अ. क्रं. ७०८८२

आ. क्रं. ८३४५

# दुसरी आवृत्ति

या आवृत्तींत पहिल्या आवृत्तींतले कांहीं निबंध पुन्हां लिहिले आहेत; निबंधांच्या संख्येंत बरीच भर पडली आहे. कांहीं निबंध जास्त विस्तार-पूर्वक लिहिले आहेत. विषयाच्या महत्त्वाप्रमाणें कमजास्त विस्तार केला आहे. 'अॅटम बॉम्बचा संदेश' हा शेवटचा निबंध 'वाङ्मय-शोभा' मासिकांत मीं लिहिलेल्या लेखाचें रूपांतर आहे. अगदीं सामान्य विद्यार्थ्यां-पासून तो विशेष विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना संग्राह्य वाटतील, अशा दृष्टीनें विविध विचारांचें संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. हे निबंध वाचतांना विद्यार्थ्यांनी हें लक्षांत ठेवावें कीं, त्या त्या विषयांवर ज्या अनेक पद्धतींनीं निबंध लिहितां येतील, त्यांपैकीं ही एक पद्धति आहे; एकमेव नव्हे. यांत-लेच विचार घेऊनहि त्याच विषयांवर विविध प्रकारें रचनाकौशल्य दाख-विण्याचा विद्यार्थ्यांनीं प्रयत्न करावा असा माझा हेतु आहे. या दृष्टीनें शेवटीं कांहीं निबंधाचे जे मुद्दे दिले आहेत त्यांचा उपयोग करावा. तोंड-पाठ करण्यासाठीं कांहीं मजकूर पुरवावा असा माझा मुळींच हेतु नाहीं.

द्वितीय आवृत्तीचा योग आल्याबद्दल माझ्या असंख्य विद्यार्थि-मित्रांचा मी आभारी आहें.

REFBK-0006847

गं. भा. निरंतर

निबंध ८५७

[ निबंधाच्या पुढचे आंकडे परीक्षेच्या वर्षांचे आहेत. ]

# अनुक्रमणिका


| | विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| | निबंध लिहिण्यापूर्वी | ... | ... | १ |
| १ | परीक्षा | ... | ... | १ |
| २ | आचार आणि विचार | ... | ... | ३ |
| ३ | जगीं सर्व सूखी असा कोण आहे | | ... | ५ |
| ४ | प्राण्यावर दया करा | ... | ... | ७ |
| ५ | एकत्र कुटुंबपद्धति | ... | ... | ९ |
| ६ | " थर्ड क्लास " | ... | ... | ११ |
| ७ | दारू आणि जुगार | ... | ... | १३ |
| ८ | शहर आणि खेडें | ... | ... | १५ |
| ९ | मला १००० रु. मिळाले तर | | ... | १८ |
| १० | लोकभ्रम ... | ... | ... | २० |
| ११ | शाळेंतील वादविवाद-संघ | ... | ... | २२ |
| १२ | रिकामपणाचा उपयोग | ... | ... | २४ |
| १३ | वरातीची मिरवणूक | ... | ... | २६ |
| १४ | गाडी सुटण्यापूर्वी— | ... | ... | २८ |
| १५ | आग ! आग ! ! | ... | ... | ३० |
| १६ | परीक्षेच्या मंडपांतील तीन तास | | ... | ३२ |
| १७ | सर्कशींतील सिंहाचें आत्मवृत्त | | ... | ३४ |
| १८ | भविष्यज्ञान इष्ट कीं अनिष्ट ? | | ... | ३६ |
| १९ | शाळेचें क्रीडांगण | ... | ... | ३८ |
| २० | वाङ्मय आणि जीवन (१९३८) | | ... | ३९ |

२१ माझा आवडता लेखक (दे. भ. शिवराम महादेव परांजपे) ४१
२२ मातेची महती ... ... ४६
२३ स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र ... ४८
२४ ग्रंथालय ... ... ... ५०
२५ इतिहासाची शिकवण ... ... ५२
२६ अतिपरिचयादवज्ञा ... ... ५३
२७ ग्रामोद्धार (१९३७) (१९४०) ५५
२८ नाटक आणि बोलपट (१९३९) ५७
२९ वर्तमानपत्रें ... ५९
३० रोजनिशी ... ... ६१
३१ रस्त्यावरील एका कुत्र्याचें आत्मकथन ... ६३
३२ सृष्टिसौंदर्यापासून मिळणारें शिक्षण ... ६४
३३ सुधारणा व सुख ... ... ६६
३४ माझा आवडता खेळ ... ... ६९
३५ सकाळची शोभा (१९३७) ... ... ७१
३६ माझ्या आठवणींतील अतिशय मौजेचा रविवार ७३
३७ फुलासंगें मातीस वास लागे ... ... ७५
३८ बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें ... ७७
३९ युद्ध कीं शांतता ? ... ... ७९
४० लहानपण दे गा देवा ... ... ८१
४१ अस्पृश्योद्धार ... ... ... ८२
४२ रहदारीचा रस्ता... ... ... ८४
४३ आरोग्य हीच संपत्ति ... ... ८६
४४ रस्त्यावरील भिकारी (१९४२) ... ८८
४५ माझ्या खिडकींतून दिसणारें जग ... ९०

REFBK-0006847

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४६ | कालाय तस्मै नमः | ... | ... | ९२ |
| ४७ | भूगोलाचा अभ्यास | ... | ... | ९४ |
| ४८ | वंदे मातरम् | ... | ... | ९७ |
| ४९ | माझी चंद्रलोकावरील सफर | ... | ... | ९९ |
| ५० | मी शिक्षणमंत्री झालों तर – | | ... | १०१ |
| ५१ | आधुनिक तरुणाची कैफियत | ... | ... | १०३ |
| ५२ | करावें तसें भरावें | ... | ... | १०५ |
| ५३ | दुरून डोंगर साजरे | ... | ... | १०८ |
| ५४ | शाळेंतला शेवटचा दिवस (१९४१) | | ... | ११० |
| ५५ | वळी तो कान पिळी | ... | ... | ११२ |
| ५६ | पोषाख आणि सौंदर्य (१९३९) | | ... | ११४ |
| ५७ | घड्याळाची कैफिकत | ... | ... | ११७ |
| ५८ | निवडणुकीचा दिवस | ... | ... | ११९ |
| ५९ | जनसेवा हीच ईश्वरसेवा (१९४०) | | ... | १२१ |
| ६० | मातृभाषेची सेवा (१९३७) | ... | ... | १२३ |
| ६१ | आदर्श पुढारी (१९४०) | ... | ... | १२५ |
| ६२ | आदर्श गृह (१९३८) | ... | ... | १२७ |
| ६३ | लष्करी शिक्षण | ... | ... | १२९ |
| ६४ | आधुनिक स्त्री (१९३९) | ... | ... | १३२ |
| ६५ | मानवी जीवनांत गप्पागोष्टींचें महत्त्व | | ... | १३४ |
| ६६ | आपले सण ... | ... | ... | १३६ |
| ६७ | यंत्र – शाप कीं वर ( १९४१ ) | | ... | १३८ |
| ६८ | जुना बाजार ... | ... | ... | १४० |
| ६९ | जुन्या कोटाचें आत्मवृत्त | ... | ... | १४३ |
| ७० | काळा बाजार (१९४५) | ... | ... | १४५ |

७१ जाहिरातबाजी (१९४५) ... ... १४७
७२ शिक्षा-पद्धतीमुळें होणाऱ्या गंमती (१९४४) ... १४८
७३ औद्योगिक शिक्षण (१९३८)... ... १५०
७४ साक्षरता-प्रसार (१९४२) ... ... १५३
७५ असाध्य तें साध्य० (१९४१)... ... १५५
७६ गुरु-सहवास (१९४२) ... ... १५७
७७ अंधानुकरण (१९४३) ... ... १५९
७८ महागाई (१९४३) ... ... १६१
७९ चातुर्यें शृंगारें अंतर (१९४६) ... १६२
८० थोर साहित्यिकाचा स्मृतिदिन (१९४४) ... १६४
८१ हवाई हल्ला (काल्पनिक वर्णन) (१९४२) ... १६६
८२ प्रकाश-नियंत्रण (१९४३) ... ... १६९
८३ खानेसुमारीचें महत्त्व (१९४१) ... १७१
८४ शारीरिक-शिक्षण-दिन (१९४५) ... १७३
८५ प्राचीन इतिहासप्रसिद्ध स्थळाचें आत्मवृत्त (दिल्ली) (१९४४) १७५
८६ शिवकालीन हेराचें आत्मवृत्त (१९४५) ... १७८
८७ स्वयंसेवक सेनेचें महत्त्व (१९४३) ... १८१
८८ १०० रु.च्या नोटेचें आत्मवृत्त (१९४६) ... १८३
८९ महाराष्ट्रांतील एका किल्ल्याचें वर्णन (तोरणा) (१९३८) १८६
९० धान्यटंचाई व ती निवारण्याचे उपाय (१९४६) १८९
९१ माझें आवडतें पुस्तक (श्यामची आई) (१९३७) १९२
९२ छत्रीची आत्मकथा (१९४०) ... १९४
९३ संप ... ... ... १९६
९४ विद्यार्थी आणि राजकारण ... ... १९९

९५ करमणुकीचीं आधुनिक साधनें... ... २०१
९६ इतिहास हें एक प्रकारचें अंजन आहे ... २०४
९७ माझें आवडतें नाटक ( एकच प्याला) ... २०६
९८ प्रवासांतील मौजा (१९४६) ... ... २१०
९९ एका संशोधकाचें चरित्र (केप्लर) ... २१३
१०० ॲटम बॉम्बचा संदेश ... ... २१६
थोडेसें मार्गदर्शन (कांहीं निबंधांचे मुद्दे) ... २२१

( १९३७ ते १९४६ या वर्षांत मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक प्रश्न-पत्रिकांत आलेले सर्व निबंध दिले आहेत. )

६६०८०. ६५७०  १०८५२

# निबंध लिहिण्यापूर्वी

मराठी ही आपली मातृभाषा आहे, या विचारानें पुष्कळ विद्यार्थ्यांना मराठीबद्दल एक खोटा आत्मविश्वास वाटत असतो आणि मराठींत सहज उत्तीर्ण होतां आल्यानें आपला तो आत्मविश्वास खरा आहे असेंहि त्यांस साहजिकच वाटतें. मातृभाषेंत नापास होणें ही खरोखरच नामुष्कीची गोष्ट आहे. परंतु मातृभाषेंत नुसतें उत्तीर्ण होणें हीहि फारशा पराक्रमाची बाब नाहीं. आपल्या मातृभाषेंत उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण होतां येणें ही खरी अभिनंदनीय गोष्ट आहे आणि अभिनंदनास पात्र होण्याइतके गुण मराठींत मिळविणारे विद्यार्थी थोडे असतात. मराठींत उत्तीर्ण होणारे पुष्कळ, परंतु अभिनंदनीय यश मिळविणारे थोडे. याचें कारण मातृभाषा म्हणून ज्या कांहीं उपजत सोयी मराठींत मिळतात त्यापलीकडे विद्यार्थी या विषयांत फारसें कांहीं कमवीत नाहींत !

मराठीच्या ज्ञानाची खरी कसोटी निबंध-लेखनांत होते. आपल्या मातृभाषेंत आपणांस एखाद्या विषयावर कांहीं विचार एकत्र जमविण्याची जेव्हां वेळ येते तेव्हां नुसती मातृभाषा म्हणून असलेल्या सोयीवर भागत नाहीं. मातृभाषेमुळें सुचलेले विचार कमी श्रमानें मांडतां येतील. परंतु वेळेवर विचार सुचण्यास, विचार करण्याची संवय लागते. निबंधाच्या वेळीं दोन तऱ्हेचें वैचारिक कार्य करावयाचें असतें. एक म्हणजे दिलेल्या विषयावर आपण वाचलें असेल, व जें पूर्वी सुचलें असेल, तें सर्व वेळेवर आठवणें आणि दुसरें म्हणजे जें आठवलें असेल त्याची विशिष्ट पद्धतीनें रचना करणें.

पहिल्यापेक्षांहि दुसरें काम जास्त महत्त्वाचें आहे निबंध लिहितांना कांहीं विद्यार्थ्यांची अशी समजूत असते कीं, दिलेल्या विषयावरचें सर्व ज्ञान आपणांस लिहून काढावयाचें आहे आणि या विचारानेंच बरेच विद्यार्थी घाबरतात, आणि या विषयावर 'काय लिहावयाचें' असा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहतो. या प्रश्नाची कांहीं विद्यार्थ्यांना एवढी भीति वाटते कीं, त्यांना माहित असलेलेंहि आठवत नाहीं. परंतु त्यांना त्या विषयावर लिहिलेला एखादा निबंध दाखविला तर मग तेच आश्चर्यानें म्हणतात : " हें

तर आम्हांस माहित होतें. " म्हणजे निबंध लिहिण्याची मुख्य अडचण असते ती विचारांची नसून ते विचार आठवण्याची व मांडण्याची असते.

आपणांस जें माहित आहे त्याची मांडणी करणें हेंच निबंधलेखनाचें मुख्य कौशल्य आहे. चार-दोन विचार कमी असले तरी हरकत नाहीं. त्या विषयावरील ज्ञानाचा कांहीं भाग मनोवेधक रीतीनें मांडणें हा मुख्य हेतु असतो.

ही मांडणी कशी करावी, या प्रश्नाचें निश्चित व पूर्ण उत्तर देणें कठीण आहे. तरी बरोबर मांडणी कशी असते हें, आपणांस आवडणारे निबंध या दृष्टीनें वाचल्याबरोबर ज्याचें त्याला सहज कळेल.

साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, व्यवहारांत बोलण्याचे जे गुण असतात ते सर्व गुण निबंधलेखनास लागतात. एकच हकीगत चार माणसें चार निरनिराळ्या तऱ्हेनें सांगतात आणि कांहीं माणसें अशा कांहीं मनोवेधकपणें सांगतात कीं, त्यांचें सारखें ऐकत रहावेसें वाटतें. ते सांगत असलेला विषय किरकोळ कां असेना ते तो श्रवणीय आणि मनोवेधक करतात! अशीं मनोवेधक बोलणीं आपण नेहमीं ऐकतों. त्यांत विशेष काय असतें.

समजा, एखाद्या माणसाचें चरित्र सांगावयाचें आहे. ३०।४० ओळींत एखाद्या जगद्विख्यात विभूतीचें चरित्र सांगावयाचें म्हणजे तें चरित्रग्रंथासारखें संपूर्ण असणें तर शक्य नाहीं. नुसतें बालपण वर्णन करतां करतांच ४० ओळी संपावयाच्या. आणि वेळहि संपावयाचा. त्या व्यक्तीची आठवण झाल्याबरोबर कांहीं ठळक प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात. ती व्यक्ति कांहीं एका विशिष्ट कार्यासाठीं प्रसिद्ध असते. कांहीं विशिष्ट गुणासाठीं तिचें नांव घेतलें जातें. 'शिवाजी' हें नांव उच्चारल्याबरोबर 'स्वराज्य' हा शब्द आपल्या मनांत येतो आणि स्वराज्यस्थापनेसाठीं त्यांनीं केलेले प्रयत्न आठवतात. त्यांतला असा एखादा प्रसंग असणारच कीं, ज्यांत शिवाजीचें 'शिवाजीपण' दिसून येतें. तो प्रसंग हीच त्या निबंधाची मुख्य मेख. तो प्रसंग हीच त्या निबंधाची खरी सुरुवात. तो प्रसंग वाचल्याबरोबर वाचकास असें वाटावें कीं, याला म्हणतात शिवाजी! आपण शिवाजीची किती तरी हकीगत वाचली आणि ऐकली असेल.

परंतु कांहीं प्रसंग मात्र खात्रीनें असे असतील कीं, ज्यांचा आपणांस कधींहि विसर पडणें शक्य नाहीं. तेव्हां चरित्रात्मक निबंधांत त्या व्यक्तीची ज्या गुणांबद्दल जगास अमरस्मृति राहिली आहे त्या गुणांचें प्रतिबिंब दाखविणारे प्रसंग निवडावेत व त्यांतल्यात्यांत एखाद्या मनोवेधक प्रसंगापासून सुरुवात करावी आणि अशा कांहीं निवडक प्रसंगांची गुंफण केली कीं, शिवाजीवर चरित्रात्मक असा उत्कृष्ट निबंध झाला. " महाराष्ट्रांत इ. स. १६३० मध्यें शिवाजी नामें एक मोठा पुरुष होऊन गेला " ही सुरुवात किती रुक्ष आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. तेंच सिंहगडचा प्रसंग, आग्र्याहून सुटकेचा प्रसंग, अफझुलखानाशीं दोन हात केल्याचा प्रसंग, अशा एखाद्या प्रसंगानें सुरुवात करून निबंध आकर्षक करतां येईल. जी चरित्रात्मक निबंधाची गोष्ट तीच सर्व निबंधांविषयीं थोड्याफार प्रमाणांत आहे. आपल्या मनावर त्या विषयाचीं अनेक स्मृतिचित्रें उमटलेलीं असतात. त्या स्मृतिचित्रांपैकीं वाचकांच्या डोळ्यांत व मनांत चटकन् भरतील अशीं स्मृतिचित्रें निबंधासाठीं जमविणें हेंच मुख्य काम आहे.

या दृष्टीनें निबंधलेखनाविषयीं कांहीं स्थूल नियम सांगतां येतील.

पहिला मुख्य नियम म्हणजे विषय वाचल्याबरोबर जें कांहीं आठवूं लागेल तें एका बाजूस भराभर टिपून काढा. विचारांचा हा पहिला भर टिपून झाला म्हणजे मग तो नीट काळजीपूर्वक वाचा. त्यांत आरंभीं घेण्यासारखा, शेवटीं सांगण्यासारखा, असे भाग निवडा. नंतर अत्यंत सामान्य असे विचार व जे कोणास सहज सुचणार नाहींत असे विचार, असे भाग पाडा. असा विचार करतां करतां निबंधाचा सांगाडा डोळ्यासमोर उभा राहतो.

निबंधाची सुरुवात हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सामान्य वाचकाच्या दृष्टीनें निबंधाकडे पहा. आपण हा निबंध लिहिला आहे, हा विचार क्षणभर बाजूस ठेवून, वाचक या दृष्टीनें त्याच निबंधाकडे पाहण्यास शिका. एखादें मासिक वाचावयास सुरुवात करण्यापूर्वी आपण निरनिराळ्या लेखांचे आरंभ आधीं चाळून पाहतों आणि मग एखादा लेख, आरंभामुळेंच आपलें मन खेंचून घेतो. तें आरंभाचें कौशल्य हें वाचकांस आमंत्रण आहे. तें आमंत्रण वाचकास खेंचून आणील असें पाहिजे. " आपण वाचन म्हणजे काय तें आधीं पाहूं या " " प्रथम वाचन म्हणजे काय तें पाहिलें पाहिजे "

असलीं वाक्यें आरंभीं पाहिलीं किंवा सुरुवातीलाच विषयाची व्याख्या दिसली कीं, तुम्हांला तरी तो निबंध वाचावासा वाटेल का? निबंधाची सुरुवात विषयाशीं तावडतोब संबंध जोडणारी अशी असावी. नमनांत मण-भर तेल जाळण्याची पद्धति अत्यंत दोषास्पद आहे.

आरंभापासून शेवटपर्यंत जे विचार असतील ते सुसंगत असावेत. द्विरुक्ति शक्य तोंवर टाळावी. निबंधांतील परिच्छेद हेहि लहान लहान निबंधच म्हणजे त्या परिच्छेदांत निबंधाचे सर्व गुण असले पाहिजेत. प्रत्येक परिच्छे-दांत एक मुख्य विचार असावा. तो विचार परिच्छेदाच्या आरंभीं सांगून त्याचें विवेचन किंवा स्पष्टीकरण नंतर सांगावें. परिच्छेदाच्या आरंभींचींच वाक्यें एकत्र केलीं तर निबंधांतील मुख्य विचारांची मालिका तयार झाली पाहिजे.

निबंधाचा शेवट अनुमानासारखा असावा. परंतु तें अनुमान भूमितीच्या प्रमेयासारखें मांडूं नये. तें अनुमान निबंधांतील विवेचनाच्या सारांशासारखें असावें. निबंधाचा शेवट वाचल्यावर आपण कांहीं तरी पूर्ण वाचलें, असें वाटलें पाहिजे.

निबंधाची भाषा हाहि एक महत्त्वाचा भाग आहे. विद्वत्ता दाख-विण्याच्या इच्छेनें कांहीं विद्यार्थी लहान तोंडीं मोठा घांस घेतात. तर कांहीं याच्या उलट, भाषा साधी असावी म्हणून, अगदीं निर्जीव भाषा लिहितात. मोजक्या शब्दांत महत्त्वाचा विचार व्यक्त करतां येणें हा भाषेचा मुख्य गुण आहे. सुभाषितांचा मान अशाच वाक्यांना मिळतो. व्याकर-णादि दोष टाळण्यासाठीं वाक्यें लहान व सुटसुटीत असावींत. भाषा ही लेखकाची खूण आहे. विचार व भाषा या दोहोंवर लेखकाच्या व्यक्ति-त्वाची छाप असते. प्रसिद्ध लेखकांच्या लेखनाचा अभ्यास केला तर असें दिसून येईल कीं, त्यांचीं चार-दोन वाक्यें वाचल्याबरोबर तावडतोब तीं वाक्यें अमक्या लेखकाचीं असलीं पाहिजेत असें ओळखतां येतें. भाषेंत हें वैशिष्ट्य व्यक्त करण्यासाठीं त्या भाषेंतील म्हणी, संप्रदाय हे माहित असले पाहिजेत.

निबंधामध्यें लेखकाचें असें व्यक्तित्व दिसलें पाहिजे. चार लोकांचे चार

विचार एकत्र रचून ठेवणें म्हणजे निबंध नव्हे. त्यांत 'आपला' असा कांहीं भाग असलाच पाहिजे. आपल्या जीवनांतले प्रसंग, आपणांस माहित असलेले प्रसंग, आपलें व्यक्तित्व दाखवितात. लौकिक विषयावरील वैयक्तिक विचार असें निबंधाचें स्वरूप असतें. निबंध म्हणजे पोपटपंची नव्हे. आपलीं स्वतःचीं अशीं कांहीं मतें असतात. तीं मतें मांडण्यासाठीं म्हणून दुसऱ्याचें उदाहरण द्यावयाचें असतें. आपलें मत सांगण्यास घाबरूं नका. मत कोणतें आहे यापेक्षां तें प्रामाणिक आहे कीं नाहीं हें महत्त्वाचें असतें. परीक्षकांस आवडेल कीं नाहीं हा विचारहि मनांत येऊं देऊं नका. परीक्षकांस पटेल कीं नाहीं हा विचार करा आणि तें आपल्या पटविण्याच्या पद्धतीवर अवलंबून असतें. जें प्रामाणिकपणें मनापासून वाटतें तें कोणाहि समंजस वाचकास पटण्यासारखें मत असतें. आपलें मत 'ओळखणें' ही मात्र फार महत्त्वाची बाब आहे. आपण पुष्कळ वेळां आपलें म्हणणें सांगण्याच्या ऐटीनें, दुसऱ्याचेंच म्हणणें जोरजोरानें सांगत असतों !

हें आपलें मत तयार होण्यासाठीं आपल्या भोंवतालचें जीवन लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. डोळे आणि कान हीं आपल्या मेंदूचीं द्वारें आहेत. तीं मुद्दाम लक्षपूर्वक, हेतुपुरस्सर उघडल्याखेरीज मेंदूपर्यंत ज्ञान पोहोंचत नाहीं. आपले कान तर नेहमींच उघडे आणि डोळेहि किती तरी वेळ उघडे असतात तरी आपल्या भोंवतालच्या किती तरी गोष्टी आपणांस ऐकूं येत नाहींत आणि किती तरी घडामोडी दिसत नाहींत. कारण आपण त्या नीट 'ऐकत' नाहीं आणि 'पाहत' नाहीं.

उदाहरणार्थ, रेल्वे स्टेशनवर दिसणारें दृश्य हा विषय घ्या. रेल्वे स्टेशनवर आपण पुष्कळ वेळां गेला असाल, परंतु तरी तें दृश्य आपणास पूर्णपणें माहित नसतें. तें दृश्य निबंध लिहिण्यापूर्वी एकदां पाहून या. किती तरी फरक वाटेल तुम्हांला. तुम्ही लक्षपूर्वक पाहूं लागलांत म्हणजे तुम्हांला कळेल कीं, किती तरी गोष्टी तुम्हीं स्टेशनवर येऊनहि पाहिल्या नव्हत्या. आणि किती गमतीदार गोष्टी असतात त्या ! आतां तें पाहिल्यावर लिहावयास बसा. पाहिलेलें दृश्य अगदीं हुबेहूब डोळ्यांसमोर उभें राहिलें पाहिजे, म्हणजे तें तुमचें वर्णन वाचणाऱ्याच्या डोळ्यांसमोरहि उभें राहील.

वर्णनपर निबंधांतलें मुख्य सौंदर्य हेंच आहे कीं, ते वाचतांना वर्ण्यविषय वाचकाच्या डोळ्यांसमोर उभा राहिला पाहिजे. समारंभाचीं, प्रवासाचीं, सर्वसामान्य प्रसंगांचीं, संमेलनाचीं, बक्षिस-समारंभाचीं, देखाव्याचीं वगैरे वर्णनें लिहिण्याच्या कामीं हीच गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

पाहणें आणि निरीक्षण यांत फरक आहे. वर्णनपर निबंध लिहिण्यांत उत्तम यश संपादण्यासाठीं निरीक्षणाची संवय पाहिजे. पहावयाचें ठरविल्या-खेरीज पाहण्याची 'दृष्टि' येत नाहीं व पाहिल्याखेरीज निरीक्षणकला येत नाहीं. प्रत्येकाच्या बुद्धींत फरक असला तरी डोळे व कान यांचें सामर्थ्य सर्वांचें जवळ जवळ सारखेंच असतें. तेव्हां वर्णनपर निबंधाच्या बाबतींत तरी कोणासहि उत्तम यश मिळवितां आलें पाहिजे, आणि तें मिळविण्याचा खरा मार्ग म्हणजे लिहिण्यासाठीं पहावें व पाहिलेलें चटकन् लिहावयास बसावें.

वर्णनपर निबंध वाचकाच्या दृष्टीनें तपासून पहावा. दुसऱ्यास तें वर्णन कसें वाटेल हा विचार करावा. प्रवासवर्णनांत प्रवासाच्या तयारीचें वर्णन करण्यांतच पुष्कळ विद्यार्थी जागा संपवतात. असे फराळाचे डबे घेतले नि तशा मोटारी निघाल्या, या गोष्टीस त्या प्रवासवर्णनांत फार थोडें महत्त्व आहे. त्यापेक्षां प्रवास-विषयाची विशेष माहिती व प्रवासांतील कांहीं मजे-दार स्मरणीय प्रसंग यांनीं वाचकास जिव्हाळा वाटतो. ताजमहालचें वर्णन करतांना आग्र्यापर्यंतचा प्रवास या गोष्टीला फार थोडी जागा दिली पाहिजे. वाचकास रेल्वेची माहिती नको असते. बसल्याजागीं त्याच्या डोळ्यांसमोर ताजमहाल उभा राहिला पाहिजे आणि तें करण्यासाठीं ताजमहाल स्वतः निरखून पाहिला पाहिजे. त्या निबंधांत शहाजहानच्या कारकीर्दीच्या वर्णनाची जरूरी नाहीं किंवा मुमताजमहालच्या पूर्वचरित्रालाहि स्थान नाहीं. एकदम ताजमहालसमोर उभें राहून सुरुवात करतां आली पाहिजे. आणि मग जणूं काय आपण आपल्या प्रिय वाचक मित्रास बरोबर घेऊन ताजमहालच्या सौंदर्याचें एक एक दालन उघडून दाखवीत आहोंत अशा भूमिकेवरून निबंध लिहितां आला पाहिजे. निबंधाचा समारोप करतांना वाचकाच्या मनावर ताजमहालाच्या सौंदर्याची स्पष्ट छाया उमटली पाहिजे.

चिंतनपर निबंध लिहिणें थोडें अवघड असतें. तो लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी ' चिंतन ' आवश्यक असतें. कांहीं विषय असे असतात कीं, त्यांत दोन बाजू असतात. त्या बाजू कांहींशा परस्परविरोधी असतात आणि त्यांत आपणास आपली बाजू निवडावी लागते. आपली बाजू–आपलें मत–निश्चित ठरविल्यावर त्यास विरोधी बाजूचे आक्षेप काय आहेत ते समोर ठेवावेत आणि त्यानंतर त्या प्रत्येक आक्षेपाचें आपण कोणच्या उत्तरानें खंडन करावयाचें तें मांडावें. अशा रीतीनें वादग्रस्त विषयाचे तीन भाग करावेत: ( १ ) आपलें मत व आधार ( २ ) विरुद्ध बाजूचें मत व समर्थन ( ३ ) विरुद्ध मुद्यांचें खंडन. परंतु खंडन करतांना किंवा आपल्या बाजूचें समर्थन करतांना त्यांत एकांडेपणा असूं नये. विरुद्ध बाजूचीं मतें सर्वस्वीं चुकीचीं आहेत व आपलीच बाजू पूर्णपणें बरोबर आहे असें मांडूं नये. कारण तें खरें नाहीं. वादग्रस्त विषयांत प्रत्येक बाजूस कांहीं निश्चित सत्य असतें म्हणून तर तेथें वाद उत्पन्न होतो. आपण त्या वादांत शक्य तोंवर समन्वय करण्याचा प्रयत्न करावा. दोन्ही पक्षांत सामान्य भूमिका शोधावी व त्या भूमिकेचें वर्णन करून समारोप करावा.

कांहीं निबंधांत वृत्तांत सांगावयाचा असतो. तो वृत्तांत प्रत्यक्ष झालेला असेल किंवा नसल्यास तो झालेला आहे अशी कल्पना करून निबंध लिहावयाचा असतो. यांत समारंभ, प्रवास, प्रसंग, ऐतिहासिक व्यक्ति वा प्रसंग इत्यादींचा समावेश होतो. अशा प्रकारच्या निबंधांत कालानुक्रम पाळावा. ज्या क्रमानें प्रसंग घडला असेल त्या क्रमानें मांडावा. परंतु आरंभ करतांना मात्र त्या प्रसंगांतील एखाद्या संस्मरणीय भागापासून आरंभ करावा. मग तो भाग अमक्या प्रसंगीं झाला अशी सुरुवात करून यथाक्रम ' कथन ' करावें. कथनपर निबंधांत स्वतंत्र विचाराचें काम फार थोडें असतें. या दृष्टीनें हा निबंधलेखनप्रकार सोपा आहे खरा; परंतु त्याबरोबर त्यांत कंटाळवाणेपणाची मोठी भीति असते. तो कंटाळवाणेपणा घालविण्यासाठीं एकंदर हकीकतींतील सर्वांना मनोरंजक वाटेल असा भाग निवडतां आला पाहिजे. यासाठीं पुष्कळ हकीकत माहीत पाहिजे. माहितीचा सांठाच मुळांत थोडा असेल तर त्यांत निवड तरी काय होणार ? या निबंधाच्या प्रकारांत अवलोकनशक्तीची खरी पारख होते.

अशा रीतीनें निबंधाच्या मुख्य प्रकारांची स्थूल लेखनपद्धति सांगितली. पण निबंध-लेखन हें कांहीं गणितासारखें एकमुखी, एकजिनसी शास्त्र नाहीं ! तेव्हां निबंध कसा लिहावा याविषयीं 'नियम' असे असूं शकत नाहींत. आपण आपल्या निबंधाकडे वाचकाच्या दृष्टीनें पहावें म्हणजे आपलें लिहिणें वाचनीय आहे कीं नाहीं हें ठरवितां येईल, एवढाच सर्व-साधारण नियम सांगतां येईल.

ही वाचनीयता अनेक मार्गांनीं उत्पन्न होते. एकाच विषयावर अनेक तऱ्हेनें निबंध लिहितां येतात. असे निबंध अनेकांनीं लिहिलेले आहेत आणि विद्यार्थ्यांस तरी ते सर्व वाचनीय आहेत !

मराठींत असे नामवंत निबंधलेखक आहेत. त्यांचे निबंध या दृष्टीनें वाचावेत. फडके, खांडेकर, दांडेकर, काणेकर इत्यादि लेखकांचे निबंध-संग्रह वाचा. अगदीं साधे विषय परतु किती विलक्षण मोहिनी आहे त्या लिहिण्यात ! त्यांची सुरवात पहा, गुंफण पहा, शेवट पहा. एखाद्या निबंधाचें नुसतें शीर्षक वाचा आणि तो वाचण्यापूर्वी स्वतः एक टांचण करा. मग तें टांचण तुम्हीं योजलेली रूपरेखा समोर ठेवा आणि निबंध वाचा. दोहोंत तुम्हांस कितीतरी फरक दिसेल. विषय एकच, माहितीहि जवळ-जवळ सारखीच; परंतु या लेखकांचे निबंध कितीतरी पटीनें जास्त मनो-वेधक वाटतात. ही मनोवेधकता कशी येते हें एकाच विषयावरील स्वतःचें व दुसऱ्याचें लेखन तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास कळेल.

मुख्य भांडवल पाहिजे तें अवलोकनाचें. ज्याला भोंवतालचें जग चांगलें पाहतां येतें त्यालाच चांगलें लिहितां येईल ! कांहीं गोष्टी डोळ्यांनीं पहावयाच्या असतात व कांहीं मनानें पाहावयाच्या असतात.

अशा रीतीने निबंधलेखनाचें 'तंत्र' आहे. सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, कोणच्याहि निबंधांत, लेखकाच्या अवलोकन, ग्रहण वा स्मरण व विवेचन या तीन शक्तींची पारख असते. आपण चांगलें पाहूं शकतों, पाहिलेलें अचूक लक्षांत ठेवूं शकतों आणि लक्षांत ठेवलेलें दाख-वितांना त्यांत चांगली निवड व मांडणी करूं शकतों, हें वाचकांस दाखवावयाचें असतें.

---

# मराठी निबंध-मंजूषा

## १ : : : परीक्षा

परीक्षेसाठीं तयारी करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला 'परीक्षा' म्हटली कीं, थोडीफार तरी धास्ती वाटते. परीक्षेच्या मंडपाकडे जाणाऱ्या मोठमोठ्या बुद्धिवंतांच्या सुद्धां मनांत "काय होईल कोणास ठाऊक!" हा विचार येऊन जातो. त्यांची तयारी नि आत्मविश्वास कांहीं क्षण तरी हादरतात! प्रत्येक विद्यार्थी–विशेषतः हिंदी विद्यार्थि–परीक्षा म्हणजे एक नशीबाचा खेळ समजतो. कारण २॥–३ तासांच्या मर्यादेंत त्याला वर्षभर केलेल्या अभ्यासाचें चीज करून दाखवावयाचें असतें. तेथल्या तेथें त्याला कितीतरी गोष्टी आठवाव्या लागतात आणि दुर्दैवानें कांहीं न आठवलें, विषयाचा बारीकसा भागहि विसरला तर तेवढ्यावरून एखाद्या वेळीं तो सर्वस्वीं नालायक ठरावयाचा! एखादें 'शीत' परीक्षकास कच्चें लागलें तरी तेवढ्यावरून तो सर्व, 'भाताची' परीक्षा करतो. अशा रीतीनें शितावरून भाताची परीक्षा घेण्याची ही पद्धति आहे. यांत पुष्कळ वेळां बुद्धिवंतहि गडगडतात आणि येर–गबाळ सुटूं शकतात!

आपल्या परीक्षापद्धतीचे हे वरील दोष सहज दिसतात. तरीहि 'परीक्षा' ही पद्धतिच त्यामुळें त्याज्य ठरत नाहीं. परीक्षा या अत्यंत उपयोगी असतात. गुणांचें मापन करणें व व्यक्ती-व्यक्तींत गुणानुक्रम ठरवणें हें त्यांचें मुख्य कार्य आहे. नाहींतर माणसामाणसांत गुणानुक्रम लागणार कसा? माणसांची निवड करण्याचें परीक्षा हें एकमेव साधन आहे आणि गुणावगुणांचें ज्ञान कळण्याचें तें एकमेव माध्यम आहे. प्रत्येक माणसाची आमूलाग्र पारख करून अनुभवानें त्याचा दर्जा ठरविण्याइतका वेळ व्यवहारांत नसतो. अशा वेळीं 'उदाहरणार्थ' त्यांची माहिती मिळवून काम भागवणें जरूर असतें. व्यवहारांत शितावरूनच भाताची परीक्षा होते. भात तयार करण्याची पद्धति निर्दोष असली तर शितावरून केलेली परीक्षा सहसा चुकत नाहीं.



रा. ९० ८८८२

परीक्षेचा अभ्यासक्रम म्हणून निदान त्या त्या विषयाचा कांहीं भाग तरी विद्यार्थी चांगला तयार करतात. कोणत्या का हेतूनें होईना केलेलें अध्ययन मनावर संस्कार केल्याशिवाय रहात नाहीं. परीक्षेमुळेंच कित्येक-जण अध्ययन करीत असतात. त्यांना परीक्षेमुळेंच सक्तीनें ज्ञानामृत प्यावें लागतें. नाहीं तर केवळ ज्ञानलालसेनें अध्ययन करणारे किती लोक निघतील! परीक्षा नि परीक्षक असें म्हणूं शकतील कीं,

" आम्हांला बगळा गतप्रभ क्षणीं होतील शालागृहें । "

विद्यार्थ्यांनीं केवळ परीक्षार्थी म्हणून अध्ययन करूं नये. परीक्षेंत 'चान्स' म्हणून मिळालेला विजय हा बेगडी विजय होय. तो विजय अस्सल नसतो. जें यश आपणांस अभिमानानें, आत्मविश्वासानें, निःसंकोचपणें मिरवितां येईल तेंच खरें यश. श्रमानें मिळविलेलें यश हें जिवंत यश होय. अध्ययनाच्या श्रमानें, ज्ञानाच्या खऱ्या कसोटीनें मिळालेलें यश हें खरें यश होय. तेव्हां परीक्षा हें जीवितसर्वस्व मानूं नये. परीक्षेंतील यशापयशाच्या वेडानें शिक्षणाच्या मूलहेतूची हेळसांड करूं नये. आपल्या निसर्गदत्त सामर्थ्याची जाणीव, जोपासना व वाढ हा शिक्षणाचा खरा हेतु आहे. ४।२ 'क्रमिक' पुस्तकांतील गाळीव पानें घोकून खुबीनें तीं वेळेवर उतर-विण्याची धडपड केल्यानें ही वाढ होत नाहीं. अध्ययनाचा आनंद स्वयं-स्फूर्त व स्वयंसिद्ध असला पाहिजे. तो ज्ञानाच्या जाणिवेनें होतो. गुणांच्या संख्येनें होत नाहीं.

ज्ञानासाठीं अध्ययनाची गोडी उत्पन्न करून परीक्षापद्धतींतील 'चम-त्कार' कमी करण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. परीक्षेमध्यें आपलें सर्व ज्ञान कसोटीस लागत आहे, आपलें सर्व बौद्धिक वैभव दाखविण्याची ही संधि आहे, अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनांत उत्पन्न होईल अशा पद्ध-तीनें परीक्षा घेतली पाहिजे. परीक्षेची पद्धति चमत्कारमय असली तर विद्यार्थ्यांच्या मनांत अध्ययनाची हौस टिकत नाहीं. तेव्हां विद्यार्थ्यांत ज्ञानाभिलाषा व ज्ञानोपासना वाढविण्यासाठीं परीक्षापद्धति अत्यंत शास्त्र-शुद्ध असली पाहिजे.

# २ : : आचार आणि विचार

'कळतें पण वळत नाहीं' अशी एक अतिशय अर्थपूर्ण म्हण आहे आणि त्या म्हणीच्या खरेपणाचा अनुभव आपणांस पदोपदीं येतो. ज्ञानाच्या बाबतींत आपण कितीतरी प्रगति करतों. चांगले विचार लहानपणापासून आपल्या मनांत साठविले जातात. उदा० 'सत्य सदा बोलावें,' 'सत्यमेव जयते, सत्यान्नास्ति परो धर्मः ।' इत्यादि वचनें आपणांस अगदीं लहानपणींच माहीत असतात. सत्यधर्माप्रमाणें वागणाऱ्यांचीं चरित्रेंहि आपण वाचतों. तरी स्वतः सत्याचरण करण्याचा हजारों वेळां निश्चय करूनहि आपल्याला तें नेहमींच जमतें असें नाहीं ! कळतें पण वळत नाहीं !

ज्यांना तें जमतें, ज्यांना आपले विचार आचारांत आणतां येतात ते जगांत वंदनीय ठरतात. 'बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥' हा उपदेश जग अतिशय प्रामाणिकपणें पाळीत आहे. जगानें वंदनीय ठरविलेलीं माणसें आचार-श्रेष्ठतेनेंच वंदनीय ठरलीं आहेत. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर इत्यादि साधुसंत, शिवाजीसारखे राष्ट्रोद्धारक, टिळक, आगरकर यांच्यासारखे राष्ट्रपुरुष, आणि समाजसेवक ज्या काळीं ज्या समाजांत होऊन गेले त्या काळीं त्याच समाजांत त्यांच्यापेक्षांहि विद्वान् असलेलीं माणसें होतीं, परंतु तरी ते विद्वान्, लोकांना इतके वंदनीय वाटले नाहींत. तर आचारसंपन्न असे हे थोरपुरुषच वंदनीय वाटले. याचें कारण विचारापेक्षां आचार हेंच खरें भूषण आहे. विचार आचारांत आणणें हीच खरी कसोटी आहे.

जे विचार आपल्या आचरणावर परिणाम करतात तेच खरे जिवंत विचार होत. ज्या विचारांचें आपल्या आचारांत प्रतिबिंब दिसत नाहीं ते विचार आपल्या डोक्यांत असले काय किंवा पुस्तकांत असले काय सारखेच.

सद्विचार आचरणांत आणण्यास कांहीं तपश्चर्या करावी लागते. ती तपश्चर्या आयुष्यभर करावी लागते. कारण सुखाच्या दिखाऊ स्वरूपास भुलून कांहीं मोह मनास अनाचाराकडे खेचीत असतात आणि जी गोष्ट वाईट आहे, अनाचरणीय आहे असें आपणांस स्पष्ट कळत असतें त्या

गोष्टींकडे जाणूनबुजून आपलीं पावलें वळूं लागतात ! विवेकबुद्धि आपणास मार्ग दाखवीत असते, सावध करीत असते तरी आपण त्या सावधगिरीच्या सूचनेला धुडकावतों आणि विवेकबुद्धीला धुडकावण्याची संवय लागली कीं, कळणें आणि वळणें, आचार आणि विचार यांत अंतर पडूं लागतें.

विद्वान् म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या माणसांच्याहि वर्तनांत आपणांस त्यांच्या ज्ञानास विसंगत असें आचरण झाल्याचा एखादा प्रसंग दिसला, तर त्यांच्या विद्वत्तेविषयीं मनांत वाळगलेला आदर ढांसळतो. यावरून आपण विचारापेक्षां आचारास किती महत्त्व देतों हें स्पष्ट दिसतें. सदाचारी माणसाचे ठिकाणीं ज्ञानाची थोडीशी उणीव दिसली तर त्यामुळें त्याच्या-विषयींच्या आदरांत फरक पडत नाहीं. कारण ज्ञान हें अमर्याद आहे; त्यामुळें तें पूर्ण आहे कीं नाहीं हें मोजण्याची निश्चित कसोटी नाहीं. परंतु सदाचाराचें स्वरूप निश्चित आणि शाश्वत आहे. ज्ञानाच्या प्रांतांतील कांहीं गोष्टींचें सत्यासत्यत्व बदलत असतें. ज्ञानाच्या बाबतींतलीं प्रमेयें आणि सिद्धांत बदलतात. काल अज्ञात ठरलेली गोष्ट उद्यां ज्ञानांत जमा होईल. परंतु हजारों वर्षांपूर्वी जो आचार वंदनीय ठरला तो अनंत कालपर्यंत वंदनीय राहणार यांत शंका नाहीं.

सदाचाराचें स्वरूप इतकें निश्चित आणि शाश्वत असूनहि सदाचार ही एक तपश्चर्येची बाब झाली आहे. याचें कारण विचार मिळाविणें सोपें आहे, परंतु ते आचरणें अत्यंत कठीण आहे. म्हातारपणींहि कांहीं नवीन विचार संपादितां येतील परंतु आचरणाचें वळण प्रौढपणीं बदलतां येत नाहीं.

यासाठीं विद्यार्थिदशेंत ज्ञानापेक्षांहि चारित्र्य-संवर्धनाचें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्ञानापेक्षां शील मोठें आहे. किंबहुना जें शीलांत रूपांतर पावतें तेंच खरें ज्ञान ! मन व शरीर या दोहोंचीहि घडण विद्यार्थिदशेंत होत असते. यासाठीं ज्ञानाबरोबर संवयींचें सामर्थ्य वाढविलें पाहिजे. निश्चय पाळण्याची संवय लहानपणापासून ठेवली तरच कळणें आणि वळणें यांतील अंतर कमी होत जाईल आणि ज्ञानाचें सार्थक झाल्यासारखें होईल ! हें कार्य करण्याचा योग्य काळ म्हणजे विद्यार्थिदशा. एका सत्क-वीनें म्हटलें आहे.—

“ बालपणीं बालांची कोमल, तरुतुल्य बुद्धि वांकेल । ”

---

## ३ : " जगीं सर्व सूखी असा कोण आहे ? "

या प्रश्नाचें उत्तर सर्वजण एकच देतील कीं, " कोणी नाहीं ! " आणि त्याच वेळीं आपण सर्वस्वी सुखी नाहीं याबद्दलच सर्वत्र चाललेली मोठी तक्रारहि ऐकूं येते. याचा अर्थ जें जगांत कोणास लाभलें नाहीं तें आपणांस हवें अशी हांव मनुष्य बाळगीत आहे आणि कोणास मिळालें नाहीं तें आपणांस मिळालें नाहीं म्हणून तो असमाधानी आहे. असें विसंगत वर्तन कित्येकांच्या हातून होत असतें; याचें कारण त्यांची सुखाची कल्पनाच चुकलेली असते. आपण सुखी नाहीं—आपणांस सुख मिळत नाहीं—अशी ओरड करण्यापूर्वी आपली सुखाची कल्पना आपण तपासून पाहिली पाहिजे.

सामान्यतः पैसा हें सुखाचें मुख्य साधन समजलें जातें. सुखाबद्दल ओरड करणारे अप्रत्यक्षपणें पैशाबद्दलची हाकाटी करीत असतात. पैशाच्या अभावीं दारिद्र्यामुळें ज्यांना अहोरात्र अनंत यातना सोसाव्या लागतात. त्यांची पैशाबद्दलच हाकाटी योग्य आहे. परंतु जेव्हां पैसेवालेहि पैशासाठींच धरपड करतांना दिसतात त्या वेळीं सुखाची कल्पना चुकलेली आहे असें दिसून येतें. किती पैसा मिळाला म्हणजे मनुष्य सुखी होईल याचें उत्तर अद्याप सांपडलें नाहीं. कारण पैशामागें धांवणारे आजन्म धांवतच असतात. तेव्हां केवळ पैसा हेंच सुखाचें साधन आहे असें म्हणतां येणार नाहीं.

जगाच्या दृष्टीनें अत्यंत दरिद्री असलेलेहि अतिशय समाधानी व आनंदी दिसतात. जगांतले साधु, समाजसेवक, धर्मोपदेशक, हे अत्यंत निर्धनावस्थेंतहि पूर्ण समाधानी होते आणि पायावर संपत्ति लोळण घेऊं लागल्यावरहि त्यांनीं त्या संपत्तीचा लोभ बाळगला नाहीं. जनसेवा—आमरण जनसेवा—हेंच त्यांच्या सुखाचें मुख्य साधन होतें. आजहि असे थोर पुरुष आहेत.

अशा उदाहरणांवरून आपणांस असें दिसून येईल कीं, सुख हें साधनापेक्षां समाधानावर अवलंबून असतें. मनाचें समाधान हेंच सुखाचें मुख्य

साधन आहे. तें समाधान ज्याला मिळवितां आलें तो जगांत सुखी ठरतो. हें समाधान घेण्यापेक्षां देण्यानें, उपभोगापेक्षां त्यागानें मिळतें. चार पैशांचा कांहीं गोड जिन्नस घेऊन जें समाधान वाटेल त्यापेक्षां ते चार पैसे अन्नावांचून तरफडणाऱ्या एखाद्या भिकाऱ्याला देऊन त्याच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसेल तो आनंद पाहण्यांत जास्त समाधान आहे. आपण प्रामाणिकपणें श्रम करून आपली भाकरी मिळवीत आहोंत असें ज्याचें मन ग्वाही देतें त्या मनुष्याला मिळणारें समाधान, आपण मजुरांचें रक्त आटवून त्यांच्या श्रमावर जगत आहोंत अशी टोंचणी ज्याच्या मनाला आहे त्या धनिकाच्या सुखापेक्षां हजारों पटीनें मोठें आहे.

समाधानी वृत्तीचा अर्थ माणसानें दैववादी व्हावें, प्रयत्न न करतां 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें' असा नाहीं. प्रयत्नवाद आणि हांवरेपणानें केलेली धरपड यांत फरक आहे. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं प्रामाणिक-पणें श्रम करणारा प्रयत्नवादी अपयश आलें तरी समाधानी राहतो. परंतु लोभाच्या पायीं बऱ्यावाईट मार्गाचा अवलंब करणारा आपल्या कल्पने-प्रमाणें यशस्वी झाला तरी त्याला समाधानाचें सुख कधीं लाभणार नाहीं.

एखाद्या आशेचा पाठलाग करण्यापूर्वीं आपण या सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे. ती आशा आपण कशासाठीं बाळगीत आहोंत ! ती आपणांस मनापासून वाटत आहे कीं, इतरांचें पाहून आपल्या मनांत कल्पना आली आहे ? ती आशा पूर्ण करण्याचें आपल्या स्वतःच्या ठिकाणीं सामर्थ्य आहे कीं नाहीं ? ती आशा पूर्ण करण्यासाठीं आपण जे उपाय योजिले आहेत त्यांत इतरांचें विनाकारण अकल्याण होत आहे काय ? इत्यादि गोष्टींचा विचार केला तर आपल्या मनांतल्या किती तरी तळमळी आपोआप दूर होतील आणि आपण वेडेपणा करण्याच्या बेतांत होतो असें कळून येईल. आणि तो वेडेपणा पूर्ण झाला नाहीं याबद्दल दुःख वाटण्याऐवजीं तो आधीं कळला याबद्दल आनंदच वाटेल.

जगीं सर्व सुखी असा कोण आहे ? याचें उत्तर, आतां 'कोणी नाहीं' असें देण्याऐवजीं समाधान व प्रयत्नवाद हे ज्यांच्या ठिकाणीं आहेत ते

सर्वस्वी सुखी आहेत असें द्यावें लागेल. असे सुखी लोक जगांत फार थोडे आहेत आणि ते आपल्या उदाहरणांनीं इतरांस सुखाचा मार्ग दाखवीत आहेत.

'जगीं सर्व सुखी असा कोण आहे' असा प्रश्न विचारणारे समर्थ रामदास हे स्वतःच या प्रश्नाचें उत्तर देत आहेत कीं, जे त्यांच्यासारखे आहेत ते निःसंशय सुखी आहेत.

---

## ४ : : : प्राण्यांवर दया करा

शाळेंत अगदीं आरंभीं गुरुजी जो उपदेश करतात त्यांत 'प्राण्यांवर दया करा' हा एक उपदेश असतो. प्राण्यांवर दया करण्याची शिकवण माणसाला अगदीं लहानपणापासून मिळते आणि मोठेपणींसुद्धां जीवदया-संघासारखे संघ हाच उपदेश करीत असतात. दिसावयास अगदीं साधी गोष्ट परंतु माणसाला ती किती शिकवावी लागते! कानीं कपाळीं हा उपदेश येत असूनहि करमणूक म्हणून, किंवा लहर म्हणून प्राण्यांचा छळ करण्याचे प्रकार चालू आहेतच.

जुन्या वाङ्मयांत एका घोड्याची एक गोष्ट आहे. एका शहरांत तेथील राजानें कोणालाहि अन्यायाविरुद्ध सहज दाद मिळावी म्हणून भर बाजारांत एक घंटा बांधून ठेवली. ती वाजल्याबरोबर राजाचे न्यायाधीश घंटा वाजविणाऱ्याची तक्रार ऐकून न्याय देत. एक दिवस एका घोड्यानें ती घंटा वाजविली. न्यायाधीश जमा झाले आणि त्यांनीं घोड्याची तक्रार ऐकून घेतली. घोड्याची तक्रार अशी होती कीं, मी म्हातारा झाल्यामुळें माझ्या मालकानें मला सोडून दिलें आणि मी अन्नावांचून मरत आहें. तेव्हां इतक्या दिवस केलेल्या श्रमाचा मोबदला म्हणून मला मालकानें म्हातारपणीं, पोसलें पाहिजे. न्यायाधिशानें घोड्याच्या मालकास बोलावून त्याला घोड्याचें पोषण करण्याची आज्ञा केली आणि घोड्याचा छळ केल्याबद्दल शिक्षाहि केली!

त्या घोड्याप्रमाणें जर आपल्या भोंवतालच्या प्राण्यांनीं तक्रारी मांडावयास सुरवात केली तर आपल्यापैकीं कित्येक जण शिक्षेस पात्र ठरतील. कारण, कारण नसतांना मुक्या प्राण्यांचा छळ करणें ही एक आपली करमणूकच झाली आहे. खेळ म्हणून तळ्यांतल्या बेडकांना दगड मारणारीं मुलें फक्त गोष्टीच्या पुस्तकांतच आहेत असें नाहीं. रस्त्यानें एखादें कुत्रें जात असलें कीं, त्याला दगड मारणें हा तर मुलांचा मोठा आवडीचा प्रकार आहे. हातांतील कुऱ्हाड गमतीनें वडिलांच्या झाडावर चालविणारा जॉर्ज वाशिंग्टन चूक कळल्याबरोबर शहाणा झाला, याबद्दल आपण त्याची वाहवा करतों, परंतु आपण स्वतः तशाच चुका वारंवार करीत असतों.

घरीं उपयोगी जनावरें बाळगणारे लोक जनावरांकडून वाटेल तसें काम करून घेतात, परंतु त्यांच्या खाण्यापिण्याची मात्र पर्वा करीत नाहींत. दिवसभर त्यांना राबवावयाचें आणि काम संपलें कीं, एकाद्या पडीत जागेंत कोंडून टाकून कांहीं तरी शिळेंपाकें त्यांच्यापुढें टाकावयाचें; आणि अशी उपासमार होत तीं निरुपयोगी झालीं कीं, तीं म्हातारी झालीं म्हणून कसायाकडे पोहोंचवावयाचीं हा व्यवहार माणसाच्या पशुवृत्तीचाच निदर्शक नाहीं का ! उपयुक्त जनावरांना काळजीपूर्वक खाणेंपिणें दिलें तर तीं माणसाची जास्त सेवा करतील, त्यांत आपलाच स्वार्थ साधेल, इतका साधा विचारहि जनावरांचे मालक डोक्यांत आणीत नाहींत.

हौस म्हणून पशुपक्ष्यांचा छळ करणें हा क्रूरपणाचा आणखी एक प्रकार आहे. पिंजऱ्यांत ठेवलेले पशुपक्षी हे याची साक्ष देतील. कांहीं पशुपक्षी सुंदर दिसतात आणि गरीब असतात हाच जणू काय त्यांचा अपराध समजला जातो आणि त्यामुळें त्यांस आजन्म बंदिवास पत्करावा लागतो. मजेखातर गरीब पशुपक्ष्यांस अत्यंत क्रूरपणें वागविणारा मनुष्य स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं परमेश्वराची प्रार्थना करतो. परंतु परमेश्वर मनांतल्या मनांत हंसत असेल आणि म्हणत असेल " आधीं दुसऱ्यावर दया करा म्हणजे मी तुमच्यावरहि दया करीन."

"प्राण्यांवर दया करा" हें आपणच आपल्याला शिकविण्याची जरूरी आहे. गरीब बिचारे मुके प्राणी माणसांनीं केलेला छळ मुकाट्यानें सोशीत आहेत. इतकेंच नव्हे, तर कित्येक वर्षापासून मनुष्य त्यांचा छळ करीत असूनहि त्यांनीं माणसाची सेवा करण्याचें व्रत चालूच ठेवलें आहे. गाईंना कसाई मारतात म्हणून गाईच्या जातीनें कधीं संप केला आहे का? घोड्यांना आपण चाबकानें बडवतों तरी घोड्यांच्या जातीनें कधीं प्रतिकार केला आहे का? हाडें निघेपर्यंत बैलांकडून शेतकरी काम करून घेतात तरी बैलांनीं आपल्या मानेवरचें जूं संतापून कधीं फेंकून दिलें आहे का?

माणसानें आपल्या शहाणपणाचा आणि सामर्थ्याचा उपयोग पशुपक्ष्यांना क्रूरपणानें वागविण्यांत करावा हें त्यांच्या श्रेष्ठपणास कमीपणा आणणारें आहे. हा कलंक दूर करण्यासाठीं सर्व लहानथोरांनीं स्वतःसच शिकविलें पाहिजे कीं, "प्राण्यांवर दया करा."

## ५ : : : एकत्र कुटुंबपद्धति

एकत्र कुटुंबपद्धति हा हिंदुसमाजाचा एक विशेष आहे. मुलांबाळांनीं भरलेलें घर हें या समाजाचें एक भूषण आहे. संतति ही दैवी संपत्ति आहे अशी हिंदु लोकांची दृढ श्रद्धा आहे.

एकत्रकुटुंबपद्धतीचा उगम मानवी समाजाच्या प्रारंभकाळींच आपणांस सांपडेल. ज्या वेळीं मनुष्यास भोंवतालच्या सृष्टिधर्मांचा परिचय नव्हता, आपल्या जीवनाच्या, निसर्गात असलेल्या सोयींचें ज्ञान नव्हतें, त्या काळीं मनुष्यें एक प्रकारें कळप करून, संघशक्ति जमवून आपलें रक्षण करीत असत. कुटुंबांतील समर्थ अशा एक किंवा अनेक व्यक्ति आपल्या सामर्थ्यानें इतरांस संरक्षण देत असत आणि आत्मरक्षणास असमर्थ असलेले त्या संघनायकाचें श्रेष्ठत्व सर्वस्वीं मानीत असत. आश्रितांसाठीं स्वतःच्या प्राणाचीहि पर्वा न करणाऱ्या त्या संघनायकास संघांतील व्यक्तीस देहांताचीहि शिक्षा करण्याचा अधिकार असे.

एकत्रकुटुंबपद्धतीचा उगम या संघजीवनांत आहे आणि हा विशेष हिंदुसमाजांतच प्रामुख्यानें शिल्लक राहिला आहे. एकत्रकुटुंबपद्धतींत लहान लहान कुटुंबांचा समावेश होतो. तेथें घरांतील मुलगे, नातू, पणतू इत्यादि आपापलें वैयक्तिक व वैवाहिक जीवन मुख्यतः त्या कुटुंबांतील मुख्य व्यक्तीच्या छत्राखालीं घालवीत असतात. घराचें अत्यंत रम्य स्वरूप आपणांस येथें पहावयास सांपडतें. वडील व धाकटीं माणसें तेथें आदर, वात्सल्य इत्यादि भावनांनीं निगडित झालेलीं असतात. एकत्रकुटुंब-पद्धतीनें राहणारीं घरें ही जगाची लहान आवृत्तिच असते. प्रौढपणीं जगांत जीवन यशस्वी करण्यास ज्या गुणांची आवश्यकता असते त्या गुणांची जोपासना एकत्रकुटुंबपद्धतींत राहणाऱ्या मुलांच्या ठिकाणीं होते. 'घर ही व्यवहारज्ञानाची शाळा आहे' हें एकत्रकुटुंबपद्धतीनें राहणाऱ्या घरासच यथार्थत्वानें लागू पडतें. निरपेक्षपणें दुसऱ्याच्या सुखासाठीं झटत राहण्यांतच आनंद मानणें हा जीवनास अलंकृत करणारा सद्‌गुण जेथें पैदा होतो ती जागा म्हणजे एकत्रकुटुंबपद्धति !

परंतु आधुनिक जीवनांत ही पद्धति मागें पडत चालली आहे आणि पुष्कळ वेळां एकत्रकुटुंबपद्धतीनें राहणाऱ्या माणसांत कांहीं अनिवार्य तेढी उत्पन्न झालेल्या दिसतात. हिंदी समाजांतील आधुनिक तरुण एकत्र-कुटुंबपद्धतीस फारसे अनुकूल असल्याचें दिसत नाहीं.

याचें मुख्य कारण आर्थिक परिस्थिति हें आहे. पुष्कळ माणसांची जीवनाची सोय एकाच ठिकाणीं होत होती, तोंपर्यंत कुटुंबांतील माणसांना एकत्र राहणें शक्य होतें. एकानें मिळवावें नि दहाजणांनीं खावें हें शक्य होतें तोंपर्यंत कुटुंबें एकत्र होतीं. परंतु पोटासाठीं घरेंदारें सोडून देशो-देशीं भटकावें लागल्यानें कुटुंबें विभक्त झालीं.

याच परिस्थितींतून दुसरें कारण उत्पन्न झालें. पूर्वींपेक्षां हल्लीं दोन पिढ्यांत जीवितविषयक गरजा आणि अपेक्षा यांत बराच फरक पडला आहे. कौटुंबिक कर्तव्यापेक्षां सामाजिक कर्तव्यांचें महत्त्व वाढलें आहे आणि सामाजिक कर्तव्यें पार पाडण्यासाठीं व्यक्तीला कौटुंबिक कर्तव्यास बाजूस सारण्याचे प्रसंग येतात. जुन्या पिढीस नव्या पिढीचा दृष्टिकोण न

कळल्यानें व्यक्ति-स्वातंत्र्याच्या भूमिकेवरून दोघांत तीव्र मतभेदाचे प्रसंग येतात. इत्यादि अनेक कारणांमुळें आधुनिक समाजांत एकत्रकुटुंबपद्धति मोडकळीस येऊन कुटुंबें विभक्त होऊं लागलीं आहेत.

या विभक्तपणापासून कांहीं तोटे होणें अपरिहार्य आहे. एकतर घरांतील वडील माणसांच्या अनुभवाचा व संरक्षणाचा लाभ तरुण पिढीस मिळत नाहीं. प्रत्येक गोष्ट स्वानुभवानें शिकण्याचे प्रसंग येत गेल्यानें जीवितांत अनेक बिकट प्रसंग येतात आणि त्यांना जबर किंमत द्यावी लागते. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांतील मूलभूत फरक न कळल्यानें विभक्त कुटुंबेंहि धुळीस मिळण्याचे प्रसंग येतात.

परंतु एवढीहि जबर किंमत देऊन एकत्रकुटुंबपद्धतीपासून दुरावलेली तरुण पिढी आपलें व्यक्तिस्वातंत्र्य सत्कारणीं लावील आणि आपल्या जीवनाची राष्ट्रीय व सामाजिक उपयुक्तता वाढवील अशी आशा करण्यास भरपूर जागा भोंवतालच्या सामाजिक जीवनांत दिसत आहे. कारण सामाजिक जीवन हें तरी एकत्रकुटुंबपद्धतीचेंच आधुनिक स्वरूप आहे.

---

## ६ : : : " थर्ड-क्लास "

थर्ड-क्लास म्हटल्याबरोबर माणसांचा एक ढीग डोळ्यांसमोर उभा राहतो. थर्ड-क्लासांतून केलेला प्रवास संपल्यावर श्रम आणि संताप यांच्या आठवणी शिल्लक राहतात. गाडींतून उतरतांना 'आपलें गांव आलें' या आनंदाच्या आधीं " सुटलों बुवा " हा सुटकेचा विचार मनांत येतो.

तिसऱ्या वर्गाचा डबा म्हणजे माणसांनीं उतू जाणारें एक खोकेंच ! आणि आंत माणसें मावेनाशीं झालीं तरी बाहेरून नवे उतारू आंत ये च असतात ! 'अमुक बसावे' अशी पाटी लावलेली असते तीसुद्धां दिसेनाशी होते. एवढीं माणसें या डब्यांत कशीं मावतात याचें एखाद्यास आश्चर्य वाटेल. आतां एकहि माणूस बसावयास जागा नाहीं असें प्रत्येक स्टेशनवर आंतलीं माणसें ओरडतात तरी दार लोटून आंत लोक येतात आणि शेवटीं

तीं खालीं न पडतां आंत राहतातच! प्रवासी व त्यांचें सामान यांच्या लायकींत तेथें फरकच उरत नाहीं. समतेचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष कोठें पाहावयाचें असेल तर तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जरा डोकावून पहा! तेथें एखाद्या पदवीधराच्या मांडीला एखाद्या मवाल्याचें डोकें टेकलेलें दिसेल आणि श्रीमंताशेजारीं शेतकरी चिलीम फुंकतांना आढळेल. तिसऱ्या वर्गात बसणाऱ्या उतारूंचा अहंभाव एका क्षणांत नाहींसा होतो आणि जीवित हेंहि एक बोचकें आहे हें त्यांस पटूं लागतें! कित्येक वेळां ट्रंक-वळकुटीस जागा मिळेल परंतु त्यांच्या मालकास उभें राहणें सुद्धां मुष्किल होईल!

प्रत्येक स्टेशनवर आंतील व बाहेरील प्रवाशांची रस्सीखेंच चालते. परंतु एकदां गाडी सुरू झाली कीं, सगळे गप्प बसतात आणि क्षणापूर्वी एकमेकांचा गळा दाबूं पाहणारे नंतर एकमेकांना पानतंबाखू देत असतात.

याहि प्रसंगांतून आणि असह्य परिस्थितींतून सुखाचे कांहीं क्षण उत्पन्न होतात. जमलेल्या प्रवाशांत कांहीं जगन्मित्र असतात. त्यांच्या एकदां गप्पा सुरू झाल्या कीं, जागेच्या त्रासाचा विसर पडतो आणि जिव्हाळ्याचें वातावरण उत्पन्न होतें. भेटेल त्याच्या जीविताची पुसतपास करण्याच व स्वतःची हकीकत त्याला ऐकविण्याचें कांहीं लोकांना वेड असतें. आपण अतिशय महत्त्वाचीं कामें करणारे लोक आहोंत हें क्षण-दोन क्षण सोबत करणाऱ्याससुद्धां पटविल्याखेरीज ते राहणार नाहींत.

तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत आपल्या शेजारीं कोण बसावयास येईल याचा अंदाज करणें जितकें अशक्य त्याहिपेक्षां प्रवाशांच्या गप्पांचे विषय कोणते असतील याचा अंदाज करणें जास्तच अशक्य! ती एक सर्वधर्मीय परिषद असते! सर्व जातींचें तें एक संमेलन असतें. मानवी स्वभावाच्या अनेक नमुन्यांचें तें एक प्रदर्शन असतें! त्यांत एखाद्या वेळीं तुमचा जिवलग मित्र असेल. एखाद्या वेळीं तुम्ही ज्याचें तोंडहि पाहूं इच्छित नाहीं असा गृहस्थ तुमच्या खांद्यास खांदा भिडवून बसलेला असेल! एखाद्या वेळीं तुमच्यासमोर एखादा विद्वान् बसलेला असेल किंवा तुमच्या पायाशीं मिनतवारीनें बसलेला मनुष्य प्रसिद्ध दरोडेखोरहि असेल!

याहि गर्दीत अलग राहण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे कांहीं स्वयं-मन्य असतात. तिसऱ्या वर्गात बसून पहिल्या वर्गात बसण्याची ऐट आणणारे कांहीं असतात, तर फुकट प्रवास करतांनाहि हक्काची भाषा बोलणारे कांहीं हरीचे लाल असतात.

या माणसांच्या 'राशीं'तून वाट तुडवीत जाणारे विक्रेते डब्यांत उतारूंच्या सुखसोईसाठीं फिरत असतात आणि त्याबरोबरच कोणत्या तरी साहेबाचें इंग्रजी शिफारसपत्र घेऊन मदत मिळविणारे अनाथहि असतात.

या मोठ्या माणसांच्या गर्दीत सांपडलेल्या मुलांचे हाल विचारायलाच नकोत. खिडकीजवळ बसणें आणि गाडी थांबली कीं खालीं उतरणें या दोन हट्टांसाठीं तीं कल्लोळ करीत असतात.

अशा धक्काधक्कीच्या मामल्यांतून प्रवास करतांना एखाद्या वेळीं मनांत विचार येतो कीं, बैलगाडीच्या काळापेक्षां हा आगगाडीचा काळ जास्त सुखाचा आहे काय ? तिसऱ्या वर्गानें प्रवास करणारा उतारू एखाद्या वेळीं 'वेदांती' होतो आणि तिसरा वर्ग त्याला तत्त्वज्ञान शिकवीत असतो ! सहनशीलता, विश्वबंधुत्व, इत्यादि सद्गुण माणसांच्या अंगीं उतरविण्याचें तिसरा वर्ग हें एक स्थान आहे !

---

## ७ : : दारू आणि जुगार

'माणसाचें शरीर व मन यांचा नाश करणारें भयंकर हत्यार कोणतें ?' असें जर कोणीं विचारलें तर 'दारू' हें त्याचें उत्तर आहे. माणसाला हौशीनें पशुत्वाच्या कोटींत नेणारें साधन कोणतें ? तर—दारू ! जिवंत असून मेल्यासारखी अवस्था उत्पन्न करणारी जादू कोणती ? तर—दारू !

दारू पिऊन गटारांत लोळणाऱ्या माणसाकडे क्षणभर आपण पाहिलें तर आपणांस वर सांगितलेलें दारूचें सामर्थ्य ताबडतोब पटेल. एखाद्या माणसाला शुद्धीवर असतांना गटारांत लोळविलें तर तो लोळविणाऱ्याचा

भयंकर सूड घेतल्याखेरीज राहणार नाहीं! परंतु दारूबाज स्वतः मात्र हौशीनें–अनावर हौशीनें–गटारांत लोळत राहील! आपलें बौद्धिक वैभव, आपला सामाजिक दर्जा, आपलें कौटुंबिक प्रेम, आपला स्वाभिमान, गर्व, सर्व–सर्व एका क्षणांत विसरून कांहीं काळ तरी माणसाला मातीमोल करण्याचें सामर्थ्य दारूंत आहे. दारूचे दुष्परिणाम कळण्यास शास्त्रज्ञानाची जरूरी नाहीं. दारुड्याचें दर्शन झाल्यावर दारू चांगली कीं वाईट हा प्रश्न उरत नाहीं. तरी दारूच्या पायीं हजारों कुटुंबें धुळीस मिळत आहेत!

दारूमुळें होणाऱ्या रोगांची संख्या सांगणें अशक्य आहे. 'दारूमुळें काय होतें' या प्रश्नाचें उत्तर, 'दारूमुळें काय होत नाहीं?' अशा प्रश्नानेंच देतां येईल.

तरी दारूबाज दारू कां पितात?—कांहीं क्षण सर्व जगाचा विसर पडून ब्रह्मानंदीं टाळी लागते म्हणून! त्या ब्रह्मानंदाची केवढी किंमत द्यावी लागते त्यांना! स्वतःच्या जीवनाचें मोल तर तो देतोच,परंतु त्याच्याबरोबर धुळीस मिळणाऱ्या त्याच्या कुटुंबाचेंहि मोल तो देत असतो! आपल्या लाडक्या मुलाला कांटा बोंचला तर ज्याच्या डोळ्याला टचकन् पाणी येईल आणि आपल्या हृदयांत भाला गेल्यासारखें ज्याला दुःख होईल तोच बाप दारूच्या धुंदींत त्या मुलाची कवटी फोडण्यासहि कचरणार नाहीं! दारूबाज जगांत एकच बंधन पाळतो; तें म्हणजे दारू पिण्याचें! एखाद्या कर्तव्यनिष्ठ माणसाप्रमाणें तो दारूच्या आड येणाऱ्या कोणत्याहि मायापाशांची पर्वा करीत नाहीं! आणि हें सगळें कशासाठीं?—तर कांहीं क्षण माणसांतून उठून पशूंचें जीवन अनुभवण्यासाठीं!

परंतु दारूबाजास पशूची उपमाहि बरोबर नाहीं. पशूंची निंदा होते ती! पशू कधीं आत्मनाश करीत नाहींत. उलट आत्मसंरक्षणासाठीं ते नेहमीं सिद्ध असतात. पशू आपल्या मुलांबाळांना ठार मारीत नाहींत. तेव्हां दारूबाज हा पशू होतो हें वर्णन बरोबर नाहीं. त्याची तुलना करण्याइतकें हीन जीवन जगांत कोणचाहि प्राणी घालवीत नसेल!

जुगार ही दारूची बहीण आहे. हीं दोघें बहीण-भावंडें बहुधा एकत्रच राहतात. जुगार ही दारू न पाजतां दारूबाजासारखी स्थिति करते.

पैशाची लालूच दाखवून ती माणसास आपल्या पाशांत खेचते आणि शेवटीं त्याला निराशेचे तीव्र तडाखे मारून आपल्या भावाच्या स्वाधीन करते ! जुगारी शेवटीं दारूच्या पिपांत विसर्जन पावतात. कायद्याची सर्वगामी नजर चुकवून जुगारी जुगार खेळत राहतो. बायकामुलांना सुखी करण्याच्या तळमळीनें जुगार खेळतां खेळतां जुगारी शेवटीं बायकामुलांचाच बळी घेतो ! दारिद्र्यांतून सुटण्यासाठीं त्यानें पत्करलेला मार्ग शेवटीं त्याला भिकारी करून सोडतो. जुगारी दिसावयास शुद्धीवर दिसला तरी तो दारूबाजाइतकाच धुंद असतो.

दारू आणि जुगार यांचे प्रताप सारखे असूनहि जुगार हा गुन्हा आहे. पण दारू पिणें हा मात्र गुन्हा नाहीं, हें काय विचित्र कायदेशास्त्र आहे ! कायद्यास शुद्धीवर आणून दारूबंदी करण्यासाठीं सत्याग्रह करावे लागतात. वास्तविक जुगारीप्रमाणेंच दारूबाजीहि शिक्षेस पात्र आहे, इतकेंच नव्हे, आत्महत्येचा नुसता प्रयत्न करणें हा जसा गुन्हा आहे तसाच ही राजरोस चाललेली आत्महत्या आणि इतरांचे खून हींसुद्धां भयंकर शिक्षेस पात्र ठरविलीं पाहिजेत.

दारूबाज आणि जुगारी हे आत्महत्या आणि खून हे दोन्ही भयंकर गुन्हे करणारे गुन्हेगार आहेत !

---

## ८ : : शहर आणि खेडें

अलीकडे देशांतल्या पुढाऱ्यांचा, समाजसेवकांचा, ओढा खेडेगांवाकडे लागलेला आपणांस दिसून येतो. महात्मा गांधी यांनीं स्वतः ग्रामसुधारणेचें काम हातीं घेतलें आहे. त्यांचा आश्रमसुद्धां शेगांवसारख्या साध्या ठिकाणीं असतो. प्रख्यात कवि रवींद्रनाथ टागोरांचें 'शांतिनिकेतन'हि सृष्टीसान्निध्यांत आहे. कोणत्याहि देशाचा लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केल्यास लोकवस्ती खेड्यांतच जास्ती आहे असें आपणांस दिसून येईल !

खेडेगांवांत शांतता असते त्यामुळें आपणांस मनःस्वास्थ्य लाभतें. तिथें वेळींअवेळीं ओरडणारा रेडिओ नसतो अगर फोनोची रडवी प्लेटहि नसते ! गाड्यांचा खडखडाट नसतो किंवा मोटारींचा धडधडाट नसतो ! सिनेमा-नाटकासारखीं मोहाचीं साधनें नसतात. त्यामुळें पैसा वांचतो. शहरांत लोकांच्या गरजा वाढतात. वागण्यांत कृत्रिमपणा उत्पन्न होतो. खेडेगांवीं आपण गेलों तर मनमोकळेपणानें आपलें स्वागत होतें. पण शहरांत चेहऱ्यावर उसनें हास्य आणून लोक आपणांस दूर करीत असतात.

खेडेगांवांतील हवा स्वच्छ व शुद्ध असते. शहरांतल्या हवेसारखी कोंदट व दूषित नसतें. अनेक गिरण्यांमुळें व मोठमोठ्या इमारतींमुळें शहरचें वातावरण दूषित व निरुत्साही बनतें. शहराची राहणी फार महाग असते. शहरांत पैसा जास्ती मिळतो खरा पण खर्चहि तितकाच होतो. बाजारांतील जिन्नस स्वच्छ व ताजे नसतात. त्या जिनसांवर धूळ बसते, माशा बसतात व ते पदार्थ प्रकृतीस अपायकारक ठरतात. पण खेडें-गांवांतील पदार्थ स्वच्छ व ताजे मिळतात ! शहरांत पाण्याची फार गैर-सोय असते. मुबलक पाणी मिळत नाहीं. पण खेडेगांवांत मुबलक पाणी मिळतें. पोहावयास विहिरी असतात. सहल करावयास मोकळें व नैसर्गिक वातावरण असतें व वनभोजनाचा आनंदहि मधूनमधून लुटतां येतो. पक्ष्यांचा कर्णमधुर किलबिलाट, हिरवींगार शेतें, मनमोकळीं माणसें, सृष्टीचें सौंदर्य यांत नैसर्गिक वातावरण असतें. एका बाजूनें मोटार, तर दुसऱ्या बाजूनें सायकल; कधीं कधीं टांगे, तर कधीं गाड्या यांचा शहरी सुळसुळाट तिथें नसतो. डावीकडूनच जायचें, पोलिस सांगेल तिथें थांबायचें, असें दडपण नसतें. पांचूसारख्या हिरव्यागार शेतांतून हिंडायचें, पक्ष्यांचीं कर्णमधुर गाणीं ऐकायचीं, परमेश्वरानें उत्पन्न केलेलें नैसर्गिक सौंदर्य लुटायचें, मन मानेल तसें फिरायचें, यांत मन केव्हांच रमून जातें. मनास एक प्रकारची शांतता व उदात्तता प्राप्त होते. शहरांतील मोहाचीं साधनें पाहून मन चलबिचल होतें. कृत्रिमपणामुळें नैसर्गिक सौंदर्याची हानि होते. कोंदट वातावरणामुळें शरीरप्रकृति बिघडते व आयुष्यमान कमी होतें; म्हणूनच कित्येक शहरचे रहिवाशी हवा बदलण्यास खेडेगांवीं जाऊन राहतात.

नं. ७०८८२

परंतु शहरच्या राहणीपासून आपणांस अनेक फायदेहि आहेत. वर्तमानपत्रें, वाचनालयें, रेडिओ इत्यादि साधनांनीं ज्ञानवृद्धि होते. बुद्धि विशाल होते. जगांतलें चालू राजकारण कळूं लागतें. चालू काळांत एखाद्या राष्ट्राच्या हालचालीचा परिणाम सगळ्या जगाला भोगावा लागतो, त्यामुळें राष्ट्रांच्या हालचाली आपणांस कळवून घेणें अवश्य होतें. खेड्यांतील मनाचा संकुचितपणा जाऊन विशालता प्राप्त होते. शाळा-कॉलेजांमुळें शैक्षणिक क्षेत्रांत प्रगति होते. नाटक-सिनेमांची कधीं कधीं शैक्षणिक क्षेत्रांत फार मदत होते. याशिवाय मनुष्यांच्या गायन, चित्रकला इत्यादि उपजत गुणांना वाव मिळतो. नव्या नव्या कल्पना सुचतात व सुधारणेचें पाऊल पुढें पडतें.

त्याचप्रमाणें शहरांतील राहणीचे दुष्परिणामहि लक्षांत घेणें जरूर आहे. मनुष्य व्यसनी, आळशी व सुखलोलुप बनतो. मोठमोठ्या शहरांतून जिवाच्या सुरक्षिततेकरितां लोक खेड्यापाड्यांतून जाऊन राहत असतात. शहरांतील सुखसोयी वाढल्या खऱ्या, पैसा मिळविण्याचीं साधनें उत्पन्न झालीं खरीं ! पण हीं साधनें कुणाची भर करतात ? पैसा अधिक झाला, सुखसोयी वाढल्या पण त्या श्रीमंतांच्या ! बिचारे गरीब तसेच आहेत ! शहरचा मोठेपणा, सुखसोयी, श्रीमंती, खेड्यांतल्या गरीब जनतेपासून उत्पन्न होतात. पण तिकडे लक्ष देतो कोण ? शेतकऱ्यांनीं धान्य जर पिकविलें नाहीं, कापूस जर उत्पन्न केला नाहीं, तर शहरांतील लोक काय करतील ? पण जगाचें लक्ष इमारतीच्या वरील डोलाऱ्याकडे असतें, पायऱ्याकडे नसतें हेंच खरें !

शहरांतील उपयुक्त गोष्टी खेडेगांवांत आणल्यास खेडेगांवची सुधारणा होईल! एखादें वाचनालय, छोटीशी शिक्षणसंस्था अशा साधनांनीं साक्षरताप्रसार केल्यास आदर्श खेडें निर्माण होणार नाहीं काय ?

---

ग्रंथ संग्रहालय
नं. ८३४५

## ९ : मला १००० रु. मिळाले तर—

खरोखर मिळतील किंवा न मिळतील ! परंतु 'मिळाले तर' ही कल्पनाच किती सुखदायक आहे ! आणि जेव्हां मी भोंवतालीं एकेक पैशासाठीं काबाडकष्ट करणारीं माणसें पाहतों तेव्हां तर वरील कल्पनेचें सुख जास्तच वाढतें आणि त्याचबरोबर त्या कल्पनेंतील फोलपणाहि मनाला पटूं लागतो. कारण रुपयाचें 'मोल' मला डोळ्यांसमोर पदोपदीं दिसतें आहे.

तरी मी एक मनोराज्य करून पाहणार आहें. कारण तरुण आहें मी. माझ्याहि जीवनाचीं कांहीं आवडतीं स्वप्नें आहेत, आशा आहेत, योजना आहेत, आणि त्या गांठण्याच्या आशेनें तर मी कांहीं निश्चित मार्गानें चाललों आहें.

पैसा – दुहेरी हत्यार आहे हें ! चांगला उपयोग केला तर तो वर आहे. दुरुपयोग केला तर शाप आहे. पैशाच्या अभावीं कांहीं लोक मरणप्राय दुःख भोगतात आणि पैशापायींहि कित्येक रसातळाला गेले आहेत. हीं दोन्हीं दृश्यें मीं नीट पारखून ठेवलीं आहेत. आणि माझें १००० रु. चें स्वप्न मीं काळजीपूर्वक रंगविलें आहे.

विद्यार्थी आहें मी ! तेव्हां त्या पैशांतून मी पहिल्यानें माझ्या विद्यार्जनाच्या सोयी मिळवीन. शिक्षणाची आकांक्षा पूर्ण करतांना येणाऱ्या सर्व संभवनीय अडचणींचा बंदोबस्त करून टाकीन. म्हणजे पैसा नाहीं म्हणून शिक्षण सोडावें लागलें अशी वेळ येऊं नये. नंतर तरुण माणसास कांहीं हौशी असतात त्या पूर्ण करण्याची सोय करीन. करमणुकीच्या प्रकारांत मनाला अधाशी करणाऱ्या करमणुकींना फांटा देऊन मनाला शांति देणाऱ्या प्रकारासाठीं पैसा कारणीं लावीन. माझ्या व्यक्तित्वाला उठाव येणारे कपडे, मनाला उत्साह देणारी खोलीची सजावट हे खर्चाचे पुढील मुद्दे. चार मित्रांचा मनसोक्त सहवास मिळेल अशी जागा असावी ही माझी रुखरुख मी पूर्ण करूं शकेन. माझ्या धाकट्या भावाला कित्येक वेळां मला नाखूष करावें लागतें. त्याला नवीं नवीं पुस्तकें घ्यावींशीं वाटतात

पुष्कळ नवे कपडे करावेसे वाटतात. आणखी किती तरी गोष्टी त्याला हव्या आहेत. पैशाच्या अभावीं मी त्याचा हिरमोड करतों. पण हजार रुपये मिळाल्याबरोबर मी त्याला सांगेनः "आतां हिरमुसला होऊं नकोस."

गेल्या वर्षींचा एक प्रसंग मला आठवतो. एका मित्राला फीला पैसे नसल्यानें लोकांचीं त्याला कामें करावीं लागत आणि शेवटीं त्याला परीक्षेत नापास व्हावें लागलें ! वर्गातल्या कित्येक मुलांपेक्षां हुषार होता तो ! मला पास झाल्याबद्दल आनंद दाखविण्याचा संकोच होऊं लागला ! मला १००० रु. मिळाले तर अशा दोस्तांच्या आयुष्यांत केवढा आनंद आणीन मी ! आणि माझ्याहि आयुष्यांत केवढें समाधान मिळेल ! माझ्या शाळेंतील विद्यार्थि-सहाय्यक-मंडळाचा आजीव सभासद होणें हें पहिलें काम !

आतां किती राहिले शिल्लक ? पण अद्याप बेत तर पुष्कळ राहिलेत. तेव्हां शेवटीं मी असा विचार ठरवितों कीं, मला १००० रु. मिळाले तर मी ते अशा रीतीनें खर्च करीन कीं, हजारों रुपये मिळविण्याची योग्यता माझ्यांत आली पाहिजे. कारण हजार रुपयांनीं काय होणार आहे ? १००० रुपयांनीं स्वतःच्या आयुष्याचा नाश करण्याचें काम पूर्ण होईल ! परंतु स्वतःच्या आयुष्याचें सार्थक करण्यासाठीं स्वतःच्या व इतरांच्या जीवनांत मनमुराद आनंद उत्पन्न करण्यासाठीं हजार रुपयेच काय पण हजारों रुपयेहि कमीच पडतील. रुपयांपेक्षां टिकाऊ, सामर्थ्यवान् असें कांहींतरी मिळविण्यासाठीं त्या हजार रुपयांचा उपयोग केला पाहिजे.

पण इतके रुपये मिळाले तरच्या गोष्टी आहेत या ! आधीं रुपये मिळविले पाहिजेत. 'मिळाले तर'ची बात पुढें !

---

संग्रहालय
नं. ६३९५

## १० : : : लोकभ्रम

दुश्चिन्ह अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन ॥
दचके पदार्थ देखून । या नांव भ्रम ॥

—रामदास.

रामदासांनीं भ्रमाची व्याख्या केली आहे ती वाचूनच लोकभ्रमांतला भ्रमिष्टपणा दिसून येतो. परंतु हा भ्रमिष्टपणा एकट्या-दुकट्याचा असता तर त्या मनुष्यास लोकांनींच भ्रमिष्ट ठरविला असता. परंतु सगळ्या लोकांचा भ्रमिष्टपणा ही सर्वमान्य गोष्ट ठरते. समजा, एखादा मनुष्य कामास जात असतां त्याच्या समोरून एखादा उंदीर पळत गेला आणि त्यावरून त्याला वाटलें कीं, "फार वाईट गोष्ट झाली ! आतां कसचें काम होणार ?" तर लोक त्या माणसाला हंसतील, त्याला मूर्ख ठरवतील; परंतु तेंच मांजर आडवें गेलें आणि कोणी कष्टी झाला तर लोक त्याला हंसणार नाहींत. याचें कारण मांजर आडवें गेल्यावर काम होत नाहीं ही समजूत लोकांत रूढ आहे. वास्तविक दोन्ही समजुती भ्रमाच्याच आहेत. परंतु एक भ्रमिष्टपणाची समजली जाते आणि दुसरींतील भ्रमिष्ट-पणा लोकांना मान्य नाहीं एवढाच फरक !

लोकांत प्रचलित असलेले भ्रम हे कांहीं गोष्टींच्या कार्यकारणसंबंधाचें अज्ञान असतें. इतकेंच नव्हे, तर त्या अज्ञानाबरोबर आणखीहि एक अज्ञान असतें. खरें कारण माहित नसणें हें एक अज्ञान आणि खोटें कारण खरें वाटणें हें त्याहून मोठें अज्ञान. लोकभ्रम या दुहेरी अज्ञानांतून निर्माण होतात.

प्रत्येक समाजांत कांहीं विशिष्ट लोकभ्रम असतात आणि पुष्कळ वेळां असें दिसतें कीं, एका समाजांत शुभ मानलेली गोष्ट दुसऱ्या समाजांत अशुभ समजली जाते किंवा एका समाजांतील अशुभसूचक घटनेस दुसऱ्या समाजांत शुभसूचक समजतात. यावरूनहि या समजुतींतला भ्रम दिसून येतो. कारण चांगलें किंवा वाईट होणें हा एखाद्या वस्तूचा गुणधर्म किंवा परिणाम असतां तो गुणधर्म सगळीकडे सारखाच असणार ! असें असतांना

कांहीं लोकांना एखादी गोष्ट शुभसूचक व दुसऱ्यास अशुभसूचक वाटावी हा त्या लोकांचा भ्रम आहे.

लोकभ्रमांची उत्पत्ति लावणें अशक्य आहे. त्या त्या गोष्टीविषयीं किंवा घटनेविषयीं शुभ किंवा अशुभ असें कां वाटूं लागलें हें सांगणें जितकें अशक्य तितकेंच असें केव्हां वाटूं लागलें हेंहि सांगणें अशक्य आहे. घुबडाचा आवाज, धूमकेतूचें दर्शन, पालीचें चुकचुकणें, भरलेला घडा डोक्यावर घेतलेली सुवासिनी, विधवा, मांजर, मुंगूस, यांचें दर्शन इत्यादींविषयीं शुभ किंवा अशुभ सूचनेचे संकेत केव्हां ठरले, कोणीं ठरवले, कोणास ठाऊक !

परंतु साधारणतः असें दिसतें कीं, ज्या वस्तूंच्या किंवा घटनेच्या दर्शनानें मनाला आनंद वाटतो त्या शुभसूचक व दुःख होतें त्या अशुभसूचक मानलेल्या आहेत. उदाहरणार्थ, घुबडाविषयींचा लोकभ्रम माहित नसलेल्या माणसालाहि, घुबडाचें रूप पाहून नि आवाज ऐकून आनंद कधींच होणार नाहीं ! उलट मुंगुसासारखा गोजिरवाणा प्राणी पाहून खात्रीनें आनंद वाटेल.

कांहीं लोकभ्रम हे अगम्य गोष्टींविषयींच्या आश्चर्यानें उत्पन्न झाले आहेत. उदाहरणार्थ, अकस्मात् दिसूं लागणारे धूमकेतु ! शेंडे नक्षत्राचें तें रूप पाहून साहाजिकच पूर्वींचे लोक घाबरून गेले आणि त्यांना वाटलें कीं, कांहीं तरी भयंकर संकटाची ही सुरुवात आहे.

लोकभ्रमांत कित्येक वेळां काकतालीन्याय दिसून येतो. उदाहरणार्थ, धूमकेतु दिसला त्याच दिवशीं एखादा राजा मृत्यु पावला असा एखादा योग आला असेल. त्याबरोबर लोकांना वाटलें कीं, धूमकेतु हेंच राजाच्या मृत्यूचें कारण !

बहुतेक लोकभ्रम अशा कार्यकारणभावाच्या अज्ञानामुळें उत्पन्न झालेले असतात. परंतु जगांत जसजसें ज्ञान वाढत आहे तसतसें आरंभीं सांगितलेले अज्ञानाचे दोन्हीहि प्रकार कमी होत आहेत व त्याच्या भोंवतीं जमलेले लोकभ्रमहि वितळत आहेत.

आतां धूमकेतूच्या दर्शनानें मनुष्य आश्चर्य आणि आनंद उपभोगतो, पण घाबरत नाहीं. चंद्राचें खळें त्याला एक आकर्षक दृश्य वाटतें. घुबडाच्या आवाजाचा निरुपद्रवीपणा त्याला कळला आहे. पालीविषयींचा त्याचा राग कमी झाला आहे. विधवांविषयीं सहानुभूति वाढत आहे. पटकन् रस्ता ओलांडणारें मांजर पाहून त्याला मौज वाटते आणि आपल्या कृत्यांचे चांगले किंवा वाईट परिणाम हे आपल्या कर्तृत्वावर अवलंबून असतात, त्यांचा पळत्या मुंगुसाशीं किंवा चुकचुकणाऱ्या पालीशीं कांहीं संबंध नाहीं हें त्यास अनुभवानें कळलें आहे.

ज्ञानानें व्यक्तींतील भ्रमिष्टपणा कमी होतो, त्याचप्रमाणें ज्ञानप्रसारानें लोकांतीलहि भ्रम दूर होतात.

---

## ११ : : शाळेंतील वादविवाद-संघ

मनांतील विचार स्पष्टपणें प्रकट करण्यास उत्तम वक्तृत्व हें एक चांगलें साधन आहे आणि तें सहज मिळण्यासारखें आहे. लेखनापेक्षां वक्तृत्वाचा मनुष्याच्या मनावर जास्त परिणाम घडतो. आपण जर रोम अगर ग्रीस देशाच्या इतिहासाचीं पानें चाळलीं तर आपणांस असें दिसून येईल कीं, तेथील धार्मिक, सामाजिक अगर राजकीय चळवळी मोठमोठ्या वक्त्यांकडूनच झालेल्या आहेत. उत्तम वक्ता समाजाला-किंबहुना राष्ट्रालासुद्धां हवा तसा सुंदर आकार देऊं शकतो. मोठमोठ्या सभा अस्खलित वक्तृत्वामुळें जिंकतां येतात ! कसलेला वक्ता आपल्या उत्तम भाषणानें हजारों माणसांचीं मनें आकर्षून घेतो !

रोजच्या व्यवहारांत सुद्धा आपणांस अशीं कांहीं माणसें दिसून येतील कीं, जीं आपल्या मधुर भाषणानें दुसऱ्यांचीं मनें चटकन् आपलीशीं करून घेतात. कांहींना ही कला न साधल्यामुळें त्यांना आपल्या विचारांचा पगडा दुसऱ्यावर तितकासा चांगल्या रीतीनें बसवितां येत नाहीं. आपल्या प्रथम भेटीचा सुपरिणाम पुष्कळ वेळां पहिल्या गोड शब्दांवर अवलंबून असतो.

यावरून आपणांस असें आढळून येईल कीं, वक्तृत्व ही एक प्रभावी कला असून इतर विषयांप्रमाणें तिचाहि पद्धतशीर अभ्यास शाळा-कॉलेजां-मधून व्हावयास हवा. वक्तृत्वकलेला शाळा हें एक उत्तम व योग्य क्षेत्र आहे. कारण त्या ठिकाणीं वादविवादाचे विषय निवडण्यास व त्यांचें शिक्षण घेण्यास आपणांस शिक्षकांची मदत मिळूं शकते. याखेरीज आणखी एक फायदा असा कीं, वादविवादाच्या दोन्ही बाजू शाळेंतील मित्रांच्या असल्यामुळें भाषणांतून न कळत गेलेले शब्द विरुद्ध बाजूच्या मंडळींचीं मनें दुखवीत नाहींत. मित्रांच्या सान्निध्यांत आपण धीटपणानें पुढें सरकतों व आपले विचार आपण स्पष्टपणें मांडतों. कदाचित् भाषणांत पुष्कळ चुकाहि होतील. पण त्या मित्रमंडळींच्या मदतीनें आपण सुधारून घेतों.

वादविवादाकरितां नेमलेल्या विषयाची तयारी करतांना सहजच ज्ञान-प्राप्ति होते, हा केवढा फायदा आहे! त्याचप्रमाणें वादविवादांत बोलण्याची संवय झाली म्हणजे हजरजबाबीपणाचा गुणहि आपलासा होतो. पराभवाच्या वेळीं सहनशीलता व मानसिक शांतता कशी राखावी हें समजतें, व ' प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात; दोन्ही बाजूंचा विचार केल्यानेंच खरी ज्ञानप्राप्ति होते ' हें तत्त्व आपणांस कळून येतें.

या वादविवादांतून वैयक्तिक द्वेषास जागा मिळूं न देण्याची काळजी घेणें अत्यत अवश्य आहे. खेळाडू वृत्ति हा थोर वक्त्याच्या अंगचा सद्गुण आहे. या गुणाशिवाय त्याला वक्तृत्वकला कधींहि साधणें शक्य नाहीं. हंसतमुखानें स्वतःच्या पडत्या बाजूकडे पाहण्यास व दुसऱ्यांचीं मनें न दुखवितां मतें खोडून काढण्यास या गुणाचा फार फायदा होतो. म्हणून हा गुण प्रत्येकानें संपादन केला पाहिजे.

एवढी काळजी घेतल्यास शाळेंतील वादविवाद-संघ खिलाडू-वृत्तीचीं क्रीडांगणेंच ठरतील व त्या क्रीडांगणावर आपणास मानसिक आरोग्य लाभेल.

## १२ : : रिकामपणाचा उपयोग

सुटीची अतिशय उत्सुकतेनें वाट पाहणारे लोक मोठ्या सुटीच्या शेवटीं शेवटीं कामाची वाट पहात असतात. सुटीचाच त्यांना कंटाळा येतो आणि केव्हां एकदां संपते सुटी असें त्यांना होऊन जातें. दिसा-वयास मोठें विचित्र आहे हें; परंतु तें खरें आहे आणि त्यांत फार मोठा अर्थ आहे. तो अर्थ असा कीं, सुटीचें काय करावें याचें त्यांना ज्ञान नसतें. रिकामपणाचा उपयोग त्यांना माहीत नसतो. चालू कामा-पेक्षां कांहीं निराळें करण्यासाठीं त्यांना सुटी पाहिजे असते असें नाहीं. कामाचा कंटाळा आला म्हणून सुटी पाहिजे असते.

रिकामपण हा एक प्रकारें स्वातंत्र्याचा काळ आहे. आपण बेत करतोंच ना सुटीचे ! 'आतां खुशाल ८।८ वाजेपर्यंत लोळत पडायला हर-कत नाहीं ! रात्रीं १० च्या 'शो'ला गेलों तरी फिकीर नाहीं. आतां कोणाची ताबेदारी नाहीं निदान महिनाभर तरी !' परंतु सुटीचा कंटाळा येणें याचा मग अर्थ असा होतो कीं, स्वातंत्र्याची आपली योग्यता नाहीं ! रिकामपणाचा उपयोग करण्यावरूनच स्वातंत्र्याची योग्यता सिद्ध होते. रिकामपणाचे क्षण हे या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे आहेत. जो रिकाम-पणाला कंटाळतो तो कामालाहि कंटाळतो ! ज्याला कामाची हौस वाटते तो रिकामपणाचेंहि स्वागत करतो.

रिकामपण हे विश्रांतीचे क्षण असतात आणि कामास पुन्हां सुरवात करतांना भरपूर उत्साह सांठविणें हा विश्रांतीचा खरा उपयोग आहे. यासाठीं कामांत बदल हें विश्रांतीच्या सुखाचें, रिकामपणाच्या सदुप-योगाचें मुख्य सूत्र आहे. तेंच तें काम करीत राहून शरीर व मन थकून जातें, परंतु काम बदललें कीं, तो थकवा नाहींसा होतो. यावरून रिकाम-पणा म्हणजे रिकामें बसण्याचा काळ नव्हे. कामाच्या वेळचें काम व रिकामपणचें काम यांच्या स्वरूपांत फरक पाहिजे. जगांतील राजकारणी पुरुष रिकामपणीं कांहीं तरी शारीरिक श्रमाचें काम करतात. कोणी मासे धरीत एकाद्या तळ्याच्या कांठीं रमून जातो, तर कोणी बागेंत रोपांची

मशागत करीत असतो; कोणी लांकडें फोडतो, तर कोणी प्रवास करीत हिंडतो. कोणाला जुन्या वस्तु जमविण्याचा छंद, तर कोणास फोटो घेण्याचें वेड ! याच्या उलट शारीरिक श्रमाचें काम करणारे लोक रिकामपणीं आवडीचें ग्रंथवाचन करतात. प्रसिद्ध सेनापति रिकामपणीं काव्यग्रंथ वाचीत असल्याचीं उदाहरणें आहेत.

रिकामपणाचा सदुपयोग करणाऱ्या माणसाला कांहीं "छंद" असतात. एखादा छंद असणें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. ज्यांना कांहीं तरी छंद आहे त्यांना रिकामपणाचें काय करावें हा प्रश्न पडत नाहीं. 'छंद' म्हटल्याबरोबर कांहींची गैरसमजूत होईल. छंद हें हौशीचें काम आहे. त्यांत मनावर ताण पडत नाहीं. तसेंच त्यांत मन रमून जाण्याचाहि गुण असतो. छंद असा असावा कीं, जो कामाच्या वेळीं बाजूस ठेवतां येईल. छंद म्हणजे अनावर मोह नव्हे. छंद हें रिकामपणीं करावयाचें काम आहे.

क्रमिक पुस्तकें वाचून कंटाळा आला तर इतर आवडीचीं पुस्तकें वाचण्यास रिकामपणाचाच वेळ उपयोगी आहे. इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहणें, पायीं सहल करणें, निसर्गाच्या सहवासांत मनसोक्त हिंडणें या गोष्टी रिकामपणाचीं फार महत्त्वाचीं कामें आहेत.

काम चालू असतांना त्यांत बऱ्याच उणीवा राहतात आणि त्या भरून काढण्यास वेळ मिळत नाहीं. त्या उणीवा भरून काढणें हें रिकामपणांतील अत्यंत आवश्यक काम आहे. कामाच्या वेळीं सहकाऱ्यांच्याबरोबर वागतां आलें पाहिजे. ती सहजीवनाची तयारी कोठें कमी पडत असेल तर रिकामपणीं तिची भरपाई केली पाहिजे.

रिकामपणाचा आनंद घेण्यासाठीं कामाच्या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे ही पहिली तयारी आणि दुसरी तयारी म्हणजे आपलें मन रमून जाईल असा छंदविषय शोधून ठेवला पाहिजे. म्हणजे "पुरे झाली बुवा सुटी" असे करंट्यासारखे उद्गार काढण्याची वेळ येणार नाहीं.

## १३ : : वरातीची मिरवणूक

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे आणि ही त्याची समाजप्रियता उत्सवप्रसंगीं अतिशय मोठ्या प्रमाणांत व्यक्त होते. धार्मिक, सामाजिक किंवा मिश्र स्वरूपाच्या उत्सवांत मनुष्याची एकमेकांविषयींची ओढ व्यक्त होते. एकत्र जमून सहवासानें आनंद शतगुणित करण्याचें उत्सव हें एक मोठें लोकप्रिय निमित्त आहे. उत्सवाची मूळ कल्पना कांहींहि असो, चार लोकांनीं एकत्र जमणें हा कोणत्याहि उत्सवाचा महत्त्वाचा भाग असतो.

हिंदी लोकांत विवाह-समारंभ हें उत्सवप्रियतेचें प्रमुख उदाहरण आहे. एरवीं आपापल्या ऐपतीप्रमाणें आपापसांत सण साजरा करणारा माणूस विवाह-समारंभाच्या वेळीं जास्तींत जास्त लोक जमविण्याचा प्रयत्न करतो. यासाठीं तो आपल्या ऐपतीचीसुद्धां पर्वा करीत नाहीं. जास्तींत जास्त लोक जमवून त्यांना हरतऱ्हेनें संतुष्ट करून एक प्रकारची लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न विवाह-समारंभांत होतो. विवाह-विधीच्या मूळ कल्पनेशीं कांहींहि संबंध नसलेल्या अशा कितीतरी गोष्टी विवाह-समारंभांत होतात. तें एक प्रदर्शन असतें आणि 'वरात' हें त्या प्रदर्शनाचें अत्यंत लोकप्रिय स्वरूप आहे.

वरात बहुधा रात्रीं निघते; कारण एकंदर थाटमाटांत दिव्यांनीं आणखी भर पडते. दिवसा दिवे लावून हें जमत नाहीं. यासाठीं रात्र ही वरातीची ठरलेली वेळ आहे. दिव्यांच्या शोभेंत दारूकामानें चांगलीच भर पडते. विवाह-समारंभाचा दर्जा दारूकाम व दिवे यांच्यासाठीं होणाऱ्या खर्चावरून ठरविला जातो.

वाद्यांचे ताफे तर असतातच. वाद्यें गर्जना करून लोकांना जागें करतात आणि लवकरच रस्त्यावरील दुतर्फा खिडक्या वरातीच्या प्रेक्षकांनीं भरून जातात. झोंपीं गेलेले लोकसुद्धां वरातीचा बँड ऐकल्याबरोबर डोळे चोळीत खिडकींत येऊन उभे राहतात आणि वरात पाहतां पाहतां वैभवाच्या प्रदर्शनावर आपला अभिप्राय व्यक्त करीत असतात आणि पूर्वी पाहिलेल्या वरातीशीं तुलना करीत असतात.

सगळ्या प्रेक्षकांचे डोळे फुलांनीं सजविलेल्या मोटारींतील वधूवरांकडे लागलेले असतात. समारंभाचीं तीं तर मुख्य दैवतें ! परंतु त्यांचे हाल त्यांनाच माहीत. चार लोकांच्या हौशी पुऱ्या करतां करतां ते बेजार होतात. मुंडावळी बांधलेले, कुंकू-गुलाल यांचे मळवट भरलेले, नवीं वस्त्रें अंगाभोंवतीं अत्यंत अव्यवस्थितपणें गुंडाळलेले, सगळयांची नजर रोखलेली असल्यानें कावरेबावरे झालेले ते 'दोघे'जण वरातीच्या मिरवणुकींत बेजार होतात.

वाजंत्रीं, नगारे, बँड या वाद्यांच्या गजरांत त्यांचें नवजीवन जगजाहीर होतें. बँडला त्यांतल्या त्यांत जास्त मान मिळतो. चालू चित्रपटांतील लोकप्रिय गाणीं वाजवीत बँड डौलांत जात असतो. गाण्यांच्या बाबतींत कांहींहि विधिनिषेध नसतो. लावण्यापासून तों लष्करी कवाइतीच्या पद्यापर्यंत वाटेल तीं गाणीं बँडवाले वाजवीत असतात.

वधूवरांच्या मोटारीमागें बायकांचा ताफा असतो. विवाह-समारंभांत 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' या सुभाषिताचें महत्त्व पदोपदीं पटतें. दिवसभर जेवणावळीच्या दंगलींत बायका अगदीं दमून भागून गेल्या तरी वरातीच्या वेळीं त्यांचा उत्साह रेसभरहि कमी नसतो. रात्रीं १।-१॥ वाजावयाच्या वेळींहि आपला पेहराव जास्तींत जास्त डौलाचा दिसावा ही मिरवणुकींतील बायकांची मुख्य हौस !

बायकांच्या मागाहून पुरुषमंडळी आणि मुलेंबाळें ! मुलांना तर पदोपदीं कुतूहल वाटत असतें. आपली ताई किंवा दादा आज अशीं देवबाप्पासारखीं गप्प कां बसलीं यांचें त्यांना फार गूढ वाटतें. तीं वधूवर बसलेल्या मोटारीकडे वारंवार डोकावून पहात असतात. ' त्या ' मोटारींत बसण्यासाठीं त्यांची केवढी चढाओढ चालू असते !

कमींत कमी वेगानें वरात चालत असते. चौकाचौकांत नारळ फुटतात, भुईनळे उडतात आणि चंद्रज्योति प्रकाशतात ! वरातीचा रस्ता जास्तींत जास्त लांब असला पाहिजे !

अशा थाटामाटानें चाललेला हा माणसांचा तांडा शेवटीं वरगृहापाशीं पोहोंचतो. बरीच रात्र झाल्यानें मुलें पेंगूं लागतात. मोठीं माणसेंहि दिब-

साच्या श्रमानें गळून गेलेलीं असतात ! वधू-वरांना काय होतें तें त्यांचें त्यांना माहीत !

परंतु कांहीं झालें तरी वरात ही निघालीच पाहिजे ! कारण वरात हें समारंभाचें मुख्य सूत्र आहे. मिरवणें ही माणसाची फार प्रबळ हौस आहे !

———

## १४ : : गाडी सुटण्यापूर्वीं—

रेल्वे स्टेशन ही एक रंगभूमि आहे. या रंगभूमीवर १०।१५ मिनिटेंच नाटक चालतें खरें; पण येवढ्याशा वेळांत प्रत्येक नट आपली भूमिका किती सुंदर तऱ्हेनें वठवतो ? कांहीं विनोदी तर कांहीं गंभीर, कांहीं शांत तर कांहीं धांदरट, कांहीं तरुण तर कांहीं वृद्ध, त्यांतच लहान मुलें ! अशीं नाना तऱ्हेचीं, निरनिराळ्या स्वभावाचीं, चित्रविचित्र पोशाखाचीं पात्रें आपणांस दिसून येतात. स्टेशनवरून गाडी सुटण्यास पांच मिनिटें अवधि असतांना मात्र या नाटकास खरा रंग चढतो. गाडी सुटण्याचे वेळेस अगदीं कळस होतो. या नाटकांत कांहीं पात्रें हंसत असतात तर कांहीं रडत असतात. भावा-बहिणींचा वियोग, तरुणयुगुलांचा विनोद, कोठें सहवास तर कोठें विरह, अशीं दृश्यें दिसतात.

एखादी खेडवळ मराठा तरुणी आपल्या दादल्यास पाहून स्फुंदत असते व तिचा दादला " अग असं रडतीस कशापायीं ? मी ममईहून अक्षी लवकर येईन हं ! शिरपतीला संभाळ बरं का ! " असें समजावीत असतो. एखादा पिता आपल्या चिरंजीवास " अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करूं नकोस ! पत्र पाठवत जा ! " इत्यादि उपदेश करीत असतो. एखादी माता आपल्या सासरीं जाणाऱ्या मुलीस 'कसें वागावें, काय वागावें' हें वरचेवर पटवून देत असते, तर एखादी फॅशनेबल तरुणी आपल्या प्रियकरास ' पत्र पाठवावयास विसरायचं नाहीं अं ! ' असें म्हणून हावभावानें आपला अनुराग दाखवते.

एखाद्या ठिकाणीं हमालाची व प्रवाशाची पैशावरून चाललेली खडा-जंगी ऐकूं येते, तर मधून मधून पोर्टरांची सामान टाकण्याकरितां धांवपळ चाललेली दिसून येते. 'पानपट्टी विडी-माचिस-सिगारेटस्' 'चाय् गरमागरम्' "किर्लोस्कर-स्त्री-मनोहर, सकाळ-काळ-बॉंबे-टाईम्स्" 'हिंदु-हिंदु चाय्' इत्यादि आरोळ्या ऐकूं येत असतात. एखादा मनुष्य पाण्याकरितां लोटा घेऊन पळत असलेला दिसतो, तर एखादी बाई मुलाला खिडकीपाशीं न बसण्याकरितां दरडावीत असते. उशीरां आलेले प्रवासी जागेकरितां प्रत्येक डब्याजवळ जात असतात, तर डब्यांतले प्रवासी आपलें निम्में शरीर बाहेर काढून हवेंत विशिष्ट प्रकारें हात हलवीत 'अरे इधर जगा नहीं, आगे जाव' असें दरडावीत असतात. ते गरीब बिचारे पुढें जाऊं लागतात. पण एखादा आडदांड आपल्या सर्व लव्याजम्यासह त्याच डब्यांत शिरतो व आंतमध्यें झोंपलेल्या लोकांना 'जरा ऊठके बैठो भाई' असें म्हणून जागा करून घेतो. कांहीं खेडवळ शेजारच्या प्रवाशाला 'हें कोणतं ठेसण!' असे विचारीत असतात. प्रवेशपरीक्षा पास झालेले आणि कॉलेजकडे निघालेले तरुण आपण नव्या जगांत प्रवेश करणार म्हणून आनंदांत असतात, तर कांहीं नोकरीसाठीं दूर देशीं जावें लागणार म्हणून दुःखी असतात. इकडे गार्ड आपलें पोट सावरीत सावरीत एका हातांत निशाण धरून दुसरा हात वेडा-वांकडा करीत मनगटावरील घड्याळाकडे पहात असतो.

इतक्यांत गाडीची-वेळ झाली हें दर्शविण्याकरितां घंटा वाजते. पाण्या-साठीं गेलेले लोक अर्धीच लोटी भरून आणतात. चहा पिणारे लोक अर्धाच चहा पिऊन डबा गांठण्याची धडपड करीत असतात. चहावाला पैशाकरितां गडबड करीत असतो. कुणी स्फुंदून स्फुंदून रडत असतात. "बरं! पत्र पाठवा अं!" 'रडूं नको! उगी! उगी!' "प्रकृतीस संभाळून रहा" "माईला म्हणावं कीं येतांना सोलापूरहून लुगडी आण म्हणून" इत्यादि वाक्यें ऐकूं येतात. कांहीं वृद्ध लोक आधींच गाडींत जाऊन बसलेले अस-तात, तर कांहीं तरुण 'आपल्याला गाडीची कांहीं फिकीरच नाहीं' असें दर्शवीत प्लॅटफॉर्मवरच रेंगाळत असतात.

गार्ड पुन्हां पुन्हां घड्याळाकडे पहात असतो, व स्टेशनमास्तरशीं हितगुज करीत असतो. ' आतां निघावें किंवा काय ? ' हें विचारण्याकरितां एंजिन एकदां कर्कश स्वरांत किंचाळतें ! पोर्टर घाईघाईनें 'लाईन क्लीअर' घेऊन पळत असतो. गाडीची सुटण्याची वेळ होते. तरुण मुलें आपल्या मनगटाकडे पहात ' अरे, अद्यापि गाडी कशी सुटत नाहीं ! ' असा चेहरा करीत असतात. इतक्यांत गार्ड गाल फुगवून आपली शिटी फुंकतो व हिरवें निशाण हवेंत फडकतें. एंजिनला निघण्याचा संदेश मिळतो. 'बाजूला सरा ! मागें सरा ! ' पोर्टर ओरडत असतो व गाडी नागिणीसारखे फूत्कार टाकीत हळूं हळूं चालूं लागते ! पोहोंचवावयास आलेली मंडळी सचिंत मुद्रेनें व अश्रुयुक्त डोळ्यांनीं जाणाऱ्या माणसांकडे पहात असतात. थोड्याच वेळांत स्टेशनवर शुकशुकाट होतो व या रंगभूमीवरील पडदा पडतो.

---

## १५ : : आग ! आग ! !

लोकांच्या झुंडीच्या झुंडी पळतांना पाहिल्यावर माझी उत्सुकता फारच वाढली. मी रस्त्यानें नेहमींच्या चालीनें चालत होतों. लोक कां धांवतात हें मला माहीत नव्हतें. कोठें जात आहेत हेंहि माहित नव्हतें. तरी मीहि झपाझप तिकडे जाऊं लागलों आणि एका गृहस्थास विचारलें—

" काय हो ! काय झालं ? "

" आग लागली आहे ! आग ! "

" आग ? कोठें ? कोणाच्या घरास ? "

परंतु कोणासच नक्की ठाऊक नव्हतें. आम्ही सर्वजण धांवतां धांवतां एका घराभोंवतीं जमा झालों.

काय भयंकर दृश्य होतें तें ! अशीं दृश्यें यापूर्वी मीं फक्त चित्रपटांतच पाहिलीं होतीं.

जणूं काय त्या घरांत इतक्या दिवस कोंडून ठेवलेल्या ज्वाला आणि धूर घर फोडून बाहेर येत आहेत असें वाटलें. काड्–काड् असा सारखा आवाज होत होता. ज्या खिडक्यांतून ३।४ तासांपूर्वी आंतील माणसें

रस्त्यावरची मजा पाहण्यासाठीं डोकावत होतीं त्या खिडक्यांतून धुराचे लोट बाहेर येत होते आणि ज्या छपरांतून प्रकाशाचा किरणहि आंत येऊं शकत नव्हता, त्यांतून ज्वाला बाहेर उफाळत होत्या. हजारों भुजंग मोठ्या आवेशानें नृत्य करीत आहेत असें तें दृश्य दिसत होतें.

त्या आगीच्या कल्लोळांत कांहीं आर्त स्वर ऐकूं येत होते. धुराच्या वावटळींत घरांत गुदमरणाऱ्या कांहीं दुर्दैवी प्राण्यांचे ते आर्तस्वर होते. तें तीन मजली घर होतें. मोठें डौलदार असें तें घर आतां फारच भेसूर दिसूं लागलें होतें. अंगापिंडानें भरलेल्या माणसाचें सगळें मांस ओरबाडून निपटून काढावें आणि त्याचा नुसता हाडाचा सांपळा ठेवावा तसें त्या घराच्या जळालेल्या भागाचें स्वरूप दिसत होतें. त्या घरांत राहणाऱ्या कुटुंबाच्या दालनांत रस्त्यावरच्या कित्येक लोकांना कधीं पाऊलहि टाकतां आलें नसतें. घराचा खासगी भाग कधीं कोणास दिसलाहि नसता. तो खासगी संसार आतां उघडावाघडा पडला होता. ज्या दालनांत त्या कुटुंबियांनीं आपल्या जीवनाच्या सुखदुःखाच्या गप्पागोष्टी सांगत रात्री घालविल्या असतील, जेथें त्यांचे अश्रु सांडले असतील आणि हास्याचे पडसाद उमटले असतील तीं दालनें, त्या त्यांच्या विश्रांतीच्या जागा त्या क्षणीं आगीनें भाजून निघत होत्या.

आग आटोक्यांत आणण्यासाठीं म्युनिसिपालिटीचे नोकर फायर-ब्रिगेडच्या साहाय्यानें अतिशय धाडसाचे प्रयत्न करीत होते. आगीच्या ज्वालांच्याहि वर पाण्याचे फवारे जात होते. तें संतापलेलें घर शांत करण्यासाठीं जणूं काय त्याच्या शीर्षावर जलौघानें अभिषेक चालविला होता. घरांत राहणारी माणसें बाहेर पडून आपल्या संसारांतील सामानां-पैकीं जास्तींत जास्त सामान बाहेर काढण्यासाठीं मोठमोठ्यानें ओरडून सांगत होतीं. “अहो ! तेवढी पेटी काढा ! तेवढीं भांडीं खालीं टाका !” गरीब कुटुंबें होतीं तीं ! एक एक वस्तु मिळवितांना त्यांना घाम गाळीत श्रम करावे लागले होते आणि त्या वस्तु आतां गेल्या तर त्यांना त्या पुन्हां कधीं मिळवितांहि येणें शक्य नव्हतें !

रस्त्यावरची गर्दी सारखी वाढत होती. जमलेले लोक आपापल्या माहितीप्रमाणें त्या घरांतल्या माणसांविषयीं बोलत होते. कांहीं आपापल्या आठवणींतल्या आगींचीं वर्णनें रसभरीतपणें करीत होते आणि कांहीं आग कशी विझवावी याची मोठ्या गंभीरपणें शास्त्रीय चर्चा करीत होते !

मी तेथून कांहीं वेळानें निघालों. माझ्या कानांत त्या आपद्ग्रस्तांच्या केविलवाण्या आरोळ्या आणि मनांत त्यांच्या भविष्यकाळचें भेसूर चित्र उभें राहिलें होतें. त्याच वेळीं त्या 'बघ्या' लोकांचाहि संताप आला. पण माझें मन इळूंच म्हणालें, "तूंहि त्यांपैकींच नाहींस का ? तूं आपल्या हातानें आग विझविण्यासाठीं ओंजळभरसुद्धां पाणी टाकलें नाहींस !" माझ्या डोळ्यांत पाणी जमूं लागलें होतें.

---

## १६ : : परीक्षेच्या मंडपांतील तीन तास

मंडपांत बसून परीक्षा देण्याचा हा माझा पहिलाच अनुभव आहे. माझ्या शाळेंत मित्रमंडळींच्या परिवारांत बसून आमच्या गुरुजींच्या नेतृत्वाखालीं परीक्षेच्या उत्तरपत्रिका लिहितांना मला जो अनुभव आला त्यापेक्षा आजचा अनुभव कांहीं निराळाच आहे. 'मॅट्रिक'ची परीक्षा म्हणून अभ्यासाच्या दृष्टीनें मीं सर्व शक्ति एकवटून तयारी केली आहे. ज्ञानापुरता मीं पास होण्याइतका आत्मविश्वास मिळविला आहे. परंतु मंडपांत बसल्यावर जें कांहीं वाटतें त्याची मात्र तयारी झाली नाहीं असें माझ्या अनुभवास आलें !

जिकडे पहावें तिकडे विद्यार्थीच विद्यार्थी ! आणि जो तो माझ्यासारखाच बावरलेल्या चेहऱ्यानें भोंवतालीं पहात पहात लिहीत आहे. एवढे विद्यार्थी एकत्र असून अगदीं निःशब्द शांतता पसरली आहे. त्या शांततेचें मनावर मोठें दडपण पडलें आहे. आमच्या रांगांतून हिंडणारे सुपरवायझर्स आणि उच्चासनावर बसलेले मुख्य व्यवस्थापक ! त्यांची सगळीकडे करड्या नजरेनें चाललेली टेहळणी ! सगळें वातावरण विचित्र शांततेनें आणि गांभीर्यानें दडपून गेलें आहे.

गेले २।–२।। तास मी पेपर लिहीत आहें. आरंभींपेक्षां मन पुष्कळ शांत झालें आहे. आतां तीन तास भरत आलेत. हा निबंध पुरा होई-पर्यंत वेळ पुरेल कीं नाहीं अशी धाकधुक वाटत आहे. बऱ्याच विद्या-र्थ्यांची तारांबळ सुरू झाली आहे. पानांचा फड्फड् आवाज होत आहे. सुपरवायझर्स दोरा-कागद-टिपकागद वगैरे पुरवीत धांवपळ करीत आहेत. कांहीं विद्यार्थी डोक्याला टांक टेकून उत्तरपत्रिका तपासण्यांत गर्क झाले आहेत, तर कांहीं दोरा बांधून आवराआवर करूं लागले आहेत. कांहींचे प्रश्नांचे अंदाज बरोबर ठरले असतील. कांहींची विलक्षण फसगतहि झाली असेल. मी जरा शांतपणें सुस्कारा टाकीत आहें कीं, हा पेपर तर ठीक गेला. आतां पुढचा पाहूं! प्रश्नपत्रिका हातांत पडल्याबरोबर काय धड-धडत होतें माझें हृदय? आधाशीपणानें मीं भराभर पेपर वाचून काढला. कागदावर टांक टेकला तो हात थरथर कांपूं लागला. माझें मीच आश्चर्य करीत होतों, "अरे! आज झालें तरी काय असें?"

आतां मन शांत झालें आहे. यशाच्या नौबती ऐकूं येऊं लागल्या आहेत. आतां निबंध संपत आला, वेळहि संपत आला आणि हा शेवट-चाच प्रश्न होता. एका विषयाच्या तडाख्यांतून सुटलों. खरोखर विचार केला तर या पेपरमध्यें अगदीं परीक्षकानें वाटेल तितकी काटकसर केली तरी ६० द्यावयासच पाहिजेत. नाहींतर निदान ४० तर कोठें गेलेच नाहींत!

तीन तास लिहिण्याचें एवढें फळ मिळत नाहीं मग मंडपांत आलों कशाला?

हो!...घंटा झाली! परीक्षेच्या मंडपांतले हे तीन तास तर ठीक पार पडले.

———

## १७ : सर्कशींतील सिंहाचें आत्मवृत्त.

" कां मी उगाच गुरगुरतों आहें ? मध्यरात्र होऊन गेली आहे. सगळें जग शांत झोंपलें आहे. जे कोणी जागे असतील त्यांतले माझ्यासारखे जीव फार थोडे असतील. माझे जातभाई या वेळीं अरण्यांत पराक्रमाचे डाव खेळत असतील आणि मी नुकतेच रिंगमास्तरच्या चाबकाचे फटके खाऊन माकडासारख्या चार उड्या मारून लोकांच्या टाळ्या मिळवून पिंजऱ्यांत येऊन पडलों आहें आणि भूतकाळच्या आठवणींनीं आणि वर्तमानकाळच्या यातनांनीं तळमळत किंचाळतों आहें ! हें गुरगुरणें नाहीं ! हा सिंहनाद नाहीं ! ! हें रडगाणें आहे ! ! !

माझा मालक गल्ल्यांतील पैसे मोजीत बसला असेल आणि मी अंगावरचे चाबकाचे वळ जिभेनें चाटीत आहें. त्या रिंगमास्तरचें हें केवढें धैर्य आहे कीं, नखें काढलेल्या, दाढा पाडलेल्या, लहानपणीं फसवून पकडलेल्या सिंहाला तो फटके मारूं शकतो !

रानांत असतों तर सिंहनादानें रान दणाणून सोडलें असतें. ते दिवस— आणि त्याहिपेक्षां त्या रात्रीं आठवल्या कीं, माझा दुबळा देह थरारतो आणि हातपाय सळसळूं लागतात. माझे वडील स्वयंसिद्ध वनराज होते. आणि आई मूर्तिमंत शक्तिदेवता होती. मला पकडण्यासाठीं आईला गोळी मारणाऱ्या त्या शिकाऱ्यावर ती ज्या वेळीं चवताळून गेली त्या वेळीं आईच्या वत्सल हृदयाचें सर्व सामर्थ्य मूर्तिमंत उभें होतें. अंगांतून रक्ताची धार वाहत होती तरी ती किंचित्‌हि दुबळी झाली नाहीं. आणि शेवटीं मरतां मरतां तिनें आपल्या पिल्लांना शेवटचें पाहण्यासाठीं—! छेः ! आठवणीनेंहि त्रास होतो. आम्हांला शिकाऱ्यानें कुत्र्याच्या पिलासारखें उचललें. त्या दिवशीं बाबा गुहेंत परत आले असतील आणि गुहा रिकामी पाहून त्यांना सारें ब्रह्मांड आठवलें असेल ! स्वतः मारलेल्या हत्तीचें धूड पाठीवर घालून ते गुहेकडे किती ऐटीनें येत असत !

त्या दिवशीं आम्ही त्यांची वाट पाहत गुहेच्या बाहेर आईच्या अंगाखांद्यावर लोळत होतों. आणि इतक्यांत बंदुकीचा बार झाला ! आईनें

किंचाळी मारली, आम्हांला–दोघें होतों आम्ही–पोटाशीं धरलें आणि क्षणार्धांत ती गोळीच्या रोखानें गर्जत गेली. सगळें रान तिच्या आक्रोशानें दणाणलें होतें. आम्ही भेदरून गेलों होतों. आणि इतक्यांत पुन्हां थडाड् असा आवाज झाला आणि आई खालीं पडली ! आम्हीं आईकडे धांव ठोकली. तिचे हातपाय आम्ही चाटूं लागलों; कुशींत घुसून तिला उठवूं लागलों. खदिरांगासारखे दिसणारे तिचे डोळे डबडबडले होते. मला या भयाण अंधारांत ते डोळे नेहमीं दिसतात ! आम्हां दोघांना त्या शिकाऱ्यानें उचललें आणि आईचा मृत देहहि वाहून नेला.

माझा भाऊ कांहीं दिवस बरोबर होता. आम्ही एकाच पिंजऱ्यांत होतों. मानेवर मान टाकून झोंपत होतों आणि एक दिवस त्याला नेण्यांत आलें, तें कायमचेंच ! तोहि एखाद्या रिंगमास्तरचे चाबूक खात आतां जगत असेल ! !

भाऊ गेल्यावर मी अस्वस्थच झालों. मी किंचाळें, चरफड करीं, पिंजऱ्याचे गज चावीं ! परंतु तो संताप व्यर्थ होता ! लवकरच मालकाच्या मांडीवर मी लोळूं लागलों ! हळूं हळूं नखें गेलीं, दाढा गेल्या आणि पराक्रमाची ऊर्मिहि गेली !

एका माणसाच्या चाबकाबरोबर मी नाचूं लागलों ! तो सांगेल तशा उड्या मारूं लागलों आणि हजारों लोकांच्या टाळ्या मिळवून मालकाचें पोट भरूं लागलों !

माणसाचा हात तोंडांत धरूनहि चावावयाचा नाहीं, जळत्या चाकां-तून टुणकन् उडी मारावयाची, माणसाच्या छातीवर बसावयाचें पण ती छाती फोडावयाची नाहीं, शेळीबरोबर एका ताटांत जेवावयाचें आणि तरी स्वतः सिंह आहोंत याची आठवण ठेवावयाची हे माझे चालू पराक्रम आहेत !

आतां लहान मुलेंहि माझ्याकडे निर्धास्तपणें येतात, खडेहि मारतात कारण मी आतां सिंह राहिलों नाहीं. सिंहाचें कातडें पांघरलेलें एक माकड झालें आहे मी !—”

## १८ : भविष्यज्ञान इष्ट कीं अनिष्ट ?

हल्लींच्या वर्तमानपत्रीय युगांत केवळ साताहिक 'भविष्यें' पाहण्याकरितांच पुष्कळ लोक वर्तमानपत्र विकत घेतात. कांहीं कांहीं भविष्यवेत्ते फक्त व्यक्तींचेंच भविष्य सांगतात असें नाहीं तर पाऊस केव्हां पडेल, युद्धाचा वणवा केव्हां पेटेल, दुष्काळ कोणत्या भागांत पडेल इत्यादि भविष्येंहि सांगत आहेत. भविष्य समजावून घेणें हें एक व्यसनच होऊन बसलें आहे.

हें भविष्यज्ञानाचें वेड पुरातनकालापासून चालत आलेलें आहे. मनुष्य भूतकालांतील चुकांकडे लक्ष देत नाहीं; वर्तमानकालांतील सुसंधीकडे पाहत नाहीं; तर भविष्यकालांतील वैभवाकडे नजर लावतो. 'हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें' लागण्यासारखेंच नाहीं का हें ? हजारों मैल दूर असलेल्या बिचाऱ्या 'निर्जीव' ग्रहांचा परिणाम आपल्यावर कितपत होतो हें पाहत बसणें खात्रीनें वेडेपणाचें आहे. आपलें भवितव्य चंद्रलोकावर अगर मंगळावर नसून तें पृथ्वीवर आहे; आपल्या हातावर पडलेल्या आडव्या उभ्या रेषांवर नसून मनगटांतील जोरावर अवलंबून आहे.'होणारें न चुकेचि येइल जरी ब्रह्मा तया आडवा' हें जर खरें असेल तर मग हात दाखवून अवलक्षण करून कां घ्या ?

साप्ताहिकांतून येत असलेलीं आधुनिक भविष्यें आपण जर लक्षपूर्वक पाहिलीं तर भविष्यवेत्ते भविष्यज्ञान जाणणारे आहेत कीं वाङ्मयसेवक आहेत हाच प्रश्न डोळ्यांसमोर उभा रहातो. भविष्य वर्तविण्यापेक्षां इतर मसालाच अधिक ! 'अष्टमांतला शनि', 'मिश्रफळांचा आठवडा', 'तीन ग्रहांचें ठाणें', 'पंचमांत स्वगृहींचा कर्केचा चंद्रमा' इत्यादि गडबडगुंडा करून ठराविक दोन-चार बाता त्यांत ठोकून दिलेल्या असतात. उदाहरणार्थ- 'लांबचा प्रवास होईल', 'सरकारदरबारांत मानमान्यता मिळेल', 'सगळें तुमच्यासारखें होईल', 'गृहसौख्य अत्युत्तम आहे', असा कांहींना आशीर्वाद दिलेला असतो, तर कांहींना अकल्पित संकटाचा गंभीरपणें इशारा दिलेला असतो.

युद्धादिकांचीं भविष्यें जर अचूक सांगतां आलीं असतीं तर भविष्य-ज्ञान्यांना हिटलर-मुसोलिनीनें सन्मानानें नसतें का बोलावलें ?... सारांश, भविष्यज्ञान हा नुसता पोरखेळ आहे. भविष्य वर्तविणें हा कांहीं पोटभरू लोकांचा धंदा आहे. असे लोक जोंपर्यंत समाजांत आहेत तोंपर्यंत 'बुवा-बाजी'सारखेंच यांचें प्रस्थ वाढत जाणार. समाजांत शास्त्रीय दृष्टीनें विचार करणारे सत्य-शोधक निघाल्याखेरीज व या भविष्यवेत्त्यांच्या हात धुऊन पाठीस लागल्याखेरीज हें व्यसन सुटणें अशक्य !

लोकांना तरी भविष्य ऐकावेंसें कां वाटतें ? भूतकाळ आपणांस ठाऊकच असतो; वर्तमानकाल तर आपलाच आहे. भविष्यकाल मात्र काळाच्या ओघांत पडलेला आहे. त्यांतलें रहस्य मात्र कुणाला समजत नाहीं. तेंच फक्त गूढ आहे आणि मानवी मनोधर्माप्रमाणें गूढ गोष्टीबद्दल जिज्ञासा असतेच ! तेव्हां या गूढतेमुळेंच त्याला भविष्यज्ञानाची आवड उत्पन्न झाली आहे. याचा फायदा लुच्चे लोक अगदीं वाईटपणानें घेऊं लागले आहेत. पंढरपूरचे बडवे, काशीचे पंडे आणि हे भविष्यवेत्ते भोळया लोकांना जळवांप्रमाणें चिकटले आहेत यांत शंका नाहीं.

साहित्याचार्य श्री. न. चिं. केळकर म्हणतात कीं, 'भविष्यज्ञान हें एक अनुमान आहे' हें मात्र खरें ! कांहीं घडलेल्या गोष्टींवरून व चालू परिस्थितीवरून कांहींतरी अनुमान बसवितां येणें शक्य आहे आणि असें अनुमान अत्यंत उपयुक्त आहे. संसारी माणसाला नेहमीं 'उद्यांची' तरतूद 'आज' करावी लागते. मुलींचीं लग्नें, मुलांची विद्या हें सर्व मनांत ठेवून त्याला व्यवस्था करावी लागते. तेव्हां त्याला थोडेंफार भविष्यज्ञान म्हणजे अनुमान बांधण्याची कला अवश्य आहे.

भविष्यकथन ही एक चांगली विद्या आहे. तिचें आजचें हिडीस स्वरूप जाऊन इतर क्षेत्रांतल्याप्रमाणें अनुमानप्रमाण या मार्गानें तिचा अभ्यास झाला पाहिजे. भविष्यज्ञानाचा अभ्यास बालिश आनंदानें करूं नये. तसें केल्यानें उलट पदोपदीं निराशा उत्पन्न होईल; मनुष्य निष्क्रिय होईल; प्रयत्नवादी ध्येय सोडून देईल व मनुष्याच्या मनाची असंतुष्टता कायम राहील, मृगजळाप्रमाणें दिसणाऱ्या भविष्यकालांतील वैभवाकडे सारें लक्ष लागल्यानें वर्तमानकालांतील आनंदास तो पारखा होईल.

## १९ : : शाळेचें क्रीडांगण

घरापेक्षां मुलांना घराचें आंगण जास्त आवडतें, त्याप्रमाणें विद्यार्थ्यांना शाळेपेक्षां शाळेचें क्रीडांगण जास्त आवडतें. आपलें क्रीडांगण हें पृथ्वीवरचें नंदनवन आहे, असें प्रत्येक विद्यार्थ्यास वाटतें. अर्थात् 'पुस्तकांतले किडे' असे जे बाळ-म्हातारे विद्यार्थी आहेत ते याला अपवाद आहेत !

क्रीडांगणावर जिवलग मित्र मिळतात आणि स्मृतिरूपानें जन्मभर आनंद देतील असे क्षण जीवितांत येतात. आपल्या अनेक सहाध्यायांबरोबर खांद्यास खांदा लावून खेळतांना आपले अहंगंड नाहींसे होतात, अहंकार झडून जातो आणि मन पौर्णिमेच्या आकाशासारखें होतें. खेळाडू वृत्ति ही मोठेपणी एक मोठी देणगी ठरते आणि ती देणगी क्रीडांगणावर मिळते. शरीर व मन या दोहोंचीहि पूर्ण वाढ करणें हा शिक्षणाचा हेतु आहे आणि क्रीडांगणावर तो हेतु पूर्ण होतो.

जीविताला नेहमीं युद्धाची उपमा देतात. परंतु युद्धापेक्षांहि जीवितांत कांहीं विशेष आहेत. ज्या जीवितयुद्धांत पराक्रम आहे परंतु क्रौर्य नाहीं, विनय आहे परंतु उन्माद नाहीं आणि पराभवहि आहे परंतु विषाद नाहीं असें युद्ध खेळणारा जीवितांत यशस्वी होतो. त्या युद्धाचें शिक्षण क्रीडांगणावर मिळतें. आपल्याच सहाध्यायांशीं शर्यती करावयाच्या, आपल्यांतलेच प्रतिपक्षी समोर उभे करावयाचे, त्यांचा पराभव करण्यासाठीं सर्व शारीरिक व बौद्धिक सामर्थ्य पणास लावावयाचें आणि हें करीत असतांना विजयासाठीं कमालीचे प्रयत्न करतांना, प्रतिपक्षीयांबद्दल द्वेष उत्पन्न होऊं द्यावयाचा नाहीं, क्रौर्यास थारा द्यावयाचा नाहीं, इतकेंच नव्हे तर आपला विजय झाल्याबरोबर प्रतिपक्षीयाशीं हस्तांदोलन करावयाचें, विजयाच्या आनंदांत त्यास भागीदार करून आनंद वाढवावयाचा आणि क्षणार्धांत शर्यत, चुरस विसरून मित्र म्हणून गळ्यांत हात टाकून घरीं जावयाचें ! आपला पराभव झाला तर—तोहि क्षणार्धांत विसरून विजयी पक्षाचा हस्तांदोलनासाठीं पुढें आलेला हात हंसत स्वीकारावयाचा, त्याच्या विजयसूचक गर्जनेस सांथ द्यावयाची आणि पुन्हां पुढील शर्यतीचे कार्यक्रम ठरवीत घरीं परतावयाचें !

हीच वृत्ति प्रौढपणीं यशदायी ठरते. हाच खेळाडूपणाचा गुण वीर, मुत्सद्दी, पुढारी यांना लोकप्रिय करतो. तो गुण खेळण्याखेरीज कसा येणार ? आणि क्रीडांगणाखेरीज तो मिळविण्याची दुसरी जागा कोणची ?

शाळेचें क्रीडांगण हें शाळेचें वैभव आहे. सर्व विद्यार्थ्यांना मनसोक्त खेळतां येईल इतकें तें विस्तृत पाहिजे. सर्व प्रकारच्या खेळांचें साहित्य तेथें पाहिजे. उंच उंच झाडांचा फेर क्रीडांगणासभोंवतीं असावा. क्रीडांगण शहराबाहेर असावें आणि शाळेंतील शिक्षकांनीं आपल्या विद्यार्थ्यांशीं समरस होऊन खेळाडूवृत्तीचे प्रत्यक्ष धडे विद्यार्थ्यांस क्रीडांगणावर द्यावेत.

अशा क्रीडांगणावर संध्याकाळीं तरुण विद्यार्थ्यांचा समुदाय पाहणें हें दृश्यसुद्धां आरोग्यदायक आहे. हिरवळीवर धांवणारे टेनिसचे चेंडू, आकाशांत उडणारे पायचेंडू, हुतूतूनें उडविलेले धुळीचे लोट, खो-खोनें उठविलेले पडसाद असलीं दृश्यें हें त्या शाळेचें आणि त्या गांवाचेंहि वैभव आहे. जेथें खेळाडूंची धांवपळ नाहीं, उत्साही खेळगड्यांची चढाओढ नाहीं, विजयोत्साहाच्या आरोळ्या नाहींत तेथें स्मशानशांतता आहे ! मुलांवांचून घर तशी क्रीडांगणावांचून शाळा होय ! क्रीडांगण हें सर्व विद्यार्थ्यांचें हक्काचें नंदनवन आहे.

---

## २० : : वाङ्मय आणि जीवन

अलीकडल्या काळांत वाचन हें पुष्कळांचें करमणुकीचें साधन झालें आहे. मराठीपुरता विचार केला तर आपणास असें दिसून येतें कीं, इतका मजकूर सारखा प्रसिद्ध होत असतो कीं, सर्व दिवस नुसता वाचनांत घालविला तरी अव्याहत प्रसिद्ध होणारें वाङ्मय वाचून संपणार नाहीं. इतकें लेखन प्रसिद्ध होण्याचें कारण लोकांत वाचनाचें वेड दिवसेंदिवस वाढत आहे. “ कांहींतरी वाचावयास द्या हो ! ” असें आपण सहज आपल्या शेजाऱ्यास सांगतों.

वाचन ही एक करमणूक झाली आहे आणि वाङ्मय हें त्या करमणुकीचें साधन आहे. परंतु वाङ्मय या शब्दाचा अर्थ करमणुकीचें एक साधन असा करणें ही फार मोठी चूक आहे. वाङ्मयाचा हेतु वाचकास त्यानें न अनुभविलेल्या जीवनाचें ज्ञान देणें व अनुभवलेल्या अनुभवांची आठवण करून देणें हा आहे. ' अनुभूतांचें स्मारक व अननुभूतांचें सूचक ' अशी कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांनीं वाङ्मयाची व्याख्या केली आहे.

मानवी जीवनाचें यथार्थ ज्ञान हें आपलें जीवन यशस्वी करण्यास अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीनें हें यथार्थ ज्ञान देण्याचें कार्य वाङ्मयानें केलें पाहिजे. परंतु याचा अर्थ वाङ्मय केवळ उपदेशानें भरलेलें असावें असा नाहीं. मराठी वाङ्मयाच्या आरंभकाळीं वाङ्मयांत नीतिबोधाचा भाग बराचसा असे. तसा रुक्ष नीतिबोध मनावर परिणामकारक होत नाहीं. वाङ्मयाची कला वाढत गेल्यावर त्यांतील रुक्षपणा नाहींसा होऊन तें मनोवेधक होत चाललें आहे. परंतु तें नुसतें मनोवेधक असून जीवनास उपयोगी पडणार नाहीं. तें परिणामकारकहि पाहिजे. ग्रंथ वाचून झाल्यावर त्यांतील प्रसंग व विचार मनांत ठसून राहिले पाहिजेत.

मराठी वाङ्मयावर पुष्कळांचा असा आरोप आहे कीं, तें नुसतें मनोवेधक होत चाललें आहे. कादंबऱ्या, गोष्टी, वगैरे वाचतांना मन रंगून जातें, परंतु वाचून झाल्यावर मनावर परिणाम काय होतो म्हणावें तर पुष्कळ वेळां कांहींच होत नाहीं आणि जेथें होतो तेथें तो कांहीं विचित्र खोट्या विचारांचा होतो.

याचें कारण आपल्या वाङ्मयांत आपल्या जीवनाचें असावयास पाहिजे तेवढें प्रतिबिंब दिसत नाहीं. कागदावर दिसणाऱ्या व्यक्ति प्रत्यक्ष जीवनांत दिसत नाहींत. त्यांत वर्णिलेले प्रसंग कधीं झाल्याचें आढळत नाहीं. एका इंग्रजी ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें तें वाङ्मय प्रत्यक्ष जीवनापेक्षां १०।१२ फूट उंचीवर वावरत असतें.

वाङ्मय जीवनास साहाय्यक होण्यासाठीं त्यांत जीवनाचें प्रतिबिंब दिसलें पाहिजे. जीवनांत–आपल्या दररोजच्या जीवनांत–सर्वसामान्य लोकांच्या जीवनांत जे प्रश्न उत्पन्न होतात, ज्या भावना, आकांक्षा, गूढें

असतात तीं वाङ्मयांत दिसलीं पाहिजेत आणि ते प्रश्न सोडविण्यास वाङ्मयानें मदत केली पाहिजे. वाङ्मय व जीवन यांचे संबंध जिव्हाळ्याचे असले तर वाङ्मय हें फार सामर्थ्यवान् साधन ठरेल. मनोवेधकपणाबरोबर परिणामकारकता वाढत गेली तर वाचकांना ग्रंथ हे मित्र वाटतील आणि लेखकास ते असे मित्र दिल्याबद्दल धन्यवाद देतील. मनोरंजनासाठीं अचकट विचकट वर्णनें, अत्यंत हीन दर्जाचा विनोद, पाशवी भावना चेतविणारे प्रसंग आणणें म्हणजे वाचकांचा उपमर्द करण्यासारखें आहे आणि महत्त्वाचे प्रश्न कांहीं अद्‌भुत कारणांनीं चुटकीसारखे सोडवून दाखविणें म्हणजे लेखकानें गारुडी होण्यासारखें आहे.

आपल्या भोंवतालच्या जीवनाचें भव्य स्वरूप लक्षपूर्वक पाहून, त्याचें मनन करून, लोकांचीं मनें ओळखून, त्याचें यथातथ्य चित्र रंगवणें आणि जीवनाच्या अभ्यासास मदत करणें हें वाङ्मयाचें कार्य आहे. वाङ्मय आणि जीवन यांमध्यें तसें म्हणण्याइतकें भिन्नत्व नाहीं. वाङ्मय म्हणजे जीवनाचेंच उद्बोधक प्रतिबिंब असें झालें पाहिजे.

---

## २१ माझा आवडता लेखक : दे. भ. शिवराम महादेव परांजपे

" या नवजीवनधारी देशांत जीं अव्वल दर्ज्याच्या बुद्धिमत्तेचीं, धैर्याचीं, देशाभिमानाचीं व विद्वत्तेचीं माणसें झालीं त्यांत शिवरामपंतांची गणना इतिहासांत अवश्य करावी लागेल. गलितपात्र देशाला आशेचें पाणी पाजून त्याच्या अंगांत स्वदेशाभिमानाचा अभिनव संचार करणारे जे कोणी झाले व होतील त्यांच्या परम देदीप्यमान मालिकेंत शिवरामपंतांस इतिहासानें बसविलें पाहिजे. "

—प्रा. श्री. म. माटे.

लोकमान्य व टिळक हे शब्द जसे आतां एकत्र गुंफले गेले आहेत, महात्मा व गांधी ही विशेषण–विशेष्याची जोडी जशी अभेद्य झाली

आहे, चिपळूणकर म्हटल्याबरोबर ज्याप्रमाणें ‘ निबंधमाला ’ आठवते, हरी नारायण आपटे म्हटल्याबरोबर ज्याप्रमाणें प्रथम कादंबरीकारच आठवतात, त्याचप्रमाणें परांजपे म्हटल्याबरोबर ‘ काळकर्ते ’ हे शब्द आपोआप आठवतात. ‘ **काळकर्ते परांजपे** ’ याच नांवानें शिवराम महादेव परांजपे यांना जग ओळखतें !

कारण शिवरामपंत ऊर्फ अण्णासाहेब हे खरोखरच अत्यंत व्यापक अर्थानें ‘काळकर्ते’ होते. ‘ काळ ’ वृत्तपत्राचे संपादक, हा त्याचा संकुचित अर्थ आहे. परंतु १८९४ ते १९२९ पर्यंतचा ३५ वर्षांचा $\frac{१}{३}$ शतकाचा कालखंड या देशांत ज्यांनीं आपल्या कर्तबगारीनें आपल्या नियंत्रणाखालीं ठेवला व कालौघाला विशिष्ट वळण दिलें त्यांत अण्णासाहेबांचें कर्तृत्व फार मोठें होतें व त्या काळाची घडण करणारे म्हणून ते काळकर्ते होत !

आजच्या तरुण पिढींतील कार्यकर्ते तयार करण्याचें कर्तृत्व, आजच्या समाजांत सुरू असलेल्या विचारप्रवाहाचें उगमस्थान होण्याचें महत्त्व, आज चालू असलेल्या सामाजिक राजकीय चळवळींचें सूत्रचालकत्व संपादण्याचें सामर्थ्य गेल्या पिढींतील ज्या प्रातःस्मरणीय विभूतींच्या ठिकाणीं होतें त्यांत अण्णासाहेब हे एक होते.

अण्णासाहेबांच्या आयुष्यांत प्रगट झालेल्या या कर्तृत्वाच्या मूळ प्रवाहाचा इतिहास म्हणजे त्यांचें चरित्र होय.

अण्णासाहेबांच्या पणज्यांनीं स्वाभिमानासाठीं पेशवे सरकारची दरबारी नोकरी सोडली. अण्णासाहेबांचे वडील हे अष्टपैलू व हरहुन्नरी गृहस्थ होते. ते उत्तम गायक व चित्रकार होते. जाज्वल्य देशाभिमान, तीव्र बुद्धिमत्ता या प्रखर गुणांबरोबरच मार्मिक रसिकता व कलाविज्ञान या कोमल गुणांचाहि अण्णासाहेबांच्या ठिकाणीं झालेला संयोग अशा प्रकारें वांशिक गुणांतून उगम पावला होता.

त्यांचा जन्म महाडास शके १७८६, ज्येष्ठ शु. ७ स झाला. शाळेंतील त्यांचें विद्यार्थिजीवन असामान्य व्यक्तीप्रमाणेंच असामान्य होतें. शाळेच्या

संकुचित जगाबाहेरच ते नेहमीं वावरत असत. घरची श्रीमंती असल्यामुळें लहानपणापासूनच त्यांच्या राहणींत डौलदारपणा येत चालला होता. वयाच्या १३–१४ वर्षांपर्यंत महाड येथील प्राथमिक शिक्षणक्रम चालू असतां त्यांनीं बरीचशी शरीरसंपत्ति जमविली आणि गृहस्थाश्रमाचीहि दीक्षा घेतली ! पुढें रत्नागिरीस इंग्रज़ी पांचवीपर्यंत मजल गांठून ते पुण्यास आले. आणि महाराष्ट्रांतील थोर पुरुषांची परंपरा ज्या शाळेनें आरंभापासून आजतागायत राखली आहे, त्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें ते दाखल झाले तेथें त्यांच्या बौद्धिक गुणांना वैभव येत गेलें. प्रि. आपटे हे शाळेचे मुख्याध्यापक होते व त्यांच्या नजरेंतून शिवरामपंत सुटणें शक्यच नव्हतें. १८८४ सालीं शिवरामपंत मॅट्रिक होऊन जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति त्यांनीं मिळविली. पुढें फर्ग्युसन महाविद्यालयांत त्यांना लोकमान्यांचें गुरुत्व मिळालें. एक वर्ष तेथें काढून ते डेक्कन कॉलेजांत गेले.

कॉलेजांत असतांना त्यांचें बिऱ्हाड गांवांत ढमढेरे यांच्या बोळांत होतें. दरम्यान वडील वारले आणि कुटुंबाचा सर्व भार शिवरामपंतांवर पडला. या परिस्थितींत बौद्धिक वैभव दाखविणें ही नुसती हौस न राहतां गरज होऊन बसली व शिष्यवृत्तीवर सर्व शैक्षणिक खर्च भागविण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं. शिकवण्याहि होत्याच. या अडचणींत प्रचंड अवांतर वाचन हीच त्यांची करमणूक असे. अडचणी ओलांडीत व ग्रंथाच्या रांगा संपवीत ते १८९० सालीं बी. ए. झाले आणि त्या परीक्षेंत उत्तम यश मिळाल्यानें ७०–७५ रु.ची फेलोशिप त्यांना मिळाली. त्या पैशावर एम. ए. चा अभ्यास चालू झाला. तो संपावयास मात्र ५ वर्षें लागलीं. याचें कारण अवांतर वाचनाची अनिवार संवय ! परीक्षेपुरतें मोजकें ज्ञान मिळवून थोड्या श्रमांत पास होण्याचा 'किराणा' मालाचा व्यवहार त्यांना जमला नाहीं. शेवटीं १८९५ सालीं ते एम. ए, झाले व २ हजार रुपयांचीं बक्षिसें मिळवून त्यांनीं मधल्या ६ वर्षांचा हिशेब चोख रीतीनें पुरा केला. प्राच्यविद्यांत ऋषितुल्य विद्वत्ता संपादिलेले डॉ. भांडारकर यांची व शिवरामपंतांची गांठ पडली व शिवरामपंतांना प्राचीन विद्येचेंहि अफाट क्षेत्र मनसोक्त भटकावयास मिळालें ! लो. टिळक, डॉ. भांडारकर यांच्या-

सारखे बुद्धीचे उत्तुंग पर्वत चतुःसीमेवर उभे असतांना त्या मैदानांत वावरणाऱ्या तरुणांच्या अंगांत शिखराकडे धांव घेण्याची व ती उंची गांठण्याची स्फूर्ति व्हावी यांत काय नवल ?

टिळक, भांडारकर, आगरकर, रानडे इत्यादि महापुरुष म्हणजे त्या वेळच्या तरुण पिढीच्या कर्तृत्वाला केवढें मोठें आव्हानच होतें, आणि त्या आव्हानाचा शिवरामपंतांसारखे दुर्दम्य उत्साह असलेले तरुण आत्मविश्वासानें स्वीकार करीत होते. इतिहास, समाजशास्त्र, अलंकारशास्त्र, तर्कशास्त्र, संस्कृत वाङ्मय, वेदान्त या ज्ञानक्षेत्रांत त्यांची चौफेर गोलंदाजी चालू होती. राजकारण तर मूर्तिमंत त्यांच्या समोर, पुण्यांतच नांदत होतें. वरपांगीं ते प्रोफेसरीचा गंभीर, सौम्य, शांत व्यवसाय करीत होते; परंतु मनांत निरनिराळ्या कार्यक्षेत्रांतून येणाऱ्या आव्हानांनीं कोलाहल माजला होता !

अशा स्थितींत १८९७ सालीं पुण्यास इतिहासप्रसिद्ध प्लेग सुरू झाला; त्या प्लेगनें अनंत मृत्यु घडवून आणले असतील. हजारों कुटुंबें उध्वस्त केलीं असतील, परंतु त्या भयंकर आगींतून देशाचा उद्धार करणाऱ्या अग्निदेवांची परंपरा स्पष्टपणें तेवूं लागली. सरकार व जनता यांचा क्रोधाग्नि भडकत होता. रँडचा खून, टिळकांचा कारागृहवास, पुण्यांतील जाळपोळ, या गोष्टी डोळ्यांसमोर होत होत्या आणि अण्णासाहेबांचें अस्वास्थ्य वाढत होतें आणि त्यास कोठून वाट द्यावी हें न ठरल्यानें सारखा कोंडमारा होत होता. जनतेलाहि हेंच अस्वास्थ्य बेचैन करीत होतें. परंतु बहुजनसमाज आंतल्या आंत कुढत होता, बसल्या जागीं दांत-ओंठ खाऊन मुठी वळीत होता. तोंडानें उच्चार करण्याची सोय नव्हती ! मातृवंदनाला सुद्धां बंदी होती. 'वंदे मातरम्' हा उच्चार सरकारनें मुस्कटदाबीनें बंद केला होता. शेवटीं अण्णासाहेबांनीं या प्रचंड असंतोषाला तोंड फोडण्यासाठीं तयारी केली. नोकरी सोडली. मानमरातब मोडला. डेक्कन कॉलेज सोडलें. आणि गायकवाडवाड्याचा रस्ता धरला ! आणि—'काळ' हें वर्तमानपत्र १८९८ सालीं सुरू केलें !

त्यांच्या जीवनाची गुप्तगंगा 'काळ' काढल्या दिवसापासून प्रगट झाली.

या दिवसापासून तो गंगौघ अव्याहतपणें वाढतच गेला. त्याच्या वेगवान् पात्रावर नजर ठरत नाहीं, अफाट तीरांचें एकदम दर्शन घेतां येत नाहीं, तो गंगौघ म्हणजे या देशांतील नवजीवनाचा प्रवाह ! अण्णासाहेबांचें जीवन संपलें. परंतु त्या जीवनांतून उत्पन्न झालेला चैतन्यप्रवाह आजहि महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांतून स्फूर्तिरूपानें वाहतच आहे.

काळ वर्तमानपत्र काढल्यानंतर शिवरामपंतांच्या कर्तृत्वाचा चौफेर संचार सुरू झाला. टिळक तुरुंगांत होते. त्यांचीं मतें अत्यंत प्रखर होतीं. सभा, बैठकी, ठराव या गतीनें चाललेला प्रवास त्यांना चीड आणी व ते त्या प्रकारावर प्रचंड हल्ला करीत. या कामीं उपहास व व्याजोक्ति हीं त्यांचीं तीक्ष्ण हत्यारें होतीं. १९०८ सालपर्यंत म्हणजे दहा वर्षांत काळाची लोकप्रियता इतकी वाढली कीं, सरकारला त्यांच्यावर खटला करावा लागला. शिवरामपंतांनीं खटला स्वतः चालविला व तुरुंगांत जातां जातां त्यांनीं इंग्रजी भाषेवरील आपलें प्रभुत्व दाखविलें. एकोणीस महिन्यांची शिक्षा भोगून अण्णासाहेब बाहेर आले. त्या वेळीं शरीरानें ते पंगू होऊन गेले होते. तरी त्यांना १९१० सालीं सरकारनें १० हजारांची जामीनकी मागून आणखी एक तडाका मारला आणि त्यांत 'काळ' बंद पडला !

काळाबरोबर अण्णासाहेबांचें चैतन्य हिरमुसल्यासारखें दिसूं लागलें. " हाच माझा तरुणपणचा जिवंत मृत्यु होय " असे त्यांचेच या प्रसंगाचे उद्गार आहेत. टिळकहि तुरुंगांत. ते १९१४ सालीं सुटून आले, तों महायुद्धानें सर्व जगांत गोंधळ माजला. शिवरामपंतांना मनासारखें जाज्वल्य कार्यक्षेत्रच मिळेना. त्यांना मवाळपणाचा मनस्वी तिटकारा असे. कांहींशा असंतुष्टपणेंच ते देशसेवेचें व्रत आचरीतच होते आणि वाङ्मयद्वारा मनाचें रंजन करीत होते. ते गांधीच्याहि चळवळींत सैनिक म्हणून हजर होते. त्यांनीं ' स्वराज्य ' पत्रहि काढलें, पण ' काळकर्ते ' अण्णासाहेब हे नाहींत हें कोणासहि ओळखूं येई ! परंतु सैनिकाच्या कर्तव्यबुद्धीनें त्यांनीं शेवटपर्यंत देशसेवा केली; मतभेद बाजूस ठेविले; आणि आपलीं क्रांतिकारक मतें बाजूस ठेवून असहयोगी अनत्याचारी म्हणून १९२२ सालीं अठ्ठावन्नाव्या वर्षींहि सहा

महिने कारागृहवास भोगला. १९२८ सालीं पंडित जवाहरलाल नेहरूंनीं स्थापलेल्या स्वातंत्र्य-संघाच्या पुणें शाखेचे ते अध्यक्षहि होते !

परंतु काळाच्या कारकीर्दीत त्यांच्या ठिकाणीं दिसणारें तेज, चैतन्य पुढील कर्तव्यकठोर बुद्धीनें केलेल्या कार्यांत कधींहि दिसलें नाहीं. ते वृत्तीनें सैनिक होते आणि व्यवसायानें मुत्सद्दी होते. मुत्सद्देगिरीचें राजकारण त्यांना फार कोमल वाटे. तरी त्यांनीं देशसेवेंत चुकारपणा केला नाहीं ! आणि शेवटीं २७-९-१९२९ रोजीं देहावसान होईपर्यंत त्यांची ही कर्तव्यबुद्धि जागृत होती.

यंदा शिवरामपंतांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं काळांतील निबंधांचे दहा भाग पुन्हां प्रकाशित झाले. शिवरामपंतांचा आत्माच जणूं काय बंधमुक्त होऊन स्वैरसंचार करूं लागला आहे ! तरुण पिढीस मोठें भाग्य लाभलें आहे.

---

## २२ : : : मातेची महती

**रुसणार मी न आतां । जरि बोलशील रागें ॥**
**ये रागवावयाहि । परि येइ वेगें वेगें ॥**

**——यशवन्त.**

'आई'! किती गोड शब्द ! केवढें माधुर्य भरलें आहे या शब्दांत ! या गोड शब्दांपुढें स्वर्गांतील अप्सरांचें गायन देखील तुच्छ वाटेल ! आईपुढें स्वर्गाचें सिंहासनसुद्धां त्याज्य वाटेल. सारें जग 'आई' या एका शब्दावर डुलत राहतें ! केवढी ही जादू त्या शब्दांत !

बालपणीं दररोज शाळेंतून परत आल्यावर डोळ्यांत आनंदाश्रु आणून मीठमोहऱ्या ओवाळून टाकते ती—आई; मुलाला पडसें—खोकला आला तरी जी खडतर उपास-तापास करते ती--आई; आपल्या मुलाला कांटे बोचूं नयेत म्हणून स्वतःच्या हृदयाच्या पायघड्या अंथरते ती—आई; सागराचें गांभीर्य, पृथ्वीचें औदार्य जिच्या डोळ्यांत नाचतें ती—

आई; मांगल्याचें माहेर, पावित्र्याचें तेज, मूर्तिमंत प्रेम जिच्या चेहऱ्यावर विलसतें ती—आई. मातृदेवतेची महती वर्णन करण्यास शब्दभांडार अपुरें पडेल !

आई मुलाकरितां काय करूं शकत नाहीं ? मूल गर्भांत असतांना त्याचें नीट पोषण व्हावें म्हणून नेहमीं आपल्या जेवण्याखाण्यावर ती नियंत्रण ठेवते. ती आपल्या गर्भाला आपल्या प्राणापेक्षांहि अधिक जपते. तेंहि एक-दोन दिवस नव्हे, तर सतत नऊ महिने ! आपल्या मुलाकरितां ती प्रत्यक्ष मृत्यूशीं झुंजते; प्रसंगीं आपले प्रिय प्राण देखील अर्पण करून मुलाला वांचवतें; केवढा हा स्वार्थत्याग !

मनांत उठलेलें तुफान आईच्या मांडीवर झोंपलें असतां शांत होतें. जगांतील निंदकांचे विषारी बाण आईच्या कुशींत लागत नाहींत. लहान मुलाला आईच्या मांडीवर स्वर्गसुद्धां तुच्छ वाटतो. आईच्या दृष्टींत, आईच्या स्पर्शांत, कांहीं तरी प्रेमळ, पवित्र, अवर्णनीय जादू असते यांत शंका नाहीं. सर्वांगाचा दाह होत असतांना आईचा प्रेमळ हात पाठीवरून फिरला कीं, मनास अपूर्व शांतता मिळते.

आपलीं मुलें मोठीं—मनानें, गुणानें आणि पराक्रमानें मोठीं—व्हावींत अशी प्रत्येक मातेची इच्छा असते. राष्ट्राच्या भाग्योदयाची दोरी आईच्या हातांतच असते. देशाला थोर महात्मे मिळवून देते ती आईच ! अशा थोर आईचीं मुलें मातृभक्त, सुविचारी, कष्टाळू, स्वाभिमानी व प्रेमळ निपजतील यांत काय शंका ?

आई ही मुलाची पहिली आदर्श शिक्षिका आहे. आईच्या चारित्र्याचा मुलाच्या स्वभावावर परिणाम होतो. लहान मुलांचें मन एखाद्या शाडूच्या गोळ्याप्रमाणें असतें. या गोळ्याला आईच हवा तसा आकार देते. लहानपणीं मूल अंगावर असतांना ज्याप्रमाणें आईच्या खाण्यापिण्याचा दुधावर परिणाम होतो; त्याचप्रमाणें तिच्या भावना व वासना यांचाहि होतो. मुलाच्या पराक्रमाचीं जीं भव्य मंदिरें पुढें उभारलीं जातात, त्यांच्यावर जे कळस चढतात, त्या कळसांचा पाया मूल गर्भांत असतांना आईनें तयार केलेला असतो. आपल्या मुलांपुढें नचिकेत, ध्रुव, चिलया,

रोहिदास, प्रल्हाद यांचीं उदाहरणें ठेवून ती त्या मुलांच्या मनाची घडण करीत असते. जिजामाता आपल्या छोट्या शिवबाला महाभारतांतल्या गोष्टी सांगून आपल्या देशाविषयीं, धर्माविषयीं त्यांच्या मनांत चेतना उत्पन्न करीत असत. शिवाजीचें नांव आज अजरामर झालें तें केवळ त्या जिजामातेच्या महतीमुळेंच !

आईचें ऋण कधींहि फिटण्यासारखें नाहीं. आपल्या कातड्याचीं पादत्राणें करून जरी आईच्या पायांत घातलीं तरी तिचे उपकार फिटणें शक्य नाहीं. लहानपणीं आपण शब्दसृष्टींत पाऊल टाकतों तें आईच्याच आधारानें ! आपण चालायला शिकतों तें आईच्या बोटाचा पांगुळगाडा करून ! आई कधीं कधीं कठोरहि होते. पण तिच्या कठोरपणांतहि प्रेमच असतें. तिच्या तोंडांतील उष्ट्या घासापुढें पंचपक्वान्नांचें ताट देखील त्याज्य वाटतें. गाद्या–गिरद्यांपेक्षां आईची मांडीच जास्ती शांतता देते. लोहचुंबकाकडे जसें लोखंड जातें तसें मुलाचें मन आईकडे ओढलें जातें.

जी आई आपल्याला स्वातंत्र्याचें बाळकडू पाजते, जी आई आपणांस सर्वगुणसंपन्न करून जगांत सोडते, जी आई आपली देवावरील श्रद्धा कायम करते, ती आई ज्या घरांत असेल ती घरें देवांचीं मंदिरेंच आहेत. वंदे मातरम् । कारण, न मातुः परदैवतम् ।

---

## २३ : 'स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र'

" नर करणी करे तो नरका नारायण हो जाय " अशी जी म्हण आहे तींत प्रयत्नवादाचें माहात्म्य वर्णन केलें आहे. प्रयत्नवादाचें समर्थन करतांना आपल्या डोळ्यासमोर फक्त यशस्वी प्रयत्नवाद्यांचींच उदाहरणें असतात. मनुष्य आशेवर जगत असल्यास आपण बाळगलेल्या आशेच्या समर्थनार्थ तो प्रयत्नवादाची महती गात असतो; मनाला उत्तेजन देण्यासाठीं अनेक संकटें सोसून शेवटीं यशस्वी झालेल्याचीं उदाहरणें

चित्तांत आणतो आणि 'ते यशस्वी झाले मग आपणच कां होणार नाहीं? जरूर होऊं' असें आपल्या मनाचें तो समाधान करतो आणि इतरांसहि हेंच तत्त्वज्ञान सांगतो.

परंतु असेहि कांहीं प्रसंग येतात कीं, त्या वेळीं प्रयत्नवादाचें सर्व तंत्रें पाळूनहि यश मिळत नाहीं. यश डोळ्यासमोर दिसत असूनहि प्रयत्नाच्या वाटेवर एक पाऊलहि पुढें टाकतां येत नाहीं; मनुष्य हतबुद्ध होतो. अंगांत कर्तृत्व असूनहि तें दाखवितां येत नाहीं. त्या वेळीं मनुष्य दैववादी होतो; परिस्थितीचा तो गुलाम होतो आणि मुकाट्यानें परिस्थितीपुढें मान वांकवितो. प्रयत्नाखेरीज दुसरें कांहींतरी सामर्थ्य, साहाय्य लागतें, हें त्याला पटूं लागतें आणि तो स्वतःशीं तरी म्हणतो, "स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र."

यावरून मनुष्याच्या तर्कशक्तीचा अंदाज पोहोंचेल तेथपर्यंत प्रयत्नवाद ठीक आहे. परंतु परिस्थितीच्या घडामोडीचा अतर्क्य असा एक भाग असतो आणि तो अतर्क्य भाग प्रयत्नाच्या सामर्थ्यापेक्षां जास्त प्रबल ठरला कीं, तेथें प्रयत्नाचा पराभव होतो.

स्वतःच्या किंवा इतरांच्या प्रयत्नवादाचा पराभव पाहिला कीं, सामान्यतः मनुष्य आपले हातपाय आवरूं लागतो, महत्त्वाकांक्षेस आळा घालतो आणि प्राप्त परिस्थितींत समाधान मानून राहूं लागतो. परिस्थितीचें दास्य तो अशा स्थितींत स्वखुषीनें पत्करतो.

परंतु 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय' ही म्हण जितकी खरी आहे तितकीच 'स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र' हीहि खरी आहे. दोन्हीहि म्हणींत थोडासा अलंकार आहे. म्हण म्हणजे सिद्धांत नव्हे! या दोन्ही म्हणींचा एकत्र विचार केला कीं, पूर्ण सत्य हातीं लागतें. तें सत्य असें कीं, बुद्धीच्या जोरावर मनुष्याच्या कर्तृत्वास जगांत वाव आहे. बुद्धीच्या जोरावर मनुष्य भविष्यकालाविषयीं कांहीं ज्ञान निश्चितपणें मिळवूं शकतो. परंतु तें ज्ञान पूर्ण नसतें याची जाणीव ठेवावी. आपल्याला अज्ञात असलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची त्यानें तयारी ठेवावी म्हणजे

प्रयत्नाच्या वाटेनें जातांना निराशेचा धक्का बसला तरी तो गांगरणार नाहीं. परिस्थिति सामर्थ्यवान् असली तरी माणसाला ती किंकर करून टाकण्याइतकी सामर्थ्यवान् नसते. मनुष्य हा सर्वस्वीं दैवाधीन नाहीं. परिस्थितींत सुद्धां मानवाचें थोडेंफार कार्य असतेंच आणि परिस्थितीच्या घडामोडींतहि कांहीं सामान्य सिद्धांत असतातच.

तेव्हां परिस्थितिवाद आणि प्रयत्नवाद यांच्या मर्यादा लक्ष्यांत घेऊन आशा बाळगणारा मनुष्य सहसा नामोहरम होत नाहीं. परिस्थिति आणि प्रयत्न यांतील सुवर्णमध्य ओळखला पाहिजे.

---

## २४ : : ग्रंथालय

जगांत ज्ञानाचा जसजसा विस्तार वाढत आहे तसतशीं ज्ञानप्रसाराचीं साधनेंहि वाढत आहेत. त्या साधनांच्या योगानें ज्ञानाचा विस्तृत प्रमाणांत प्रसार होत आहे. ज्ञानप्रसाराच्या कामीं छापण्याच्या कलेनें जगांत क्रांति घडवून आणली आहे.

ग्रंथांनीं ज्ञानाचीं स्थलकालबंधनें नाहींशीं केलीं आहेत. ग्रंथापूर्वी मुख हें एकच ज्ञानप्रसाराचें साधन होतें. त्या साधनाची मर्यादा फारच आकुंचित आहे. त्या मानानें लिहिण्याच्या कलेनें ती मर्यादा खूपच वाढविली. मनुष्य नाहींसा झाला तरी त्याचें लेखनिविष्ट ज्ञान अमर होत असे. परंतु लिहिण्याचें कामहि मर्यादित होतें. ज्ञान लिहून तरी किती ठेवणार आणि लिहिलेलें ( हस्तलिखित ) किती लोकांना वाचावयास मिळणार आणि किती वेळां मिळणार ?

त्यानंतर छापण्याची कला आली. त्या कलेनें वरील सर्व अडचणी दूर केल्या. आतां ज्ञानाचीं द्वारें सर्वांना सर्वकाळ खुलीं झालीं आहेत. एकाच वेळीं हजारों माणसांना एखाद्या विषयाचें ज्ञान मिळवितां येतें. जें ज्ञान संपादन करण्यास मूळ अभ्यासकास सर्व आयुष्य खर्चावें लागलें असेल तें ज्ञान, त्याच्या तपश्चर्येचें तें फळ, आज वाटेल त्या माणसास अल्प श्रमानें मिळवितां येतें.

६८७० ६६०५१

प्रत्येक ग्रंथाची व्यक्तिशः ही जी उपयुक्तता आहे ती ग्रंथालयानें शतगुणित होते. ज्ञानाच्या सर्व शाखांचा संगम ग्रंथालयांत झालेला असतो. भिन्न रुचीच्या लोकांच्या समाधानाचें ग्रंथालय हें एकमेव स्थान आहे. ग्रंथालयांत केवळ करमणुकीखातर वाचणाऱ्या वाचकांपासून तों अभ्यासासाठीं वाचन करणाऱ्या ज्ञानोपासकापर्यंत सर्वांचें समाधान होतें. ग्रंथालयाची योग्यता वर्गणीच्या रकमेवर नसते तर भिन्न रुचीच्या वाचकांच्या समाधानावर असते. किती प्रकारच्या अभिरुचीचे लोक ग्रंथालयाचा उपयोग करून उपभोग घेतात त्यावर ग्रंथालयाचें महत्त्व अवलंबून असतें. थोडीशी अतिशयोक्ति पत्करूनहि असें म्हणतां येईल कीं, ग्रंथालयांत प्रत्येक ग्रंथास हक्कानें प्रवेश मिळाला पाहिजे. सर्व काळांतील, सर्व विषयांतील सर्व लहान-मोठ्या ग्रंथकारांचें ग्रंथालय हें संमेलन होय.

ग्रंथालयांत विषयाप्रमाणें व स्थानविशिष्ट गरजांप्रमाणें पोटभेद असतात. एखाद्या विशिष्ट ज्ञानशाखेचा ग्रंथसंग्रह करणारीं ग्रंथालयें असतात. त्याचप्रमाणें विशिष्ट वर्गाच्या वाचकवर्गासाठींहि ग्रंथालयें असतात.

ग्रंथालय कोणच्याहि स्वरूपाचें असो त्याची व्यवस्था अशी असावी कीं, कमींत कमी श्रमानें वाचकांस ग्रंथ शोधतां यावा व मिळावा. ग्रंथांची व्यवस्था हेंहि एक शास्त्र आहे व त्या शास्त्रांत पदवी मिळविण्याइतका अभ्यास करण्यास वाव आहे.

ग्रंथालयांनीं सवंग लोकप्रियतेचा किंवा द्रव्यलोभाचा पंथ न धरतां व्यापक व विविध उपयुक्ततेचा हेतु डोळ्यांसमोर ठेवावा.

ग्रंथालयाचें वातावरण तीर्थक्षेत्रासारखें मनाला शांतता देणारें असावें. त्या वातावरणांत ग्रंथरूपानें लाभणारा सत्संग अतिशय मोलाचा असतो. ग्रंथालयाच्या भिंती ग्रंथकारांच्या प्रतिमांनीं सुशोभित असाव्यात. निरनिराळ्या शाखांतील ज्ञानाच्या प्रगतीचे आलेख व पत्रकें वाचकांच्या डोळ्यांसमोर ठेवून ज्ञानोपासनेस स्फूर्तिदायक असे वातावरण ग्रंथालयांत असावें. ग्रंथालय हें समाजाची चावडी नसावी, तर स्फूर्तिस्थान आणि शांतिस्थान असावें. दाही दिशांनीं ज्ञानाचा संग्रह वाढत आहे. त्याची जगभर वांटणी करणें हें ग्रंथालयाचें पवित्र कार्य आहे.

---

## २५ : : इतिहासाची शिकवण

'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' अशी एक म्हण आहे. इतिहासापुरती ही म्हण अशी करतां येईल कीं, मागच्यास ठेंच पुढचा शहाणा ! ज्याला आधीं ठेंच लागते तो ज्याला लागली नाहीं त्याच्या दृष्टीनें मागचा ठरतो ! आणि त्याच्या मागाहून येणारा पुढें पाऊल टाकतांना सावध होतो. हें शहाणपण प्रत्येक मनुष्य प्रत्यक्ष जीवनांत शिकत असतो. स्वानुभव हा शहाणपणाचा एक मार्ग असला तरी तो मार्ग सर्वव्यापी नाहीं. अनुभव एकाचा आणि त्यापासून ज्ञान मिळविणारा दुसराच, असेंच पुष्कळसें ज्ञान-संपादन अप्रत्यक्षपणें चालतें. अनुभव आलेल्या माणसाला होऊन गेलेलें बदलतां येत नाहीं. परंतु होऊन गेलेलें कां झालें, कसें झालें, तें पुन्हां घडण्यास किंवा घडूं न देण्यास काय आवश्यक आहे हें त्या अनुभवाच्या परिशीलनानें होणारें ज्ञान होय.

प्रसंग जितका महत्त्वाचा तितकें हें ज्ञान महत्त्वाचें असतें. इतिहास अशा प्रसंगांनीं भरलेला असतो. ज्या कृति व ज्यांच्या कृति अतिशय मोठ्या प्रमाणावर परिणामकारक ठरतात त्या कृति व त्या व्यक्ति इतिहासांत नमूद होतात. भूतकालांतील परिस्थितीस अत्यंत महत्त्वाचें, चांगलें किंवा वाईट वळण लावणाऱ्या घडामोडींची नोंद इतिहासांत होते.

ते परिणाम भूतकाळापुरतेच मर्यादित राहिले असते तर इतिहासाच्या अभ्यासाची मुळींच जरूरी राहिली नसती. परंतु ते परिणाम वर्तमानकाळ घडविण्यास कारण झालेले असतात. भूतकाळांतून वर्तमानकाळ आणि वर्तमानकाळांतून भविष्यकाळ जन्मास येतो. वर्तमानकाळीं कार्य करतांना भूतकाळाचा धागा लक्षांत राहिला पाहिजे. इतिहास आपणांस मोठमोठ्या घडामोडींची कारणपरंपरा सांगतो आणि इतिहास हेंहि सांगतो कीं, त्या अतिशय प्रभावी घडामोडींचीं स्थूल कारणें बरींच निश्चित असतात. मोठमोठ्या सम्राटांचे उदय नि अस्त, मोठमोठ्या युद्धांतील विजय वा पराजय इत्यादि गोष्टी कांहीं विशिष्ट कारणांनींच घडतात. वर्तमानकाळांत त्या गोष्टी पुन्हां घडतांना दिसल्या किंवा घडवून आणण्याचे प्रयत्न चालू

असले तर तेथें इतिहास हा वाटाड्या आहे. हा वाटाड्या प्रवाशाची खुषमस्करी करणारा नाहीं, तर कर्तव्यबुद्धीनें मार्ग दाखविणारा मार्गदर्शक आहे. तो अत्यंत प्रामाणिक, मनमोकळा आहे. मदांधाच्या नाशाची कथा तो जितक्या प्रामाणिकपणें सांगतो तितक्याच प्रामाणिकपणानें तो लोकसेवकांचेंहि कार्य वर्णन करतो !

इतिहासामुळें आपणांस आपल्या पूर्वजांची खरी माहिती कळते, परंपरेचें यथार्थ ज्ञान होतें व परकीयांच्या संबंधाचें स्पष्ट स्वरूप कळतें. त्यामुळें अंधश्रद्धा, खोटा स्वाभिमान, परकीयांचा अज्ञानमूलक द्वेष हीं कमी होतात. इतिहासानें देशाभिमान व विश्वबंधुत्व एकाच वेळीं उत्पन्न होतात. इतिहासानें भूतकाळापासून भविष्यकाळापर्यंतच्या कालाचें स्थूलदर्शन होतें. इतिहासानें प्रयत्नवाद शास्त्रशुद्ध होतो.

यासाठीं इतिहासाची शिकवण शिकतांना आपले दूषित पूर्वग्रह बाजूस ठेवून विद्यार्थिवृत्तीनें इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे. इतिहास हें त्या त्या समाजाचें, देशाचें, कालाचें, उद्बोधक चरित्र आहे आणि भूतकाल हा त्या चरित्राचा लेखक होय.

---

## २६ : : अतिपरिचयादवज्ञा !

अतिशय परिचय झाला कीं, परिचिताची किंमत नाहींशी होते आणि परिचिताचा अपमान होतो. एखादी वस्तु दुर्लभ असली कीं, तिच्याबद्दल अतिशय उत्सुकता वाटते. ती मिळाल्यामुळें किती सुख होईल, ती आपणांस किती मोलाची वाटेल, याविषयीं आपण मनोराज्यें करीत असतों. परंतु पुष्कळ वेळां अनुभव येतो कीं, ती वस्तु मिळाली, नित्य परिचयाची झाली कीं, वरील उत्सुकता मावळते. इतकेंच नव्हे, त्या वस्तूच्या प्राप्तीची जाणीवहि रहात नाहीं. जें वस्तूचें तेंच व्यक्तीचें.

आपल्या घरचेंच उदाहरण घ्या. आपलें घर, आईचें वात्सल्य, बंधुप्रेम, भगिनीप्रेम इत्यादिकांविषयीं आपण रसभरित वर्णनें वाचतों. परंतु

आपणांस त्या गोष्टी नेहमींच्याच झाल्यामुळें आपणांस प्रत्यक्ष जीवनांत ती उत्कटता सहसा अनुभवास येत नाहीं. तेंच घर सोडून दूर राहण्याची वेळ आली कीं, घराविषयीं आपल्या मनास किती अनावर ओढ आहे याचा अनुभव येतो. घरीं आईबापांना न जुमानणारीं मुलें घरापासून दूर गेलीं कीं, अश्रु ढाळीत असतात !

निबंधाचें शीर्षक हें एका श्लोकाचा भाग आहे. त्या श्लोकांत अति-परिचयाची अवज्ञा होण्याचीं उदाहरणें दिलीं आहेत. तो श्लोक असा—

अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनम् कुरुते ॥

चंदनाचें खोड सामान्यतः देवघरांत फक्त देवाच्या कामीं गंधापुरतें वापरलें जातें. परंतु ज्या मलयपर्वतावर चंदनाचेंच रान आहे तेथें भिल्लिणीसुद्धां सर्पणासाठीं चंदन वापरतात. येथें अतिपरिचयामुळें चंदनाची अवज्ञाच झाली आहे.

मानवी व्यवहारांत अतिपरिचयाचा हाच परिणाम होतो. मनुष्य कांहीं कारणानें दुसऱ्याचा परिचय करून घेतो. आरंभीं त्या परिचयामुळें सहवासाचा, मैत्रीचा आनंद वाटतो. परंतु परिचय वाढत गेला कीं, एकमेकांचें एकमेकांविषयींचें कुतूहल, उत्सुकता नाहींशी होते आणि प्रसंगीं उत्सुकतेच्या ठिकाणीं बेपर्वाई दिसून येते. परिचयाच्या आरंभीं एकमेकांना संतुष्ट करण्यासाठीं झटणारीं, एकमेकांच्या भावनांना जपणारीं माणसें अतिपरिचयानें एकमेकांचा अपमानहि करण्यास कमी करीत नाहींत.

परिचयाचें असें पर्यवसान होण्याचें कारण परिचयामुळें आरंभींची उत्सुकता, आणि नावीन्याचें आकर्षण नाहींसें होतें. अतिपरिचयांतहि टिकून राहणारें नावीन्य क्वचित् ठिकाणीं दिसतें. दुसरें कारण असें कीं, परिचयास कारण होणारी उपयुक्तता व गरज परिचयानंतर नाहींशी होते आणि अतिपरिचयांत ती लोप पावते. नावीन्य आणि गरज यांच्या अभावीं राहिलेला परिचय पुष्कळ वेळां निर्जीव ठरतो.

परिचयाचें अतिपरिचयांत आणि अतिपरिचयाचें अवज्ञेंत रूपांतर होऊं

नये म्हणून संयमाचें महत्त्व आपण ओळखलें पाहिजे. सहवास-सुखासाठीं विरह, उपभोगसुखासाठीं संयम हीं आवश्यक आहेत. प्रत्येक बाबतींत नेमस्तपणाचें तत्त्व पाळलें पाहिजे. म्हणजे त्यांतील उपयुक्तता व नावीन्य हीं टिकून राहतात. नाहींतर अधाशीपणानें उपयुक्त वस्तूहि अपायकारक ठरतात. 'अति तेथें माती' ही म्हण घोक्याच्या पाटीसारखी मनासमोर ठेविली पाहिजे.

---

## २७ : : : ग्रामोद्धार

खेडेगांवची सुधारणा हें आधुनिक सुधारणेचें एक महत्त्वाचें कार्य आहे. आधुनिक सुधारणेच्या पहिल्या भरांत यंत्रकलेची अत्यंत झपाट्यानें प्रगति झाल्यानें ठिकठिकाणीं औद्योगिक केंद्रें उत्पन्न झालीं आणि यंत्रांच्या योगानें थोड्या श्रमांत व अल्प मोबदल्यांत सुखाची अनंतपट वृद्धि झाल्यानें त्या औद्योगिक केंद्रांच्या भोंवतीं मनुष्यवस्ती वाढूं लागली आणि शहरें आणि खेडीं असे लोकवस्तीचे दोन भाग पडले. शहरांत यंत्राधीन लोकवस्ती वाढत गेली आणि स्वावलंबी अशी लोकवस्ती खेड्यांत राहिली. खेडीं भराभर ओस पडूं लागलीं. ज्यांना यंत्रसंस्कृतीचा स्वीकार करतां आला नाहीं ते लोक मागें पडूं लागले. आज आपण शहरांतील व खेड्यांतील लोकवस्तीचें अवलोकन केलें तर आपणांस हाच फरक मुख्यतः दिसेल. सुधारलेले व मागासलेले असा भेद समाजांत उत्पन्न झाला आहे

हा भेद नाहींसा करणें हें ग्रामोद्धाराचें मुख्य सूत्र आहे. खेड्यांतील लोकांत आधुनिक जगाविषयीं अतिशय अज्ञान असल्यानें त्यांची पिळ-णूक होत असते. सुधारलेल्या लोकांपैकीं कांहीं धूर्त लोक त्यांची फस-वणूक करीत असतात. ही फसवणूक थांबविण्यासाठीं खेडेगांवांतून साक्षरता वाढली पाहिजे. केवळ निरक्षरतेमुळें खेडेगांवांतील लोकांचा अनेक प्रकारानें छळ होत असतो. त्यांना सावकार फसवितात. अधिकारी

त्यांच्यावर अरेरावी करतात. आपले हक्कसुद्धां त्यांना मिळवितां येत नाहींत. मग सवलती तर दूरच राहोत.

खेडेगांवांत शेतकी हा मुख्य व्यवसाय असतो. शहरांतील उद्योग-धंद्यांत यांत्रिक साहाय्य मिळत गेल्यानें लोकांची प्राप्ति वाढत जाते. परंतु शेतकीचीं साधनें त्या मानानें मागासलेलीं आहेत. त्यामुळें शहरवासीयां-पेक्षां जास्त श्रम करूनहि शेतकरी उपाशी राहतात. जमिनीचा कस व बीजाची उत्पादनशक्ति वाढविण्याचीं आधुनिक शास्त्रीय साधनें शेत-कऱ्यांस सांगून व पुरवून त्यांची उत्पादनशक्ति वाढविली पाहिजे व समाजाचा अन्नदाता सुखी केला पाहिजे.

आरोग्याच्या बाबतींत झालेल्या सोयी खेडेगांवांत जास्त जरूर आहेत. केवळ अज्ञानामुळें आणि दारिद्र्यामुळें निसर्गाच्या सान्निध्यांत राहूनहि खेडेगांवांत जास्त लोक मरतात. त्यांची सेवा करून त्यांना जीवदान देणें हें फार मोठें पवित्र कार्य आहे. प्रत्येक खेडेगांवांत आरोग्यकेंद्रें पाहिजेत. त्यांच्या हाताशीं असलेल्या नैसर्गिक संपत्तीचा उपभोग घेण्याचें ज्ञान त्यांस दिलें पाहिजे.

शहरापर्यंत आलेलें सामान्य विषयाचें ज्ञान खेड्यापर्यंत पोंहोंचविलें पाहिजे. म्हणजे अंधश्रद्धा, अज्ञान, लोकभ्रम इत्यादि कारणांनीं होणारा त्यांचा नाश थांबेल.

हें सर्व करतांना खेड्यांचें नैसर्गिक वैभव भ्रष्ट होणार नाहीं याची काळजी घेतली पाहिजे. उद्धार म्हणजे आत्मनाश नव्हे. खेड्यांचीं शहरें करणें हा ग्रामोद्धाराचा हेतु नव्हे. खेडीं हीं शहराचीं विश्रांतिस्थानें झालीं पाहिजेत आणि तीं विश्रांतिस्थानें शहराच्या तोलाचीं असलीं पाहिजेत. सुधारणेच्या पायीं, यंत्राधीन सुधारणेच्या पायीं, माणसें सुखलोलुप व परावलंबी होतात. या सुधारणेच्या दोषापासून खेडीं वांचविलीं पाहिजेत. त्यांच्या स्वावलंबनाचें सामर्थ्य वाढवितांना त्यांना यंत्राचे गुलाम करणें यांत त्यांचा नाश होईल, कीं उद्धार होईल? शेतकरी हा शेतकरी राहूनच सुखी राहील हें भारतीय ग्रामोद्धाराचें ध्येय आहे. या दृष्टीनें शहरांत उपलब्ध होणारीं ज्ञानप्रसाराचीं साधनें खेड्यांत नेलीं पाहिजेत आणि सुधारणेच्या धांवपळींत खेडेगांवें बाजूस पडलीं आहेत, तीं बरोबर घेतलीं पाहिजेत.

ग्रामोद्धाराची योजना आखतांना त्या त्या गांवची नैसर्गिक संपत्ति ओळखून, शोधून त्या संपत्तीच्या साहाय्यानें त्या गांवांतील लोकांच्या जीवनांत सुखाची भर घालण्याचा मार्ग शोधला पाहिजे. हिंदुस्थानांत कितीतरी नैसर्गिक संपत्ति अद्याप अज्ञात स्थलीं शहरापासून दूर अशा ठिकाणीं पडली आहे. त्या संपत्तीचा शोध करून खेडेगांवांतून प्रत्येक खेडेगांव स्वावलंबी होईल असे स्थानविशिष्ट उद्योगधंदे सुरू केले पाहिजेत. आज सर्व शेतकरीवर्ग गिरणीकडे धांवत आहे. ती त्यांची धांव आवरून त्यांना आपआपल्या झोपडींत माणुसकीचे सर्व हक्क उपभोगतां येतील असें जीवन दिलें पाहिजे.

---

## २८ : : नाटक आणि बोलपट

एखादी कादंबरी, कथा किंवा चरित्र आपणांस इतकें आवडतें कीं, क्षणभर भोंवतालच्या जगाचा आपणांस विसर पडतो आणि आपण वाचींत असलेला प्रसंग डोळ्यासमोर घडत आहे असा 'भास' होतो. लेखकानें आपल्या अपूर्व कौशल्यानें, शब्दांच्या साहाय्यानें आपल्या डोळ्यासमोर तें चित्र उभें केलेलें असतें. त्या वर्ण्यविषयाचें आपण मनानें नाटकच पाहत असतों. परंतु केवळ शब्दांच्या साहाय्यानें मनासमोर उभें केलेलें चित्र क्षणभंगुर असतें. तें जास्त स्थिर करण्यासाठीं शब्दांच्या बरोबर प्रत्यक्ष वस्तुस्थिति उभी केली कीं, तें दृश्य जास्त परिणामकारक ठरतें.

ग्रंथांत वर्णन केलेलें दृश्य नाटकांत सजीव देह धारण करून उभें राहतें. तें दृश्य प्रत्यक्ष होत असतांना जसें असेल तसें तयार करणें, तसें उत्पन्न करणें हें रंगभूमीचें कार्य आहे. प्रत्यक्षाचें हुबेहुब अनुकरण हें नाटकाचें मुख्य रहस्य आहे. नटाचें सगळें कौशल्य भूमिकेशीं समरस होण्यांतच आहे. सत्याचा आभास उत्पन्न करण्यासाठीं पोशाख, भाषा, हावभाव, पार्श्वभूमि इत्यादि गोष्टींचें साहाय्य होतें. नट स्वतःस विसरला आणि भूमिकेशीं एकरूप झाला कीं, प्रेक्षकहि स्वतःस विसरतात आणि नाट्यवस्तूशीं

समरस होतात. फार काय यशस्वी नटाचें काम चालू असतां नटापेक्षांहि प्रेक्षक जास्त समरस होतो. नट करुणरसप्रसंगीं दुःख करण्याचा 'अभिनय' करतो, परंतु त्यामुळें प्रेक्षकांच्या डोळ्यांतून खरेखुरे अश्रू ओघळूं लागतात! आणि नाटकीपणाची नटास जाणीव राहते, परंतु प्रेक्षक नाटकीपणा विसरतो. २०।२० वर्षांपूर्वी पाहिलेल्या नाटकांतील प्रसंग प्रेक्षकास अगदीं ताजे वाटत असतात. नटांचें दुसरें कौशल्य म्हणजे त्यांस निरनिराळ्या भूमिकेशीं समरस व्हावें लागतें. नट तोच परंतु भूमिका निराळी. परंतु प्रेक्षकास मात्र त्याची जाणीव होऊं नये हें नटाचें खरें कौशल्य होय. आपल्यांतील नैसर्गिक गुणांप्रमाणें कांहीं नटांचीं नांवें कांहीं भूमिकांशीं कायमचीं निगडित झालीं आहेत.

नाटकानें सत्याचा यशस्वी आभास उत्पन्न करतां येत असल्यानें नाटक हें लोकजागृतीचें फार महत्त्वाचें साधन आहे. ग्रंथ एका वेळीं एकच मनुष्य वाचूं शकेल, परंतु नाटक हजारों प्रेक्षक एका वेळीं पाहूं शकतात. भिन्नरुचींच्या लोकांचें मन एका ठिकाणीं केंद्रीभूत करणें हें नाटकाचें मुख्य कार्य आहे. इतिहासांतील संस्मरणीय प्रसंग, पुराणांतील उद्बोधक कथा, समाजांतील महत्त्वाच्या प्रश्नांचें विवेचन इत्यादि कार्यें अतिशय मोठ्या प्रमाणावर करण्याचें कार्य नाट्यकला करते. मनोरंजन व हेतुबोध हीं दोन्हीं कार्यें नाट्यकला यशस्वीपणें करते. म्हणून नाटकाला संसाराचें चित्र म्हणतात.

परंतु नाट्यकलेच्या साहित्याला कांहीं मर्यादा आहेत. त्या मर्यादा किंवा उणीवा बोलपटांनीं दूर केल्या आहेत. चित्रपटांच्या मूकावस्थेमध्यें नाट्यकलेंतील कांहीं उणीवा दुर झाल्या, परंतु चित्रपट 'बोलूं' लागल्यावर त्यांनीं एक प्रकारें नाट्यकला परमोत्कर्षास गेली. नाटकाचें सगळें यश नटांवर अवलंबून असतें आणि नटाबरोबर त्यांची कला आणि त्यांचें यशहि नाहींसें होतें. तें कौशल्य, तें यशस्वी नाट्य छायालेखनाच्या ( फोटोग्राफी ) साहाय्यानें आतां अमर झालें आहे. छापण्याच्या कलेनें जगांतील ज्ञान जसें अमर केलें तेंच कार्य छायालेखनकलेनें केलें आहे. नाटकांपेक्षां बोलपटांतील दुसरी सोय म्हणजे दृश्यें परिणामकारक करण्यासाठीं जी पार्श्वभूमि लागते

ती नाटकापेक्षां बोलपटांत जास्त जिवंत नि नैसर्गिक असते. तिसरी मोठी सुधारणा म्हणजे नाटकांचीं स्थलकालाचीं बंधनें बोलपटांनीं दूर केलीं. एकच बोलपट एकाच वेळीं निरनिराळ्या चित्रपटगृहांतून कोट्यावधि प्रेक्षक पाहतात आणि बोलपटकथा वाटेल तितक्या वेळां वाटेल त्या वेळीं दाखवतां आणि पाहतां येते.

नाटकांत मूळ कथेचें पूर्ण स्वरूप उतरविण्यासाठीं जीं साधनें असतात त्या मानानें बोलपटास अनंतपट साधनें असतात. रंगभूमीवर झालेल्या चुका ताबडतोब सुधारण्यास अवकाश नसतो; बोलपटास तें बंधन नाहीं.

या व इतर अनेक साधनांमुळें नाट्यकलेचा हेतु बोलपटांनीं किती तरी पटीनें यशस्वी केला आहे. 'आपलें गाव न सोडतां अल्प मोबदल्यांत विश्व-संचाराचें सुख बोलपट देतात.

सुधारलेल्या देशांत बोलपट हें ज्ञानप्रसाराचें व मतप्रचाराचें अत्यंत प्रभावी साधन झालें आहे.

---

## २९ : : : वर्तमानपत्रें

जगांत ज्ञानसंपादनाचीं साधनें दरक्षणीं वाढत आहेत. अज्ञात असलेले आणि अज्ञेय वाटणारे असे किती तरी विषय, निसर्गांतील कितीतरी रहस्यें दरक्षणीं उकलत आहेत. दरक्षणीं जगांतील ज्ञानसंग्रह वाढत आहे.

हा वाढता ज्ञानसंग्रह सर्वत्र पसरावा हेंच त्या संग्रहाचें सार्थक आहे. या दृष्टीनें ज्ञानसंपादनाबरोबरच ज्ञानप्रसाराचींहि साधनें वाढत आहेत. छापण्याच्या कलेनें ज्ञानप्रसाराच्या कार्यांत फार मोठें कार्य केलें आहे. वर्तमानपत्रें हीं ज्ञानप्रसाराच्या कार्यक्षेत्रांत फार महत्त्वाचें कार्य करीत आहेत.

वर्तमानपत्र या शब्दांतील वर्तमान या शब्दावरून वर्तमानपत्राचा हेतु दिसून येतो. आपला भविष्यकाळ उज्ज्वल करण्यासाठीं व्यक्तीप्रमाणें समा-जहि मोठमोठ्या आकांक्षा मनांत बाळगतो. त्या आकांक्षा पूर्ण होण्यासाठीं

आपण चालू कार्यांची योजना त्या धोरणानें केली पाहिजे आणि त्यासाठीं वर्तमानकालाचें आपणांस सांगोपांग ज्ञान असलें पाहिजे.

जगांत ज्या घडामोडी होतात त्यांचें विशिष्ट दृष्टीनें संकलन व संपादन करून त्यांचें वृत्त दूरवर पोहोंचवणें हें वर्तमानपत्राचें कार्य आहे. वर्तमानपत्रें हीं वर्तमानवृत्तपत्रें म्हणजेच चालू काळाचें वृत्त देणारीं पत्रें असतात. दररोज जगभर माहिती पुरविणारे ते जासूदच होत. एखाद्या राजाचे बेत यशस्वी होणें हें त्याच्या पदरीं असलेल्या जासूदांच्या कार्यावर अवलंबून असतें. तसेंच एखाद्या समाजाचें किंवा राष्ट्राचें कार्य त्यांतील वर्तमानपत्रसंस्थेवर अवलंबून असतें.

दररोज, आठवड्यांतून दोनदां, एकदां, पंधरा दिवसांनीं, महिन्यानें, तीन महिन्यांनीं अशा निरनिराळ्या प्रसिद्धिकालाप्रमाणें वर्तमानपत्रांचे दैनिक, अर्धसाप्ताहिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक वगैरे प्रकार असतात. प्रसिद्धिकालांत फरक असला तरी हेतु ज्ञानप्रसार हाच असतो.

ज्ञानप्रसार या सामान्य हेतूंत कांहीं विशेष प्रकार असतात. एकंदर माहितीपैकीं विशिष्ट माहिती निवडून त्यावर भाष्य करून निरनिराळीं वर्तमानपत्रें राजकारणांतील किंवा सामाजिक चळवळींतील आपापल्या पक्षाचा मतप्रचार करीत असतात. हल्लींच्या काळीं प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या साहाय्यानें मतप्रचार करणें हें वर्तमानपत्रांचें मुख्य कार्य आहे. विशेषतः दैनिकें, साप्ताहिकें, पाक्षिकें राजकारणांतील निरनिराळ्या पक्षांपैकीं आपापल्या पक्षाचें समर्थन व मतप्रचार करीत असतात. या मतप्रचाराच्या ईर्ष्येमुळें वर्तमानपत्रांतून पुष्कळ वेळां वैयक्तिक टीकेपर्यंत मजल जाते. या वैयक्तिक टीकेच्या विपरीत स्वरूपामुळें लोकप्रियता मिळविण्याच्या नादानें समाजांतील हीन अभिरुचीचा पुरस्कार होऊं लागतो.

वरील दोष अत्यंत घातुक आहे, याविषयीं कोणाचाहि मतभेद होणार नाहीं. वाचकांनीं आपल्या अभिरुचीचा दर्जा वाढविल्याखेरीज हा दोष दूर होणार नाहीं.

मतप्रचाराचा भाग वगळल्यास वर्तमानपत्रांतील राहिलेल्या भागांत ज्ञानाच्या विविध शाखेंतील माहितीचें अत्यंत उपयुक्त संकलन होत असतें.

इतकी विविध माहिती दररोज प्रसिद्ध होते कीं, ती नुसती वाचण्याचें म्हटलें तरी वाचकास वेळ पुरणार नाहीं. महत्त्वाच्या विषयावर मोठमोठ्या विचारवंतांचे विचार पैसे दोन पैसे देऊन आपणांस कळतात. ही वर्तमानपत्रांची केवढी सेवा आहे !

वर्तमानपत्रें हीं जगाच्या इतिहासग्रंथाचीं मोकळीं पानेंच आहेत आणि वर्तमानपत्रांचे संपादक हे चित्रगुप्तच आहेत. आपण करीत असलेल्या कार्याचें परिणामाच्या दृष्टीनें महत्त्व लक्षांत घेऊन त्या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनीं अत्यंत निःपक्षपातीपणानें आपलें कार्य करावयास पाहिजे. ग्रंथकारांपेक्षांहि वर्तमानपत्रकर्त्यांवर जास्त जबाबदारी असते. केवळ लोकरंजनासाठीं पैशाच्या लोभानें त्यांनीं वाचकांच्या हीन मनोवृत्तींना उत्तेजन देणें हें फार मोठें पाप आहे. वृत्तपत्रद्वारां देशांत जागृति उत्पन्न करण्याचें कार्य ज्यांनीं केलें त्यांत लोकमान्य टिळक, आगरकर, चिपळूणकर, शिवरामपंत परांजपे इत्यादि महाराष्ट्रीयांचीं नावें अजरामर झालीं आहेत.

---

## ३० : : : रोजनिशी

रोजनिशी हा स्वतःचा मित्र आहे. फार काय मित्रापेक्षांहि तो श्रेष्ठ आहे. मित्रापेक्षांहि रोजनिशी जीवनास जास्त जवळ आहे. रोजनिशी हा मित्र आहे आणि गुरुहि आहे. मात्र जी रोजनिशी प्रामाणिकपणें लिहिली असेल तिलाच एवढी योग्यता येते.

उदाहरणार्थ, एका विद्यार्थ्यानें प्रामाणिकपणें आपल्या रोजनिशीचें एक पान लिहिलें. त्या पानांत, त्या दिवसाचा वृत्तांत लिहून झाल्यावर, त्यानें एकवार त्यावर नजर टाकली आणि त्याला असें आढळून आलें कीं, त्या दिवसांत एकहि महत्त्वाची गोष्ट नमूद झालेली नाहीं. त्या दिवसाचे सर्व तास वायां गेले आहेत. हें लक्षांत आल्याबरोबर त्याच्या मनावर जो परिणाम होईल तो हजारों उपदेशपर ग्रंथांच्या वाचनानेंहि होणार नाहीं. आपल्या उणीवांची, चुकांची आपणांस आठवण देणें, जाणीव देणें, हें

आदर्श मित्राचें कर्तव्य बजावणारे मित्र जगांत दुर्मिळ आहेत. कारण "अप्रियस्यापि पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः" असा व्यवहार आहे. एखाद्या व्यापाऱ्यास आपल्या रोजकीर्दीचें जें महत्त्व आहे तेंच प्रत्येकास प्रामाणिकपणें टिपलेल्या रोजनिशीचें आहे. आपला जीवित-व्यवसाय फायद्यांत चालला आहे कीं तोट्यांत चालला आहे हें समजण्याचें रोजनिशी हें एकमेव साधन आहे.

रोजनिशींत आपण आपले संकल्पहि टिपतों. नवे निश्चय, नवे बेत आपल्या मित्रास सांगण्यास एखाद्या वेळीं संकोच वाटेल. रोजनिशींत आपण त्यांची नोंद करतों आणि पुढें रोजनिशी लिहितां लिहितां मागलीं पानें चाळलीं कीं, आपण आपल्या निश्चयाप्रमाणें किती वागलों याचें सहजच सिंहावलोकन करतां येतें. अनुभवानें शहाणपण येतें आणि हे अनुभव नोंदणें हें रोजनिशीचें कार्य आहे. हें सिंहावलोकन प्रगतीस आवश्यक आहे. तें सिंहावलोकन करण्यास रोजनिशी हें अतिशय उत्तम साधन अ हे.

सार्वजनिक कार्यकर्त्यांची रोजनिशी अनेक कारणांमुळें महत्त्वाची असते. त्यांच्या रोजनिशीमुळें आपल्याला त्यांच्या मनांतील कितीतरी विचार कळतात. त्यांच्या सूक्ष्म आणि व्यापक दृष्टीस दिसणारें जगाचें स्वरूप त्यांच्या रोजनिशीमुळेंच आपणांस कळतें. मोठ्या माणसांची रोजनिशी ही त्यांच्या आत्मचरित्राचीं कच्चीं टांचणेंच होत. त्यांच्या जीवनांत जे बिकट प्रसंग येतात त्यांतून त्यांनीं कसा मार्ग काढला हें कळणें अत्यंत उद्बोधक असतें. त्यांचीं आयुष्यें हीं सामान्य लोकांस पाऊलवाटेसारखीं असतात. संशोधक, समाजसेवक, राजकीय कार्यकर्ते, तत्त्वज्ञानी, यांच्या रोजनिशांमुळें जगांतील कितीतरी अज्ञात गोष्टींवर प्रकाश पडला आहे. रोजनिशी ही आत्मचरित्रापेक्षांहि जास्त मनमोकळेपणानें लिहिलेली असते. जें रोजनिशींत नोंद करण्यास आपलें मन कचरेल तें कृत्य करण्यास आपलें मन धजणार नाहीं. अशा रीतीनें रोजनिशी लिहिण्याची संवय आपल्या चारित्र्यास वळ । लाविते.

## ३१ : रस्त्यावरील एका कुत्र्याचें आत्मकथन

" काय नशीबाचे खेळ आहेत पहा ! एके काळीं मी मोठमोठ्या बंगल्यांतून रहात होतों, खेळत होतों, थोरामोठ्या सरदारांबरोबर देशो-देशीं हिंडलों व नद्या पहाड-ओलांडले. या गोष्टीवर आतां कुणाचा विश्वासहि बसणार नाहीं. कारण मी एक घरांतून घालवून दिलेला, घाणेरड्या रस्त्यावरील गटाराच्या बाजूनें हिंडणारा कुत्रा आहें. शिळ्या भाकरीच्या तुकड्याकरितां मला उन्हातान्हांतून वणवण भटकावें लागत आहे! नुकतेंच मला सहावें संपून सातवें वर्ष लागलें. दोन वर्षांपासून ही माझी स्थिति आहे ! त्यांतून मी एका पायानें लंगडा ! कोण विचारणार मला ?

" माझे आईबाप लहानपणींच मला सोडून गेले. भावाबहिणींना लोकांनीं गोळ्या घालून ठार केलें. त्यामुळें मला 'माझें' असें कुणी नाहीं. लहानपणापासून मला जीविताशीं झगडावें लागत आहे. एखादे दिवशीं मीहि असाच गोळी घालून ठार मारला जावयाचा. पण परमेश्व-राच्या मनांत मला तसें सुखानें मरूं द्यायचें नव्हतें म्हणा किंवा जगांतलें वैभव उपभोगायचें होतें म्हणून म्हणा; मला एका श्रीमंत गृहस्थाच्या चिरं-जीवानें प्रेमानें पाळलें ! तो मला दररोज लोणी व पाव खायला देत असे. पण मी त्यांच्या घरांतल्या मंडळींना नकोसा झालों होतों. माझे तरुण धनी परगांवीं शिक्षणार्थ गेल्यानंतर मला घरांतून हाकलून देण्यांत आलें. त्या घरांत मी किती वैभवांत होतों ! तिथें मला निजण्याकरितां अंथरूणहि मिळालें होतें ! मीं तेथें खूप लोकांशीं ओळखी करून घेतल्या होत्या. पण एकदां प्राणी निराश्रित झाला म्हणजे त्याला कोण विचारतो ? सारें जग माझ्यावर उलटलें ! जो तो मनाला येईल तसा मला त्रास देऊं लागला.

" शेवटीं मला कांहीं तरी आसरा शोधून काढणें भाग पडलें. तेव्हां शहराबाहेरच्या एका पडक्या देवळांत मी राहूं लागलों. तिथें माझ्यासार-खाच एक निराश्रित भिकारी रहात होता. तो मला खाण्यापिण्यास देऊं लागला व मीं त्याचें रात्रीं रक्षण करण्याची कामगिरी घेतली. दिवसभर मी शहरांतील रस्त्यांतून भटकत असें. कांहीं कांहीं वेळेस मी रेल्वे लाईननें

हिंडत असें व प्लॅटफॉर्मच्या बाजूला उतारूंनीं टाकलेलें उष्टें खाऊन रहात असें. रेल्वे लाईनवर असाच उष्टें खातांना दोनदां मी जिवावरच्या संकटांतून निभावलों; नाहींतर मी गाडीखालीं चेंगरून मेलों असतों.

" रस्त्यावर माझ्यासारखे भटकणारे माझे खूप मित्र होते. त्या सर्वांचा एक संघ स्थापन करून मी त्यांचा पुढारी बनलों व आमचा हा तांडा शहरांतून धिंगाणा घालूं लागला. लोकांच्या मनांत दहशत बसली. पण दुर्दैवानें एके दिवशीं एका मनुष्यानें दगड भिरकावून मला मारला. त्यामुळें माझा डावा पाय दुखावला व मी कायमचा लंगडा झालों. अर्थात् त्या संघाचें पुढारीपण गेलें व देवळांतला भिकारीहि मला जवळ घेईना !

" आतां मी येथें आयुष्याच्या घटका मोजीत पडलों आहें. कोणी माझ्याकडे लक्ष देत नाहीं. क्वचित् प्रसंगीं एखाद्या दयाळू माणसाचें मन परिस्थितीमुळें द्रवतें व तो मला खाण्यापिण्यास देतो.

" अर्धवट डोळे मिटून, दुपारच्या वेळीं रस्त्यावरच्या फळीखालीं शांतपणानें बसून मी मनुष्याचा व जगाचा विचार करतों आणि प्राप्त परिस्थितीची पूर्वीच्या वैभवाशीं तुलना करून उदासपणानें हंसत राहतों. नाहींतरी माझ्यासारख्या लंगड्या व निरुपयोगी ' कुत्र्या 'ला आतां दुसरा काय उद्योग असणार ! "

---

## ३२ : सृष्टिसौंदर्यापासून मिळणारें शिक्षण

आधुनिक कालांत लोकांचा कल शहराकडे असल्यामुळें व परिस्थितीच्या तीव्रतेमुळें पोटाकरितां त्यांना शहराकडे धांव घ्यावी लागत असल्यामुळें सृष्टिसौंदर्याचा निरुपमेय आनंद त्यांना मिळणें अशक्य झालें आहे. जिकडे तिकडे गिरणीचा धूर व त्यामुळें मलीन झालेलें धुरकट वातावरण, आगगाड्यांचा धडधडाट, ट्राम, मोटारी इत्यादिकांची धावपळ व गगनचुंबित इमारतींमुळें असंख्य खोपटीं ऊर्फ चाळी, यांमुळें उत्पन्न झालेला कोंदटपणा, असें दृश्य दिसून येतें.

शाळेंतील क्रमिक पुस्तकांतूनहि सृष्टिसौंदर्याच्या विषयावर आपणांस फारसे धडे आढळत नाहींत. तेव्हां मुलांच्या मनांत तरी सृष्ट्यवलोकनाची आवड उत्पन्न व्हावी कशी ? व सृष्टिचमत्काराविषयीं त्यांचें अज्ञान जावें कसें ? पाश्चिमात्य युरोपीय देशांकडे नजर टाकली तर तेथील काव्यग्रंथांतून व चरित्रग्रंथांतून सृष्टीबद्दलचा पूज्यभाव आपणांस दिसून येतो. वर्डस्वर्थ-सारख्या कविश्रेष्ठांनीं सृष्टीचीं वर्णनें फार बहारीचीं केलेलीं आढळून येतात.

सृष्टिसौंदर्यावलोकनापासून आपणांस किती तरी उच्च प्रकारचें शिक्षण मिळवितां येतें. प्रशांत रात्रीं उदय पावणाऱ्या तारका आपणांस नियमित कसें वागावें हें शिकवितात; तर प्रतिपदेची चंद्रकोर नाशावांचून विकास नाहीं हें सत्य शिकवितें. रात्रीनंतर येणारा प्रभातकाल आपणांस आशा-वादी करतो, तर मावळता सूर्यनारायण आपणांस कर्तव्यपूर्तीचा आनंद देतो. सृष्टिसौंदर्य पाहण्यामुळें मनुष्याच्या मनांत कांहीं तरी उदात्त व उच्च विचार येऊं लागतो व सृष्टीबद्दल एक प्रकारचा आदर निर्माण होतो. जगन्नियंत्या परमेश्वराकडे आपलें मन वळतें व मनाला एक प्रकारचें पावित्र्य लाभतें. आपण जर खूप दमूनभागून आलों तर रात्रीं तारकारत्नें आपलें स्वागत करावयास तयार असतात व शीतल वायु आपणांस शांत करीत असतो. आपण क्षणभर ऐहिक अडचणी विसरून जातों व कसल्या तरी गूढ आनंदांत निमग्न होतों.

प्रभातकालीं पाखरांचा किलबिलाट, ‘ काम करा, काम करा ’ असें शिकवितो, तर सुगंधित फुलें ‘ दुसऱ्याकरितां देह झिजवा ’ हें सांगतात. शीतल वायु ‘ शांत रहा ’ असें सांगतो, तर सूर्यकिरण ‘उज्ज्वल व्हा’ असा उपदेश करतो. सृष्टिसौंदर्यावलोकनामुळें आपण आयुष्यांतील अडचणी व भीति विसरतों व आनंद उपभोगतों; हा काय थोडा फायदा झाला ?

वृक्षाभोंवतीं गुंडाळलेली वेल ‘ पुरुषावांचून स्त्रीला जगतां येणें शक्य नाहीं.’ असें शिकविते, तर वसंतऋतूंत फुलणारीं झाडें ‘ वाईट दिवसां-नंतर चांगले दिवस येतातच ’ हें शिकवितात. कण्हेरीचीं फुलें ‘ नुसत्या रूपाला व भडकपणाला भुलूं नकोस ’ असें सांगतात, तर गुलाबाचीं फुलें आपले कांटे दाखवून ‘ चांगल्यासाठीं थोडासा त्रासहि सोसावा लागतो ’

हें पटवून देतात. पौर्णिमेचा उज्ज्वल चंद्र ' कोणीहि दोषहीन असूं शकत नाहीं ' असें सांगतो, तर अमावास्येची काळोखी रात्र ' जग हें निराशामय आहे ' असें सांगते. आयुष्यांत उपयोगीं पडणारीं किती तरी उच्च तत्त्वें आपणांस सृष्टिसौंदर्याच्या अवलोकनापासून मिळतात.

गगनचुंबी पर्वत व नजर फिरवणाऱ्या दऱ्या, मोठमोठ्या नद्या व विस्तीर्ण सरोवरें, किलबिलणारीं पांखरें व असंख्य वन्य पशू, उड्या मारीत जाणारे निर्झर व तांडव नृत्य करणारा सागर, भिन्न भिन्न स्वरूपें धारण करणारें आकाश व त्यांतील सप्तरंगी इंद्रधनुष्य, कोंवळ्या पानांवरील दंवबिंदू—हीं आपणांस मोहून टाकत नाहींत काय? पण हें सौंदर्य पाहण्यास व त्यापासून आनंद लुटण्यास सृष्टीच्या सान्निध्यांत गेलें पाहिजे. कृत्रिम-पणापासून निसर्गाकडे धांव घेतली पाहिजे.

सृष्टींतील घडामोडी पाहिल्या म्हणजे त्यांच्या उत्पत्तिकर्त्याकडे साह-जिकच आपलें लक्ष जातें व कूपमंडूकवृत्ति नाहींशी होऊन बुद्धीची विशालता वाढते आणि अंतःकरणास प्रसन्नता व उत्साह येतो.

---

## ३३ : : सुधारणा आणि सुख

आधुनिक काळांत जग झपाट्यानें सुधारत आहे. दर मिनिटागणिक नवे शोध, नव्या नव्या कल्पना अस्तित्वांत येत आहेत. सुधारणा (फॅशन) ही दैनिक वर्तमानपत्रांप्रमाणेंच झालेली आपणांस दिसून येईल. प्रत्येक दिवशीं नव्या सुधारणा येत आहेत. कालची सुधारणा आज, कालच्या वर्तमानपत्राप्रमाणेंच त्याज्य वाटत आहे. आगगाड्या, मोटारी, आगबोटी, विमानें, रेडिओ, टेलिव्हिजन... एक ना दोन ! अशा हजारों सुखसोयी पाहून मन दंग होऊन जातें व खरेंच आपण किती झपाट्यानें प्रगति-पथावर चालत आहोंत असें वाटतें...पण आपण खरोखरच सुधारत आहोंत का ? असाहि एक विचार मनाला धक्का देऊन जातो.

आपल्या वाडवडिलांच्या वेळीं आगगाड्या नव्हत्या. तेव्हां काशी-यात्रेस जाण्यास ३।४ महिने सहज लागत. तेंहि धोक्याच्या मार्गानें! 'सुरक्षित परत येऊंच ' अशी खात्री देतां येत नव्हती. पण आतां ३–४ दिवसांच्या आंत आपण काशीला जाऊन येऊं शकतों व तेंहि अगदीं निर्धास्तपणें. पोटांतलें पाणीसुद्धां हलणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर विमानाच्या योगानें मुंबईस चहा घेऊन, ग्वालेरला जेवण करून, आग्र्याचा ताजमहाल पहातां येणें शक्य झालें आहे.

पूर्वी कोठें दूरच्या ठिकाणीं निरोप पाठवावयाचा असल्यास विश्वासू सांडणीस्वार पाठवावा लागे. पण आतां पोस्ट-खात्यामुळें हजारों मैल दूर असलेल्याहि आप्तेष्टांस सविस्तर निरोप अगदीं थोड्या खर्चानें कळवतां येतो.

रेडिओ आणि सिनेमा यांच्या प्रचारामुळें आतां आपली कूपमंडूकवृत्ति जाऊन आपला जगाशीं संबंध येऊं लागला आहे. वर्तमानपत्रांच्या योगानें जगाच्या एका टोंकावरील बातमी दुसऱ्या टोंकाला सहज कळते. सिनेमाच्या योगानें दूरदूरचे प्रदेश, लोक, इमारती, सृष्टिसौंदर्य आहे त्या स्थितींत पहावयास मिळतात.-चार-दोन आण्यांत दूरदूरचे प्रदेश पहावयास मिळणें, हें काय थोडें सुख झालें?

अशा कितीतरी गोष्टी आपणांस दाखवून देतां येतील! सारांश, या यांत्रिक-युगांत नव्या नव्या शोधांमुळें आपला पैसा, श्रम व वेळ वांचत आहे व मिळालेला वेळ राजकारण, वाङ्मय यांच्या वाढीकडे, कलांच्या उत्कर्षाकडे घालवला जात आहे. आपण अद्याप थोडे परतंत्र आहोंत, आपणांस पूर्णपणें स्वतंत्र व्हावयाचें आहे, इतर राष्ट्रें आपल्या मानानें खूप सुधारलेलीं आहेत, ही जाणीव आतां आपणांस उत्पन्न झाली आहे. यंत्रांच्या प्रचारामुळें आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रांत आपणांस सुख मिळत आहे. पूर्वी एखादा ग्रंथ लिहिण्यास ५-६ महिने सहज लागत, पण आतां दररोज शेंकडों ग्रंथ छापले जात आहेत.

आतां ' स्त्रियांचा प्रश्न ' सुटत आहे. स्त्रियांना समाजांत पुरुषांबरोबर समानता मिळूं लागली आहे. अस्पृश्यता जाऊन एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होत

आहे. जगांतल्या राजकारणाशीं संबंध येऊन आपणांस बरेचसें ज्ञान प्राप्त झालें आहे. भुताखेताच्या वेडगळ समजुती व लोकभ्रम दूर होत आहेत. मनुष्यांचें कर्तृत्व हातांच्या रेषांवर नसून मनगटांत आहे, दूरदूरच्या ग्रहांवर नसून पृथ्वीवर आहे, याची जाणीव उत्पन्न झाली आहे. दैववादाचा लय होऊन प्रयत्नवादाची वाढ झाली आहे. भूतकालीन मोठेपणाच्या गप्पा न मारतां भविष्यकाल उज्ज्वल कसा होईल इकडे आपलें लक्ष लागलें आहे. सारांश, आपल्यांत जीवंतपणा आला आहे. सुखाच्या मार्गावर आपण पुढें जात आहोंत.

प्रत्येक गोष्टीस जशा दोन बाजू असतात, तसेंच वरील विचारावरहि आक्षेप घेणारे लोक आहेत. ' यंत्राच्या प्रसारामुळें बेकारी वाढते. यंत्रामुळें माणसाची विध्वंस करण्याची शक्ति वाढली ' इत्यादि आक्षेप नेहमीं ऐकूं येतात. परंतु या आक्षेपांचा विचार करतांना यंत्र आणि यंत्राचा उपयोग करणारे आपण यांत भेद केला पाहिजे. यंत्रसंशोधकांना दोष देतां येईल का ?

आपलीं बहुमोल आयुष्यें खर्चून ज्यांनीं यंत्रें शोधून काढलीं तीं काय मनुष्याच्या अपकर्षाकरितां? बिचारीं निर्जीव यंत्रें काय, तुम्ही वागवाल तशीं वागणार ! जात्यांत बोट घातलें आणि तें चेंगरलें तर त्यांत जात्याचा दोष नाहीं; तर त्या जात्याचा तसा उपयोग करणाऱ्याचा दोष आहे. तसेंच यंत्रांमुळें बेकारी वाढली, गिरणी-मालकाची दृष्टि फायद्यावर जाऊं लागली व सारा पैसा त्याच्याकडे जाऊं लागला. त्या पैशांतून त्याला लोकांची बेकारीची स्थिति इतर प्रकारें खास घालवतां येईल ! पण त्याची इच्छा नाहीं ! मनुष्य हा स्वार्थी आहे. ज्या अग्नीचा उपयोग अन्न शिजविण्याकडे करावयाचा त्याचा उपयोग जर तो घरें जाळण्याकडे करूं लागला तर अग्नि काय करणार ?

सारांश, सुखाचीं साधनें वाढलीं. मनुष्य सुखी होऊं लागला. तो सुधारूं लागला आहे ! आतां या नवीन शोधांचा उपयोग मनुष्य शहाणपणानें करीत नाहीं ही गोष्ट निराळी ! त्यांत यंत्राचा काय दोष? मनुष्य हाच मनुष्याचा मुख्य शत्रु आहे !

---

## ३४ : : माझा आवडता खेळ

लहानपणीं मी हुतुतू, आट्यापाट्या, खो-खो हे खेळ खेळत असें व पुढें मी क्रिकेट खेळूं लागलों. सर्व खेळांत मला 'क्रिकेट' हा खेळ आवडूं लागला. क्रिकेटचे सामने पहात बसण्याचें मला पुढें वेडच लागलें. उन्हातान्हाची पर्वा न करितां मी क्रिकेटचे सामने अगदीं एकाग्रतेनें पहात असें. मला या सामन्यापुढें जेवणाचें सुद्धां भान नसे. ५–६ तास सतत सामने पहात बसण्यांत मला खूप मौज वाटे !

क्रिकेट हा असा खेळ आहे कीं, तो मोठेपणींसुद्धां खेळतां येतो. मुंबईचे सामने आम्ही किती उत्सुकतेनें रेडिओंतून ऐकतों व परदेशांतील 'इंग्लंड - ऑस्ट्रेलियाचे' वगैरे सामने आम्हीं वर्तमानपत्रांतून वाचावयास किती उत्सुक असतों !

'क्रिकेट' हा खेळ हिंदुस्थानांतला नाहीं हें खरें ! हा खेळ इंग्लंडमध्यें प्रथम सुरू झाला. आतां हा खेळ साऱ्या जगभर खेळतात. इंग्लंड व ऑस्ट्रेलियांत नेहमीं आंतरराष्ट्रीय सामने झालेले आपण वाचतों. हिंदुस्थानांत सुद्धां पुष्कळ ठिकाणीं हा खेळ मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. विशेषतः मुंबई, कराची व कलकत्ता अशा ठिकाणीं या खेळाचें प्रमाण जास्त. छोट्या छोटया मुलांचीं मनेंहि या खेळानें आकर्षून घेतलीं आहेत. हातांत एक फळी व चेंडू घेऊन ग्राउंडकडे चाललेलीं कितीतरी मुलें लहानमोठया गांवांत दिसतात.

या खेळास कमींत कमी २२ गडी तरी लागतात. शिवाय क्रीडांगण लागतें व क्रिकेटचें सर्व सामान लागतें. एवढी गोष्ट खरी कीं, हा खेळ थोडासा खर्चिक आहे. त्यामुळें सर्वांना तो परवडत नाहीं. श्रीमंत तरुण या खेळांत पुष्कळ भाग घेतात. क्रिकेटपटूचें नांव वर्तमानपत्रांतून नेहमीं झळकतें. वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने या खेळांच्या वर्णनानें नेहमीं भरलेले असतात.

या खेळामुळें खेळाडूवृत्ति उत्पन्न होते व सामुदायिक ऐक्य उत्पन्न होतें. अपयशाची चीड उत्पन्न होत नाहीं; तर मनमोकळेपणा उत्पन्न होतो.

हा खेळ खेळण्यांत एक प्रकारचा आनंद व अभिमान उत्पन्न होतो व मोठा गौरवहि मिळवितां येतो.

या खेळामुळें खेळाडूंमध्यें एक प्रकारची शिस्त व सभ्यता उत्पन्न होते. शरीराला सारखा व्यायाम मिळतो. हा खेळ जागतिक असल्यामुळें आपण जगाशीं संबद्ध आहोंत याची जाणीव होते. सर्व लोक उत्सुकतेनें क्रिकेटचीं वर्णनें वर्तमानपत्रांतून वाचतात.

शाळा-कॉलेजमधून नेहमीं सामने चाललेले आपणांस दिसून येतात. 'गेम्स-फी 'पैकीं बराचसा पैसा या खेळाला दिलेला असतो व या खेळाला महत्त्व दिलेलें असतें. क्रिकेटपटु विद्यार्थ्यांकडे शाळेचें लक्ष जास्त असतें. या खेळाच्या माहितीकरितां CRICKET या नांवाचें एक मासिकहि निघत असतें. त्यांत या खेळाविषयीं सर्व माहिती असते. 'बोलिंग कसें करावें ', 'चेंडू कसा मारावा ', इत्यादि माहिती सचित्र पुरवलेली असते.

हा खेळ पुष्कळ लोकांना आवडतो. इतर खेळांपेक्षां किती तरी विस्तीर्ण पटांगण या खेळाला लागतें. शिवाय क्रिकेटच्या सामन्याच्या वेळेस तंबू वगैरे उभारावे लागतात. एकंदरींत सामन्याच्या वेळचा देखावा अतिशय भव्य.

क्रिकेटशीं संबंध नसणारे प्रेक्षकसुद्धां हा खेळ अत्यंत आवडीनें पहात असतात. पुष्कळ वेळां क्रिकेटचे तिरंगी-पंचरंगी सामने पहाण्याकरितां लोक परगांवाहूनहि येतात. इतकी आवड लोकांना या खेळाची आहे. इंग्रजी भाषा जशी जागतिक झाली आहे तसाच हा खेळही जागतिक झाला आहे. 'देवधर ' हें महाराष्ट्रीय नांव याच खेळानें सर्व जगास ऐकविलें आहे.

मला तरी या खेळाचें भयंकर वेड आहे. 'क्रिकेटची मॅच ' मला एखाद्या सिनेमा–नाटकापेक्षांहि जास्त वाटते. जेवण सुचत नाहीं. अभ्यास सुचत नाहीं. सामना पहावयास गेलों म्हणजेच समाधान वाटतें.

## ३५ : : सकाळची शोभा

आयुष्यांत जसें ' बालपण ' रम्य असतें तसाच सर्व दिवसांत 'प्रातः-काल' अतिशय मनोहर असतो. एकदां मी पहाटेच फिरावयास गेलों होतों. नदीकांठीं आमचें गांव असल्यामुळें मीं तिकडेच आपला मोर्चा वळवला.

पहाटेची झुंजुमुंजु संपून सुंदर संधिप्रकाश पडला होता. शेतांतील कणसांचीं ताटें आनंदानें डुलूं लागलीं होतीं. निराशेची रात्र पळून जाऊन आशेची ज्योत पूर्व क्षितिजांतून वर येत होती. त्यामुळें अतिशय रम्य वातावरण निर्माण झालें होतें. पूर्व दिशा हळुहळू उजळूं लागली व सूर्यनारायणाचीं पावलें ऐकूं येऊं लागलीं. मेघराजांनीं आपल्या देहाच्या पायघड्या सूर्यनारायणाकरितां पसरल्या. उषेनें भगवान् सूर्याच्या आगमनाकरितां नाना तऱ्हेचीं–रंगाचीं–वस्त्रें परिधान करण्यास सुरवात केली. एक वस्त्र पसंत न पडून त्याऐवजीं दुसरें नेसावें असें तिचें क्षणोक्षणीं चाललें होतें. अशा वस्त्रांचा केवढातरी प्रचंड ढीग दिसत होता. शेवटीं तिनें गुलाबी छटांचें वस्त्र पसंत केलें व हंसतमुखानें सूर्याकडे पाहिलें.

पृथ्वीवर तर मूर्तिमंत उत्साहच नाचत होता. रात्रीनें आपलें तोंड काळें केलें होतें व ती दऱ्याखोऱ्यांतून लपून बसूं लागली; पण प्रकाशाचे किरण तिला तिथेंहि राहूं देईनात. थोड्याच वेळांत तिला पश्चिमेच्या दरींत पळून जाणें भाग पडलें.

सूर्याच्या स्वागतार्थ ' सूर्यफुला 'नें आपली नजर पूर्वेकडे फिरविली. वेलीवरील कळ्या हसूं लागल्या. आपल्या चेहऱ्यावरील दंवबिंदूचे अश्रू त्यांनीं केव्हांच पुसून टाकले. पक्षी सुस्वर गाऊं लागले व सामुदायिकपणानें परमेश्वराची प्रार्थना करूं लागले. सरिता आनंदानें नाचूं लागल्या. वायु पुष्पसुगंध उधळीत बागडूं लागला. पृथ्वीवर जिकडे तिकडे आनंदाचें वातावरण निर्माण झालें. नैराश्याची रात्र संपली; आशेची प्रभा उजळूं लागली. पक्ष्यांच्या किलबिलाटांत, सरितेच्या नर्तनांत व वायूच्या बागडण्यांत एकच आनंदाचा ध्वनि निघत होता कीं, ' प्रभात आली, प्रभात आली. '

थोड्याच वेळांत भगवान् सूर्यनारायण हातांत तेजोदीप घेऊन क्षितिजावर आले व त्यांनीं ' कर्तव्य करा, कर्तव्य करा ' हा दिव्य संदेश सांगितला. पक्षी किलकिलाट करीत पिलांना चारा आणण्याकरितां निघाले. गाईनें पाडसास दुग्धपान देण्यास सुरवात केली. शेतकरी खांद्यावर कांबळें टाकून शेताकडे निघाले. कामकरी कामावर निघाले. घरांतील स्त्रिया मंजुळ स्वरांत गाणें म्हणत काम करूं लागल्या. लहान मुलें नाचत बागडत सकाळच्या कोवळ्या उन्हांत खेळूं लागलीं.

प्रभातकालीन तें रम्य वातावरण पाहून कोणाच्या मनांत पवित्र व उदात्त वातावरण निर्माण होणार नाहीं ? प्रभातकाल कवींची स्फूर्तिदेवता आहे; मनुष्याची आशा आहे. उगवत्या सूर्यनारायणाकडे पाहून आपोआपच आपले हात नमन करण्यास जोडले जातात.

मी नदीकांठीं एका दगडावर हें प्रभातकालीन सृष्टिसौंदर्य पहात बसलों होतों. एक प्रकारचा उच्च आनंद मनास होत होता. उगवत्या सूर्यनारायणाचा ' कर्तव्य करा ' हा संदेश मला मिळाला व मी परत गांवाकडे निघालों. दोन्ही बाजूंनीं नयनमनोहर कणसें दिसत होतीं. त्यांवर कोवळे सूर्यकिरण पडल्यामुळें कणसाचीं ताटें जणूं काय सोनेरी मुकुटच घालून झुलत आहेत असें वाटत होतें.

मीं गांवांत प्रवेश केला. वेशीजवळच्या भव्य मंदिरांत नौबद झडत होती व जगन्नियंत्या परमेश्वराची आरती चालली होती. सुस्वर पद्य ऐकूं येत होतें. भाविक लोक प्रातःकाळीं देवाचें दर्शन घेऊन परत येत होते. नकळतच माझें मस्तक नम्र झालें मी उत्साहानें घरीं गेलों आणि स्नान वगैरे करून माझ्या नित्यक्रमास लागलों.

अलीकडे मी नेमानें हें सृष्टिसौंदर्य पाहण्याकरितां व प्रभातकालाचा संदेश ऐकण्याकरितां नदीकांठीं फिरावयास जात असतों. वेलीफुलांसारख्या निर्जीव वस्तूंत प्रभातकाळीं जर इतकी चेतना उत्पन्न होते तर सजीव मानवांत ती कां बरें उत्पन्न होणार नाहीं ?

# ३६ : माझ्या आठवणींतील अतिशय मौजेचा एक रविवार

[ माझ्या रोजनिशींतील एक पान ]

"— रात्रीचा एकाचा ठोका पडला आत्तां. किती उशीर झाला आज मला झोंपायला! नुकताच प्रभातचा 'गोपालकृष्ण' पाहून आलों. आजचा सारा दिवस माझा किती आनंदांत गेला! आजचा रविवार मी कधींहि विसरणें शक्य नाहीं. मनुष्याच्या आयुष्यांत असा एखादाच दिवस येतो कीं, ज्या दिवशीं एकामागून एक घडणारे सारे प्रसंग सुखद संवेदनाच उत्पन्न करीत असतात. तसेंच कांहींसें आज माझें झालें.

सकाळीं मच्छरदाणी बाजूला सारून, तोंड धुऊन चहा घेण्याकरितां स्वयंपाकघरांत गेलों तों आईसमोर बसलेल्या ताईकडे पाहतांच मला क्षण-भर आश्चर्यच वाटलें. किती दिवसांनीं आज ताई माहेरीं आलेली होती! बहुतेक ती पहांटेच्या गाडीनें आलेली असावी असा मीं तर्क केला. २।३ वर्षे आम्हांला ती भेटली नव्हती. तिला पाहतांच मला आनंदाचा ठेवा सांपडल्यासारखें वाटलें. 'केवढा रे मोठा झालास तूं!' असें म्हणून तिनें मला जवळ बसवून घेतलें व पाठीवरून प्रेमळपणानें हात फिरविला. त्या प्रेमळ हातापुढें स्वर्गसुखसुद्धां त्याज्य वाटलें मला. माझ्या ताईचें माझ्यावर किती प्रेम आहे! कारण माझ्याशिवाय प्रेम करायला तिला दुसरा भाऊ नव्हता. आमचें एकमेकांचें प्रेम पाहून आईच्या चेहऱ्यावर आनंद नाचत असतो. ताईला माहीत होतें कीं, मला साय फार आवडते! म्हणून तिनें पटकन् माझ्या चहाच्या कपांत साय घातली! मी ताईला घेऊन माझ्या अभ्यासाच्या खोलींत गेलों व तिला माझी आनंदांत प्रसिद्ध झालेली 'नाट्यछटा' दाखविली. किती अभिमान वाटला तिला माझ्याबद्दल!

नंतर मी व बाबा मंडईत गेलों. मला ठाऊक होतें कीं, ताईला बटा-ट्याची भाजी फार आवडते. म्हणून मी बाबांना बटाटे घ्यावयास सांगि-तले व आम्ही मंडईतून परत आलों.

दुपारीं ताई, बाबा, बापूसाहेब—ताईचे पति— आम्हीं सर्वांनीं हंसत-खेळत व विनोद करीत जेवण आटोपलें. मी व ताई कॅरम खेळत बसलों.

बाबा व बापूसाहेब दिवाणखान्यांत गप्पा मारीत बसले. आई हातांत विणण्याचें सामान घेऊन आमचा खेळ पहात बसली होती. इतक्यांत खालून 'चौधरी ऽ ऽ' अशी हांक ऐकूं आली. 'तुला कुणीसें बोलावतें आहे रे !' बाबांनीं सांगितलें. मीं खिडकींतून पाहिलें. आमच्या शाळेंतील नायडू हा माझा स्नेही आला होता. मीं 'आलों हं' असें सांगून खालीं धूम ठोकली.

"अरे, आज आपल्या शाळेची आणि इंडियन इन्स्टिटयूटची मॅच आहे. सरनीं तुला कॅप्टन केलें आहे. चल लवकर. सरनीं बोलावलंय तुला आत्तां !" असें ऐकतांच मी पळतच माडीवर गेलों. क्रिकेट हा माझा अत्यंत आवडता खेळ ! मी कपडे करून हातांत माझी बॅट फिरवीत 'ताई मी मॅचला जातों ग ऽ ऽ' असें सांगून नायडूबरोबर क्रीडांगणावर गेलों.

सकाळीं मीं कुणाचा चेहरा पाहिला कोण जाणें ! कारण आज माझा सारा दिवस आनंद, उत्साह, यश यांनीं भरलेला दिसला मला. हो ! आठवलं ! सकाळीं मीं प्रथम माझ्या ताईला पाहिलं ! आज माझें कल्पनेबाहेर 'बॅटिंग' झालें. माझी जेव्हां 'सेंचरी' झाली तेव्हां 'पॅव्हीलियन'-मधून 'बक अप चौधरी' असे स्फूर्तिदायक संदेश येऊं लागले. आमची शाळा विजयी ठरली. मी विजयी वीरासारखा 'नॉट आऊट' परत येत असतां टाळ्यांच्या प्रचंड गजरांत मित्रांनीं मला उंच उचलून धरलें. शिक्षकांकडून आजच्या अपूर्व यशाबद्दल मला चांदीचा कप मिळाला !

घरीं आल्यावर मला कळलें कीं, बाबा व बापूसाहेबहि सामना पहावयास आले होते. बापूसाहेबांनीं माझी पाठ थोपटली. बाबांना आनंद झाला. आईनें प्रेमाद्र-दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें. ताईनें 'आहेच माझा अशोक तसा' असें म्हणून कुरवाळलें ! त्यांत बाबांनीं सांगितलें कीं, "तुझे मास्तर मला भेटले होते. तुझा इंग्रजींत पहिला नंबर आलाय म्हणे" हें ऐकतांच माझा आनंद गगनांत मावेना.

संध्याकाळीं ताईजवळ आपण आज 'गोपाळ कृष्ण' पहायला जाऊं असा मीं हट्ट घेतला. ताईनें बापूसाहेबांजवळ हट्ट धरला. 'कांहीं हट्ट विधा-

त्यालासुद्धां पुरवावे लागतात ' असें गडकऱ्यांनीं म्हटलें आहे ना ! आमचें सिनेमास जाण्याचें ठरलें. नुकताच मी ' गोपाल कृष्ण ' पाहून येऊन दैनंदिनी लिहीत आहें. खरंच आजचा रविवार किती आनंदांत गेला माझा ! अशा आनंदाचा दिवस परमेश्वरानें दाखवून दिल्याबद्दल मी त्याला वंदन करून झोंपतों आतां. "

---

## ३७ : 'फुलासंगें मातीस वास लागे'

एखाद्या बागेंत जाईजुईसारख्या फुलवेली फुलांनीं बहरल्या असल्या कीं, जमिनीवरसुद्धां फुलांचा सडा पडतो आणि त्या फुलांच्या सहवासामुळें त्या मातीलासुद्धां सुवास मिळतो. सत्संगतीचें हें अत्यंत समर्पक उदाहरण आहे. संगतीचा परिणाम किती प्रभावी असतो हें फुलें आणि माती या उदाहरणांत दिसून येतें. मातीच्या अंगीं कांहीं गुणधर्म असतात. ते गुणधर्म स्वतंत्रपणें कितीहि वृद्धिंगत झाले तरी सुवासाचा गुण मातींत कधीं उत्पन्न होत नाहीं. निसर्गतः जो गुण मातीस मिळणें अशक्य झालें आहे तो केवळ संगतीमुळें मातीस मिळूं शकतो.

मनुष्याच्या जीवनांत तर संगतीचें फारच महत्त्व आहे. एक तर आपल्या अंगीं निसर्गतः कोणते गुण आहेत याचें फार थोड्यांस ज्ञान असतें. फार काय कित्येक आईबापांसहि आपल्या मुलांतील नैसर्गिक गुणांचा पत्ता लागत नाहीं. मुलांची आवड एका प्रकारची आणि आई-बाप त्यांना दुसऱ्याच आवडीकडे लोटीत असतात. अशा वेळीं कांहीं असामान्य मुलांच्या नैसर्गिक प्रवृत्ति बंड करतात आणि स्वतंत्रपणें वाट काढतात.

सामान्य माणसांच्या नैसर्गिक प्रवृत्तींचें सामर्थ्य सामान्यच असतें. त्या नैसर्गिक प्रवृत्ति भोंवतालच्या वातावरणाप्रमाणें बदलत असतात. स्वतःचा मार्ग शोधण्याइतकें सामर्थ्य त्यांच्यांत नसतें. त्यांचें घर, भाऊ-बहिणी, मित्र

वगैरेंच्या सहवासांत वावरतांना त्यांचें मन तयार होतें. त्यांच्या आवडी-निवडी त्या वातावरणांतच तयार होतात. सामान्य माणसांतले पुष्कळसे गुणावगुण त्यानें आपल्या सहवासक्षेत्रांतून मिळविलेले असतात. तेथें संगतीचें सामर्थ्य प्रत्ययास येतें.

बहुसंख्य माणसांच्या मनाची घडपड अशी कांहींशी परावलंबी असल्यानें प्रत्येकानें संगतीची योग्य निवड करणें जरूर आहे. ज्या गुणांची स्वतंत्रपणें पैदास करण्याची शक्ति किंवा बुद्धि आपल्यांत नसते, ते गुण असलेल्या माणसाच्या सहवासाचा लाभ मिळाल्यास आपणांस प्राप्त होतात. कारण सहवासानें अनुकरणाची बुद्धि होते. अनुकरणांतून संवय उत्पन्न होते आणि संवयीच्या द्वारें कांहीं गोष्टी अंगांत मुरून त्यांना गुणरूप प्राप्त होतें. सद्‌गुणी असावें असें प्रत्येकास वाटतें. परंतु सद्‌गुणांची स्वतः प्रयत्नानें प्राप्ति करण्याइतकें कर्तृत्व फार थोडक्यांत असतें. त्यासाठीं सद्‌गुणी माणसाच्या संगतींत राहणें हाच एक ते सद्‌गुण संपादण्याचा मार्ग आहे. सन्मित्राची थोरवी सहवासाच्याच सामर्थ्यांत आहे.

एका कर्तृत्ववान्, स्वयंसिद्ध, गुणवान् माणसाच्या सहवासानें हजारों माणसांना स्फूर्ति मिळते आणि जागृति येते. नुसत्या उपदेशानें जें होणार नाहीं तें उपदेशकाच्या सहवासानें घडून येतें. शिवाजीच्या सहवासानें हजारों मावळे स्वदेशसेवा करण्यास सिद्ध झाले. साधुसंतांच्या सहवासानें सामान्य माणसांतहि साधुत्व आलें. संगतीचें माहात्म्य दाखविणारीं हजारों उदाहरणें आपल्या देशाच्या इतिहासांत आहेत.

वरील वचनाचा उत्तरार्ध सत्संगतीच्या सामर्थ्याची आणखी एक बाजू दाखविणारा आहे. आपल्या सहवासानें मातीस सुगंध देणारीं फुलें मातीच्या संपर्कापासून अलिप्त राहतात. फुलांना कांहीं मातीचा वास लागत नाहीं. सत्संगतींत सज्जनांचें सज्जनपण कमी होत नाहीं किंवा भ्रष्ट होत नाहीं. कारण तें सज्जनपण फुलांतील सुवासाप्रमाणें स्वयंसिद्ध असतें. देतां दुणावें असें विद्येच्या संबंधांत म्हटलें आहे. तें सत्संगतीच्या बाबतींतहि खरें आहे. असाधूंच्या परिवारांतहि साधूंचें साधुत्व अबाधित राहतें. सद्‌गुणाचें

सामर्थ्य असें आहे. ‘ आपणांसारखें करिती तत्काळ । नाहीं काळ वेळ तयां-लागीं ’ असा सज्जनांचा महिमा पाहूनच कवि म्हणतो—

काय मानूं ऐशा संतांचे उपकार ।

सत्संगतीचा लाभ देणारे संत हे ‘ जगाच्या कल्याणा, उपकारें देह झिजवीत ’ असल्यानें सत्संगति हा सर्वांना सुलभ असा लाभ आहे. सत्संगतीची ओळख आणि ओढ असणारास हा लाभ सहज मिळेल. तो लाभ घेऊन आपल्या जीविताची ‘ माती ’ सुगंधित करण्याचें भाग्य आपण जोडलें पाहिजे.

---

## ३८ : बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें

‘कळतें पण वळत नाहीं’ अशी एक म्हण आहे. साधारणपणें पुष्कळांना या म्हणीचा प्रत्यय येतो आणि आपापल्या अनुभवांचा विचार केला तर कळणें आणि वळणें यांत किती अंतर आहे आणि तें अंतर तोडणें, मधला मार्ग चालून जाणें किती कठीण आहे हें आपणांस त्या अनुभवावरूनच पटतें.

जगांत वंदनीय अशीं जीं माणसें असतात त्यांच्यांत आणि त्यांना वंदन करणाऱ्यांत विचाराच्या दृष्टीनें फारसें अंतर नसतें. वंदनीय विभूतींचे विचार सामान्य माणसासहि पटतात. दया धर्मका मूल है, सत्यमेव जयते, सत्यापरता नाहीं धर्म, इत्यादि तत्त्वें, इत्यादि विचार आपणांस मुखोद्गत असतात. आपण येतां जातां तीं तत्त्वें बोलतों. परंतु प्रत्यक्ष वागण्यांत आपण त्या तत्त्वांना सारखी मुरड घालीत असतों. दयेचें थोरपण माहीत असूनहि स्वार्थासाठीं आपण कमजास्त प्रमाणांत निर्दयी वृत्ति धारण करतों. दुसऱ्याला आपल्या अधिकाराच्या जोरावर राबवतों. आपला डाव साधण्यासाठीं आपण व्यवहाराच्या नांवाखालीं खुशाल असत्याचा आश्रय करतो. त्या त्या वेळीं मनांत आपण ओळखतों कीं, कळणें आणि वळणें यांत फार अंतर आहे.

बोलल्याप्रमाणें आचरण करणाऱ्यास पदोपदीं आपल्या मनाशीं लढाई खेळावी लागते. वंदनीय ठरणारीं माणसें जन्मतःच वंदनीय नसतात. आरंभीं तीं इतर लोकांबरोबरच जगत असतात. सर्वांना मिळणाराच उपदेश त्यांनाहि मिळतो. परंतु ते विचारांना आचारांत आणण्याचा निश्चय करून वागूं लागले कीं, ते असामान्य होऊं लागतात आणि शेवटीं असामान्य आचरणामुळें वंदनीय ठरतात.

स्वदेशसेवेचेंच उदाहरण घ्या. ' वंदे मातरम् ' हें गीत मोठ्या गंभीरपणें म्हणणारे लोक किती तरी असतात. देशावर प्रेम कसें करावें हें प्रत्येक जाणत्या माणसास माहीत असतेंच. परंतु त्या प्रेमाच्या कसोटीची वेळ आली, त्या प्रेमासाठीं सर्वस्व अर्पण करण्याची वेळ आली कीं, तेथें सामान्य आणि असामान्य निरनिराळे दिसूं लागतात आणि कांहीं लोक वंदनीय ठरतात आणि इतर मुकाट्यानें आपलें शिर त्यांच्यापुढें लववितात. त्यांचीं ' वंदावीं पाउलें ' असें सर्वांस स्वयंस्फूर्तीनें वाटूं लागतें.

विचाराप्रमाणें आचार करणारीं माणसें आपल्या विवेकबुद्धीलाच नेहमीं प्रमाण मानतात. त्यांचे विचार पुष्कळ वेळां लोकांना अप्रिय वाटतात. त्यांच्या कल्पना वेडेपणाच्या वाटतात. फार काय लोक त्यांना आपले हितशत्रू समजतात. अशा मतामतांच्या गलबल्यांत आपली श्रद्धा कायम टिकवून यशापयशाची पर्वा न करतां, लोकनिंदा, छळ यांची क्षिति न बाळगतां जे आपलें तत्त्व सोडीत नाहींत, विचार आणि आचार यांत तफावत पडूं देत नाहींत ते शेवटीं वंदनीय ठरतात. त्यांच्या हितबुद्धीचा प्रत्यय लोकांस येतो; त्यांची तपश्चर्या सफल होते.

वंदनीय ठरलेल्यांना हा मान पुष्कळ प्रसंगीं मेल्यानंतर मिळतो ! जिवंतपणीं आमरण त्यांना झगडावें लागतें. ते आपल्या मनांत कीर्तीचा अणुमात्र लोभ ठेवीत नाहींत. आपण तत्त्वाप्रमाणें, विचाराप्रमाणें आचरण करीत आहोंत एवढेंच त्यांना समाधान असतें. हें समाधान हेंच त्यांचें सामर्थ्य असतें. अशा सामर्थ्यानें त्यांची आपल्या तत्त्वावरील श्रद्धा दृढ होते आणि त्या श्रद्धेचा विजय होतो. जगांतील सर्व वंदनीय महात्म्यांचीं चरित्रें आपणांस हेंच दाखवितात कीं, वंदनीयता नुसत्या विचारांनीं प्राप्त होत नाहीं तर आचारानें प्राप्त होते.

## ३९ : : युद्ध कीं शांतता ?

आज सर्व जगास गिळूं पाहणारें युद्ध अगदीं चांगलें आठवत असतां वरील प्रश्न वेडेपणाचा वाटेल. जीवित आणि वित्त यांचा दरक्षणीं सरास संहार करणारें असें युद्ध असावें असें कोणाच्या शहाण्या माणसास वाटेल ? युद्ध म्हटलें म्हणजे सामान्य माणसाचें मन तर एकदम बधिर होतेंच, परंतु मोठमोठे धुरंधरसुद्धां युद्धाचें भेसूर स्वरूप आठवतांच चिंतातुर होतात.

गेलें महायुद्ध संपल्यावर पुन्हां जगांत युद्ध होऊं नये, राष्ट्राराष्ट्रांतील भांडणें सलोख्यानें मिटावींत याशाठीं जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं एक राष्ट्रसंघ स्थापन केला आणि आपापल्या तक्रारी सर्वानुमतें नेमलेल्या लवादाकडून मिटविण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु शेवटीं हा प्रयत्न फोल ठरला. राष्ट्रसंघ, शांतता-परिषदा, शस्त्रसंन्यास-परिषदा या सर्व धडपडींना युद्धप्रिय राष्ट्रांना आळा घालतां आला नाहीं ! शेवटीं हिटलर आणि मुसोलिनी यांनीं आपापलीं राष्ट्रें रणभूमीवर उतरविलीं आणि एकामागून एक राष्ट्रांना रुधिरस्नान घालण्याचा सपाटा चालू ठेवला. हा नरयज्ञ केव्हां थांबेल हें सांगणें अशक्य झालें !

ज्यांना या युद्धांत जबर तडाखे बसले ते युद्धास कंटाळले असतील यांत कांहींच नवल नाहीं. परंतु जे विजयी झाले त्यांना तरी युद्धाबद्दल काय वाटत असेल ? विजयी राष्ट्रांना विजयाची केवढी किंमत द्यावी लागत आहे ? विजयाच्या उन्मादानें मनें जरा वेळ बेभान होतील, परंतु पोटाला चिमटा बसला कीं, तो उन्माद क्षणार्धांत उतरतो. आज विजयी राष्ट्रांतहि पराभूत राष्ट्राप्रमाणें अन्नाचा तुटवडा पडला आहे. अतिशय परिश्रमानें, सर्व जगाचें कल्याण करण्यासाठीं उभारलेलीं कामें आज उध्वस्त झालीं आहेत. कोटयवधि माणसांचे श्रम धुळीला मिळाले आहेत. निरापराधी अर्भकांचे बळी पडले. कर्तबगार अशा तरुणपिढीचा संहार झाला. झालेलें नुकसान भरून येण्यास कदाचित् एखादें शतक लागेल आणि कांहीं नुकसान तर कधींहि भरून येणार नाहीं, एवढा विध्वंस युद्धानें केला आहे. कारण या युद्धांत आजपर्यंतच्या कोणत्याहि युद्धापेक्षां जास्त परिणामकारक अशीं

विध्वंसक साधनें वापरलीं गेलीं. माणसाच्या संहारशक्तीची कमाल मर्यादा या युद्धानें गांठली !

हें पाहिल्यावर शांततेचे वाटेल ते तोटे पुरवले परंतु युद्ध नको, असें वाटतें. परंतु युद्धाचें समर्थन करणारे असें म्हणतील, 'युद्ध नसतें तर जगांत वीरश्री ही चीजच दिसली नसती. नवीं राष्ट्रें उदयास आलीं नसतीं. जग गंजून गेलें असतें. कोठें पराक्रम नाहीं; वीरश्री नाहीं; शौर्य नाहीं. कित्येक पशुपक्षी जसे पूर्वापार स्थितींत आहेत तशींच माणसें राहिलीं असतीं. शिवाजी, नेपोलियन, अलेक्झांडर, भाऊसाहेब, बापू गोखले वगैरे नांवें कधीं उच्चारलीं गेलीं नसतीं ! अमेरिका, जपान, रशिया हीं राष्ट्रें जन्मासहि आलीं नसतीं. यावरून असें वाटूं लागतें कीं, जगांतील कांहीं युद्धांमुळें अन्यायाचें परिमार्जन, अरेराव आणि अरेरावी यांचा बंदोबस्त झाला आहे आणि जगास कल्याणकारक अशा गोष्टी रणभूमीवर जन्मास आल्या आहेत.'

परंतु जगांतील एकंदर युद्धाचा इतिहास पाहिला तर सत्याच्या संरक्षणासाठीं, असत्याच्या निर्दालनासाठीं झालेलीं युद्धें फार थोडीं आढळतात. बहुतेक युद्धें कांहीं अरेरावांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें उत्पन्न होतात. आत्मसंरक्षणाच्या नांवाखालीं युद्धसामुग्री वाढवितां वाढवितां शेवटीं त्या सामुग्रीचा उपयोग करण्याच्या इच्छेनेंच युद्धप्रवृत्ति उत्पन्न होते. युद्धाचा ज्या वेळीं निषेध करण्यांत येतो त्या वेळीं अशा अरेरावांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें उत्पन्न होणाऱ्या युद्धांचा निषेध करण्यांत येतो. शांततेचे कट्टे पुरस्कर्तेसुद्धां तत्त्वासाठीं शस्त्र हातीं घेण्यास आणि प्रसंगीं प्राणार्पणहि करण्यास सिद्ध असतात. युद्ध म्हणजे अरेरावी नव्हे. तसेंच शांतता म्हणजे दुर्बलतेचें समर्थन नव्हे. जगाच्या कल्याणासाठीं परमेश्वरहि हातांत शस्त्र घेतो. परंतु तें ' अभ्युत्थानाय धर्मस्य ' हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युद्ध किंवा शांतता हीं हेतु व परिणाम यांच्या दृष्टीनें स्तुत्य किंवा निंद्य ठरतील.

End justifies the means.

हें तत्त्व युद्धाची युक्तायुक्तता ठरवितांना लक्षांत ठेविलें पाहिजे.

## ४० : : 'लहानपण दे गा देवा'

अंगीं मोठेपणा आलेलीं माणसें मोठेपणाच्या गर्वानें कशीं वागतात हें पाहिल्यावर तुकारामानें देवाची प्रार्थना केली कीं, मोठेपणाच्या नादानें गर्व, अहंकार, सत्तेची धुंदी, अरेरावी हीं अंगीं येण्यापेक्षां मला आपलें लहानपणच दे! आपल्या अंगच्या सत्तेमुळें दुर्बलांचें रक्षण होत असेल, अनाथांना साहाय्य मिळत असेल, दीनांना दया मिळत असेल तर ती सत्ता सत्कारणीं लागली असें म्हणतां येईल. परंतु ज्या सत्तेमुळें अंगीं अरेरावी माजते, ज्या सत्तेमुळें जाच होऊन दुर्बळ शिव्याशाप देतात आणि सत्ताधीशाचा नाश व्हावा म्हणून प्रार्थना करतात ती सत्ता हा वर नसून शापच आहे. अरेरावांची सत्ता जगांत टिकाऊ ठरत नाहीं. त्या सत्तेला लवविणारा शेरास सव्वाशेर केव्हां तरी भेटतोच आणि अरेरावांचा अधःपात आणि नाश हा अत्यंत दुःखजनक असतो. या अभंगांत तुकारामानें दुरुपयोगी किंवा निरुपयोगी सत्तेचा निषेध केला आहे.

या अभंगांत मुंगी आणि ऐरावत यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांतील तत्त्व अत्यंत महत्त्वाचें आहे. ऐरावत हा हत्तींमध्यें सर्वश्रेष्ठ समजला जातो. परंतु खरें पाहिलें असतां त्याच्यांत श्रेष्ठतेचें कांहींहि चिन्ह नसतें. इंद्राचा आश्रय मिळाल्यामुळेंच त्यास मोठेपण मिळतें. त्या खोट्या बेगडी मोठेपणास भुलल्यामुळें त्यास अंकुशाचा मार सहन करावा लागतो. मोठेपणाच्या लोभानें ऐरावतानें अत्यंत हीन दर्जाचें दास्य पत्करलेलें असतें. स्वतःच्या अंगीं शक्तीचा एवढा मोठा सांठा असून यःकश्चित् मनुष्य त्याला वांकवूं शकतो. याचें कारण ऐरावतीसारख्या रत्नास आपल्या सामर्थ्याचा उपयोग करण्याची बुद्धि नाहीं. त्यापेक्षां स्वावलंबनाचा आदर्श अशी मुंगी परपुष्ट हत्तीपेक्षां श्रेष्ठ आहे. हें पाहिल्यावर ऐरावती रत्नाच्या बेगडी मोठेपणापेक्षां दिसावयास क्षुद्र परंतु वास्तविक आदरणीय असें मुंगीचें लहानपण श्रेष्ठ आहे. हत्ती होऊन लांकडे मोडण्यापेक्षां मुंगी होऊन साखर खावी या म्हणींतहि सत्तेचें खरें

मोलच सांगितलें आहे. 'लुळ्यापांगळ्या श्रीमंतीपेक्षां धट्टीकट्टी गरिबी बरी' या म्हणींतहि वरील तत्त्वाचाच निर्देश केला आहे.

वरील वचनांतील लहानपण हा शब्द रूढ अशा अर्थानें वापरला आहे असा पुष्कळांचा समज होतो. परंतु तो समज चुकीचा आहे. निरुपयोगी वा दुरुपयोगी सामर्थ्यांचा तुकारामानें एक प्रकारें वरील वचनांत निषेध केला आहे. मला सामर्थ्य देऊन हत्ती करण्यापेक्षां मी आपला मुंगीच राहतों, असें तुकारामाचें म्हणणें आहे. त्यांत दुबळेपणाचें समर्थन नाहीं. तर निष्फळ होणाऱ्या बलाचा निषेध आहे. तसेंच ऐरावताचें उदाहरण देण्यांत सुद्धां मोठेपणा अंगीं येण्यासाठीं कष्ट सहन करावे लागतात इत्यादि तत्त्व सांगितलें हाहि चुकीचा समज आहे. कारण ऐरावतास कष्ट केल्यामुळें किंवा पराक्रमामुळें मोठेपण आलेलें नसतें. ऐरावताच्या उदाहरणांत निरुपयोगी सामर्थ्य आणि बेगडी वैभवाचा निषेध हाच अर्थ आहे. असे वैभवाच्या लोभानें गुलाम झालेले बलवंत पाहिल्यावर तुकारामानें देवाची प्रार्थना केली कीं, देवा असें मोठेपण देऊन विटंबना करण्यापेक्षां मला आपला मुंगीचाच मार्ग पत्करावासा वाटतो !

---

## ४१ : : अस्पृश्योद्धार

एखादा माणूस अतिशय दुर्गुणी असला तरी तो केवळ मोठ्या कुळांत जन्माला आला आहे एवढ्याच बाशिल्यावर त्यास सभ्य माणसाचे सर्व अधिकार, मानमरातब देणें योग्य आहे काय ? त्याच्या उलट एखाद्या व्यक्तींत चांगले गुण असूनहि केवळ तो समाजानें केव्हांतरी हीन ठरविलेल्या कुळांत जन्मास आला म्हणून त्याच्या गुणांना किंमत न देणें व त्यास मातीमोल ठरविणें हें रास्त आहे काय ? माणसाची लायकी कशावर ठरते ? जन्मावर कीं कृतीवर ?

( ग्रं. नं.

हे प्रश्न अस्पृश्योद्धाराच्या चळवळीनें समाजांत जागृत केले आहेत. महात्मा गांधींनीं समाजांतील विचारवंतांना पुन्हां एकदां जागें केलें आहे. वास्तविक अस्पृश्योद्धारांतील तत्त्व हें नवें तत्त्व नाहीं. हिंदुधर्माच्या मूलभूत तत्त्वांतच हें तत्त्व आहे.

दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।

हें वचन हिंदुधर्माच्या सर्वमान्य ग्रंथांत आहे. जन्मानें हीन असलेल्यांचें कर्तृत्व, पौरुष वंदनीय असतें याबद्दलचीं अनेक उदाहरणें हिंदूंच्या पुराणांत आहेत. असें असूनहि समाजांत अस्पृश्यता फोफावली आणि लक्षावधि हिंदु केवळ जन्मामुळें अस्पृश्य ठरून समाजांतून बाजूस फेंकले गेले. एखाद्या मनुष्यास स्पर्श करण्यासमुद्धां अयोग्य ठरविणारे स्वतः दुर्गुणी, दुराचारी असतात. तेव्हां मनुष्याची योग्यता ठरविण्याच्या दृष्टीनें विचार केला तर प्रत्येक दुर्गुणी, कलंकित माणूस अस्पृश्य ठरला पाहिजे. संसर्गजन्य रोग झालेल्या रोग्याप्रमाणें अनाचारी लोक अस्पृश्य ठरविले पाहिजेत. अस्पृश्यतेचा हा खरा अर्थ महात्मा गांधींनीं अंधश्रद्धानुयायी लोकांच्या लक्षांत आणून दिला व व्यक्तीच्या योग्यतेचें खरें गमक लोकांस शिकविलें.

दुसरें असें कीं, जो आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांचें अज्ञान दूर करण्याच्या कामीं करतो तोच खरा ज्ञानी; त्यानेंच आपलें ज्ञान सत्कारणीं लावलें. दान हा संपत्तीचा खरा उपयोग हें तत्त्व ज्ञानरूपी संपत्तीच्या बाबतींतहि खरें आहे. तेव्हां अस्पृश्यांना दूर लोटणारे स्पृश्य अज्ञानामुळें, अडाणीपणामुळें त्यांचा तिरस्कार करीत असले तर ती त्यांची मोठी चूक आहे. त्यांच्या श्रेष्ठत्वास तो कलंक आहे. अस्पृश्य हे आज मागासलेले आहेत आणि मागासलेले आहेत म्हणून अस्पृश्य आहेत. त्यांत त्यांचा दोष नाहीं. समाजांतील वरिष्ठ वर्गाच्या-स्पृश्यांच्या-अरेरावीनें ते मागें रेटले गेले आहेत. आपल्या पूर्वजांनीं ती केलेली चूक सुधारणें हें आपलें कर्तव्य आहे, हें स्पृश्यांनीं ओळखलें पाहिजे. सुधारलेल्या जगांत अभिमानानें मिरविणाऱ्या माणसानें त्या चुकीचें समर्थन करूं नये. आपल्यांतील लक्षावधि बांधवांना 'दूर दूर' करीत लोटणें हें विश्वबंधुत्वाचे पोवाडे गाणाऱ्या हिंदूंना व हिंदुधर्मास लांछनास्पद आहे. स्वतःचा कांहीं दोष नसतां कांहीं माणसें

केवळ जन्मामुळें मातीस मिळत असलीं तर त्यांच्यावरील अन्याय दूर करणें हाच धर्म आहे. हें स्वयंसिद्ध तत्त्व आहे. त्यास कोणच्याहि धर्मवचनाच्या वा रूढीच्या पुराव्याची जरुरी नाहीं.

जें कां रंजलें गांजलें । त्यासि म्हणे जो आपुलें ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।।

हीं वचनें तोंडानें गुणगुणणारे, अस्पृश्यांना मंदिरांत येऊं देत नाहींत. अनाथांचा नाथ म्हणून देवाला आळविणारे अस्पृश्याला पाणवठ्यावर पाणी घेऊं देत नाहींत. 'गुणाः पूजास्थानम्' असें गंभीरपणें प्रतिपादन करणारे अस्पृश्यांची सावली पडली तरी आकाशपाताळ एक करतात. एकनाथी भागवताचें पारायण करणारे, नाथांनीं अस्पृश्याच्या बालकास कडेवर घेतलें यांतील तत्त्वज्ञान विसरतात ! या गोष्टी अत्यंत विसंगत आहेत, इतकेंच नव्हे, तर त्या अधर्माचरणांत जमा होणाऱ्या आहेत.

अस्पृश्यतेच्या विचित्र रूढीमुळें लक्षावधि अस्पृश्य बांधव स्पृश्य बांधवांचा तिरस्कार करूं लागले आहेत आणि आधींच दुर्बल झालेल्या समाजावर या एका नव्या दुहीचा घाव बसला आहे.

या सर्व दृष्टीनें हिंदुधर्मावरील हा कलंक आपणांस सर्वस्वी घातुक ठरला आहे हें लक्षांत घेऊन अस्पृश्यांचा उद्धार करणें, त्यांच्यांतील अज्ञान दूर करणें, हीनगंड नाहींसा करणें, त्यांचा द्वेष शांत करणें हें कर्तव्यबुद्धीनें केलें पाहिजे. त्यांत अस्पृश्यांवर उपकार होत नसून तें आपल्या पापाचें परिमार्जन आहे असें स्पृश्य बांधवांनीं उमजलें पाहिजे.

---

## ४२ : : रहदारीचा रस्ता

आधुनिक सुधारलेल्या शहरांतील ' रहदारीचा रस्ता ' हें एक छोटेसें प्रदर्शनच आहे असें म्हणतां येईल. पुणें-मुंबईसारख्या शहरांतील एखाद्या रहदारीच्या चौकांत उभें राहून सभोंवार नजर टाकून पाहिली तर निरनिराळ्या लोकांनीं व नानाविध वस्तूंनीं तो चौक सजलेला आपल्याला

दिसून येईल ! तो रस्ता म्हणजे जणूं काय आपखुषीनें जमलेल्या लोकांचें एक फिरतें संमेलनच आहे असें वाटतें. उदाहरणार्थ, पुण्यांतला ' बुधवार ' चौकच पहाना ! संध्याकाळीं ५–६ च्या सुमारास तेथें आपणांस माणसांची व वाहनांची अगदीं अखंड रांग लागलेली दिसून येईल, तेथील प्रत्येक मनुष्य अगदीं घाईत दिसेल व वाहनांच्या गर्दीतून आपणांस कसें सुरक्षित जातां येईल हें तो पाहत असेल. सायकली, मोटारी, टांगे, हातगाड्या अशीं कितीतरी वाहनें आपणांस दिसून येतील. या चौकांत एक अत्यंत 'जबाबदार' व्यक्ति आपणांस दिसून येईल. ती म्हणजे चौकांतील पोलीस होय ! त्याचे हात रेल्वे-स्टेशनवरील ' सिग्नल ' प्रमाणें कसे भरभर फिरत आहेत पहा. एका हातानें समोरचा जनसमूह थोपवून दुसऱ्या हातानें बाजूच्या लोकांना व वाहनांना जाण्याचा इषारा तो कसा करीत आहे पहा !

वाहनांच्या गर्दीतून कशी तरी वाट काढीत जाणारे कांहीं पादचारी लोक कांहीं विशिष्ट कामाकरितां जात आहेत; तर पुष्कळसे केवळ गंमतीखातर रेंगाळत जात आहेत. नुकतींच शाळेमधून बाहेर पडलेलीं मुलें आपल्या सोबत्यांबरोबर गप्पा मारीत एका हातानें पुस्तकाची पिशवी सांवरीत जात आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरचें तें निरोगी हास्य तुम्हांला कधींहि विसरतां येणार नाहीं. कांहीं छोटीं छोटीं मुलें आपल्या वडीलधाऱ्या माणसांबरोबर त्यांचें बोट धरून कशीं जात आहेत पहा ! रस्त्यांत दिसणाऱ्या नानाविध गंमतींबद्दल तीं आपल्या बरोबरच्या माणसांना प्रश्न विचारून कशीं भंडावून सोडीत आहेत पहा ! आणि त्यांचे पालकाहि त्यांच्या प्रश्नांना तितकेंच महत्त्व देऊन त्यांना कसें सुरक्षित नेत आहेत !

ते पाहिलेत, रस्त्याच्या बाजूला हात पुढें करून भिकारी कसे उभे आहेत ते ! तो पहा तो आंधळा आणि त्याची काठी धरणारी ती मुलगी. करुणा उत्पन्न करणारा त्याचा तो ' दे भगवान् ' असा विशिष्ट आवाज ऐकून कांहीं दयावान् लोक त्याच्याकडे पै-पैसा फेंकीत आहेत !

या गर्दीतील लोकांपैकीं कांहींजण आतुरतेनें निघाले आहेत, तर कुणी नुसतेंच मजेनें फिरायला घराबाहेर पडले आहेत. कुणी चित्रपट पहावयास

चालले आहेत, तर कुणी नुकताच 'जादा खेळ' पाहून परत जात आहेत. वर्तमानपत्रें विकणारीं मुलें युद्धाच्या ताज्या बातम्या मोठमोठ्यानें ओरडून सांगत आहेत व एखाद्या सद्गृहस्थापुढें मोठ्या आशेनें वर्तमानपत्र विकत घ्यावयास पुढें करीत आहेत. तें पहा! तें कोपऱ्यावरचें 'न्यूज एजंट'चें दुकान. तांबड्या काळ्या शाईनें जाड्या अक्षरांत छापलेली ती ताजी बातमी वाचलीत का! केवढाले 'पोस्टर्स' तेथें अडकवले आहेत!

अशा या गर्दींत, आणि उत्साही वातावरणांत कांहीं प्राणी डोळे अर्ध-वट मिटून, जसा कांहीं जगाशीं आपला कांहींच संबंध नाहीं अशा स्थितींत जात आहेत. नाहीं तरी त्यांचा काय संबंध माणसाच्या जगाशीं! कुत्रीं, गाई, म्हशी सगळे जण आपल्या चालकाच्या स्वाधीन! 'टांगा स्टँड' वरील घोडीं पहा कशीं उभ्या उभ्या पेंगत आहेत. खरोखर अशा अर्धवट डोळे मिटलेल्या स्थितींत ते कसला गहन विचार करीत आहेत हें सांगतां येईल काय?

---

## ४३ : : आरोग्य हीच संपत्ति

आयुष्यांत मन आणि शरीर हीं दोन्हींहि सारखींच महत्त्वाचीं अंगें आहेत. त्यांची योग्य जोपासना व वाढ आपण अत्यन्त काळजीपूर्वक करणें अवश्य आहे. खंबीर मन हें सशक्त शरीरांतच वास करतें व शरीराची सश-क्तता मन खंबीर करूं शकतें. सारांश हीं दोन्हीं अंगें परस्परावलंबी आहेत.

बुद्धिवान् मनुष्याला दुसऱ्याला ज्ञान देण्यापासून समाधान मिळतें हें खरें. पण तो जर सशक्त नसेल तर चार ठिकाणीं फिरून तो माणसें कशीं जमवूं शकेल! त्याला स्वतःला सुद्धां ज्ञानप्राप्तीकरितां वाचन-लेखन व मनन करावयास हवें ना? मग तो सशक्त असल्याखेरीज हें कसें शक्य आहे! शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् हें सुभाषित तरी हेंच तत्त्व सांगत नाहीं का?

फक्त बुद्धिवंतांनाच नव्हे तर सर्वांनाच आरोग्य ही संपत्ति आहे. मध्यमवर्गीय जनतेला तर आरोग्याशिवाय दुसरी अधिक संपत्तिच नाहीं. कारण संपत्ति मिळविण्यास त्याला काबाडकष्ट करावे लागतात. गिरणी-कामगार, शेतकरी यांना तर प्रत्यक्ष संपत्तीपेक्षां आरोग्य-संपत्ति अधिक आहे. कारण उत्तम आरोग्य असेल तर ते पोटापुरता पैसा मिळवूं शकतील. श्रीमंत माणसांनासुद्धां उत्तम आरोग्य असल्याशिवाय पैशाचा योग्य तो उपभोग घेतां येणार नाहीं.

'आरोग्य' ही सर्व ऐहिक देणग्यांत अत्यन्त महत्त्वाची देणगी आहे. आणि ही देणगी म्हणजे कांहीं बाजारांत पैसे टाकून मिळवतां येणारी वस्तु नव्हे अगर ती चोरून आणतां येईल अशीहि चीज नाही. आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयवांना भरपूर व्यायाम देऊन आरोग्य मिळतें. शरीर हें हत्यारासारखें आहे. तें नेहमीं उपयोगांत हवें. नाहींतर त्याच्यावर गंज चढण्याचा संभव आहे. 'आरोग्यहीन' अशा मोठ्या लोकांच्या अकालीं निधनामुळें जगाचें फार नुकसान झालें आहे. जगांतील सारी संपत्ति ओतली तरी या मोठ्या लोकांचीं आयुष्यें परत मिळणार नाहींत.

जगांतील मोठमोठ्या माणसांपैकीं कांहीं थोर पुरुष अकालींच मरण पावल्याचें आपण वाचतों. अल्पवयांतहि ज्ञानेश्वर, चिपळूणकर, यांच्यासारख्यांनीं आपलें नांव अविस्मरणीय करून ठेविलें यांत त्यांचें बुद्धिवैभव दिसतें खरें. पण त्याबद्दल अतिशय आदर वाटत असतांनाच एक रुखरुख वाटते कीं, हीं माणसें किती लवकर निघून गेलीं ! गोपाल कृष्ण गोखल्यांच्या मृत्यूच्यासंबंधीं लोकांनीं अशीच हळहळ व्यक्त केली. आगरकरांना शेवटीं प्रकृतीनेंच दगा दिला. हीं आणि अशीं अनेक उदाहरणें आरोग्यासंबंधीं एक महत्त्वाचा सिद्धांत सिद्ध करतात. तो हा कीं, आरोग्याचें संपादन तरुणपणींच करावयास पाहिजे. वाटेल तेव्हां मिळण्यासारखी ती संपत्ति नाहीं. टिळकांच्या कारागृहवासाचा वृत्तांत वाचला; स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'जन्म ठेप' वाचली कीं, त्यांनीं तरुणपणीं संपादिलेल्या शरीर-संपत्तीचें महत्त्व लक्षांत येतें. लोकमान्यांनीं तरुणपणीं शरीर कमावलें नसतें तर त्या भयंकर कारागृहवासांत त्यांचा कसा निभाव लागला असता ?

तरुणपणीं निसर्गतःच शरीर धडधाकट असतें. त्या वेळीं आरोग्यासाठीं मुद्दाम कांहीं व्यायाम वगैरे करण्याचें महत्त्व कळत नाहीं. परंतु शरीराची पोलादी चौकट उभी करण्याचा तोच काळ असतो. विद्यार्थ्यांचें याकडे दुर्लक्ष होऊं नये म्हणून शिक्षणाधिकारी विद्यार्थ्यांना सक्तीनें व्यायाम करावयास लावतात ! आरोग्यासारख्या संपत्तीसाठीं कोणी आपल्यावर सक्ति करण्याची वेळ येणें हें आपल्या अज्ञानाचेंच लक्षण नाहीं का ?

सारांश, ज्यांना आपल्या आयुष्याची कमान नेहमीं चढती ठेवावयाची आहे त्यांनीं आरोग्यरूपी संपत्तीच्या संपादनाकडे रक्षणाकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे.

---

## ४४ : : रस्त्यावरील भिकारी

हिंदुस्थानांतील समाजस्थिति अगदीं सहज कोणास पाहावयाची असेल तर त्यानें एखाद्या रहदारीच्या रस्त्यावर एक फेरफटका मारावा. तेथें त्याला श्रीमंती आणि गरिबी अगदीं हातांत हात घालून चाललेल्या दिसतील. मोटारच्या कर्कश कर्ण्यांचे आवाज ऐकूं येतील, त्याबरोबर गटारापाशीं लोळणाऱ्या भिकाऱ्यांचे आर्तस्वर ऐकूं येतील, एखाद्या देवळांत मंजुळ घंटानाद ऐकूं येतील आणि दर्शनास आलेल्या भक्तांच्या जोड्यापाशीं बसलेले भिकारी तुकारामाचे अभंग आळवीत बसलेले दिसतील. लोक देवाचे पाय धरतात आणि भिकारी देवाच्या भक्तांचे पाय धरतात. एखाद्या मंगलकार्यालयांत पंचपक्वान्नांची गर्दी उडाली असेल आणि त्या कार्यालयाच्या दाराशीं पडलेलीं उष्टीं पानें अहमहमिकेनें चाटीत बसलेल्या भिकाऱ्यांचा तांडा दिसेल. भिकाऱ्यांच्या डोळ्यांसमोर संपत्तीची धूळधाण होत असते. अन्नाच्या राशी आग्रहाच्या शिष्ट चालीनें वायां जात असतात. तें पाहून भिकाऱ्यांचीं अंतःकरणें तळमळत असतात. त्यांचें दर्शनसुद्धां लोकांस असह्य होतें. त्यांना कुत्र्याप्रमाणें दूर हाकलण्याची जो तो पराकाष्ठा करतो. परंतु भिकाऱ्यांनीं कोठें जावें ? त्यांना हाकलणारे या प्रश्नाचें उत्तर देऊं शकत नाहींत.

रस्त्यावरील भिकारी हा कांहीं भिकाऱ्यांचा निराळा वर्ग नाहीं. भिकारी म्हटला कीं, तो रस्त्यावर असावयाचा. तो गटारापाशींच बसावयाचा ! रस्ता हेंच त्याचें घर !

भिकाऱ्यांत म्हातारे–कोतारे, लुळे–पांगळे, भयंकर रोगानें ज्यांचीं शरीरें भेसूर दिसत आहेत असे, सरपटणारे, लंगडणारे, आंधळे, थोटे अशांचाच भरणा असतो. तें दृश्यच हृदयाला पाझर फोडण्यास पुरेसें आहे. परंतु तें दृश्य पाहूनहि लोकांच्या मनास पाझर फुटत नाहीं म्हणून भिकारी आपल्या तोंडानें टाहो फोडीत असतात. पोटावर हात मारून-मारून कित्येकांच्या पोटाला खळगे आणि चट्टे पडलेले असतात. माणसाला दया आली नाहीं तर निदान हें दृश्य असह्य व्हावें आणि आपली कटकट मिटविण्यासाठीं तरी त्यानें पै-पैसा, भाकर-तुकडा फेंकावा अशा निर्वाणीनें भिकाऱ्यांचा कल्लोळ चालू असतो. लहान मुलांचे हाल पाहून तरी कोणाचें मन पाझरावें म्हणून कांहीं भिकारी लहान मुलें (प्रसंगीं दुसऱ्याचीं भाड्यानें घेऊनहि) केविलवाण्या स्थितींत पथिकांपुढें ठेवतात.

या भिकाऱ्यांत कांहीं सशक्त, गलेलठ्ठहि असतात. दिवसा भिकेच्या निमित्तानें हिंडतांना रात्रीच्या चोरीसाठीं टेहळणी करीत हिंडणारे कांहीं असतात. त्यांच्याकडे पाहून आपण जास्तच चिडतों आणि त्यांना ओरडून सांगतों, “ काम करायला काय झालें ? श्रम करावे आणि पोट भरावें. ”

हें सांगावयास फार सोपें आहे. त्यांनीं काम मागितलें नाहीं असें थोडेंच आहे ? समाजाजवळ त्यांना द्यावयास कामच नाहीं. सुशिक्षितांनासुद्धां समाज पोट भरण्यापुरतें काम देऊं शकत नाहीं. तेहि ‘ मुकाट्यानें ’ भीकच मागत हिंडत असतात. ते कागदावर लिहून भीक मागतात आणि भिकारी रस्त्यावर ओरडून भीक मागतात ! हे ‘ बोलके ’ आणि ‘ मुके ’ भिकारी समाजाची अत्यंत भीषण स्थिति जाहीरपणें सांगत आहेत.

भिकाऱ्यांचें दृश्य आपणांस सहन होत नसेल, त्यांच्या आरोळ्या ऐकवत नसतील, त्यांच्या किंकाळ्यांनीं आपलें स्वास्थ्य बिघडत असेल तर

नुसतें दूर पळून, कानांवर हात ठेवून, डोळेझांक करून भिकाऱ्यांना दूर लोटून भिकार कमी होणार नाहीं. भिकाऱ्यांच्या निदान शारीरिक सामर्थ्याचा उपयोग करून त्यांना कांहीं उत्पादक काम देऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे.

सुधारलेल्या पाश्चात्य देशांत रस्त्यावर भीक मागणें हा गुन्हा आहे. परंतु असा गुन्हा ठरविण्यापूर्वी कोणाला भीक मागावी लागणार नाहीं, प्रत्येकाला निदान पोटापुरतें मिळेल—अशी व्यवस्था झाली पाहिजे. भिकाऱ्यांचा प्रश्न सोडविण्याचा हाच एक मार्ग आहे. त्यांना दूर हांकलून किंवा धर्मभोळेपणानें त्यांना एखादा पैसा किंवा मूठभर अन्न देऊन फार तर त्या क्षणापुरता त्यांचा कोलाहल थांबेल. भिकाऱ्यांसाठीं अन्नछत्र चालविणारे स्वतःस मोठे पुण्यवान् समजतात. परंतु ते आपल्या संपत्तीचा उपयोग भिकारी वाढविण्याकडे करीत आहेत, आळशीनंदनांना ते उत्तेजन देत आहेत हें त्यांनीं लक्षांत घ्यावें.

समाजांतील 'बोलके' आणि 'मुके' भिकारी नाहींसे करण्याचा एकच उपाय म्हणजे समाजांत उत्पादनाचें क्षेत्र पुष्कळच वाढावयास पाहिजे. दिवसेंदिवस या प्रश्नाचें स्वरूप अत्यंत भेसूर होत चाललें आहे आणि 'अन्न द्या, काम द्या,' या आरोळ्यांनीं सुखवस्तु लोकांचें स्वास्थ्य क्षणोक्षणीं भंग पावत आहे.

---

## ४५ : माझ्या खिडकींतून दिसणारें जग

माझी अभ्यासाची खोली ही माझी अत्यंत आवडती जागा आहे. माझ्या घरांतील अत्यंत निवडक अशी ती जागा आहे. प्रत्येक खिडकींतून मला कितीतरी दूरवर पाहतां येतें. त्यांतल्या त्यांत माझ्या टेबलाजवळील खिडकींतून थेट डोंगर दिसतात आणि त्यांतील एका डोंगरावरील देवळाचें शिखर अगदीं नाकासमोर दिसत असतें. बाजूच्या दोन खिडक्या पूर्व

आणि पश्चिम दिशांचीं द्वारें आहेत. उगवता सूर्य आणि मावळता सूर्य मी तेथून पाहतों आणि चंद्राचा प्रकाश याच खिडक्यांतून माझ्या खोलींत येतो.

अभ्यास करून मला कंटाळा आला व बाहेर जावेंसें वाटलें नाहीं म्हणजे मी माझ्या खिडकींतून बाहेरचें जग पहात बसतों.

बाहेरचें जग तसें पाहिलें तर मुळींच बदलत नाहीं. डोंगर, कुरणें, घरें, देवळें सगळें कांहीं जेथल्या तेथेंच असतें. परंतु तरी मला तेंच तें जग पाहण्याचा कधीं कंटाळा येत नाहीं. आणि पाहूं लागलों म्हणजे ऋतुमानाप्रमाणें त्यांतहि विलक्षण नावीन्य दिसत असतें. कधीं धुक्यानें सगळें जग झांकलेलें असतें आणि फक्त उंच इमारतींचीं शिखरें, देवळांचे कळस किंवा उंच झाडांचे शेंडे दिसतात. समुद्रांत बुडूं लागलेल्या बोटीप्रमाणें किंवा पुरांत सांपडलेल्या एखाद्या गांवाप्रमाणें तें दृश्य वाटतें आणि मग सूर्य आभाळांत आला कीं, धुक्याचें वस्त्र आपल्या सहस्र करांनीं तो गोळा करूं लागतो.

सकाळच्या वेळीं त्या टेकडीच्या उतरणीवर माणसांच्या आकृति बारीक ठिपक्यासारख्या दिसतात. एखाद्या वेळीं गवती कुरणावर स्वैर हिंडणारीं गुरें काळ्या ठिपक्याप्रमाणें दिसतात. देवळावरचें निशाण तिन्ही त्रिकाळ फडकत जणूं काय आपल्या भक्तांना हातानें पालवीत असतें.

पावसाळ्यांतील दृश्यांची तर मोजदाद करतां येणेंच शक्य नाहीं. कधीं काळेंकुट्ट आभाळ, तर कधीं पाण्याच्या सरींवर सरी. कधीं आभाळांत भटकणारे आळशी ढग, तर कधीं शिवधनुष्याप्रमाणें दिसणारें इंद्रधनुष्य, कधीं सोनेरी आणि रुपेरी रंगानें नटलेले ढग, अशा दृश्यांची नुसती गर्दी आभाळांत उडालेली असते.

माझ्या खिडकींतून दिसणारें शहराचें दृश्यहि मनोवेधक असतें. इमारतींचे थवेच्याथवे दिसतात आणि त्यांतच झाडांचे पुंजके दिसतात. इमारतींकडे पाहतां पाहतां मी त्या ओळखण्याचा प्रयत्न करतों. तें अमकें ऑफिस, ती अमक्या रस्त्यावरची नवी कोरी इमारत, तें माझें आवडतें

वाचनालय, तो गांवांतील प्रसिद्ध इमारतीचा मनोरा. वास्तविक किती दूरदूर आहेत तीं ठिकाणें! परंतु खिडकीच्या चौकटींत सगळीं मावून जातात. या स्पष्ट खुणांवरून मी माझ्या आतेष्टांच्या घरांचीं स्थानें अंदाजीत बसतों आणि मला वाटतें--त्या त्या माणसांना कल्पना तरी असेल का कीं, त्यांच्या घराच्या छपरावरून माझे डोळे नि मन या वेळीं भटकत आहे ?

कांहीं वेळानें डोळे दुखूं लागतात किंवा मन विचारांत गुंग झाल्यानें डोळे पाहण्याचें विसरून जातात आणि माझ्या खिडकीच्या पायथ्याशीं पसरलेल्या जगांत मी अनुभवलेले अनेक प्रसंग आठवण्यांत तल्लीन होऊन जातों.

---

## ४६ : : कालाय तस्मै नमः ।

शनिवारवाड्यापुढील हातगाड्यांवरील माल पहात मी वेळ घालवीत होतों. इतक्यांत एका गाडीवाल्यास गाडी स्थिर ठेवण्यासाठीं कांहीं टेंकण पाहिजे होतें. तो चटकन् मागें वळला आणि शनिवारवाड्याच्या तटाच्या एका भगदाडांतून त्यानें एक दगड उपसला, गाडीच्या चाकाला लावला व गाडी स्थिर केली.

तें पाहून माझ्या डोक्यांत विचारांचें चक्र सुरू झालें. माझ्या डोळ्यांसमोर असलेला शनिवारवाडा नाहींसा झाला आणि पेशव्यांच्या राजमंदिराचें दृश्य डोळ्यांसमोर उभें राहिलें. सगळीकडे भालदार, चोपदार दिसूं लागले, दाराशीं हत्ती दिसूं लागले. वाड्यापुढें पहारेकरी दिसूं लागले आणि एक गृहस्थ वाड्याच्या तटाकडे जात असतां एक पहारेकरी ओरडला, "ए! बाजूला हो." त्या इशाऱ्यानें मी भानावर आलों आणि समोर पुन्हां तें भगदाड दिसूं लागलें. ज्या राजमंदिराच्या रक्षणासाठीं सैनिकांनीं डोळ्यांत तेल घालून खडा पाहरा केला, ज्या तटाच्या प्रत्येक दगडासाठीं वीर लढले, त्या तटाचा कोणचाहि दगड आज एखादा फाटका

माणूस हातानें कढूं शकतो आणि त्याला कोणीहि मज्जाव करीत नाहीं ! कारण त्या राजमंदिराची आज धर्मशाळा झाली आहे. भूतकाल आणि वर्तमानकाल यांत केवढें महदंतर ! हें अंतर घडवून आणणाऱ्या कालाची करणी पाहिली कीं, 'कालाय तस्मै नमः' असे उद्‌गार तोंडांतून बाहेर पडतात.

काळाच्या हृदयांत मोठमोठीं साम्राज्यें गडप झालीं आहेत. इतिहासांत जगड्व्याळ म्हणून नमूद झालेल्या साम्राज्यांचे कांहीं क्षुद्र अवशेष राहिले आहेत आणि इतिहासाचा कालखंड हा एकंदर कालाचा एक बारीकसा तुकडा आहे. इतिहासांतहि ज्यांची आठवण नाहीं अशीं कितीतरी साम्राज्यें, सम्राट् , वीर, मुत्सद्दी, तत्त्वज्ञानी होऊन गेले असतील. त्यांची कृति तर राहोच पण नांवेंहि कोणास माहीत नाहींत. कांहीं महान् व्यक्तींच्या जन्मतिथीबद्दलच आपण साशंक आहोंत !

ग्रीक साम्राज्य, रोमन साम्राज्य, गुप्तांचें साम्राज्य आणि विजयानगरचें साम्राज्य यांची वैभवकथा आपण कांहीं ग्रंथांतून वाचतों, परंतु त्या साम्राज्याच्या वैभवाची फक्त स्मृति शिल्लक राहिली आहे. इतिहास कळला नसता तर साम्राज्याचे मोडकेतोडके अवशेष आपल्या लक्षांतहि आले नसते. कारण ते अवशेष म्हणजे स्मशानांत इकडे तिकडे पडलेल्या हाडांच्या तुकड्यांसारखे आहेत !

काळानें आपल्या सामर्थ्यानें प्रचंड गोष्टींची राखरांगोळी करून टाकली आहे. सर्व जगभर काळाच्या या पराक्रमाचीं चिन्हें पसरलीं आहेत. अयोध्येस गेल्यास प्रभु रामचंद्र, मथुरेस भगवान् श्रीकृष्ण, पंचवटींत समर्थ रामदास, महाराष्ट्रांतील मावळखोऱ्यांत श्रीशिवाजी, पुण्यास पेशवे, पानिपतावर भाऊसाहेब यांच्या आठवणी होतात. परंतु ज्या कृत्यांच्या, ज्या पराक्रमांच्या त्या आठवणी आहेत त्याचे फारसे अवशेषहि राहिले नाहींत. सजीव सृष्टीप्रमाणें निर्जीव सृष्टिहि कालाच्या भक्ष्यस्थानीं पडते आणि हें भक्षण कालपुरुष अनादि कालापासून अहोरात्र करीत आहे आणि तें अनंत कालपर्यंत चालणार आहे.

कालाच्या सामर्थ्याकडे पाहिलें म्हणजे मानवी कृत्यांना अमर, अविनाशी वगैरे विशेषणें लावणें पोरकटपणाचें आहे असें वाटूं लागतें; प्रचंड कार्ये करणाऱ्यांच्या अपेक्षांचें हंसू येतें; पराक्रमाचा गर्व वाहणाऱ्यांचें लघुत्व कळूं लागतें आणि कविवर्य तांबे यांच्या कवितेंतील खालील पंक्ति आठवूं लागतात—

रामकृष्णही आले, गेले। त्यांविण जग का ओसचि पडलें?

तेव्हां—अशा जगास्तव काय कुढावें?

मानवी कृति केवढीहि प्रचंड असली तरी ती सागरतीरावरील वाळूवर काढलेल्या नांवासारखी आहे. सागराची एक लाट सहज येईल आणि पाहतां पाहतां तीं अक्षरें पुसून टाकील. मग आपण स्वस्थ पाहत राहून एवढेंच म्हणूं—

कालाय तस्मै नमः।

---

## ४७ : : भूगोलाचा अभ्यास

"जें आम्हीं पाहिलें नाहीं, पाहण्याचा संभव नाहीं, पाहण्याची जरूर नाहीं अशा जगाची उठाठेव पाहिजे कशाला आम्हांला? तीं आफ्रिकेंतील मैदानें, अमेरिकेंतील जंगलें, इंग्लंडमधील कारखाने, जपानच्या व्यापारी धडपडी, ऑस्ट्रेलियांतील गवती कुरणें अशा हजारों गोष्टींचा भारा आम्हीं डोक्यांत कशाला सांठवावा? सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरतो कीं पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, चंद्राला ग्रहण कां लागतें, पृथ्वीचा आंस किती कललेला आहे आणि त्यामुळें काय परिणाम होतात, या गोष्टींची आम्हांला काय जरूर आहे" असे प्रश्न पुष्कळ विद्यार्थ्यांच्या मनांत डोकावतात आणि कित्येक प्रसंगीं ते ते बोलूनहि दाखवितात.

त्यांचा मुख्य आक्षेप एकच कीं, वरील प्रकारची माहिती नसली तर आमच्या जीवनांत कांहीं उणीव येत नाहीं आणि माहिती झाली तरी जीवनांत कांहीं भरहि पडत नाहीं. भौगोलिक परिस्थिति ही स्वयंसिद्ध असते. माणसास ती माहिती असो किंवा नसो. निसर्गाचें काम हें चालूं राहणारच.

परंतु वरील विचारांत एक मुख्य गोष्ट आपण विसरतों. ती कळली म्हणजे वरील आक्षेप क्षणार्धांत दूर होतील. ती म्हणजे भूगोल हा विषय म्हणजे मानवी प्रयत्नांचा इतिहास आहे. भौगोलिक घडामोडींचा मानवी जीवनाशीं अतिशय निकट संबंध आहे. नैसर्गिक परिस्थितीनें मानवी जीवनाचें नियंत्रण केलें आहे. तें नियंत्रण झुगारण्याचा मनुष्य सारखा प्रयत्न करीत आहे. हें कळणें हाच भूगोलाचा खरा अभ्यास होय.

नैसर्गिक परिस्थितीचें आपल्या जीवनावर नियंत्रण असल्यानें त्या परिस्थितीची जाणीव असणें आवश्यक आहे. निसर्गाचा परिचय नव्हता, त्या वेळीं मनुष्याचें जीवन अत्यंत खडतर होतें. निसर्गाचे व्यवहार अत्यंत लहरी स्वरूपाचे आहेत असें त्याला वाटत असल्यानें त्याला निसर्गाची नेहमीं भीति वाटे.

भौगोलिक घडामोडींचीं कारणें आपणांस आज निश्चित माहीत असल्यानें त्या ज्ञानाचें आपणांस कांहीं महत्त्व वाटत नाहीं. परंतु हें ज्ञान मनुष्यास भूगोलावरील घडामोडींचा अभ्यास करूनच मिळालेलें आहे आणि यासारखे निसर्गाच्या कित्येक व्यवहारांचें स्वरूप कळल्यामुळें आपणास निर्धास्तपणा वाटत आहे. इतकेंच नव्हे, तर निसर्गाच्या व्यवहारांमुळें आपल्या जीवनास अत्यंत अमोल साहाय्य होत आहे हेंहि आपणांस भूगोलाच्या अभ्यासानें कळलें आहे. निसर्ग हा आपला शास्ता आहे आणि साहाय्यकहि आहे हें माणसास समजलें आहे.

त्याचप्रमाणें निसर्गाचा परिचय झाल्यानें मनुष्यानें निसर्गाच्या सामर्थ्याचा आपल्या सुखसोयींसाठीं उपयोग करून घेतला आहे. भौगोलिक ज्ञानाच्या अभावीं निसर्गापुढें मान वाकवणाऱ्या मानवानें, निसर्गास कांहीं प्रसंगीं

बांकविण्याइतकें सामर्थ्य आज मिळविलें आहे. दिवसेंदिवस निसर्गांत आपल्या जीवनाची किती अपरंपार तरतूद आहे हेंहि माणसास कळूं लागलें आहे.

आपल्या जीवनाच्या सुखसोईंचे प्रयत्न करतांना निसर्गाच्याच गुणधर्मांचा अभ्यास माणसास उपयोगीं पडला आहे. पंचमहाभूतांचा परिचय व साहाय्य मिळवूनच माणसानें आपलें यंत्रमय जग उभें केलें आहे.

भूगोलाचा राजकीय विभाग हा निसर्ग व मानव यांच्या मैत्रीचा इतिहास होय. त्याप्रमाणें आपल्याला जीवनासाठीं भोंवतालच्या जीवनांत किती व कसा बदल करतां येईल हेंहि भूगोलाच्या अभ्यासानें माणसास कळलें आहे. निसर्गाच्या सामर्थ्यापैकीं अनुकूल गोष्टींवर नियंत्रण गाजवून प्रतिकूल गोष्टींबरोबर टिकाव धरण्याचें ज्ञान माणसास भूगोलाच्या अभ्यासानेंच मिळालें आहे. चक्काचूर करणारी वीज, अनावर झालेला पाणलोट, वाट अडविणारे पर्वत यांतील विध्वंसक सामर्थ्याचें नियंत्रण करून माणसानें त्यांना विधायक कार्य करण्यास लाविलें आहे. कारण भूगोलाच्या अभ्यासानें त्यास वरील गोष्टींचीं कारणें व परिणामाचें स्वरूप व मर्यादा कळलीं आहेत.

फार काय मनुष्य ज्वालामुखी पर्वतास सुद्धां सर्कशींतल्या सिंहाप्रमाणें आपल्या काबूंत आणूं पहात आहे आणि धरणीकंपांतहि पाय रोवून स्थिर राहण्याइतकें तो बळ जमवीत आहे.

निसर्गाच्या परिचयाबरोबर मनुष्यास एकामागून एक रहस्यें उकलत आहेत आणि तों तों नवीं गूढें, नवीं रहस्यें त्याच्या मतीस गुंग करीत आहेत. त्या रहस्याचा पाठपुरावा करीत मनुष्यास अंतराळांत, पाताळांत, अत्युच्च गिरिशिखरावर आणि दुर्लंघ्य अरण्यांत नि महासागरांत सारखी धांवाधांव करावी लागत आहे.

भूगोलाचा अभ्यास हा अशा दृष्टीनें मनुष्यास अत्यंत आशादायी, साहाय्यक आणि संरक्षक होत आहे. माणसाने भूगोलाचा अभ्यासच केला नसता तर तो अतिप्राचीन माणसासारखाच राहिला असता.

———

## ४८ : : : वंदे मातरम्

हिंदुस्थानांतला हिंदी, अमेरिकेंतला अमेरिकन, जपानांतला जपानी किंवा आफ्रिकेंतला बुश्मन कोणीहि सारख्याच अधिकारानें म्हणूं शकतो 'वंदे मातरम्' मातेला–जन्मभूमीला नमस्कार असो. प्रत्येक मूल आपल्या आईकडे धांव घेतें. त्याला विचारलें, 'तुला यापेक्षां सुंदर घरांत नेलें तर येशील?' तर तो उत्तर देईल–

"छे!"

"कां?"

'तिथें माझी असणार नाहिं आई.'

मातेवरचें आणि मातृभूमीवरचें प्रेम हें स्वयंसिद्ध आहे. आईविषयींची ओढ ही जशी जन्मसिद्ध असते तसेंच जन्मभूमीवरचें प्रेम हें माणुसकीचें आद्य लक्षण आहे: आपणच नव्हे तर आपले पूर्वज ज्या ठिकाणीं जन्मले, ज्या भूमीवर त्यांनीं अतुल पराक्रम करून आपलें आणि जन्मभूमीचें नांव अजरामर केलें, ज्या भूमीवर त्यांच्या रक्ताचे थेंब सांडले, ज्या भूमीसाठीं त्यांनीं प्राणाचा होम केला ती ही भूमि आहे. ज्या भूमीनें मला जन्म आणि जीवन दिलें तीच ही भूमि म्हणून तिला वंदन असो. यासाठीं 'वंदे मातरम्।'

आईवरची भक्ति ही आईच्या वैयक्तिक लौकिकावर अवलंबून नसते. त्याचप्रमाणें जन्मभूमीवरचें प्रेम भौगोलिक वा ऐहिक संपत्तीवर अवलंबून नसतें. आपल्या जन्मभूमींत इतरांपेक्षां गवत जास्त माजलें असेल, पर्वत फार पसरले असतील, लोक अशिक्षित असतील, दरिद्री असतील तरी आम्ही सर्वजण एका सुरांत म्हणूं,

"वंदे मातरम्"

जन्मभूमि म्हणजे जमिनीचा तुकडा नव्हे. जन्मभूमि म्हणजे पर्वतांच्या रांगा नव्हत. जन्मभूमि म्हणजे गवती कुरणें किंवा दाट अरण्यें नव्हत. तर जन्मभूमि म्हणजे त्या भूमीच्या भोंवतीं मनांत वाढलेल्या भावना होत.

जन्मभूमि म्हणजे वंदनीय पूर्वजांच्या जन्मामुळें पावन झालेली भूमि होय. जन्मभूमि म्हणजे आदर, जन्मभूमि म्हणजे अभिमान, जन्मभूमि म्हणजे कर्तव्य, जन्मभूमि म्हणजे प्राणत्यागाच्या योग्यतेचें कर्तव्य! यासाठीं "वंदे मातरम्।"

जन्मभूमीसाठीं ज्यांनीं सर्वस्व अर्पण केलें त्यांनीं आपल्या वंशजांसाठीं अजरामर संपत्तिच ठेवली आहे. आपला जन्म धन्य होईल अशी या भूमीस त्यांनीं श्रेष्ठता आणली. हें वैभव आपणांस केवळ जन्मतः मिळालें आहे आणि तें आपण शतगुणित करून भावी पिढीस दिलें पाहिजे म्हणून "वंदे मातरम्।"

वैभव, कीर्ति, सामर्थ्य हें सर्व कांहीं असून 'वंदे मातरम्' ही भावना नसेल तर सजवलेलें शरीर आहे पण प्राण नाहीं असा त्याचा अर्थ होईल. कारण वैभव, कीर्ति इत्यादि गोष्टी मिळविण्याच्या प्रयत्नांत प्रत्येकास आपल्या जन्मभूमीच्या मातृत्वाचाहि उपयोग होतो. त्याचें नांव, त्याचें कर्तृत्व, 'अमक्या देशाचा माणूस', 'अमक्या जन्मभूमीचा पुत्र' असें नमूद केलें जातें आणि असें म्हणवून घेण्यांत त्यास भूषणहि वाटलें पाहिजे.

दुसऱ्या एका दृष्टीनें विचार केला तरी आपलें जन्मभूमीविषयींचें कर्तव्य सिद्ध होतें. आपल्या जन्मदात्या मातेविषयीं कर्तव्य करतांना आपण असाच विचार करतों ना कीं, तिनें आपल्यासाठीं स्वयंस्फूर्तीनें अनंत कष्ट सहन केले आहेत. आपणांस तिनें जीवन दिलें आहे! त्याच दृष्टीनें आपणांस जन्मभूमीनेंहि जीवन दिलें आहे. जन्मभूमीची ओळख आपण विसरलों, जन्मभूमीविषयींची भावना मनांतून नाहींशी झाली तर आपल्या मनांतील किती तरी उदात्त विचारांना स्थानच राहणार नाहीं. ज्याला जन्मभूमि नाहीं किंवा जो जन्मभूमि जाणत नाहीं, त्याला धर्म नाहीं, त्याला कुटुंब नाहीं, त्याला इतिहास नाहीं, त्याला घर नाहीं, त्याला भविष्यकाल नाहीं, आणि त्याचा वर्तमानकाल निरर्थकच आहे. किंबहुना त्याला अस्तित्वच नाहीं! त्याला नांवच नाहीं! तो असून नसल्यासारखा! जो आपल्या जन्मभूमीला विसरला त्याला कोण पत्करणार?

पण अशालाहि जन्मभूमि मात्र पत्करणार ! कारण—

कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति !

जन्मभूमीनें आपल्या कुपुत्रांना कधीं दूर लोटलें आहे का? सुपुत्राप्रमाणेंच कुपुत्रहि तिच्या ठिकाणच्या धनधान्याचा उपभोग घेतात. त्यांचेंहि सुपुत्राबरोबरच जन्मभूमीनें लालनपालन केलें आहे. यावरून जन्मभूमि ही मातेइतकीच श्रेष्ठ आहे. तिची योग्यता स्वयंसिद्ध आहे. तिची योग्यता तिच्या पुत्रांच्या सत्कृत्यांवर किंवा दुष्कृत्यांवर ठरत नाहीं. तेव्हां पुत्रांनींच आपलें पुत्रत्व सार्थकीं लावण्यासाठीं जन्मभूमीस वंदन केलें पाहिजे.

" वंदे मातरम् । "

---

## ४९ : : माझी चंद्रलोकावरील सफर

लहानपणीं मीं ' रामाचा चंद्रासाठीं हट्ट ' ही गोष्ट वाचली होती. ती गोष्ट आज आठवली कीं, रामानें चंद्र खेळावयास पाहिजे, असा हट्ट घेण्यांत वेडेपणाच केला असें मला वाटतें.

परंतु पौर्णिमेचा चंद्र पाहिला कीं, मलाहि रामासारखा वेडेपणा करावासा वाटतो. चांदण्यांत कितीहि भटकलें तरी समाधान होत नाहीं. दोन डोळ्यांनीं किती पहावें नि काय पहावें असें होऊन जातें आणि शेवटीं डोळे दमून जातात. चंद्राला खगोलशास्त्रानें परपुष्ट ठरविलें आहे, तरी स्वयंप्रकाशी सूर्यापेक्षां परप्रकाशित चंद्रच मला आवडतो. सूर्याजवळ एवढा तेजाचा सांठा आहे परंतु त्याला चंद्राइतकी लोकप्रियता मिळवितां आली नाहीं. तेंच, सूर्याचेंच तेज घेऊन चंद्रानें लोकांचीं मनें काबीज केलीं. चंद्र अतिशय रसिक आहे. थोडेंसेंच तेज तें दुसऱ्याचें कां असेना पण तें घेऊन तो आपलें ओझरतें अल्पदर्शनहि किती मोहक करतो !

एका चांदण्या रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्याच मी खिडकींतून पहात असतां वरील विचार माझ्या डोक्यांत आले आणि तसाच मी झोपीं गेलों.

जें मनांत नेहमीं येई आणि करतां येत नसे तें मी करीत आहें असें मला स्वप्नांत दिसून आलें. मी थेट चंद्रलोकावर उड्डाण केलें !

कसा गेलों तेथें कोणास ठाऊक ! परंतु जाऊन पोहोंचलों खरा ! चंद्रावरूनच मीं चांदण्यानें फुललेली पृथ्वी पहात होतों. चांदण्यांत भटकणारे लोक मला तेथून दिसत होते. आणि त्यांत माझे कांहीं स्नेहीहि असावेत अशी माझी खात्री होती. अंदाज पहावा म्हणून मी त्यांना मोठ्यानें हांक मारूं लागलों. परंतु मला कांहीं आवाजच करतां येईना. मला आश्चर्याचा मोठा धक्का बसला. माझ्या फुप्फुसांतील हवा संपली कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. परंतु तसें कांहींहि वाटत नव्हतें. मी अगदीं आनंदांत होतों. मी खूप भटकलों आणि मग एका पर्वतावर बसलों.त्या पर्वतावर किंवा कोठेंहि मला झाड म्हणून दिसेना. बारीकसें झुडुपसुद्धां कोठें दिसेना. पृथ्वीवर ह्या उद्यानांना चंद्रप्रकाशांत काय तेज चढतें ! पण चंद्रलोकावर मात्र उद्यानें तर राहोच पण एकहि झुडूप नाहीं.या योगायोगाचें मला अतिशय आश्चर्य वाटलें. मीं विचार केला, सूर्यापासून प्रकाश घेत असतांना चंद्रावरील झाडेंझुडपें जळून गेलीं असतील ! कांहीं पर्वतांचीं शिखरें फुटलेलीं व खोलगट दिसलीं. ते ज्वालामुखी पर्वत असावेत असें वाटलें. परंतु त्यांच्यांत ज्वाला तर राहोच परंतु धुगधुगी सुद्धां नव्हती. तळ्याएवढे खळगे त्या पर्वतांच्या शिखरस्थानीं पडले होते.

पृथ्वीवर नदीच्या पृष्ठभागावर चांदणें पडलें कीं, चांदीच्या रसाचा समुद्र वहात आहे असें दिसतें. पण चंद्रावर पाणीच नाहीं ! मग तळीं—नद्या यांची गोष्टच नको. वारा कोठें भेटलाच नाहीं. कोठेंहि प्राणी नाहीं. माझी कल्पना चंद्रलोकावरचीं माणसें अहोरात्र चांदण्यांतच रहात असतील. परंतु माणूसच काय पण कोणताहि प्राणी मला तेथें दिसला नाहीं.

मी पृथ्वीवर एखाद्या स्मशानांत जरी हिंडलों तरी तेथें निदान गिधाडें, कोल्हे तरी भेटतील. पण चंद्रलोकावरील शांतता पाहून स्मशानशांतता बरी असें मला वाटूं लागलें.

मला लवकरच अतिशय उदास वाटूं लागलें आणि भटकत भटकत मी चंद्रलोकाच्या अगदीं कडेवर आलों. माझा अतिशय विरस झाला होता

१०१

आणि मी चंद्रलोकावर असूनहि पृथ्वीवर पडलेली चांदण्याची शोभाच डोकावून डोकावून पाहूं लागलों.

इतक्यांत माझा तोल गेला आणि मी एकदम खालीं कोसळलों—अंथरुणावरच दचकून पुन्हां अंथरुणावरच पडलों ! आणि जागा झाल्यावर मला वाटलें कीं, रामाचा हट्ट खरोखरच वेडेपणाचा होता. आरशांत प्रतिबिंब दाखवून त्याची समजूत काढण्यापेक्षां त्याला प्रत्यक्ष चंद्रलोकावरच नेऊन आणलें असतें तर त्यानें चंद्राचें नांवच टाकून दिलें असतें. कोणाला आवडेल असा निर्जीव थंड गोळा ?

त्यापेक्षां चंद्राच्या प्रकाशानें अमृतमय झालेला भूभाग हजारों चंद्रांच्या मोलापेक्षां श्रेष्ठ आहे. 'दुरून डोंगर' साजरे या म्हणीप्रमाणें मीहि स्वतःशीं म्हणतों,

' दुरून चंद्र साजरा. '

---

## ५० : : मी शिक्षणमंत्री झालों तर—

मी शिक्षणमंत्री झालों तर – काय करीन हें ठरविण्यापूर्वी मागील शिक्षणमंत्र्यांच्या कार्याचा मला विचार केला पाहिजे. आपल्या देशास राज्यव्यवस्थेंत कांहीं अधिकार मिळाले. त्यांत शिक्षणाच्या व्यवस्थेचाहि अधिकार मिळाला आहे आणि तो अधिकार ज्यांच्या हातीं होता ते स्वतः चांगले सुविद्य, सुसंस्कृत असे गृहस्थ होते. तेव्हां माझा कार्यक्रम ठरविण्यापूर्वी त्यांनीं काय केलें, त्यांत काय उणीव राहिली आहे, ती उणीव कां राहिली हें पाहिलें पाहिजे. तें पाहिल्यावर मला असें दिसून येतें कीं, त्यांच्या योजना अत्यंत शास्त्रशुद्ध आणि हितावह असूनहि केवळ आर्थिक साहाय्य नसल्यामुळें त्या योजना पार पडल्या नाहींत.

तेव्हां पहिली गोष्ट मला करावयाची ती म्हणजे आर्थिक व्यवस्था. साधा साक्षरतेचा प्रश्न घेतला तरी सक्तीचें शिक्षण करून देशांतील प्रत्येक मनुष्य निदान साक्षर झाला पाहिजे. यासाठीं लागणारा पैसा आधीं उभा केला पाहिजे. शिक्षणाच्या जोरावर जे आज संपन्न झाले आहेत त्यांच्यावर

मी कर बसवीन. ‘ शिक्षण-कर ’ हें त्या कराचें नांव. श्रीमंतांवर हा कर अगदीं करडेपणानें बसवला पाहिजे. लष्करी सामर्थ्यासाठीं सरकार जनतेची वाटेल तशी पिळवणूक करतेच कीं नाहीं ? मग शिक्षणप्रसारासाठीं कर-ण्यास काय हरकत आहे ? प्राप्तीवरील कराप्रमाणें हा कर मी वसूल करीन. देशांतील जनता अज्ञानांत ठेवून श्रीमंत होणें हा सामाजिक गुन्हा नाहीं का? सुरवातच म्हणून मी शिक्षणमंत्र्याच्या–स्वतःच्या–पगाराची कपात करीन. शेतीच्या उत्पन्नाचा बराचसा भाग शेतकऱ्यांमध्यें साक्षरता प्रसार कर-ण्यासाठीं खर्च झाला पाहिजे. पैसा वांचवून जमविण्याचे कितीतरी मार्ग मला डोळ्यासमोर दिसत आहेत. विद्यालयांचे इमारतीचे खर्च एकदम कमी केले पाहिजेत. त्या मार्गानें कितीतरी पैसा वांचेल. धार्मिक संस्थांच्या देणग्या, समारंभाचे खर्च इत्यादि बाबी मी कांहीं दिवस तरी तहकूब करीन.

पैसा जमला कीं, मी चालू शिक्षणपद्धतींत आमूलाग्र फरक करीन. प्राथमिक शिक्षणाची सरसकट योजना न करतां स्थानिक परिस्थितीप्रमाणें प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम मी आंखीन. या कामीं वर्धा–शिक्षण-योजनेचा बराच उपयोग होईल. खेडेगांवांतील शिक्षण व शहरांतील शिक्षण असें मी शिक्षणक्रमांत दोन स्पष्ट भाग करीन. सुधारलेल्या शेतीचें शिक्षण खेडेगांवांतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगद्वारां आरंभापासून सुरू करीन. पहिलीं चार-पांच वर्षें सर्वत्र सारखें शिक्षण ठेवल्यावर पुढें मी विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणें व योग्यतेप्रमाणें विभाग ठेवीन. म्हणजे ऐन तारुण्यांतच आपापल्या आवडीच्या विषयांत तरबेज असे तरुण बाहेर पडतील. आज मराठी ४, इंग्रजी ७ व कॉलेजचीं २ अशीं १३ वर्षें निदान ११ वर्षें तरी–विद्यार्थ्यांची व्यर्थ कुचंबणा होते. १३ वर्षें एका चाकोरींतून गेल्यावर विद्यार्थी आपला आवडीचा विषय निवडतो. हा कालापव्यय आहे. यांत पहिली सुधारणा इंग्रजीचा बोजा कमी करणें ही होय. हल्लीं मिळणारें ज्ञानच सर्वांस मराठींतून दिलें तरी कितीतरी कालाप-व्यय वांचेल अशी माझी खात्री आहे.

औद्योगिक शिक्षण ही आवश्यक बाब असली पाहिजे आणि शारी-रिक शिक्षण हा परीक्षेचा विषय झाला पाहिजे. पुस्तकाचीं इतकीं पानें

वाचणें या अटीप्रमाणेंच किमान आरोग्य असणें हेंहि मी आवश्यक ठेवीन. जीं यंत्रें आणि इतर शास्त्रीय शोध आधुनिक जीवनांत हरघडी येतात, त्यांचें सामान्य ज्ञान प्रत्येक पदवीधरास असलेंच पाहिजे, असा मी कटाक्ष ठेवीन.

चालू शिक्षणांत राष्ट्रीयवृत्तीची निगा राखली जात नाहीं. माझी अशी ठाम समजूत आहे कीं, प्रौढपणीं आपल्या राष्ट्राच्या जीवनास साहाय्य करण्याचें सामर्थ्य अंगीं येणें हें शिक्षणाचें ध्येय आहे. या दृष्टीनें अभ्यासक्रमांत आमूलाग्र फरक करावयास पाहिजे. राष्ट्रीय कार्यांत मला कोणता भाग उचलतां येईल याचा निर्णय सुशिक्षितास करतां आला पाहिजे. आमचे सुशिक्षित — पण जाऊं द्या, मी त्यांना दोष देत नाहीं.

कितीतरी योजना डोळ्यासमोर आहेत आणि त्या शिक्षमंत्र्याचे अधिकार मिळाले तरच पार पाडतां येतील. मी शिक्षणमंत्री झालों तर—हा विचार मनांत आल्याबरोबर माझ्या डोळ्यासमोर माझे लक्षावधि देशबांधव दिसूं लागतात आणि ‘ आम्हांला शिकवा ’ ‘ आम्हांला शिकवा ’ अशा त्यांच्या विनवण्या मला ऐकूं येऊं लागतात !

---

## ५१ : : आधुनिक तरुणाची कैफीयत

‘ आजकालचीं पोरें ! ’ हा जुन्या पिढीचा एक करमणुकीचा विषय आहे. तसें पाहिलें तर प्रत्येक जुनी पिढी प्रत्येक नव्या पिढीविरुद्ध कांहींना कांहीं तरी ओरड करीत असतेच. जुन्या—नव्याचें भांडण ही एक जगांतील शाश्वत गोष्ट आहे. तेव्हां आमच्या पिढीबद्दल आजची जुनी पिढी ओरड करीत असली तर त्यांत नवल असें कांहींच नाहीं. शांतपणें विचार केला तर या तक्रारींचें मुख्य सूत्र एकच असतें कीं, नवी पिढी जुन्या पिढीसारखी नाहीं. तरुण वृद्धांसारखे नाहींत !

परंतु खरोखर तरुण पिढीमध्यें एवढी तक्रार करण्यासारखे कांहीं दोष आहेत का ? आमची पोशाखपद्धति बदलली. आम्ही रेशीमकांठी धोतरांऐवजीं पायजमे घालतों. डोक्यावर पागोट्याऐवजीं टोपी घालतों

किंवा कांहीं घालीतहि नाहीं. शेंडीऐवजीं भांग पाडतों. असल्या गोष्टी या तक्रारींतच जमा होतात. आणि या गोष्टी करण्याबद्दल जुन्या पिढीनें केलेल्या विरोधाला तरुणांनीं दाद दिली नाहीं कीं लगेच आरंभीं दिलेले उद्‌गार उसळून बाहेर येतात; ' हीं पहा आजकालचीं पोरें ! '

यापेक्षां जास्त गंभीर आरोप आचाराबद्दलचे आहेत. जुन्या पिढींतले आचारधर्म तरुण पिढींत कायम राहिले नाहींत. स्नान राहिलें, संध्या गेली, सोवळें-ओवळें, गेलें परंतु स्वच्छता राहिली; देवपूजा गेली परंतु आदरभावना राहिली ! परन्तु गेलेल्या गोष्टींचें सगळें खापर तरुणांच्या डोक्यावर फोडण्यांत येतें. वास्तविक पाहतां बाह्यतः झालेलें फरक हे फारसे महत्त्वाचे नसतात. त्यांतील तत्त्व कायम राहिलें म्हणजे झालें.

आपले आचारधर्म, जुन्या पिढींत कसोशीनें पाळले जाणारे आचारधर्म, ज्या तत्त्वासाठीं पाळले जात होते तीं तत्त्वें आजच्या तरुण पिढींतहि मान्यता पावलीं आहेत. देशांतील कार्यकर्त्या राष्ट्रपुरुषांना वंदन करणारा तरुण, आपल्या टेबलावर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल, लो. टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या विभूतींच्या प्रतिमा ठेवून आपला आदर व्यक्त करणारा तरुण, आपल्यांतील भक्तिभावच दाखवीत नाहीं का ? तो ही ' पूजा ' च करीत नाहीं का ?

युवकसंघाच्या चळवळींत लाठीमार खात उभा राहिलेला तरुण, काँग्रेसच्या, हिंदुमहासभेच्या व राष्ट्रीयसंघाच्या किंवा सेवादलाच्या आदेशापुढें ' नमस्ते ' म्हणून मान लववून आज्ञापालन करणारे शेकडों तरुण सेवाधर्म पाळीत नाहींत का ? जुन्या पिढीच्या मानानें पाहिलें तर आमचें जीवन किती तरी खडतर आहे. विद्याभ्यासासाठीं काबाडकष्ट करणें ही जुन्या पिढींत मोठी कौतुकाची गोष्ट समजली जात असे. आजच्या तरुण पिढींतील कित्येक तरुणांना काबाडकष्ट ही नेहमींची बाब होऊन बसली आहे. अनाथ विद्यार्थिगृहांतील विद्यार्थ्यांची वाढती संख्या काय दाखविते ? विद्यार्जनाच्या बाबतींत आजच्या पिढीनें केवढी चिकाटी दाखविली आहे.

हें विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येवरूनच दिसून येईल. हें विद्याध्ययन किती प्रतिकूल परिस्थितींत चालूं असतें याचा विचार केला तर आजच्या पिढीं-तील कष्टाबद्दल खात्री होईल. शिक्षण महाग झालेलें, परीक्षा जास्त किचकट झालेल्या, चढाओढ तीव्र झालेली आणि विद्येचा अर्थार्जनाच्या कामीं उपयोग होण्याचा भरंवसा नाहींसा झालेला. पदवीधर व्हावें तरी पोटाची पंचाईत ! अशाहि स्थितींत पदवीधरांची संख्या वाढत आहे. ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखेंत तरुण आपलें सामर्थ्य सिद्ध करीत आहेत आणि आपल्याबरोबर देशाचें नांव उज्ज्वल करीत आहेत. आपल्या राष्ट्राचा जो इतका लौकिक झाला आहे त्याचें बहुतांशीं श्रेय आजच्या तरुण पिढीकडे आहे.

मागील पिढीच्या कार्यक्षेत्रापेक्षां आजच्या पिढीचें कार्यक्षेत्र कितीतरी विस्तृत झालें आहे. नुसता शिक्षणाचा विचार केला तरी जुन्या पदवीधरां-पेक्षां नव्या पदवीधरांचें ज्ञान कितीतरी विविध आणि व्यापक असतें.

परन्तु आमची ही कैफीयत जुनी पिढी ऐकून घ्यावयास तयार नाहीं. त्यांनीं तरुणांविषयीं सहानुभूतिपूर्वक विचार करावयाचें मनांत आणलें तर त्यांना असें खात्रीनें दिसेल कीं, आजच्या पिढीमध्यें कितीतरी कर्तृत्व आहे. तें कर्तृत्व अनेक तऱ्हेच्या पारतंत्र्यामुळें कुचंबत आहे. हजारों कर्तृत्ववान् तरुण आपलें कर्तृत्व दाखविण्यासाठीं संधि मागत आहेत. आपलें कर्तृत्व सिद्ध करण्यासाठीं ते वाटेल ते कष्ट सोसण्यास तयार आहेत; वाटेल तें धाडस करण्यास तयार आहेत. जुन्या पिढीनें त्यांना आशीर्वाद द्यावा, धीर द्यावा आणि असें अभिमानानें सांगावें कीं, 'ही पहा आमची तरुण पिढी !'

---

## ५२ : : करावें तसें भरावें

'जें पेरावें तेंच उगवतें' हा अगदीं साधा सिद्धांत आहे. हें माहित असणें हें कांहीं फारसें महत्त्वाचें ज्ञान समजलें जात नाहीं. गहूं पेरून बाजरीची अपेक्षा करणारा महामूर्ख ठरवला जातो. रोपाची निगा

न राखतां फळां—फुलांची प्रतीक्षा करीत बसलेला वावळट ठरवला जातो. बीं नुसतें जमिनींत पेरून काम पुरें होत नाहीं, तें बीं रुजेल अशी जमिनीची मशागत करावी लागते. त्या बीजाच्या वाढीस आवश्यक तें साहाय्य वेळेवर नि भरपूर देण्याची दक्षता ठेवावी लागते. हें सगळें निरक्षर अडाणी शेतकरीसुद्धां जाणतो आणि आपण योग्य काळजी न घेतल्यानें जर रोपटें मेलें, पीक बुडालें तर तो कोणास दोष देत नाहीं. तो असें म्हणत नाहीं कीं, " मी वाटेल तें पेरीन, वाटलें तर श्रम करीन नाहींतर करणार नाहीं. परन्तु मला पाहिजे तें फळ मात्र मिळालेंच पाहिजे ! "

परन्तु व्यवहारांत मात्र असे म्हणणारे, अशी विचित्र अपेक्षा करणारे लोक पुष्कळ असतात. आपण अभ्यासांत हेळसांड केली हें माहित असूनहि नापास झाल्याबद्दल परीक्षकाच्या नांवानें खडे फोडणारे विद्यार्थी असतात. आपण दुसऱ्याची फसवणूक केली तरी त्याबद्दल शासन मात्र होऊं नये अशी इच्छा करणारे लोक असतात. आपली लुच्चेगिरी जगांत पचावी अशी त्यांची अपेक्षा असते. परंतु त्यांना हें समजत नाहीं कीं, शेतीच्या बाबतींतला नियम हाच सगळीकडे लागू होणारा नियम आहे. त्यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर त्यांना सांगण्याची वेळ येते कीं, करावें तसें भरावें !

मोठेपणा, वैभव, इत्यादि गोष्टींची कोणास इच्छा नसते ? परन्तु त्यासाठीं जरूर तेवढी तपश्चर्या करण्याची तयारी असलेले किती सांपडतील ? इच्छा करणारे सर्व, परंतु तपश्चर्या करणारे थोडे. याचें कारण कांहीं श्रम न करतां फळाची इच्छा बाळगीत बसलेलेच लोक जगांत फार आहेत, आणि त्यामुळें करावें तसें भरावें हें ज्ञान अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचें ठरलें आहे.

ज्यांचा अपेक्षाभंग होतो, ज्यांची फसगत होते त्यांना या तत्त्वाची ओळख करून देण्याची जरूर उत्पन्न होते. कारण स्वतःच्या चुका लक्षांत न घेतां ते आपल्या पराभवाची जबाबदारी दुसऱ्यावर टाकीत असतात. अनायासें कांहीं लाभ झाला तर मनुष्यास खंत वाटत नाहीं. श्रम करूनहि कांहीं चुकांमुळें ते व्यर्थ ठरले तर ओरडणारा मनुष्य, कांहीं श्रम न करतां

लाभ झाला तर मात्र तें योग्यच झालें असें समजतो ! मानवी स्वभावांतील हें विचित्र अज्ञान आहे. या अज्ञानामुळें मनुष्य दैववादी होत जातो. आकस्मिकपणें मिळणारें वैभव किंवा अनपेक्षितपणें होणारा पराभव या दोन्ही परिस्थितींत मनुष्य दैवाकडे बोट दाखवतो. त्यामुळें ' नशिबांत असणें ' या शब्दप्रयोगाला फार महत्त्व आलें आहे.

वास्तविक पाहतां कांहीं अपवाद सोडून दिले तर करावें तसें भरावें हा नियम सर्वत्र लागू पडतो. दैववाद हा त्या अपवादांपैकीं आहे. जगांतील अत्यंत महत्त्वाच्या घडामोडी, चिरस्मरणीय झालेल्या व्यक्तींचीं चरित्रें, हीं सर्व 'करावें तसें भरावें' याच प्रयत्नवादाच्या सिद्धांताचें समर्थन करतात. आकस्मिक वाटणाऱ्या गोष्टींच्या पाठीमागची कारणपरंपरा आपणांस माहित नसते म्हणून आपणांस त्या आकस्मिक व योगायोगाच्या वाटतात. परन्तु आपण नीट विचार केला तर जमिनींत द्रव्याचे हंडे सांपडून श्रीमंत झालेल्यांच्यापेक्षां घाम गाळून कष्ट करून श्रीमंत झालेलेच जगांत फार आढळतील. रानांत आपोआप उगवणाऱ्या कंदमुळांपेक्षां शेतकऱ्यानें विशिष्ट हेतूनें, योजनेनें, श्रमपूर्वक केलेल्या पेरणीनें व पिकानेंच जगाला अन्न दिलें आहे. करावें तसें भरावें या सिद्धांताच्या आधारानेंच समाजाचे नीतिनियम तयार झाले आहेत. ज्यानें चोरी केली आहे त्याची चोरी होणारच; ज्यानें दुसऱ्यास लुटलें त्याची लूटमार होणारच; ज्यानें कष्ट केले त्याला फळ मिळणारच; ज्यानें सेवा केली त्याला मान मिळणारच इत्यादि अनुभवसिद्ध गोष्टी हेंच दाखवितात कीं, करावें तसें भरावें.

आधुनिक जगांत या सिद्धांताचें महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. या सिद्धांतानुरूप उभारलेल्या प्रयत्नवादाचाच प्रभाव सर्वत्र दिसत आहे. मनुष्य आपल्या कृतीच्या परिणामाविषयीं निश्चितपणा बाळगूं लागला आहे आणि त्यामुळें स्वतःच्या कर्तृत्वाविषयींचा आत्मविश्वास वाढला आहे. कारण त्याला हें पटलें आहे कीं, करावें तसें भरावें. जें ' भरण्याची ' माझी इच्छा आहे त्यासाठीं जरूर तें सर्व ' करण्याची ' माझी तयारी पाहिजे आणि दुसरें असें कीं, मीं जें केलें असेल त्याचीं फळें भोगण्याची मीं तयारी ठेवली पाहिजे. आधुनिक जगाचें हें ब्रीदवाक्य आहे कीं, करावें तसें भरावें !

## ५३ : : दुरून डोंगर साजरे

आपल्या घराच्या गच्चीवरून भोंवतालचा देखावा पाहूं लागलों तर क्षितिजाजवळ असलेले डोंगर आपल्याला प्रामुख्यानें दिसतात. डोंगरांचा निळसर रंग अतिशय मनोवेधक वाटतो. त्यांचे निरनिराळे आकार, त्यांच्या बैठकीची ढब, त्यांचें एखाद्या ऋषीप्रमाणें दिसणारें गांभीर्य, त्यावरून एखाद्या पाण्याचा ओघळ वहात असला तर त्यामुळें जास्तच वाढलेलें आकर्षकत्व हीं सर्व जों जों पाहूं लागावें तों तों आपलें मन अनेक विचारानें बेहोष होत जातें. अशाच एखाद्या डोंगरावर एखादा किल्ला असला, पठारासारखी जागा दिसली तर, किंवा उंचच उंच सुळका दिसला तर क्षणभर वाटतें कीं, तेथें जाऊन उभें राहावें. दुरून किती सरळ आणि साधी दिसते ती चढण ! परंतु प्रत्यक्ष एखाद्या डोंगराजवळ जाऊं लागलों आणि तेथील दऱ्या, खोरीं, अरण्यें, ओबडधोबड उतरणी पाहिल्या कीं, दुरून दिसला तितका कांहीं डोंगर सुंदर किंवा सुखावह नाहीं हें अनुभवास येतें. डोंगराचा सुंदरपणा केवळ अंतरामुळें होणारा कांहींसा भासच होय.

जगांत कित्येक वेळां अशी फसवणूक होत असते. एखाद्या विशेष प्रसंगानें एखाद्या व्यक्तीविषयीं आपल्या मनांत विलक्षण पूज्यभाव उत्पन्न होतो. त्या अल्पपरिचयावरून त्याच्या जीविताचा जो लहानसा भाग दिसतो तसेंच सगळें त्याचें जीवन असलें पाहिजे असें आपण समजतों. परन्तु पुष्कळ वेळां असें होतें कीं, त्या व्यक्तीशीं जास्त परिचय झाला, तिच्या जीवनाचे इतर भाग कळूं लागले कीं, असें कळतें कीं, आपणांस वाटलें तितकें त्याचें जीवन सुंदर नाहीं. किंबहुना आपणांस आरंभीं दिसला तेवढाच त्या जीवनाचा चांगला भाग होता. शितावरून भाताची परीक्षा करण्याचा आपण प्रयत्न केला तो पूर्ण फसला.

ही फसगत होण्याचें कारण अनुमान आणि निर्णय करण्याची घाई हें होय. कोणचाहि मनुष्य शंभर टक्के सद्‌गुणी नसतो. मनुष्य म्हटला कीं, त्यांत कांहीं दोष असावयाचेच. हें लक्षांत न आल्यानें अल्पपरिचयानें

एखाद्याविषयीं आपण जी अपेक्षा करतों त्यापेक्षां कांहीं निराळें कळलें कीं, आपली फसगत होते.

प्रत्येक बाबतींत पूर्णज्ञान शक्य नसल्यानें अंशतः मिळालेल्या आधारावरून अनुमानानेंच अज्ञात भागाचें ज्ञान मिळवावें लागतें. तें ज्ञान मिळवितांना तें अनुमानानें मिळविलेलें ज्ञान आहे, अनुभवानें नव्हे, हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. अनुमानावर आधारलेलें ज्ञान हें बदलूं शकतें. आपणापासून दूर असलेली गोष्ट कशी असेल हें ठरवितांना आपण त्या ठरविण्यांतील निश्चितपणाची मर्यादा लक्ष्यांत घेतली पाहिजे.

भोंवतालचीं सुखी माणसें पाहिलीं म्हणजे त्यांचें सर्वच जीवन सुखानें ओतप्रोत भरलें आहे असें आपणांस वाटतें. एखाद्याच्या जीवनांतले वैभवाचे क्षण पाहिले कीं,'किती भाग्यवान् माणूस आहे' असें आपण एकदम सर्वसाधारण विधान करतों; आणि मग एखाद्या प्रसंगानें त्याच्या जीवनांतला कांहीं कटुभाग दिसला कीं, स्वतःच आपण दचकतों, आणि म्हणतों, " अरे ! आपली कल्पना चुकली तर ! "

अल्पपरिचयानें चांगलीं किंवा वाईट मतें बनवितांना आपण अनुमानजन्य ज्ञानांतील ही उणीव नेहमीं लक्ष्यांत ठेविली पाहिजे. आपणांपासून कायमच्या दूर गेलेल्या भूतकाळाविषयीं आणि अद्याप पूर्णपणें अज्ञात असलेल्या भविष्यकाळाविषयीं कांहीं मतें बनवितांना हा अंतराचा नियम लक्ष्यांत ठेवला पाहिजे. अनुमान आणि अनुभव यांतील फरक लक्ष्यांत ठेवणाऱ्या माणसाची फसगत होत नाहीं. अनुमानावरच भिस्त ठेवणारा माणूस दुराग्रही होतो आणि शेवटीं त्याला आपला केविलवाणा पराभव पत्करावा लागतो.

अनुमानानें अनुभवाच्या मार्गावर थोडें साहाय्य मिळतें एवढाच अनुमानाचा उपयोग. माणसाचें ज्ञान हें त्याला भोंवतालीं दिसणाऱ्या क्षितिजाच्या कडेसारखें आहे. तो जेथें उभा असेल तेवढ्या जागेपुरती त्या क्षितिजाची कडहि खरी आहे. परन्तु त्यानें जागा बदलली कीं, क्षितिजाची कड बदलली. दोन्ही कडा खऱ्या आहेत. परन्तु दोन्ही निराळ्या आहेत हेंहि खरें आहे. दुरून डोंगराची शोभा दिसते ती खरी आहे परंतु

जवळ गेल्यावर डोंगराचें जें रौद्र स्वरूप दिसतें तेंहि खरें आहे. माणसाचें ज्ञान असें मर्यादित आहे हें त्यानें ओळखलें म्हणजे दुरून साजरे दिसणारे डोंगर, जवळ जातां दरींखोरीं दाखवूं लागले तरी तो गांगरणार नाहीं.

## ५४ : : शाळेंतला शेवटचा दिवस

अद्यापि मला चांगला आठवतो तो दिवस ! विद्यार्थिदशेंतील शेवटचा दिवस तोच ठरला ! कारण पैशाच्या अभावीं मला विश्वविद्यालयाचें शिक्षण घेणें अशक्य झालें.

त्या दिवशीं मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याकरितां आमच्या प्रिय शिक्षकांनीं एक छोटीशी सभा भरवली होती. एका बाजूला सारे शिक्षक बसले होते व एका बाजूला आम्ही विद्यार्थी बसलों होतों. मध्यें आमच्या शाळेचे प्रमुख शिक्षक बसले होते ! सारी सभा तटस्थ होती. खालच्या वर्गांतील विद्यार्थी आमच्याकडे पहात होते व मधूनमधून शिक्षकांच्या चेहऱ्यांकडेहि पहात होते. जसें मनुष्याचें मन असेल तशी त्याला सर्व सृष्टि दिसते असें म्हणतात हें कांहीं खोटें नाहीं. ज्या सभागृहांत आम्ही बसलों होतों त्या सभागृहाचें शेवटचें दर्शन आम्हीं घेत होतों. शिक्षकांच्या चेहऱ्यांकडे पाहून मला फार वाईट वाटलें ! आमच्यांत ज्यांनीं सद्विचाराचें बीज रुजवलें, ज्या शाळेच्या सभागृहांत आम्हीं सद्वर्तनाचे धडे घेतले, ज्यांनीं आपल्या प्रिय मुलांप्रमाणें आम्हांस वागवलें त्या शिक्षकांचा वियोग होणार ही कल्पनाच मनाला त्रास देत होती ! शिक्षकांच्या शिकवण्यावरच आम्हीं आयुष्यांत मोठे होणार ! आम्ही कुणीतरी थोर लेखक झालों किंवा देशसेवक झालों तर लोक आमची स्तुति गाणार, पण आमच्या मोठेपणाचें बीज आमच्या शिक्षकांनींच रुजवलेलें असतें. वृक्षाच्या वरच्या पसाऱ्याकडे लोक पाहतात पण जमिनीखालच्या स्वार्थत्यागी बीजाकडे कोण पाहणार ? जगाची दृष्टि इमारतीच्या डोलाऱ्याकडे असते, पण पायथ्याच्या दगडाकडे नसते ! पण पायथ्याचा

दगड होण्यांतच कित्येकांना आनंद वाटतो ! त्यांपैकींच आमचे शिक्षक एक होते.

शांततेंत थोडा वेळ निघून गेल्यानंतर आमच्या प्रमुख शिक्षकांनीं बोलण्यास सुरवात केली—

"प्रिय विद्यार्थि-मित्रांनो,—" त्यांना किती गहिंवरून आलें त्या वेळीं ! डोळ्यांत अश्रू चमकलेसे मला दिसले. आमचे मराठीचे शिक्षक तर थोडेसे बाहेर जाऊन आले. मराठीचे शिक्षक किती प्रेमळ होते आमचे ! 'पोर खाटेवर मृत्युच्याच दारा' या काव्यपंक्ति शिकविण्याच्या वेळेस त्यांना कितीतरी वाईट वाटलें होतें. अश्रू दिसूं नयेत म्हणूनच ते बाहेर गेले होते हें मीं ओळखलें. थोड्या वेळानें उसनें धैर्य दाखवून प्रमुख शिक्षकांनीं पुढें बोलण्यास सुरवात केली. वियोगाच्या वेळीं बोलण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तो फोल ठरतो असेंच नाहीं का! आम्ही 'हृदयाचे' कान उघडे ठेवून त्यांचें भाषण ऐकत होतों.

" आजपासून तुम्हीं जगांतील अडचणींना तोंड देण्यास प्रत्यक्ष पाऊल टाकणार आहांत. शाळेंतील छोट्याशा जगांतून, व्यवहारी जगांत तुमचें पदार्पण होत आहे. तुमच्यांपैकीं कुणी डॉक्टर होतील, कुणी वकील होतील, कुणी बडे नोकरदार होतील ! पण तुम्हीं ज्या ठिकाणीं शिक्षण घेतलेंत त्या शाळेला मात्र आजन्म विसरूं नका ! जगाच्या बाजारांत तुमची किंमत कधीं कमी ठरेल तर कधी जास्ती ठरेल. मोठेपणानें हुरळून जाऊं नका व सामाजिक हालअपेष्टांनीं चित्ताची चलबिचल होऊं देऊं नका ! आपल्या कर्तव्याशीं प्रामाणिक रहा. कित्येक वेळां तुम्हांला अपयश येईल, पण त्याला फारशी किंमत देऊं नका. प्रयत्न करा ! प्रयत्नाचें समाधान हेंच हक्काचें सुख आहे. शाळेंत असतांना आम्हीं तुम्हांला त्रास दिला असेल पण तुमच्या बऱ्याकरितांच आम्हांला निष्ठुर व्हावें लागलें ! त्या गोष्टी तुम्ही लक्षांत घेणार नाहींत असें आम्हांला वाटतें ! मी या समयीं जास्ती बोलूं शकत नाहीं. जग हें कांट्याकुट्यांनीं भरलेलें आहे, पाऊल टाकतांना थोडासा विचार करून पाऊल टाका व आपलें ध्येयशिखर गांठा, एवढेंच मी सांगतों. "

शिक्षकांचें भाषण ऐकत असतां मला त्यांनीं शिकविलेल्या ओळी आठवूं लागल्याः ' विसर मला, परि अमर्याद जग राही नित्य जपून. '

जिकडे तिकडे दुःखमय वातावरण पसरलें होतें. निरोप देण्याचा समारंभ झाला व सभा संपली. आमच्यांतील कित्येक विद्यार्थ्यांना राहवलें नाहीं. त्यांनीं तावडतोब प्रमुख शिक्षकांच्या पायांवर डोकें ठेवलें. शिक्षकांनीं सुद्धां पित्याप्रमाणें प्रेमळ हातांनीं आलिंगन दिलें. तें दृश्य अद्यापि डोळ्यासमोर उभें राहतें. दिवाणखान्यांतून आम्ही बाहेर पडलों.

शाळेच्या बागेंत आम्ही गेलों. वियोगाची कल्पना सहन न होऊनच बागेंतील वेलीफुलांवरून दंवबिंदु दिसत होते. बागेंतून शाळेच्या पवित्र इमारतीकडे मीं पाहिलें व न कळतच माझे हात जोडले गेले व मीं शाळेला प्रणाम केला. जड अंतःकरणानें शाळेच्या आवाराचें फाटक उघडलें, पुन्हां एकदां माझ्या प्राणप्रिय शाळेला डोळे भरून पाहून घेतलें व बाहेर पडलों. हा माझा शाळेंतला शेवटचा दिवस, विद्यार्थिदशेंतला शेवटचाच दिवस ठरला. तो दिवस हृदयावर कसा अगदीं कोरला गेल्यासारखा वाटतो. अद्यापि शाळेच्या बाजूनें जातांना एखाद्या प्रेमळ माणसाच्या जवळून चालल्यासारखें वाटतें.

---

## ५५ : : बळी तो कान पिळी

' सत्तेपुढें शहाणपण द ' अशी एक म्हण आहे आणि त्या म्हणीचें सत्यत्व व्यवहारांत पदोपदीं अनुभवास येतें. एखाद्या माणसाच्या हातांत सत्ता आली कीं, कोणतेंहि कार्य तो अधिकाराच्या जोरावर घडवून आणतो. सत्ताधीश असल्यानें तें कार्य करण्याच्या त्याच्या लायकी-नालायकीविषयीं प्रश्न उत्पन्न होत नाहीं. त्या वेळीं त्या कार्यांतील दोष त्याच्या हाताखालील माणसासहि दिसण्याइतके स्पष्ट असले तरी त्या अधिकारी व्यक्तीला तो दुय्यम माणूस ते दोष दाखवून देऊं शकत नाहीं. आणि तसा कोणीं प्रयत्न केलाच तर तो बळी, आपल्या मार्गांत येणाऱ्या माणसाचे कान पिळून त्याला गप्प बसवतो. सत्तेपुढें आपलें शहाणपण द आहे हें

त्या दुय्यम माणसास कळून चुकतें. कित्येक लोक सत्ताधीशांचे प्रमाद मुकाट्यानें पहात व सोशीत राहतात. आपल्या सांगण्याचा उपयोग नाहीं मग सांगून काय करावयाचें? विनाकारण स्वतःचे कान कशाला पिळून घ्या, असा विचार करून ते सत्ताधीशाच्या वाटेंतून बाजूस होतात.

ज्या बळाच्या जोरावर सत्ताधीश ही सत्ता मिळवितात तें बळ पुष्कळ वेळां शारीरिक असतें. शारीरिक बळाच्या बाबतींत अरेरावी जास्त संभवते. भौतिक सत्तेच्या जोरावरच बौद्धिक सत्तेची मुस्कटदाबी करतां येते. प्रचलित सत्ताधीशांच्या मताविरुद्ध मतप्रचार केल्याबद्दल प्रचारकास अनन्वित छळ सोसावे लागल्याचीं उदाहरणें इतिहासांत जाहीरपणें नमूद झालेलीं आहेत. ग्यालिलिओ, सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त इत्यादींचे झालेले छळ हे 'बळी तो कान पिळी' या न्यायानेंच झालेले आहेत. कारण त्यांनीं सांगितलेलें ज्ञान सत्य असलें, उपयुक्त असलें तरी तत्कालीन बलवंतांना तें न पटल्यामुळें त्यांनीं या ज्ञानी पुरुषांचा अनन्वित छळ केला. तो छळ अन्यायमूलक आहे हें माहीत असणारे त्या काळींहि लोक नव्हते असें नाहीं. फरक एवढाच कीं, या वर सांगितलेल्या महात्म्यांनीं तत्त्वनिष्ठेसाठीं बळी लोकांना विरोध करण्याचें धैर्य दाखविलें. त्यासाठीं पिळवणूक सहन केली. इतरांनीं आपला विरोध मनांतच ठेवला.

वरील उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं, दुसऱ्याची पिळवणूक करून मिळविलेली सत्ता नि विजय हे सत्यावर उभारलेले नसतात. ते विजय असत्यासारखेच मर्त्य असतात. बळी लोकांनीं छळ केलेले महात्मे जगांत अजरामर झाले. बळी लोकांना त्या माणसाचें शरीर पिळतां आलें, ज्ञान पिळतां आलें नाहीं. 'बळी तो कान पिळी' या म्हणींत अन्यायाचें स्वरूप दाखविलें आहे. त्यांत न्यायाचें समर्थन केलेलें नाहीं. सत्तेचा असा उपयोग हा दुरुपयोग आहे हेंच ही म्हण सांगते. अशा उपयोगांत खर्च होणाऱ्या बळाचा, अरेरावीचा निषेधच या म्हणींत केला आहे.

कारण शेवटीं बळी लोकांनाहि पुरून उरणारें सत्य, —ज्ञान हें जास्त बलवान् ठरलें आहे. सत्य कधींहि अरेरावी करून सत्ता गाजवीत नाहीं. सत्य स्वयंसिद्ध आहे. तें कोणाची मनधरणी करीत नाहीं. तसेंच कोणाची

छळणूकहि करीत नाहीं. तें पिळवणूक सहन करील, परन्तु अरेरावी करणार नाहीं. या दृष्टीनें कान पिळून, मुस्कटदाबी करून आपलें बल प्रस्थापित करणारा खरा बलवान् नव्हे. बल हें त्याच्या ठिकाणीं भूषण नसून दूषण आहे.

कांहीं प्रसंगीं बळाचा अरेरावीनें केलेला उपयोगहि हितावह ठरतो. एखाद्या माणसास आपलें हिताहित समजण्याची अक्कल नसेल तर त्याला न समजणाऱ्या गोष्टी पटवीत बसण्यापेक्षां अरेरावीनें त्यास आपल्या म्हणण्याप्रमाणें वागावयास लावणें, त्यासाठीं कानहि उपटणें, हितावह ठरतें. परन्तु वरील म्हणीचा उपयोग करतांना परिणामीं हितावह ठरणारी अरेरावी लक्षांत घेतलेली नसते तर अरेरावीमुळें सत्याचीहि गळचेपी होते असें व्यक्त करण्यासाठीं या म्हणीचा उपयोग होतो. नाहींतर अज्ञ मुलांवर आईबाप सत्ता गाजवितात त्यांत वाईट काय आहे? परन्तु सत्तेच्या त्या हितावह उपयोगाचा विचार या म्हणींत केलेला नाहीं, तर अरेरावीनें सत्याची गळचेपी करण्यावरच या म्हणीचा सगळा रोख आहे.

आज युरोपमध्यें अद्यापहि धुमसणारें महायुद्ध याच अरेरावीचें भेसुर स्वरूप दाखवीत आहे. जर्मनीनें आपल्या बळाच्या जोरावर दुर्बल राष्ट्रें चिरडून टाकण्याचा सपाटा चालविला. परन्तु ‘ बळी तो कान पिळी ’ या म्हणीला उत्तर ‘ शेरास-सव्वाशेर केव्हां तरी मिळतोच ’ असें आहे. कारण बळाच्या जोरावर दडपलेलें सत्य कधींहि नाहींसें होत नाहीं. योग्य संधि येतांच तें डोकें वरती काढतेंच. सत्य अरेरावीस त्याच शब्दांत सांगतें कीं, ‘ बळी तो कान पिळी. ’

---

## ५६ : : पोषाख आणि सौंदर्य

परमेश्वरानें दिलेलें रूप पाहून माणसाला वाटलें कीं, तें विभूषित करावयास पाहिजे. आपण आहोंत यापेक्षां जास्त सुंदर दिसूं कीं नाहीं हें जाणण्यासाठीं मनुष्य अनादि कालापासून धडपड करीत आला आहे आणि

आपल्या जीवनांत जो अनावर पसारा पडला आहे तो या धडपडीनेंच तयार झाला आहे. आपलें सौंदर्य वाढविण्यासाठीं भोंवतालच्या कोणत्या वस्तूचा कसा व किती तऱ्हेनें उपयोग करतां येईल हें मनुष्य सारखें तपाशीत आहे. झाडाचीं सुंदर पानें आणि फुलें, रंग, शिंपा, शंख, दगड, माती इत्यादि साधनांचें सुद्धां त्यानें साहाय्य घेतलें. हळूहळू त्याला या निसर्गप्राप्त वस्तूंचीं निरनिराळीं समीकरणें तयार करतां येऊं लागलीं. पानें आणि फुलें एकत्र गुंफतां येऊं लागलीं, पदार्थांच्या माळा करतां येऊं लागल्या, झाडांच्या सालींचीं पांघरुणें तयार करतां येऊं लागलीं आणि कातड्याचे जोडे करतां येऊं लागले.

सौंदर्यसाधनाची ही विद्या क्षणोक्षणीं वाढत वाढत जाऊन तिचा कांहीं ठिकाणीं तर अतिरेक झाला आहे. पोषाख हें सौंदर्यसाधनांतील प्रमुख साधन आहे. थंडीवाऱ्यापासून बचाव करण्याच्या निमित्तानें मनुष्य पोषाखाच्या नादीं लागला. तो त्याचा नाद इतका वाढला कीं, आतां त्या पायीं तो मूळ हेतु बाजूस ठेवून जो तो सौंदर्यसाधनावरच सर्व लक्ष देतो.

पोषाख आणि सौंदर्य यांच्या संबंधींच्या कल्पना प्रत्येक युगांत बदलत असतात. आणि एकाच युगांत प्रत्येक समाजांत त्या निरनिराळ्या असतात. एक दोन वल्कलें वापरणें एवढाच पोषाख एके काळीं माणसाला पुरेसा वाटत होता. त्याबद्दल कोणी कोणास बावळट म्हणत नसत किंवा आपल्या सौंदर्यांत कांहीं उणीव पडते अशीहि कोणास कधीं खंत वाटली नाहीं. पुढें कापड करतां येऊं लागल्यावर कातडीं किंवा वल्कलें टाकून मनुष्य वस्त्रें वापरूं लागला. तरी रामायणकालीन किंवा ग्रीस वगैरे देशांतील मोठमोठे श्रीमंतहि एक दोन वस्त्रांवरतीच आपली सुंदर दिसण्याची हौस भागवीत असत. त्यांत कपड्यांची संख्या यापेक्षां कपड्यांचें मूल्य ही मुख्य गोष्ट ठरवली जात असे. आजहि कोंकणी लोक रेशमी कांठाचें एक फडकें कमरेभोंवतीं गुंडाळून पोषाखानें सौंदर्य आणण्याची हौस भागवितात. पुढें कपड्यांची संख्या हें सौंदर्याचें गमक ठरूं लागलें. संख्येबरोबर विस्तारहि वाढला. जास्तींत जास्त कपडे निरनिराळ्या पद्धतीनें अंगावर घालण्याची पद्धत त्या काळीं होती. इंग्लंडमधील राण्यांचे झगे किंवा पेशवाई-

तील पायघोळ अंगरखे पहा. झगा इतका ऐसपैस कीं, राणी चालूं लागली कीं, तो झगा उचलून धरण्यासाठीं 'पोरें' ठेवण्याची चाल सुरू झाली.

पुढें हाहि पोषाख लोकांच्या सौंदर्यकल्पनेस रुचेनासा झाला आणि आतां कमींत कमी कपडे वापरणें हेंच सौंदर्याचें साधन असें लोकांस वाटूं लागलें. कोट, जाकीट, शर्ट, पागोटें, लफ्फेदार रेशीमकांठी धोतर किंवा बूट, मोजे, पॅन्ट, शर्ट, कॉलर, नेकटाय, हॅट इत्यादि वापरून आपलें सौंदर्य प्रस्थापित करणारीं माणसें आतां नेहरूशर्ट, पंचा व वहाणा यांचा स्वीकार करीत आहेत आणि हाहि पोषाख सौंदर्यवादी व्यक्तींनीं मान्य केला आहे.

स्त्रियांच्या वस्त्रभूषेच्या बाबतींतहि सौंदर्याच्या कल्पनांचे असेच नवेनवे अवतार दिसत असतात.

पोषाखाचा हा इतिहास पाहिला म्हणजे पोषाख आणि सौंदर्य' यांचा कांहीं शास्त्रीय संबंध आहे याची जाणीव फार थोडयांना असावी असें दिसतें. एके काळीं जो बेढबपणा ठरला तो दुसऱ्या काळीं आधुनिकेंत जमा होतो, आणि एकाच काळांत एका प्रांतांतील पोषाखपद्धति दुसऱ्या प्रांतांत रानटीपणाची ठरते. पोषाखांतील चालीरीती या फॅशनच्या नांवाखालीं चालू असतात. फॅशन ही समाजांतील कांहीं व्यक्तींची लोकप्रिय झालेली लहर आहे. परंतु सौंदर्य ही कांहीं लहर नाहीं, तें शास्त्र आहे. पोषाखांतील चालीरीती या शास्त्राचा विचारहि न करतां केवळ फॅशनच्या नांवाखालीं मान्यता पावत असतात. त्यांत अंधानुकरणाचाच जास्त प्रभाव दिसतो. 'एक नूर आदमी और दस नूर कपडा' या म्हणींत 'आदमी'लाच महत्त्व आहे. परंतु पोषाखांच्या चालीरीतींत तो विचार बाजूस पडून आदमीसाठीं कपडा असें व्हावयाच्या ऐवजीं कपडयासाठीं आदमी असें झालें आहे. वैयक्तिक सुखदुःखाची पर्वा न करतां पोषाखाच्या फॅशनचा जुलूम किती तरी लोक सहन करीत असतात आणि आपण सुंदर दिसतों असें गृहीत धरीत असतात. वास्तविक-पोषाखामुळें सौंदर्य, हा अगदीं व्यक्तिनिष्ठ विचार आहे. एकाला चांगलें दिसेल तें सगळ्यांना चांगलें दिसेलच असें नाहीं.

## ५७ : : घड्याळाची कैफियत

‘ घर्ररर्र...ठण्–ण्–ण्. ’ उठा ! चार वाजले ! अभ्यास करायचा आहे ना ? ‘ पहाटे संस्कृत फार चांगलं होतं, म्हणून पहाटे चार वाजतां उठव’ म्हणून रात्रीं माझा कान पिळलात ना ?–आणि आतां माझ्यावरच रागावतां उलट ’! रात्रभर न झोंपतां मी तुमच्याकरतां जागत बसलों त्याचें हें फळ वाटतें ? ‘ अतिपरिचयादवज्ञा ’ असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं– !

‘ स्वित्झर्लंडसारखी माझी प्राणप्रिय जन्मभूमि सोडून हिंदुस्थानसारख्या परप्रांतीं मी केवळ तुमच्याकरतां आलों. तुम्हीं आतां तरी वक्तशीर वागावयास शिकावें म्हणून मला कितीतरी वाटतं ! नक्षत्रांकडे पाहून किती प्रहर झाले हें गणितानें ओळखण्याची तुम्हांला दगदग पडूं नये म्हणून मी आपण होऊन तुम्हांला नेमके जागें करतों ! पण तुम्हीं कसले आळशी! ‘ लवकर निजे लवकर उठे, त्यास आरोग्य संपत्ती भेटे ’ असें म्हणतां फक्त, पण उठतां कुठं ! आणि पुनः वर आढ्यता मिरवतां कीं, आम्ही सर्व प्राणिसमुदायांत श्रेष्ठ आहोंत. ’ म्हणून ! मी एक निर्जीव वस्तु असून सुद्धां किती नियमित वागतों आणि तुम्हांला ज्ञान असूनसुद्धां तुम्ही किती तरी अनियमित वागतां ! वरं ‘ आपण अनियमित आहांत तें आहांत आणि वर मलाहि अनियमितपणानें वागवतां ! वेळेवर किल्ली देत नाहीं आणि मग कुरकुर करीत बसतां कीं ‘ मी पुढें जातों अन् पाठीमागें राहातों’ म्हणून ! ’

पूर्वी लोकांना पहाटें उठायचा किती त्रास होत असे ! नेमके पहाटें कांहीं उठतां येत नसे ! कुणी पहांट झाली असें वाटून रात्रींच उठून निशाचराप्रमाणें नदीवर स्नानास जात व उजाडण्याची वाट पहात बसत असत ! तर कुणी पहाट अद्यापि झाली नाहीं असें वाटून सूर्योदयानंतर उठत. पण आतां मी तुम्हांला कसें नेमकें जागें करतों !–साखरझोंपेंतून तुम्हांला जागं व्हावंसं वाटतं नाहीं म्हणून रागानें माझी मुस्कटदाबी करतां खरी, पण तुम्ही सांगतां म्हणूनच ना मी उठवतों !

हो ! खरंच. परवांची गंमत मी सांगायला विसरलोंच ! तुम्ही रात्रीं खुशाल झोंपा घेतां आणि मला मात्र सेकंदा सेकंदानं डोळे उघडून जागें रहावं लागतं ! दिवाणखान्यांत मला ठेवलंत तें एका अर्थी बरंच आहे. कारण रात्रीं एक चोर दिवाणखान्यांत शिरला होता. त्या वेळीं आबा-साहेबांना गाढ झोंप लागली होती. चोराला वाटलं कीं, आपल्याला कुणीच पहात नाहीं, पण मी तिथें होतों ना ? त्यानें आबासाहेबांच्या बिछान्याखालून किल्ल्या घेतलेल्या पाहिल्या मीं आणि तो आतां तिजोरी उघडणार तोंच मी ' चार वाजले हो ! ' म्हणून ओरडलों. चोर किती दचकला ! त्यानें ताबडतोब धूम ठोकली. आबासाहेबांनीं हें पाहिलें. माझ्याबद्दल त्यांना किती आदर वाटला म्हणतां ? सांगितलं तर खोटं वाटेल तुम्हांला. त्यांनीं मला खरोखर नमस्कार केला ! त्या वेळीं खरोखर मला आनंद वाटला ! आतां सांगा माझा किती उपयोग आहे तो !

तुम्हीं एकलकोंडे जर असलां तर माझ्यामुळें तुमचा किती फायदा होतो ! तुमची ही वृत्ति मी क्षणांत घालवतों. ' कांहो किती वाजले ? ' असं विचारीत जो तो तुमच्याशीं ओळख करून घेतो. तुम्हीं मला हातांत बांधलं असलं तर मात्र तुमचा मोठेपणा कांहीं विचारायला नको ! ' काहो किती वाजले ? ' असं कुणीं विचारायचा अवकाश कीं, दोन्ही कोटाच्या बाह्या सावरून, कॉलर थोडीशी वर करून, हात वेडावांकडा करून मनगटा-कडे पहात, तोंडाच्या एका कोपऱ्यांतून सिगारेटचीं धूम्रवलयें सोडीत ' आठ वाजले ' असें किती ठेक्यांत सांगतां ! हा अभिमान माझ्याच जिवावर ना !

माझा इतका उपयोग असूनसुद्धां तुम्हीं माझ्याकडे द्यावें तसें लक्ष देत नाहीं ! चोवीस तास सतत काम करणारा मजूर तुम्हांला केव्हांतरी मिळणें शक्य आहे का ? बरं माझी किंमत तरी किती थोडी असते ! एवढ्याशा स्वार्थत्यागानें आयुष्यांत नियमितपणाचें वर्तन साध्य करतां येत असूनहि तुम्हीं तिकडे लक्ष देत नाहीं ! माझे किती हाल करतां तुम्ही ! कधीं टांगून ठेवतां तर कधीं खिशामध्यें मुस्कटदाबी करून ठेवतां ! सगळ्यांत मला जर कुणाचा राग येत असेल तर मला हातांत बांधून ठेवणाऱ्याचा ! अगदीं

बिलकुल सोडीत नाहींत बुवा ! पण त्यांत माझाहि फायदा होतो म्हणा ! तुमच्याबरोबर मलाहि खूप फिरायला मिळतं ! एकाच गोष्टीचं मला वाईट वाटतं; तें म्हणजे माझ्या प्राणप्रिय जन्मभूमीचें दर्शन शेवटच्या क्षणींसुद्धां मला होत नाहीं. जन्म स्वित्झर्लंडसारख्या देशांत आणि मृत्यु दुसऱ्या देशांत ! पण ह्या त्यागांतहि मला आनंदच वाटेल ! पण केव्हां ? तुम्हीं जेव्हां नियमित वागावयास शिकाल तेव्हां ! सेकंदासेकंदांना मी टाहो फोडून सांगत आहें कीं, ' आला क्षण ! गेला क्षण ! ! '

---

## ५८ : : निवडणुकीचा दिवस

लोकशाहीच्या काळांत समाजांतील सार्वजनिक उत्सवांत आणखी एका उत्सवाची भर पडली आहे. तो उत्सव म्हणजे निवडणूक !

निवडणुकीच्या दिवशीं जी धांदल, जो उत्साह, वगैरे दिसून येतो तो कांहीं अपूर्वच ! हा उत्साह निवडणुकीच्या आरंभापेक्षां शेवटीं शेवटीं जास्त वाढत जातो.

निवडणुकीस उभे राहणारे उमेदवार जाहीर झाल्यानंतर प्रत्येक उमेदवार स्वतः व तो ज्या पक्षाचा, पंथाचा असेल त्या पंथातर्फे प्रचारकार्यास सुरवात होते. या प्रचारकार्यांत मतदारांच्या मतांच्या परिवर्तनापेक्षां प्रचारकार्याचें कौशल्यच्च जास्त दिसून येतें. दोन पक्षांमध्यें तीव्र मतभेद असल्यास मतप्रचारार्थ होणाऱ्या सभांत वक्तृत्व कलेचे अनेक नमुने पहावयास सांपडतात. मतदार व अवांतर श्रोते ते नमुने मोठ्या कौतुकानें पहात असतात. प्रत्येक पंथ, आपला उमेदवार हाच जनतेचा खरा प्रतिनिधि, आपला पंथ हाच लोककल्याणाचा एकमेव पंथ, आपलीं मतें हींच खरीं मतें इत्यादि गोष्टी मोठ्या आवेशानें सांगत असतो. जाहीर सभांप्रमाणेंच पत्रकें, वृत्तपत्रें हींहि उपयोगांत आणलीं जातात.

निवडणुकीचा दिवस जसजसा जवळ येतो तसतसें प्रचारकार्य चौफेर मोठ्या वेगानें सुरू होतें. भिंतीवर व रस्त्याच्या मुख्य भागीं निरनिराळ्या

उमेदवारांचीं नांवें, मतपत्रिकेचे नमुने हीं मोठमोठ्या अक्षरांत छापून लाव-लेलीं असतात.

निवडणुकीचा दिवस उजाडतो. शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं मत-दानाच्या जागा उभारलेल्या असतात. त्या जागेस हळूहळू एखाद्या यात्रेचें स्वरूप येऊं लागतें. जसजसा दिवस वर येतो तसतसा हस्तपत्रकांचा नुसता पाऊस पडत असतो. निवडणुकीस उभा राहणारा प्रत्येक उमेदवार आपल्या मतदारास आपली योग्यता व लोकसेवेची उत्कट इच्छा विस्तरशः निरनिराळ्या मार्गानें पटवीत असतो.

दुपार उलटून गेल्यावर धांदल वाढत जाते. मतदारांच्या सुखसोयीसाठीं उमेदवारांच्या साहाय्यकांची अतिशय वणवण चालू असते. कोणी आपल्या मतदारांना मोटारी पाठवितो तर कोणी त्यांना मतदानाच्या ठिकाणीं चहा-काफी वगैरे देऊन संतुष्ट करतो. तर कोणी—! परंतु तें कोणींहि बोला-वयाचें नसतें; लिहिणें तर अशक्यच !

मतदारहि हळूहळू मोठे हुशार झाले आहेत. कित्येक मतदार आपले सर्व हक्क त्या दिवशीं वसूल करून घेतात आणि आपल्या हातीं केवढी मोठी सत्ता आहे याची जाणीव अनेक मार्गांनीं उमेदवारास देत असतात.

संध्याकाळचे ४।५ वाजत आले कीं, मोठा चुरशीचा क्षण जवळ येत असतो. मतदानाच्या जागीं गर्दी वाढत जाते. मतदानाच्या जागेचे व्यवस्थापक पोलिसांच्या साहाय्यानें व्यवस्था ठेवण्याची पराकाष्ठा करीत असतात. कांहीं ठिकाणीं तर मारामारीपर्यंत वेळ येते.

मतदान गुप्तमतदान-पद्धतीनें होत असल्यानें मतदारांना विनंति करूनहि उमेदवारास अतिशय चिंता वाटत असते; कारण कोणीं कोणास मत दिलें हें कळावयास मार्गच नसतो.

शेवटीं मतदानाची वेळ संपते आणि मतपत्रिकांच्या सीलबंद पेट्या मतदानाच्या जागेंतून बाहेर पडतात ! त्या पेट्या म्हणजे उमेदवारांचीं सीलबंद नशिबेंच होत ! किती आतुरतेनें, आशावादीपणानें ते त्या पेट्या-कडे पहात असतील ! आणि त्यांचे साहाय्यकहि किती कळकळीनें त्या पेट्यांतील मतपत्रिकांविषयीं विचार करीत असतील !

## ५९ : : जनसेवा हीच ईश्वरसेवा

' अबू बेन अडेम ' ही कविता सर्व विद्यार्थ्यांच्या अतिशय परिचयाची आहे. अबू आपला सर्वकाळ जनसेवा करण्यांत घालवीत असे. त्याला परमेश्वराची पूजाअर्चा करण्यास वेळच नव्हता. भोंवतालचीं दुःखी माणसें पाहून, त्यांची सेवा करून त्यांचीं दुःखें कमी करण्यासाठीं तो अहोरात्र झटत असे. देवदूत ईश्वराच्या लाडक्या भक्तांची यादी करीत आहे हें कळल्यावर त्याला क्षणभर वाटलें, आपण त्या यादींत असूं कीं नाहीं ! परन्तु शेवटीं ईश्वराचें नामस्मरणहि करण्यास ज्याला वेळ नव्हता असा तो अबू आद्य ईश्वरभक्त ठरला ! जनसेवा करणारा अबू ईश्वरसेवक ठरला यांत किती मोठें तत्त्व आहे !

जगापासून अलिप्त राहून, पूजाअर्चा, जपजाप्य इत्यादि करीत परमेश्वरास संतुष्ट करणाऱ्या माणसांपेक्षां परमेश्वरास अबूसारखीं माणसेंच प्रिय होतात. आपण निर्माण केलेल्या जगावर प्रेम करणाऱ्या व त्या जगाच्या कल्याणासाठीं झटणाऱ्या माणसाबद्दल परमेश्वरासहि आदर वाटतो ! जगाचा तिरस्कार, संसाराचा तिटकारा, जन्म घ्यावा लागल्याबद्दल विषाद, जीविताविषयीं अत्यंत औदासिन्य हीं अप्रत्यक्षपणें परमेश्वराचीच निंदा आहे. जग उत्पन्न करतांना परमेश्वरानें तें माणसांच्या, आपल्या लाडक्या पुत्रांच्या—सौख्यासाठीं उत्पन्न केलें आहे. त्याच्या ' लेकरांनीं ' या जगांत राहून आनंदी व्हावें असाच त्याचा हेतु आहे. मानवी प्राण्याच्या सुखासाठीं त्यानें कितीतरी सुखसोयी करून ठेवल्या आहेत. त्यांचा आपल्या बुद्धिमत्तेनें उपभोग घ्यावा हीच परमेश्वराची इच्छा आहे. जगापासून पळून जाण्यासाठीं आपण जन्मास आलों नाहीं. परन्तु सामान्य लोकांना हा जीवितहेतु कळत नाहीं. त्यांतले कांहीं जीविताशीं बेफिकीर राहतात, कांहीं उदासीन राहतात, कांहीं बेभानपणें अरेरावासारखे वागतात. जीवित ही एक देणगी आहे आणि ती स्वीकारण्याची आपली योग्यता आपण पटविणें हें आपलें कर्तव्य आहे हें ज्ञान जनसेवक देतात.

दीनदुबळ्यांना साहाय्य करून मार्ग दाखवितांना जनसेवकांना अरेरावांकडून होणारा छळहि सहन करावा लागतो. परन्तु आपल्या सेवेमुळें इतरांचें जीवन आनंदी होत आहे हें पाहिल्यावर जनसेवकास कसल्याहि संकटाची वा छळाची पर्वा वाटत नाहीं. इतरांना जीं दुःखें आणि यातना वाटतात त्यांतूनच जनसेवकास सेवेचें समाधान मिळत असतें. परमेश्वरास अन्यायाची चीड आहे. परमेश्वर न्यायी आहे, दयाळू आहे, हें त्यांना पटलेलें असतें म्हणून जगांत अन्यायाविरुद्ध लढून न्याय प्रस्थापित करणें हें ईश्वराचेंच कार्य आहे, हें कर्तव्य आहे, अशी त्यांची वृत्ति असते. ते सेवेचें व्रत स्वीकारतांना कर्तव्यबुद्धीनें स्वीकारतात. इतरांचीं दुःखें पाहून त्यांना दुःख होतें, इतर सुखी झाल्याखेरीज त्यांना सुखी होतांच येत नाहीं. किंबहुना इतरांचें सुख हेंच त्यांचें सुख असतें म्हणून ते जनसेवेचें व्रत घेतात.

समाजसुधारणेसाठीं अहोरात्र तळमळत स्वतःच्या जीविताचीहि पर्वा न करणारे, रोग्यांची शुश्रूषा करतां करतां स्वतः त्या रोगाच्या भक्ष्यस्थानीं पडणारे, रोग्यांचीं दुःखें कमी करणारीं औषधें शोधतांना स्वतःचा जीव पदोपदीं धोक्यांत घालणारे, निरपराध्यांचें अन्यायापासून रक्षण करतांना अरेरावांचे प्रहार आपल्या अंगावर घेणारे, आपलें सर्व सामर्थ्य जास्तींत जास्त लोकांच्या साहाय्यास पुरवितांना कोणत्याहि काबाडकष्टाची, श्रमाची क्षिति न बाळगणारे, फार काय ज्यांची सेवा करावयाची त्यांच्याचकडून कृतज्ञता तर राहोच परन्तु निंदाप्रहारच मिळतात हें अनुभवास येत असूनहि सेवेचें व्रत अविरतपणें करणारे हे नुसते जनसेवकच नव्हेत, ईश्वरसेवकच नव्हेत, तर प्रत्यक्ष ईश्वराचेच अवतार आहेत.

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

हें लिहिणारा तुकाराम पुष्कळसा ईश्वरसेवकच होता, परन्तु त्यानें वर केलेलें वर्णन हें मात्र जनसेवकाचें वर्णन आहे. असे जनसेवक ईश्वरसेवकापेक्षांहि श्रेष्ठ आहेत. त्यांनीं आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून भोंवतालच्या लोकांच्या

जीवनांत जास्तीत जास्त आनंद उत्पन्न करण्यासाठीं सर्व जन्म खर्च केला. भक्तांच्या रक्षणासाठीं आणि जगाच्या उद्धारासाठीं परमेश्वर स्वतः कधीं कधीं अवतार घेतो. परन्तु त्याचें कार्य अहोरात्र करणारे जनसेवक हे परमेश्वरापेक्षांहि श्रेष्ठ नाहींत का ? ते दयाघन प्रभूची दया जगास पोहोंचवतात आणि दुष्टांचें निर्दालन करणाऱ्या ईश्वरी सामर्थ्याची जाणीव दुष्टांना देतात.

यावरून जनसेवा हीच ईश्वरसेवा हें तर खरेंच, परंतु जनसेवा ईश्वर-सेवेपेक्षांहि श्रेष्ठ आहे हें जास्त खरें आहे.

---

## ६० : : मातृभाषेची सेवा

आपापल्या प्रांतांत वावरत असतां आपले विचार आपल्या भाषेंत आपणांस जितक्या स्पष्टपणें मांडतां येतात तितक्या स्पष्टपणें ते परकी भाषेंत मांडतां येत नाहींत. ' आई ' या शब्दांतील जादू, गोडी आणि उत्कट भावना ' मदर ' या शब्दांत आपणांस आढळून येत नाहीं. मातृभाषा ही हृदयाची हांक आहे; ती हृदयासच जाऊन भिडते. एका उत्कृष्ट इंग्रजी भाषण करणाऱ्या प्रख्यात महाराष्ट्रीय वक्त्याची एक गोष्ट सांगतात. तो परदेशाहून परत आल्यावर जमलेल्या मित्रमंडळीस उद्देशून म्हणाला, " आतां मराठी बोला बुवा ! इंग्रजीचा अगदीं कंटाळा आला आहे. " आणि तो सारखा मराठी भाषेंत बोलूं लागला. यावरून हृदयांतील विचार मातृभाषेंत किती सुलभतेनें स्पष्ट करतां येतात तें समजून येईल. आपण जर दक्षिणेकडे कानडी प्रांतांत गेलों किंवा उत्तरेकडे हिंदी प्रांतांत गेलों, आणि तिथें जर एखादाच आपली मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्रीय मनुष्य भेटला तर आपणांस कितीतरी आनंद होतो !

हिंदुस्थान हें जितराष्ट्र आहे. आपण पारतंत्र्यांत असल्यामुळें आपल्या भाषेची अवहेलना होत आहे. जितराष्ट्र आपल्या ताब्यांत पूर्णपणें आण-ण्यास विजयी राष्ट्राची भाषा जितराष्ट्रावर बळजबरीनें लादणें हें एक

प्रमुख साधन असतें. स्वभाषेचा नाश स्वसंस्कृतिनाशास कारणीभूत होतो व संस्कृतिनाश स्वधर्माचा नाश करतो. धर्मनाश झाला म्हणजे जितराष्ट्र विजयी राष्ट्राच्या पूर्णपणें अंकित होतें. मातृभाषेकडे दुर्लक्ष झाल्याचे केवढे हे दुष्परिणाम !

ख्रिश्चन् मिशनरी व आपले सुशिक्षित आपल्या मातृभाषेचे हवेतसे धिंडवडे काढीत आहेत. ' टुमी, टुमी ' करीत मिशनरी लोक स्वधर्माचा प्रसार करीत आहेत. इंग्रजी शिक्षणाच्या योगानें अलीकडील उदयोन्मुख लेखक-वर्गहि इंग्रजी छापाची भाषा योजीत आहे. घरांत सुद्धां ' मदर, सिस्टर ' याशिवाय त्यांना सुचतच नाहीं. आमचा टांगेवाला ' सिंगल कोप ' म्हणण्यांत पुरुषार्थ मानतो. तरुण विद्यार्थ्यांचे खिसे ' थँक्स् ' ' सॉरी ' ' गुड मॉर्निंग ' यांनीं भरलेले आहेत. भाषेची ही अवहेलना विष्णुशा-स्त्र्यांसारख्या भाषाभिमान्यांना पाहवली नाहीं आणि म्हणूनच त्यांनीं निबंधमालेंतून मातृभाषेची सेवा केली.

ज्ञानेश्वर, एकनाथांसारख्या संतांनीं, शिवशाहींत रामदासांनीं व शाहू-शाहींत अनेक कर्मवीरांनीं मातृभाषेची सेवा केली. आधुनिक कालांत विष्णुशास्त्री, आगरकर, केळकर, परांजपे, गडकरी इत्यादि थोर आधार-स्तंभ मातृभाषेच्या वाढीस कारणीभूत झाले. इंग्रजीच्या तोडीच्या कादं-बऱ्या आपल्या भाषेंतहि लिहितां येतात हें ह. ना. आपटे यांनीं सिद्ध केलें. इंग्रजीच्या तोलाच्या लघुकथा आपणांसही लिहतां येतात हें य. गो. जोशी यांनीं दाखविलें. दिवाकरांच्या उत्कृष्ट नाट्यछटा, खांडेकरांच्या हृदयस्पर्शी कादंबऱ्या, गडकऱ्यांचीं नाटकें हीं भाषादेवतेच्या कंठांतील सुमनहारच नाहींत कां ?

पटवर्धन, सावरकर या थोर गृहस्थांनीं तर मातृभाषेची सेवा उत्कृष्ट रीतीनें केलेली आहे. ' आपल्या भाषेंत योग्य शब्दच नाहींत. आपली भाषा भिकार आहे ' असा आत्मलघुत्वाचा शिक्का जे लोक मारून घेतात त्यांच्या डोळ्यांत, सावरकरादि मातृभाषेच्या सेवकांची कामगिरी, हें एक प्रकारचें अंजन आहे. यानें सुशिक्षितांचे डोळे उघडले व त्यांनाहि भाषेचें महत्त्व कळूं लागलें. मातृभाषेची सेवा करणें, भाषेची वाढ करणें, परकीय

शब्दांची हकालपट्टी करणें, ग्रंथनिर्मितीस मदत करणें हें प्रत्येक सुशिक्षित म्हणविणाऱ्याचें पवित्र कर्तव्य आहे. माधवराव पटवर्धन आपल्या 'मायबोली' या कवितेंत म्हणतात—

'हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं, वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं ही!
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापें, हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं।

---

## ६१ : : आदर्श पुढारी

सामान्य जनतेला कल्याणाचा मार्ग दाखवून त्या ठिकाणीं घेऊन जाण्याचें कार्य करणाऱ्यास आपला पुढारी म्हणून लोक मान्यता देतात. सार्वजनिक कार्यकर्त्यास जनतेनें दिलेलें मानपत्र म्हणजे पुढारी हें पद होय. 'मी तुमचा पुढारी आहें' असें म्हणून कोणी पुढारी ठरत नाहीं. 'मी तुमचा सेवक आहें' अशीच स्वतः पुढाऱ्याची भूमिका असते. परंतु सेवक आणि पुढारी यांत एक महत्त्वाचा फरक आहे. जनतेची प्राप्त परिस्थिति सुखकारक करणें हें सेवकाचें कर्तव्य आहे. अशा कर्तव्यांत विरोधाचे फारसे प्रसंग येत नाहींत. सेवकांस लोकांचें एखादें कृत्य चुकीचें वाटलें तर तो तें नम्रपणें उपदेशकाच्या भूमिकेवरून सांगेल. एखादा जास्त कल्याणाचा मार्ग त्यास दिसला तर त्या मार्गाची महति तो वर्णन करून सांगेल.

परंतु पुढारी एवढेंच करून स्वस्थ बसत नाहीं. तो स्वतः पुढें होऊन लोकांना सांगतो कीं, "हा मार्ग आहे. या मार्गानें या." पुढाऱ्याची दृष्टि समाजाच्या भवितव्यावर खिळलेली असते. तें भवितव्य हें त्याचें आवडतें स्वप्न असतें. तें स्वप्न, आपल्या समाजाचें, देशाचें तें उज्ज्वल भवितव्य, प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभें करण्यासाठीं तो आपलें शक्तिसर्वस्व खर्च करतो. तो आपल्या दिव्य दृष्टीनें पाहूं शकतो. तें पाहण्याचें इतरांस सामर्थ्य नसतें, त्यामुळें त्या भवितव्याविषयीं श्रद्धा उत्पन्न करणें, तें प्राप्त करून घेण्याविषयीं दृढ आशा उत्पन्न करणें हें आदर्श पुढाऱ्याचें मुख्य कर्तव्य असतें. आपल्या अनुयायांवर तो हुकूमशाही गाजवीत नाहीं.

त्यांच्यांत तो श्रद्धा उत्पन्न करतो, आपल्याविषयीं विश्वास उत्पन्न करतो आणि अशा रीतीनें अतुल नैतिक बलाच्या जोरावर तो प्रचंड लोकसमूह आपल्यामागें खेंचून आणतो.

शिवाजीनें आपलें स्वराज्याचें स्वप्न आपल्या अनुयायांच्या मनावर बिंबविलें आणि तें सत्यसृष्टींत उतरून दाखविलें. लो. टिळकांनीं राजकीय हक्क संपादनाची चळवळ करतांना अशाच नैतिक बलाच्या जोरावर राष्ट्रांत आत्मसामर्थ्य उत्पन्न केलें. महात्मा गांधींनीं तीच परंपरा पुढें चालवून हिंदुस्थानला जगांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. राजकीय सुधारणे-प्रमाणें, सामाजिक सुधारणेंतहि महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनीं सुधारणांची आवश्यकता आणि हितावहता स्वतःच्या उदाहरणानें पटवून दिली आणि स्त्रीस्वातंत्र्याचा मार्ग खुला केला.

वरील थोर गृहस्थांविषयीं जनतेनें मुक्तकंठानें, स्वयंस्फूर्तीनें अशी घोषणा केली कीं, हे आमचे पुढारी आहेत. ही योग्यता मिळवितांना पुढाऱ्यांच्या जीवनांत कसोटीचे प्रसंग पदोपदीं येतात. एखाद्या कार्याचें नेतृत्व अंगीं घेतल्यावर नेत्याच्या जीवनावर हजारों लोकांचा खडा पहारा असतो. तो जो उपदेश करतो त्याप्रमाणें स्वतः आचरण करूं लागण्यापूर्वी तो स्वतः तो उपदेश पाळतो कीं नाहीं याकडे लोकांचें लक्ष असतें. आणि त्यांत त्यांना थोडीशी जरी विसंगति दिसून आली तरी ते त्या उपदेशकाला खालीं खेचल्याखेरीज राहत नाहींत. आदर्श पुढारी या आचरणाच्या कसोटीस नेहमीं सिद्ध असतो.

लोकप्रियता प्राप्त झाली असतां अनेक मोहाचे प्रसंग प्राप्त होतात. पैसा, कीर्ति, सुख यांचे अनेक प्रसंग लोक आदरानें पुढाऱ्याच्या भोंवतीं उत्पन्न करतात. परंतु त्या प्रसंगीं पुढाऱ्यास आपली निःस्वार्थी बुद्धि खंबीर ठेवा-वयाची असते. त्यानें थोडासा जरी लोभ दाखवला, थोडासा जरी स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला तरी तो स्थानभ्रष्ट होतो. आदर्श पुढाऱ्यास प्रथम आपल्या वैयक्तिक जीवनाचा असा होम करावा लागतो.

लोकांस विशिष्ट मार्गानें नेत असतां अनुयायांशीं तीव्र मतभेदाचे प्रसंग पुढाऱ्यांच्या जीवनांत उत्पन्न होतात. त्यांचीं कांहीं मतें लोकांस पटत

नाहींत. त्या मतांतील त्यांचा दृष्टिकोन लोकांच्या आटोक्याबाहेर असतो. पुढाऱ्यास असें वाटूं लागतें कीं, मी बरोबर आंहें कीं लोक बरोबर आहेत! मी चुकत तर नसेन? अशा प्रसंगीं आपली तत्त्वनिष्ठा अढळ ठेवणें, अनुयायांनीं बहिष्कृत केलें तरी आपणांस पटलेल्या सत्याचा आग्रह कायम ठेवणें हें आदर्श पुढाऱ्याचें असिधाराव्रत होय. या व्रताचें आचरण करतां करतां त्यास प्राणाचेंहि मोल द्यावें लागतें. 'तत्वाचरण करतांना माझा अंत झाला तरी माझीं मतें आज ना उद्यां विजयी ठरल्याखेरीज राहणार नाहींत' अशा श्रद्धेनें पुढारी शांतपणें आत्मदान करतो.

अशा रीतीनें आदर्श पुढाऱ्यांचें जीवन स्वयंप्रेरणेनें पत्करलेलें आत्मदानाचें व्रत आहे. तत्त्वनिष्ठा हेंच त्याचें सामर्थ्य असतें. आमरण तत्त्वनिष्ठा हीच त्याच्या जीवनाची फलश्रुति असते. आपल्या उदाहरणानें तो मानवी जीवनाचा एक आदर्श जगापुढें उभा करतो. हे आदर्श हे जगाचे मार्गदर्शक आहेत. ते अमर आहेत. ते चिरस्मरणीय आहेत. भवसमुद्रावरील ते स्वयंप्रकाशी दीपस्तंभ आहेत.

---

## ६२ : : : आदर्श गृह

एखादा शेतकरी आपल्या झोपडीकडे जात असतां कांहीं वेळानें झोपडी दिसूं लागली कीं, आनंदानें मनांत म्हणतो, 'तें पहा माझें घर'.

एखादा लक्षाधीश आपल्या ओळखीच्या एखाद्या परिचिताला मोटारींतून नेत असतां कांहीं वेळानें एखाद्या टोलेजंग प्रासादाकडे पाहून सांगतो, 'तें पाहिलेंत का आमचें घर! तें तीन मजली—वर गच्ची असलेलें—तें आमचें घर.'

झोपडी हेंहि घर आणि राजवाडा हेंहि घरच! यावरून घराचें घरपण हें बाह्य स्वरूपावर, दगडाविटांवर, लहानमोठ्या उंचीवर, कमजास्त विस्तारावर, कमजास्त सुखसोयींवर अवलंबून नसतें. घराचें घरपण घरांतील माणसांवर अवलंबून असतें. 'आपलें घर' ही भावना ज्या स्थानाबद्दल तयार होते तें ज्याचें त्याचें घर; मग तें झोपडी असो नाहींतर राजवाडा असो.

घर ही भावना आहे, वस्तु नाहीं, असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल. ही भावना उत्पन्न झालेली नसेल तर चार भिंतींच्या आश्रयानें कांहीं रक्तामांसानें जोडलेलीं माणसें कितीहि वर्षे एकत्र राहिलीं, त्यांना कितीहि ऐषआराम मिळाले, त्या चार भिंती वाटेल तितक्या शृंगारलेल्या असल्या तरी तें घर नाहीं आणि आदर्श-गृह तर नाहींच नाहीं.

आदर्श गृहांत वर सांगितलेली आपलेपणाची भावना त्या गृहाशीं संबंध असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेली असते. त्यांतील एखादी व्यक्ति प्रत्यक्ष त्या जागेपासून हजारों मैल दूर असली तरी तें 'माझें घर' आहे या भावनेनें तो त्या घराशीं जोडलेलाच असतो. लहान बालकापासून वयोवृद्धापर्यंत ज्या ठिकाणीं सर्वांचीं अंतकरणें एकत्र बांधलेलीं असतात त्या ठिकाणास ' आदर्श गृह ' म्हणतात.

ही भावना कां उत्पन्न होते ? कशी उत्पन्न होते ? एक तर आदर्श गृह हें सर्वांच्या विश्रांतीचें स्थान असतें. आदर्श गृहांत आलेल्या माणसाला आपण आपल्या विश्रांतिस्थानास आलेलों आहोंत असें वाटतें. सर्व जगाचा विसर पडून सर्व दगदगीचा शीण जाऊन जेथें पूर्ण स्वास्थ्य मिळतें तें आदर्श गृह. तेथें प्रत्येक जण प्रत्येकाच्या सुखसोयीसाठीं झटत असतो; एकाच्या डोळ्यांत पाणी आलें कीं, सर्वांचे डोळे पाण्यानें भरून येतात आणि एकाच्या तोंडावर हंसूं चमकलें कीं, सर्वांचीं अंतःकरणें खुलूं लागतात. आदर्श गृहांतील प्रत्येक व्यक्ति दुसऱ्यासाठीं श्रम करण्यांत आनंद मानते. दुसऱ्याच्या सुखासाटीं वाटेल तितकीं दुःखें भोगण्यांत प्रत्येकास सुख वाटतें. दुःख वाटून घेऊन सुख वाढविण्याची एक अहमहमिका आदर्श गृहांत सुरू असते.

आदर्श गृहांतील मुलांना वडील माणसांविषयीं स्वयंस्फूर्त आदर वाटत असतो. त्यांना हें अनुभवानें कळूं लागतें कीं, हीं वडील माणसें आपल्या सुखासाठीं जिवाचें रान करीत आहेत, माझ्या अनंत अपराधांबद्दल मला हे क्षमा करीत आहेत, हजारों चुकांपासून माझें हे रक्षण करीत आहेत, पदोपदीं मला हे मार्ग दाखवीत आहेत. चुकीचें प्रायश्चित्त न मिळतां शहाणपण मिळण्याची एकच जागा म्हणजे घर. आदर्श गृह हा क्षमेचा सागर,

ज्ञानाचें आगर, मायेचें माहेर, आणि सुखाचें साम्राज्य आहे. हें पृथ्वीवरचें नंदनवन वृद्धांच्या आशिर्वादानें आणि तरुणांच्या कर्तृत्वानें उभारलेलें असतें. आदर्श गृहांतील वृद्ध आपल्या पोरांबाळांविषयीं अशी भावना बाळगतात कीं, हीं आम्हीं लावलेलीं सुंदर रोपें आहेत. आम्ही यांना खतपाणी घालून त्यांना बहर आणूं आणि घराचें नंदनवन करूं. आपल्या प्रत्येक कृतीचें आपलीं पोरेंबाळें अनुकरण करतात याची जाणीव आदर्श गृहांतील वडील मंडळींना असते. त्यामुळें प्रत्येक आचार, विचार आणि उपचार करतांना त्याचा आपल्या मुलांबाळांवर काय परिणाम होईल याचा ते आधीं विचार करतात. भावी आयुष्यांत उपयोगीं पडणाऱ्या गुणांचें बीजारोपण तरुणांच्या ठिकाणीं आदर्श गृहांतील आईबाप आणि इतर वडील मंडळी करीत असतात. तेथें मूर्ख आणि बुद्धिमान् यांना सारखेंच संरक्षण मिळतें. कारण बौद्धिक फरकामुळें अंतःकरणाचा जिव्हाळा बदलत नाहीं. कर्तृत्वाचें कौतुक हें जगांतील केवढ्याहि पारितोषिकापेक्षां मूल्यवानच आहे. तें कौतुक आदर्श गृहांतच मिळतें. तेथें लहानसाहि गुण पर्वताएवढा वाटतो आणि डोंगराएवढे अपराध व दोष वितळून जातात. तेथील शासनांत करडेपणा असतो, पण क्रौर्य नसतें आणि उत्तेजनांत प्रेम असतें, परंतु पंगुपणा नसतो. आदराला भीतीचा धाक नसतो. प्रेमांत स्वार्थाची लाचारी नसते. तेथें कर्तव्य ही संवय असते. सेवा आणि हें सौख्य असतें !

आदर्श गृहाचें हें वैभव पैशावांचून अडत नाहीं आणि संपत्तीनें तें नासत नाहीं. त्या गृहांतील मीठभाकरीला अमृताची चव असते आणि प्रत्यक्ष अमृत असलें तरी त्याची लाचारी उत्पन्न होऊं शकत नाहीं. अशीं आदर्श गृहें ज्या समाजांत, ज्या देशांत आहेत तो समाज, तो देश, अमर आहे.

---

## ६३ : : लष्करी शिक्षण

आपल्या देशाविषयीं प्रत्येकास अभिमान असला पाहिजे असें आपण म्हणतों. देशप्रेम, देशभक्ति या गोष्टी कर्तव्यासारख्या आहेत असें सर्व जण

सांगतात. जननी आणि जन्मभूमि यांचीं स्तुतिस्तोत्रें हा अनादिकालापासून कवींचा आणि लेखकांचा मोठा आवडीचा विषय आहे. आणि देशाभिमानाचा विचार पूर्ण झाला कीं, लष्करी शिक्षण हा विचार त्यांत येतोच. देशाभिमानाच्या आवश्यकतेंतच लष्करी शिक्षणाचें महत्त्व सिद्ध होतें.

कारण ज्याचा आपण अभिमान बाळगतों, त्याचें रक्षण करण्याचें सामर्थ्य आपल्या ठिकाणीं नसेल तर तो अभिमान फुकट आहे. ज्याला मी वंदनीय मानतों, जें मी प्राणांपेक्षां प्रिय मानतों त्याच्यावर जर कोणी आक्रमण करीत असेल, तें कोणी लुबाडीत असेल आणि मी मात्र त्याला प्रतिकार करण्यास असमर्थ असेन तर मला त्या वंदनीय, प्राणांहून प्रिय गोष्टीचा अभिमान बाळगण्याचा कांहींहि अधिकार नाहीं. त्या वंदनीय गोष्टीस वंदन करण्याची सुद्धां माझी लायकी नाहीं.

आपल्या देशाचें रक्षण करण्याचें सामर्थ्य आपल्या ठिकाणीं असलें पाहिजे. साम्राज्य जिंकण्यापेक्षां साम्राज्य टिकवणें जास्त अवघड असतें. हें टिकविण्याचें कार्य करण्याचें सामर्थ्य अंगीं आणण्यासाठीं देशांतील प्रत्येक नागरिकास लष्करी शिक्षण आवश्यक आहे.

इतर शास्त्रांप्रमाणेंच देशरक्षण हें सुद्धां एक शास्त्र आहे आणि तें शिक्षणाखेरीज येत नाहीं. नुसतें मनुष्यसंख्याबल हें रक्षणाच्या कामीं उपयोगीं पडत नाहीं. चीन व हिंदुस्थान हे देश लोकसंख्येनें सर्वश्रेष्ठ आहेत. परन्तु आज वीतभर विस्ताराच्या देशांतील मूठभर लोक त्यांच्यावर शेंकडों वर्षें सत्ता गाजवीत आहेत, तें पुष्कळसें लष्करी सामर्थ्याच्या शिक्षणाच्या जोरावर !

लष्करी शिक्षणांत युद्धशास्त्र हाच मुख्य विषय असतो. जगांतील युद्धशास्त्र क्षणोक्षणीं पुढें चाललें आहे. गेल्या महायुद्धांतील हत्यारें या महायुद्धांत निकामी ठरलीं आहेत. गेल्या महायुद्धांतील युद्धशास्त्र आज निकामी ठरलें आहे. लष्करी शिक्षणांत युद्धशास्त्राचें अद्ययावत् शिक्षण हें महत्त्वाचें असतें. जगांत बॉम्बस् आणि टारपेडो यांचा धुमधडाका चालू असतां एखाद्या देशांत लष्करी शिक्षण म्हणून लाठी-बोथाटीचे हात आणि

अवजड बंदुकांची नेमबाजी चालू असेल तर त्या लष्करी शिक्षणाचा रक्षणाच्या कामीं कांहीं उपयोग होणार नाहीं.

हिंदुस्थानांत लष्करी शिक्षणाची कांहींहि प्रगति नसल्यानें एवढ्या अफाट लोकसंख्येचें रक्षण हें सरकारला अवजड ओझें झालें आहे आणि सरकार आतां हिंदी लोकांना आत्मरक्षणासाठीं समर्थ करण्यासाठीं थोडीफार हालचाल करीत आहे !

लष्करी शिक्षणाचा फक्त रणभूमीवर उपयोग होतो असें नाहीं. लष्करी शिक्षणानें असे किती तरी गुण अंगीं येतात कीं, ते चालू जीवितयुद्धांतहि उपयोगी पडतात. शिस्त या गुणाचें महत्त्व आपल्या दररोजच्या व्यवहारांत पदोपदीं पटतें. शिस्त हा तर लष्करी शिक्षणाचा पाया आहे. लष्करी शिक्षणानें मनुष्य आपल्या स्वतःविषयींचा अहंभाव विसरतो. देशाच्या सामर्थ्याचा एक अंशभाग एवढीच माझी किंमत आहे हें त्यास कळतें. कर्तव्यबुद्धीचा परमोत्कर्ष सैनिकाच्या जीवनांत आपणांस दिसून येतो. वाटेल त्या आपल्या प्राणार्पणाची तयारी ठेवून सैनिकास पाऊल टाकावें लागतें. त्या वेळीं आल्या प्राणदानाचें चीज होईल कीं नाहीं, कोणी त्याचें कौतुक करील कीं नाहीं इत्यादि विचार त्याच्या मनांत येत नाहींत. 'मी माझ्या देशासाठीं प्राणार्पण करीत आहें' एवढा एकच विचार त्याच्या मनांत असतो. कित्येक प्रसंगीं केवळ अपघातामुळें किंवा सेनापतीच्या चुकीमुळेंहि त्यास प्राणांस मुकावें लागत असेल. परंतु खरा सैनिक त्याची खंत बाळगीत नाहीं. प्राणाहून मोलाचें कांहीं नाहीं आणि त्या अमोल गोष्टीचा त्याग करण्याचें धैर्य उत्पन्न होणें हें लष्करी शिक्षणाचें सार्थक आहे.

परंतु अव्यवस्थितपणें केलेलें प्राणार्पण हें आत्महत्येसारखें पाप आहे. प्राणार्पणामध्यें कांहीं निश्चित हेतु, पद्धति असली पाहिजे; यासाठीं लष्करी वृत्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. मूठभर मावळ्यांच्या जोरावर मैल मैल पसरलेल्या मोगली छावण्यांची शिवाजीनें दैना उडवली, ती लष्करी शिक्षणाच्याच जोरावर. आपल्या सामर्थ्याचा जास्तींत जास्त चांगला विनियोग करणें हें शिक्षणाचें कार्य होय. या दृष्टीनें लष्करी शिक्षणाचें महत्त्व आहे. देशांतील प्रत्येक तरुण व्यक्ति ही देशाच्या सामर्थ्याचा घटक आहे. यासाठीं देशांतील प्रत्येक तरुणास लष्करी शिक्षण दिलें पाहिजे.

लष्करी शिक्षणानें सिद्ध असलेली तरुण पिढी ज्या देशाच्या चतुःसीमेवर उभी आहे त्या देशांतील जीवन अत्यंत शांत आणि सुखी झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्या देशाकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाहि अरेरावाची ताकद होणार नाहीं किंवा कोणताहि बंडखोर त्या देशांतील जीवनाचा शांतताभंग करूं शकणार नाहीं. लष्करी शिक्षणास मुकलेला देश कितीहि श्रीमंत, विद्वान्, तत्त्वज्ञानी असला तरी तें सर्व वैभव लष्करी सामर्थ्याच्या संरक्षणावांचून क्षणभंगुर आहे. तें माळावर उघडेंवाघडें पडलें आहे आणि तें केव्हां विध्वंस पावेल याचा नियम नाहीं. आज हिंदुस्थान अशा अत्यंत केविलवाण्या अवस्थेला आला आहे, याचें कारण देशांतील लष्करी सामर्थ्य नामशेष झालें आहे.

---

## ६४ : : : आधुनिक स्त्री

१९०० सालपर्यंत स्त्रियांना कायदेशीर अधिकार असे फारसे नव्हते असें स्त्रियांच्या कायदेशीर अधिकाराचा इतिहास सांगतो. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्रः देवताः' इत्यादि वर्णनें पुरातनकालापासून प्रसिद्ध आहेत. स्त्री ही देवता आहे, अशा अर्थाचीं वचनें अतिप्राचीन ग्रंथांतहि आहेत. तरी ही सगळी थोरवी वा योग्यता पुरुषवर्गाच्या मर्जीवर होती. स्त्री ही देवता आहे कीं आपल्या मार्गांतील धोंड आहे हें पुरुष आपापल्या सोयीप्रमाणें ठरवीत. कायद्यानें पुरुषांना स्त्री-जीवनावर अबाधित सत्ता दिलेली होती. गार्गी, मैत्रेयी, लक्ष्मीबाई, जिजाबाई, इत्यादि नांवें ही अपवादात्मक आहेत !

पाश्चात्य देशांत सार्वत्रिक ज्ञानप्रसार होऊन व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, इत्यादि तत्त्वें प्रस्थापित झालीं त्या वेळीं स्त्रीसमाजांतहि जागृति झाली. घराबाहेरचें जग त्यांना कळूं लागलें आणि त्यांनीं पुरुषवर्गाच्या अरेरावीस आळा घालण्याचें सामर्थ्य जमविण्यास सुरवात केली. पुरुषवर्गानें केलेले अन्याय मुकाट्यानें सहन करीत आणि दैवाला दोष देत बसण्याचें त्यांनीं सोडून दिलें आणि आपले हक्क प्रस्थापित करण्यास सुरवात केली.

आजच्या समाजांत स्त्रियांनीं आपलें सामाजिक महत्त्व पटविलें आहे. समाजांतील महत्त्वाच्या घडामोडींत स्त्रियांच्या कर्तबगारीचा बराच महत्त्वाचा भाग आहे. पुरुषांच्या बरोबरीनें वाटेल त्या कार्यक्षेत्रांत काम करण्यास सिद्ध होऊन आपल्या सहकार्याचें सामर्थ्य त्यांनीं जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. गेल्या महायुद्धांत पुरुष आघाडीवर गेल्यावर स्त्रियांनीं त्यांच्या सर्व क्षेत्रांतील जबाबदारी अंगावर घेऊन ती उत्तम प्रकारें पार पाडली आणि आजच्या महायुद्धांत तर स्त्री ही सैनिकाच्या तयारीनें शस्त्रास्त्रासह सिद्ध आहे. समाजासहि असें दिसून आलें कीं, आपण अहंभावानें आपल्या शेजारीं असलेली एवढी मोठी शक्ति वायां घालवीत होतों.

स्त्रियांच्या उद्धारासाठीं पुरुषांनीं ज्या चळवळी केल्या त्या पुष्कळशा दयावृत्तीनें केलेल्या होत्या. परंतु स्त्रियांनीं स्वतः आतां हक्कानें आपलें स्थान मिळविलें आहे. दया किंवा कींव म्हणून नव्हे, तर बरोबरीच्या हक्कानें त्या समाजांत प्रतिष्ठित होत आहेत. त्यांनीं आपले पुढारी निवडले, आपल्या संस्था स्थापन केल्या, संघ उभारले, चळवळी केल्या आणि पुरुषवर्गास सांगितलें कीं, आम्ही तुमचे सहकारी आहोंत, खुषमस्करे किंवा सेविका नाहीं. आज सुधारलेल्या देशांतील प्रत्येक व्यवसायक्षेत्रांत स्त्रिया आपली कर्तबगारी दाखवीत आहेत.

देशाच्या राज्यकारभारांत अतिशय जबाबदार जागेवरचीं कामें यशस्वीपणें पार पाडून राजकीय क्षेत्रांतहि स्त्रिया आपलें कर्तृत्व दाखवीत आहेत आणि सत्याग्रह-संग्रामांत त्यांनीं आपलें शौर्य जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशांतहि स्त्रियांनीं इतकें महत्व स्थापन केलें आहे ! रशिया, जर्मनी, इंग्लंड, जपान इत्यादि सुधारणाग्रणी देशांतील स्त्रियांचें कर्तृत्व तर याहिपेक्षां श्रेष्ठतर आहे. विजयालक्ष्मी पंडित यांनीं हिंदी स्त्रीचें कर्तृत्व त्या देशांतहि प्रगट केलें आहे.

घराबाहेरच्या जगाप्रमाणें घरांतील जगांतहि सुशिक्षित स्त्रियांनीं आपली योग्यता समाजाच्या प्रत्ययास आणून दिली आहे. देशांतील तरुण पिढी कर्तबगार करण्याचें कार्य सुशिक्षित माता यशस्वीपणें करूं शकते हें समाजास कळूं लागलें आहे.

स्त्रीपुरुषांतील नैसर्गिक भेदाचा बाऊ करून स्त्रियांना कोमल, दुबळ्या, विकारप्रधान, चंचल ठरविणाऱ्या पुरुषांना आतां स्त्रियांनीं लाजविलें आहे. आणि कोणच्याहि प्रकारचा अनैसर्गिकपणा येऊं न देतां आपण कर्तृत्व गाजवूं शकतों, हें त्यांनीं दाखविलें आहे.

दिवसेंदिवस जीवनाचे प्रश्न अत्यंत बिकट होत चालले आहेत. अशा स्थितींत आजची सुशिक्षित, कर्तबगार स्त्री पुरुषास धीर देऊन त्याच्या श्रमांत सहकार्य करून त्याचा उत्साह द्विगुणित करीत आहे.

आपल्या नैसर्गिक गुणांचें विकसन झाल्यामुळें त्यांनीं संसारांत अभिजात सौंदर्य आणलें आहे आणि पुरुषांच्या जीवनास जिवलग मित्राप्रमाणें साथ दिली आहे.

सहचारिणी, सहधर्मिणी इत्यादि विशेषणें इतके दिवस निरर्थक ठरत होतीं. त्या विशेषणांना आधुनिक स्त्रियांनीं सार्थकता आणली आहे.

---

## ६५ : मानवी जीवनांत गप्पागोष्टींचें महत्त्व

"गप्पा! आणि त्यांचें महत्त्व!! आणि तेंहि मानवी जीवनांत!!! कांहींतरी गप्पा मारतां झालं!" असें म्हणून कांहीं लोक नाकें मुरडतील. पण कोणत्याहि गोष्टीचा चांगला अगर वाईट उपयोग करून घेणें सर्वस्वीं आपल्या हातांत आहे. अग्नीचा उपयोग थंडीच्या दिवसांत शेकण्याकडेहि होतो. गप्पांसारख्या 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे.' ही थाप नव्हे हं! या गप्पा नव्हेत, एका कवीची सुंदर काव्यपंक्ति आहे.

दिवसभर काम करून दमून-भागून आलेल्या लोकांना तर गप्पा ही एक बिनखर्चाची नि सुंदर करमणूक आहे. गप्पा मारल्या म्हणजे त्यांचा शीण थोडासा कमी होतो. खेडेगांवांत, दिवसभर नांगर चालवून दमलेल्या शेतकऱ्यांच्या चावडींत आपण गप्पा नाहीं कां ऐकत? हातावर तंबाखू चोळत, गप्पा मारीत जातांना आपण कितीतरी मजूर संध्याकाळीं पाहतों. स्वयंपाकाचा व घरकामाचा शीण घालविण्याकरितां दुपारच्या वेळीं स्त्रिया गप्पा मारीत असलेल्या आपण पाहतों. अलीकडे विनोदाला जसें एक

प्रकारचें प्राधान्य येऊं लागलें आहे तसेंच गप्पांनाहि मानवी जीवनांत महत्त्व येऊं लागलें आहे.

गप्पांना मुद्देसूदपणा नसतो. गप्पांची गाडी लहर लागेल तिकडे वळते. कधीं राजकारण तर कधीं समाज, कोणतेहि विषय गप्पांना चालतात. दोन-चार विनोदी गप्पीदास, थोडासा रिकामा वेळ, आणि थोडीशीं रिकामीं माणसें, कोणतेंहि ठिकाण एवढी सामुग्री असली म्हणजे गप्पांची करमणूक होते. गप्पांना अमुकच ठिकाण पाहिजे, अमूकच वेळ पाहिजे असें नाहीं. फिरायच्या रस्त्यावर, थर्डक्लास वेटिंग रूममध्यें, आगगाडीच्या डब्यामध्यें, कुठेंहि, सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं, रात्रीं—केव्हांहि, तरुणांशीं, वृद्धांशीं, स्त्रियांशीं, मुलांशीं—कुणाशींहि गप्पा मारतां येतात.

विनाकारण माशा मारीत बसण्यापेक्षां गप्पा मारीत बसलेलें काय वाईट! गप्पा मारण्यांतहि एक कला आहे. दोन-चार तास अव्याहतपणें दोन-चार माणसांची करमणूक करणें हें कांहीं सोपें नाहीं. गप्पा मारून लोकांना आश्चर्यचकित करण्याची सुद्धां धमक असावी लागते! एक पाऊल पुढें टाकून असें म्हणतां येईल कीं, ज्याला चांगला लेखक व्हायचें असेल त्यानें तरी अवश्य गप्पा माराव्यात. लेखकांत आणि गप्पीदासांत फरक तो काय? गप्पीदास भाषणांत कल्पनेच्या भराऱ्या मारतो आणि यालाच नाहीं का आपण प्रतिभा म्हणत? गप्पा मारायला सुद्धां प्रतिभा असावी लागते. आणि असा प्रतिभावान् गप्पीदास एखाद्या लेखकाच्या उत्कृष्ट कादंबरी-प्रमाणें दुसऱ्याची दोनचार तास करमणूक करूं शकतो.

गप्पा म्हणजे जादूगाराची पोतडी. जादूगार जसा आपल्या पोतडींतून निरनिराळ्या वस्तू बाहेर काढतो तसेंच गप्पीदास आपल्या गप्पांतून निर-निराळे विषय काढीत असतो. नाना रंगाचे हातरुमाल ‘ उत्पन्न ’ करणारा जादूगार व क्षुल्लक गोष्टींतून राजकारण, सामाजिक न्याय-अन्याय इत्यादि गंमती दाखवणारा गप्पीदास यांत काय फरक आहे? गप्पांना अव्याप्ती-अतिव्याप्तीचा दोष नाहीं. अमुक एक विषय गप्पांना चालत नाहीं असें कधींहि व्हायचें नाहीं. कावळ्या-चिमणीच्या गोष्टीपासून अगदीं हिटलरच्या राजकारणापर्यंत सर्वांचा समावेश गप्पांत होतो.

गप्पा मारल्या म्हणजे एक प्रकारची मनास शांतता लाभते. उत्साह उत्पन्न होतो. मनमोकळेपणानें वागतां येतें. कुढेपणा जातो व मनुष्य आनंदी व हंसतमुख बनतो. नवीन नवीन ओळखी देखील होतात. मित्रांचें प्रेम संपादन करतां येतें.

'गप्पा' आणि कुटाळकी यांत मात्र फरक आहे. कोणाचीहि निंदा होणार नाहीं याची काळजी आपण घेणें अवश्य आहे. प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर, आगामी घडामोडींवर, चालू राजकारणावर बोलतांना गप्पा आणि कुटाळक्या यांतलें अंतर नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. ऐकणाऱ्यांचें मनोरंजन करण्यासाठीं कुटाळक्या, कुचेष्टा करण्याचा मोह होतो तो आपण आवरला पाहिजे. एवढी काळजी घेतली म्हणजे गप्पीदास हा जगन्मित्र ठरतो.

---

## ६६ : : : आपले सण

प्रत्येक समाजामध्यें सणांचा प्रघात आहे. अगदीं रानटी समाज जरी घेतला तरी त्यांतहि सण आहेतच. याचें कारण मनुष्य हा उत्सवप्रिय आहे आणि समाजप्रिय आहे. किंबहुना उत्सव हें त्याच्या समाजप्रियतेचें लक्षण आहे. आपल्याला कांहीं विशेष आनंद झाला तर तो आपल्या चार मित्रांस सांगितल्याखेरीज आपलें समाधान होत नाहीं. मित्रांनीं सुख दुणावतें, किंबहुना मित्रांच्या सहकार्याखेरीज सुखाचा उपभोग पूर्ण होतच नाहीं. वैयक्तिक जीवनांत कांहीं सुखाचे प्रसंग येतात ते आपण एकएकटे उपभोगतों. परंतु याखेरीज असेहि कांहीं दिवस असतात कीं, त्या वेळीं एकएकट्यानें आनंद उपभोगण्यापेक्षां चारचौघांनीं मिळून आनंद उपभोगावा अशी इच्छा होते. सणांची कल्पना अशा रीतीनें मनुष्य-स्वभावाशीं निगडित आहे.

धर्मशास्त्रकारांनीं माणसाची ही वृत्ति लक्षांत घेऊन त्या वृत्तीला चांगलें वळण देण्यासाठीं सणांची चालू जीवनाशीं सांगड घातली आहे. चारचौघांनीं मिळून आनंदित व्हावयाचें ही इच्छा प्रत्येकास असतेच, परंतु त्या जमण्यास कांहीं कारण पाहिजेच. नाहींतर कोणच्या निमित्तानें एकत्र

जमावयाचें ही एक मोठी अडचणच आहे! ती अडचण धर्मशास्त्रकारांनीं सण प्रस्थापित करून दूर केली आहे.

हिंदुधर्मापुरता विचार केला तरी असें दिसून येईल कीं, प्रत्येक सण हा कोणच्या तरी पुराणकालीन थोर व्यक्तीचा किंवा त्या व्यक्तीच्या एखाद्या महत्कृत्याचा स्मृतिदिन असतो. हिंदुधर्मांतील प्रत्येक सणाच्या मागें कांहीं तरी असा इतिहास आहेच. प्रत्येक सणाची कांहीं तरी कथा आहे. आणि या कथेंत दुर्जनांचा नाश आणि त्यामुळें जगाच्या आनंदांत पडलेली भर या गोष्टी प्रामुख्यानें सांगितलेल्या असतात.

नृसिंहजयंति, विजयादशमी, नरकचतुर्दशी इत्यादि सण हे त्या त्या देवतांनीं दुर्जनांचा संहार करून जगांत शांतता प्रस्थापित केलेल्या प्रसंगांची स्मृति करून देणारे आहेत. त्याप्रमाणेंच रामनवमी, हनुमानजयंति, परशुरामजयंति, कृष्णजयंति, दत्तजयंति इत्यादि सण हे पौराणिक कालांतील जगद्वंद्य महात्म्यांच्या चारित्रांची आठवण करून देणारे आहेत. या महात्म्यांच्या संस्मरणीय नामावलींत रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर इत्यादि साधुसंत; शिवाजी, तानाजी, बाजीराव, बापू गोखले, सवाई माधवराव, संभाजीमहाराज इत्यादि ऐतिहासिक थोर पुरुषांच्याहि स्मृतिदिनाची भर पडली आहे.

अशा रीतीनें सण हे सत्कृत्यांचे स्मृतिदिन आहेत. सणांच्या पाठीमागें समाजाचें एकीकरण ही एक दृष्टि आहे. गणेशोत्सव, शिवजयंति इत्यादि उत्सवांना चालना देण्यांत लोकमान्य टिळकांनीं ही एकीकरणाची दृष्टि प्रामुख्यानें ठेविली होती. आणि त्याप्रमाणें या दोन उत्सवांचा सामाजिक एकीकरण व राष्ट्रजागृतीच्या कामीं अतिशय उपयोग होत आहे. अतिशय मोठ्या प्रमाणावर हे उत्सव साजरे होऊ लागल्यानें त्यांचा ज्ञानसत्रासारखाहि उपयोग होत आहे.

आपले सण हे आपल्या पूर्वजांच्या जीवनाची ओळख करून देणारे आहेत आणि त्या सणाच्या निमित्तानें आपल्या अत्यंत थोर परंपरेची व संस्कृतीची स्मृति जिवंत राहिली आहे.

सणांच्या मार्गाल हा हेतु लक्षांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. परंतु पुष्कळ वेळां असें होतें कीं, या हेतूचा विसर पडून सण हे चैनीचें एक संभावित निमित्त असें होऊन बसतें. ऋण काढून सण करणें ही म्हण प्रचारांत आली याचें कारण सणाविषयींचा हा लोकभ्रम. सणाचा आनंद हा किती पैसे खर्च होतात यावर अवलंबून नसतो. आपल्या ठिकाणीं कांहीं उदात्त वृत्तींची जागृति व्हावी हा सणाचा हेतु आहे. प्राचीन सत्कृत्यांचें हेतुपुरस्सर चिंतन करणें हा सण साजरे करण्याचा हेतु असतो. तो विसरून चार लोकांत आपल्या मोठेपणाची ऐट मिरविणें हा सणांचा दुरुपयोग आहे. या हेतूचा विसर पडल्यामुळें सणाच्या दिवशींचे आचार पुष्कळ वेळां वेडगळासारखे व अंधानुकरणासारखे वाटतात. होलिकोत्सव हें याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. माणसांनीं पशुतुल्य वर्तन करावें असा या उत्सवाचा लोक अर्थ करतात ! परंतु तें आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन आणि आपल्या धर्मशास्त्रकारांचें विडंबन करीत असतात.

सणांचा हेतु लक्षांत घेऊन ते साजरे केले तर त्यांचें ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व आपल्या अनुभवास येईल आणि तें प्रस्थापित करणाऱ्यांच्या बुद्धिमत्तेविषयीं आपल्या मनांत साभिमान आदर उत्पन्न होईल.

---

## ६७ : : यंत्र—शाप कीं वर ?

एकादा पदार्थ तयार करण्यासाठीं दहा माणसांची गरज लागली कीं, त्या पदार्थाच्या उत्पादनाच्या कामांत दहा माणसांचें पोट भरतें; परंतु त्या ठिकाणीं एकादें यंत्र आणून उभें केलें कीं, तें यंत्र स्वतः ७।८ माणसांचीं कामें करूं लागतें आणि तेथें ७।८ माणसें कामास मुकतात ! तीं बेकार झालेलीं, अन्नाला मोताद झालेलीं माणसें त्या यंत्रास व तें आणणाऱ्यास शिव्याशाप देऊं लागतात. परंतु बेकार झालेल्या माणसाखेरीज इतरांच्या सुखांत त्या यंत्रानें भरच पडते. यंत्रामध्यें माणसांपेक्षा कांहीं विशेष गुण असतात. अचूकपणा यंत्रांत जास्तच असतो. यंत्रांस आवश्यक त्या शक्तीचा पुरवठा असला तर यंत्राची उत्पादनशक्ति अव्याहत राहते.

एकसारखें काम करून माणसाचे हात दमतील व कामाच्या प्रगतीवर परिणाम होणारच. परंतु यंत्रांत ते दोष उत्पन्न होत नाहींत. वाफेचा आणि विजेचा शोध लागल्यापासून यंत्राच्या शक्तींत बेसुमार वाढ झाली. माणसानें शोधलेल्या यंत्रानें माणसाचाच पराभव केला. यंत्र हें माणसापेक्षां जास्त एकनिष्ठ सेवक आहे. मजुरांच्या इच्छा, आकांक्षा, राग, लोभ इत्यादि गोष्टी मालकास संभाळाव्या लागतात. परंतु यंत्ररूपी सेवक हा एक निष्काम कर्मयोगी आहे.

आधुनिक जीवनांत यंत्रांनीं आपल्या गुणविशेषानें अत्यंत महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. माणसाला माणसाच्या साहाय्याची फारशी जरूरी राहिली नाहीं. सकाळीं उठल्यापासून तों झोंपेपर्यंत त्याच्या हरएक गरजा भागविण्यासाठीं यंत्रें सिद्ध आहेत. विजेचें बटन दाबल्याबरोबर तोंड धुण्यास गरम पाणी, चहा, पाकनिष्पत्ति, वारा घालणारा पंखा, ऊब देणारा हीटर, करमणुकीसाठीं रेडिओ, इष्टमित्रांशीं बोलण्यासाठीं, बसल्या जागेवरून शेंकडों मैल दूर असलेल्याहि ठिकाणचीं कामें करण्यासाठीं टेलिफोन, इत्यादि यंत्रें त्याच्या सेवेस हजर आहेत. हीं कामें करण्यासाठीं पूर्वीं माणसांची मनधरणी करावी लागे आणि तरी मनाजोगीं कामें होण्याची शाश्वती नसे. प्रामाणिकपणाच्या बाबतींत यंत्रांनीं माणसांना लाजविलें आहे. यंत्रें हीं निःस्वार्थीपणाचे आदर्श आहेत.

यंत्रांच्या कृपेनें जगाच्या वाटेल त्या प्रदेशांतील वस्तु माणसाच्या हाताशीं आल्या आहेत. निसर्गाच्या सामर्थ्याची आराधना करीत प्राचीन मनुष्य जगत होता आणि तरी लहरी निसर्ग माणसाला नेहमीं घाबरवीत असे. आतां निसर्गाच्या सामर्थ्यावर यंत्रांनीं नियंत्रण घालून मनुष्य जगाचा राजा झाला आहे. आतां पर्वत त्याला अडवूं शकत नाहीं, समुद्र त्याला बुडवूं शकत नाहीं, अरण्याची त्याला भीति वाटत नाहीं, पाण्याचा लोट त्याला लोटूं शकत नाहीं. वाळवंटांत पाण्यावांचून मरण्याचे दिवस गेले. पावसासाठीं तळमळण्याची फारशी जरूरी राहिली नाहीं. आकाशासारख्या निराधार प्रदेशांतहि माणूस विहार करतो आणि उत्तुंग गिरिशिखरावर तो

मर्जेत हवा खात बसतो. यंत्रानें माणसाचें सामर्थ्य शतगुणित केलें आहे. यंत्रसिद्ध माणूस हा पुरुषसूक्तांत वर्णिल्याप्रमाणें सहस्रशीर्ष, सहस्रपाद, सहस्राक्ष, सहस्र-हस्त झाला आहे. हें वैभव देणारें यंत्र हें वरदानच नाहीं का ? पण मग युद्धासारख्या प्रसंगीं भयंकर संहार कां होतो ! यंत्रामुळेंच नाहीं का ?

नाहीं ! आणि त्याचें कारण यंत्र नसून माणूसच आहे. यांत्रिक सामर्थ्याचा नाद माणसांच्या नाशास कारण झाला आहे. युद्धांतील संहाराचें प्रमाण जें इतकें वाढलें आहे तें यांत्रिक सामर्थ्याचें कटु फळ आहे. निसर्गाच्या शक्तीचा तो अपव्यय आहे. डोंगर फोडण्यासाठीं उपयोगांत आणावयाचीं यंत्रें माणसांच्या शिरावर रोखलीं तर त्यांत यंत्राचा काय दोष ! हिंस्रपशूंचा निःपात करण्यासाठीं बंदुकीचा उपयोग करणारा माणूस त्याच बंदुकीनें माणसाच्या हृदयावर नेम धरूं लागला तर त्यांत बंदुकीचा काय दोष ? यंत्राच्या निरपेक्षतेचा, निष्कामबुद्धीचा सदुपयोग करण्याऐवजीं दुरुपयोग केला तर यंत्र हें शापासारखेंच ठरणार ! आपलें उत्पादन-सामर्थ्य वाढवून सर्व मानवी जीवित अल्पश्रमांत सुखदायी करण्याच्या कार्याऐवजीं इतरांना बेकार करून उपाशीं मारण्याच्या कामीं जर उत्पादन-शक्तीचा उपयोग होऊं लागला तर तेथें यंत्राचा काय दोष !

परंतु माणसानें यंत्राच्या सामर्थ्याचा हा दुरुपयोग चालविल्यानें आधुनिक जीवनांत यंत्र हा शाप ठरूं पहात आहे. यंत्राच्या संशोधकांची कल्याणबुद्धि यंत्रयोजकांत न राहिल्यानें यंत्रशक्ति संहारक ठरत आहे. माणसाच्या मूर्खपणामुळें यंत्र हें वरदान ठरण्याऐवजीं शाप ठरत आहे. याचें कारण 'योजकस्तत्र दुर्लभः ।'.

---

## ६८ : : : जुना बाजार

चुकला फकीर मशिदींत सांपडावयाचा, अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणेंच जुन्या बाजाराबद्दल म्हणतां येईल. इतरत्र न भेटलेला माणूस जुन्या बाजारांत भेटतो, याचें कारण कोणचा माणूस जुन्या बाजारांत जाईल

याचा नेम नसतो. त्या बाजारांत जाणाऱ्या प्रत्येकाला कांहीं घ्यावयाचें असतेंच असें नाहीं. पुष्कळजण तेथें जातात आणि जातात म्हणून कांहीं तरी खरेदी करतात. कांहींतरी घ्यावयाचें आहे असें ठरवून त्या बाजारांत जाणारे त्या मानानें थोडे निघतील.

जुन्या बाजारांत जाणें, जाणें म्हणण्यापेक्षां भटकणें, ही एक करमणूक आहे. पुण्यास आठवड्यास भरणाऱ्या जुन्या बाजारांत तुम्हांस असे प्रेक्षक फार दिसतील. कित्येक लोकांची हमखास करमणुकीची जागा म्हणजे जुना बाजार. या बाजारांत कोणत्या वस्तु येतील याचा नियम नाहीं. जगांतील प्रत्येक वस्तु केव्हां ना केव्हां तरी जुनी होते, म्हणून कोणचीहि वस्तु जुन्या बाजारांत येऊं शकते. अपवाद फक्त माणसें! गुरें येतातच. पक्षीहि येतात. वाघ, सिंहहि कांहीं दिवसांनीं येऊं लागतील!

जुना बाजार हा एक अजबखाना आहे. जी वस्तु तुम्ही अतिशय प्रयत्न करूनहि तुम्हांला दिसणेंसुद्धां कठीण ती जुन्या बाजारांत रस्त्यावरच्या धुळींत, अत्यंत भिकार वस्तूंच्या संग्रहांत दिसेल! श्रीमंत लोकांच्या घरांतील अंतर्भागांत काय काय चिजा असतील याचें प्रत्येकास कुतूहल असतें. परंतु तें पूर्ण होण्याची एकच जागा म्हणजे जुना बाजार. एकाद्या सोजिरानें आपल्या प्रिय पत्नीला भेट दिलेली वस्तु तुम्हांला कधींतरी पहावयास मिळेल का? होय. जुन्या बाजारांत पटकन् एकाद्या वस्तूवर तुम्हांला लिहिलेलें दिसेल, To Dear Lucy! कोण ही लुसी? देणारा कोण? तो कुठें असेल? लुसी कोठें असेल? कांहीं कांहीं समजणें शक्य नाहीं. कित्येक वस्तूंच्या दर्शनानें हीं जीं कुतूहलाचीं वलयें उत्पन्न होतात तेंच जुन्या बाजारांतलें सौख्य आहे! तोच त्या भटकण्यांतला आनंद आहे.

वाटेल त्या वस्तूंचा वाटेल तसा संग्रह तेथें केलेला असतो. गळ्यांत घालावयाचे सुंदर मणी आणि वस्तऱ्याचें पातें ठेवावयाची सुंदर पेटी, बुटाची लेस आणि एकाद्या सेनापतीच्या कोटाला असूं शकेल अशी राजमुकुट छापाची गुंडी, एकाद्या कुत्र्याचा पाय आणि एकाद्या श्रीमंताच्या अंगावर एके काळीं शोभा देणारा वुलनचा कोट, वाण्याचें जमाखर्चाचें चोपडें आणि सोनेरी कव्हर असलेलें मिल्टनच्या महाकाव्याचें

'अमूल्य' (आतां अ - मूल्यच !) पुस्तक- अशी वस्तूंची गल्लत जुन्या बाजारांत असते. त्यांत कित्येक वस्तू अशा असतात कीं, त्या केवळ जुन्या बाजारांत आहेत म्हणूनच जुन्या म्हणावयाच्या ! नव्या बाजारांत सुंदर कपाटांत त्या ठेवल्या तर कोणाची ताकद आहे त्यांना उगाच हात लावण्याची ? ज्या वस्तूंना हात लावण्याचेंसुद्धां भाग्य गरीबांना लाभणार नाहीं, त्या वस्तु जुन्या बाजारांत गरीबांच्या पायाशीं लोळण घेत असतात. तेथें छपरी पलंग आणि देवदाराचें खोकें यांची योग्यता सारखीच !

पोलिसांनीं ज्या वस्तूंचा कसून शोध चालविलेला असेल त्या वस्तु जुन्या बाजारांत दिवसाउजेडीं व रस्त्यावर पडलेल्या असतील ! म्हणून कांहीं ठिकाणीं जुन्या बाजारास चोर-बाजार असेंहि नांव आहे. परंतु जुन्या बाजारांतील व्यवहार अगदीं राजरोसपणें चाललेले असतात. तेथें मोठमोठ्या तिजोऱ्या नसतात, रक्षक नसतात. 'कोणत्याहि वस्तूस हात लावूं नये' अशा पाट्या नसतात, उलट कोणच्याहि वस्तूस निदान हात तरी लावावा अशी तेथील दुकानदारांची इच्छा असते.

कारण तेथील दुकानदार, त्यांनीं जमविलेल्या वस्तु आणि त्या विकत घेणारीं गिऱ्हाइकें सर्वच अनपेक्षित आणि अचानक असतात. आपल्याला जुन्या बाजारांत काय घ्यावेंसें वाटेल हें आपणांस सांगतां येणार नाहीं. कोठें काय मिळेल याचा नियम नाहीं आणि तितक्याच अनपेक्षित त्या वस्तूंच्या किंमती असतात !

त्यामुळें एकादी नवल वस्तु, जुन्या बाजारांत खरेदी करून मग ती खरेदी करण्यांतलें आपलें कौशल्य इतरांस सांगून थक्क करणें हा जुन्या बाजारांतल्या गिऱ्हाइकाचा आनंद असतो. उदाहरणार्थ--तेथें एखादें सुंदर पुष्पपात्र असतें. अगदीं एखाद्या कलेक्टरच्या दिवाणखान्यांतलें असतें. तें ४।६ आण्यांस घेतां येतें आणि घरीं आणून चापून इतरांस सांगतां येतें कीं, आम्हीं तें आग्र्याहून १२ रु.ला आणलें आहे किंवा आमचा एक दिल्लीला मित्र आहे त्यानें तें पाठविलें आहे ! ऐकणारांस तें मुकाट्यानें खरें मानलें पाहिजे ! जुन्या बाजारांतील वस्तू दुर्लभ असतात; कारण त्या पुन्हा मिळत

नाहींत. कित्येक वेळां त्यांच्यासारख्या वस्तु कोठें दिसूंहि शकत नाहींत. त्या कोठून येतात तें आपणांस माहित नसतें.

जुन्या बाजारांतील कित्येक वस्तूंच्या मागें एखाद्या वेळीं किती तरी सुखदुःखाचे प्रसंगहि असतील. कदाचित् त्या वस्तु चोरून आणलेल्या असतील, वस्तूच्या मालकाचा घरादारांसह लिलांव होऊन आल्या असतील किंवा एखाद्या श्रीमंतानें स्थलांतर करतांना सहज विकूनहि टाकलेल्या असतील! कित्येक वस्तूंच्या भोंवतीं त्या वस्तूंच्या माजी मालकांच्या भावना घोटाळत असतील.

असे विचार फक्त जुन्या बाजारांत हिंडतांनाच मनांत येतात. स्थान चुकलेल्या वस्तु, चुकून ज्यांच्या हातीं त्या लागल्या ते दुकानदार, सहज आलेलें गिऱ्हाईक आणि जी ठरेल ती किंमत—असा असतो जुना बाजार!

---

## ६९ : : जुन्या कोटाचें आत्मवृत्त

माझ्या नव्या मालकाबरोबर या पडक्या झोंपडीच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत मी पडून राहिलों आहें. कित्येक दिवस झाले मी खुंटीवरून खालींसुद्धां उतरलों नाहीं. अंगाखांद्यावर जाळीं झालीं आहेत. अनंत किड्यांचें मी घर होईन कांहीं दिवसांनीं!

आतां जुन्या आठवणी आठवणें हा एकच व्यवसाय उरला आहे.

मला तो पहिला दिवस अद्याप आठवतो. कोणची तारीख असावी बरें? बहुतेक दिवाळी! पण जागा माझ्या पक्की लक्षांत आहे. 'भूषणभुवना'च्या कपाटांत मी उभा होतों. मोठी टेलरिंग फर्म होती. तेथें माझा जन्म झाला. एका उमद्या युवकाच्या अंगाखांद्यावर मला चढविण्यासाठीं ४।५ कारागीर झटत होते. आधीं एक लांब कापडाचा तुकडा मग त्याचे अनंत तुकडे आणि मग सारखी सुईची टोंचणी आणि दोऱ्याचे बंध! असें होतां होतां एक दिवस मला हें रूप मिळालें. "कोट झाला!" असें सुस्कारा टाकीत एक कारागीर म्हणाला!

इस्तरी मारून कांचेच्या कपाटांत मला टांगण्यांत आलें. मान उंच करून मी सगळीकडे पहात होतों. मी मोठा श्रीमंत होतों. माझ्या श्रीमंत मालकाची वाट पहात होतों. एक दिवस तो गोरागोमटा उमदा तरुण आला व माझी व त्याची दोस्ती झाली ! आम्हीं एकमेकांना प्रेमानें मिठीच मारली.

काय सुंदर दिसत होता माझा पहिला धनी ! त्याला कपड्यांची भारी हौस आणि अत्यंत निगा राखणारा होता तो. एक टपोरें फूल माझ्या मानेवर अडकवून तो मित्रांना दाखवीत फिरूं लागे. मला आनंद वाटे कीं, माझ्यामुळें त्याच्या आयुष्यांत केवढा आनंद उत्पन्न झाला आहे. येतां-जातां ' ब्रश ' मारून त्यानें मला अगदीं बेजार केलें !

परंतु नव्याचे नऊ दिवस ! हळूं हळूं तेहि दिवस गेले. माझ्या देहावर डाग पडूं लागले. घामाचे वळ वठूं लागले. कांहीं ठिकाणीं खरचटून फाटलें सुद्धां आणि माझ्या खिशांत नोटांचीं बंडलें असत त्यांऐवजीं मळके हातरुमाल कोंबले जाऊं लागले.

मग आमची रवानगी एका कोपऱ्यांत झाली. तेथें माझे कांहीं पदच्युत भाई भेटले ! मला धक्का बसला. काय होणार आतां आमचें ? रात्रीं एखाद्या वेळीं उंदीर येऊन कडकडून चावा घेऊन लचके तोडीत. पण काय करणार ? माझ्या धन्याचें व माझें दर्शनहि होईनासें झालें.

एक दिवस स्वारी तेथें आली. मला त्यानें वसकन् ओढलें आणि एका गड्याच्या अंगावर फेंकून देण्यांत आलें. मी मोठ्या केविलवाण्या नजरेनें त्या तरुण मालकाकडे पहात तेथून निघालों.

परंतु त्याहि स्थितींत मला आनंदित होण्याचें कारण सांपडलें. त्या गरीबाला किती आनंद झाला ! त्यानें आपल्या घरधनिणीस मला दाखवलें, आणि सांगितलें, " अग ! मालकांनीं कोट दिलाय, कोट ! "

ती माउली कौतुकानें मला जवळ घेऊन कुरवाळूं लागली. त्याच दिवशीं दुपारीं तिनें सुईदोरा घेऊन माझी डागडुजी केली. माझ्या अंगा-वर रंगीबेरंगी ठिगळें दिसूं लागलीं.

थंडी असो—उन्ह असो—पाऊस असो, तो गरीब मालक मला नेहमीं

अंगावर बागवी आणि माझ्या खिशांत आतां विड्यांचीं थोटकें, तांबडे पैसे, काड्यांच्या पेट्या, काय वाटेल तें राहूं लागलें !

खिसे लोंबूं लागले, पाठ फाटूं लागली, खांदे निखळले ! अनंत ठिगळें अंगावर चढलीं. माझें मला वाटे—तोच का मी ?

त्या धडाक्यांत माझा किती टिकाव लागणार ! सर्व प्रयत्न करूनहि मी निरुपयोगी झालों. मला खालीं उतरवून दूर फेंकण्यांत आलें आणि एक दिवस या जुन्या कपड्यांच्या दुकानांत येऊन पडलों !

आतां बहुतेक येथेंच समाधि घ्यावी लागणार. हें कपड्याचें दुकान कसलें–स्मशान आहे हें ! मूल्यवान् कपड्यांचीं प्रेतें येथें पडलीं आहेत आणि मी त्यांतलाच एक जीवन्मृत !

---

## ७० : : काळा बाजार !

नुकत्याच झालेल्या महायुद्धाचा एक अविस्मरणीय 'प्रसाद' म्हणजे काळा बाजार ! एखाद्या वस्तूची एखाद्या माणसास फार गरज असली तर ती स्वतः अडचण सोसूनहि द्यावी यांत माणुसकी आहे. ही माणुसकी दाखविणाराची लोक वाहवा करतात. पण आतां या माणुसकीचें स्वरूप पार बदललें आहे. आतां असें झालें आहे कीं, दुसऱ्याच्या अडचणींचा फायदा घेऊन त्याला राजरोसपणें लुबाडावें आणि स्वतः गबर व्हावें ! अशा मार्गानें मिळविलेलें वैभव मोठ्या दिमाखानें मिरवावें आणि असा दिवस दाखविल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानावेत !

दुसऱ्याला असें अडचणींत गांठून लुबाडण्यांत कांहीं क्रूरपणा आहे, कांहीं हीनत्व आहे ही भावनाच जणूं काय नाहींशी झालेली आहे. माणसांतल्या लोभानें त्याच्या माणुसकीस गारद केलें आहे. माणूस धन-लोभाच्या किती आहारीं गेला आहे याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे काळा बाजार !

व्यापाराचीं सूत्रें ज्यांच्या हातीं असतात ते एक प्रकारें लोकांच्या जीवनाचेच सूत्रधार असतात. जीवनास आवश्यक अशा वस्तूंचा पुरवठा

करण्याचे अधिकार व्यापाऱ्यांच्या हातीं असतात. या अधिकाराच्या जोरावर कांहीं व्यापारी लोकांची पिळवणूक करूं लागले कीं, तेथें काळा बाजार सुरू होतो.

जीवनास आवश्यक अशा वस्तूंचें उत्पादन आणि देवघेव ज्यांच्या हातांत असते ते एकदम त्या एक वा अनेक वस्तूंची खरेदी करून टाकतात. बाजारांतून तो माल एकदम ' अदृश्य ' होतो. सांठेबाजाच्या कोठारांत त्या मालाचे ढीग होऊं लागतात. मग बाजारांत धांवाधांव सुरू होते. तो माल जेथें अडवून ठेविला असेल त्या ठिकाणीं जाऊन लोक त्या सांठेबाजाची करुणा भाकूं लागतात आणि सांठेबाज तोंडास येईल ती किंमत घेऊन तो माल देतो. वस्तुतः त्या वस्तूच्या भावावर सरकारचें नियंत्रण असतेंच. पण सरकारी नियंत्रणाची वाट चुकवून सांठेबाजांचे व्यवहार चालू असतात. गरीब अडलेले लोक त्यांच्या अरेरावीपुढें मान वांकवितात आणि उघड उघड त्याच्या कृष्णकृत्यास संमति देतात ! लोक कोणत्या मालासाठीं अगतिक होतील याचा बरोबर अंदाज करणें यांत सांठेबाजाचें सारें धूर्तपण असतें !

कायद्याच्या दृष्टीनें नियंत्रणापेक्षां जास्त भाव घेण्याइतकेंच, तितकी किंमत देणेंहि गुन्हा आहे ! काळ्या बाजाराचें गिऱ्हाईकहि गुन्हेगारीच करतें. परंतु या गुन्हेगारीस सांठेबाज पुरून उरतात. पैशाच्या जोरावर ते कायद्याचीहि मुस्कटदाबी करूं शकतात. गिऱ्हाइकास तें सामर्थ्य नसतें. माल तर पाहिजे. तो घेतला तर गुन्हा आणि न घेतला तर त्याच्यावांचून होणारे हाल ! अशा स्थितींत शासनाच्या टांगत्या तलवारीच्या विचारानें मनास धसका बसत असतां तो सहन करीत गिऱ्हाईक सांठेबाजाच्या कोठारांतील माल पत्करतें ! तो माल पत्करतांना आर्थिक दृष्ट्या तर त्याची आधींच पिळणूक होते, आणि नंतर गुन्हा केल्याची रुखरुख मनास खात राहते ! पैसा तर जातोच, पण पैशाच्या पाठोपाठ ' गुन्हेगार ' म्हणून अब्रूहि जाण्याची भीति असते !

काळ्या बाजारांतील सांठेबाजांपुढें सरकारलासुद्धां हात टेकण्याची वेळ आली आहे. काळ्या बाजाराविरुद्ध सरकारनें मोहीम सुरू केली आहे. परंतु

त्या मोहिमेचा कितीसा उपयोग होतो? वाटेल ती किंमत घेणारे आणि देणारे राजरोस वावरत आहेत! गरजवंतास असलेली अकल बाजूस ठेवून काळ्या बाजाराचा आश्रय करावा लागतो!

राष्ट्रीय सरकारच्या अव्याहत परिश्रमानें काळ्या बाजाराच्या गांजणुकीस हळू हळू आळा बसत आहे. गरीब जनता सरकारला दुवा देत आहे.

---

## ७१ : : : जाहिरातबाजी

चालू युगास जाहिरातीचें युग म्हणण्याचा प्रघात आहे. सगळ्या कार्यक्षेत्रांत थोड्याफार प्रमाणांत जाहिराती फडकतांना दिसतात! एखादा ग्रंथ असो, वस्तु असो, कल्पना असो, किंवा भावी कालाविषयींची कांहीं योजना असो; जाहिरात ही झालीच पाहिजे.

आपलीं नियतकालिकें पहा. बहुतेकांची निम्मी अधिक जागा जाहिरातींनीं व्यापलेली दिसते. कोणी रोग्यांना धीर देतो तर कोणी आरोग्यसंपन्नांना कांहीं खमंग खाद्याची शिफारस करतो. कोणी मनपसंत शिलाईसाठीं गळ घालतो तर कोणी सौंदर्यासाठीं आपल्या सौंदर्यप्रसाधनाची आग्रहानें शिफारस करतो. कोठें एखादा ग्रंथ अपूर्व असल्याचें जाहीर करण्यांत येतें तर कोठें एखाद्या नव्या योजनेविषयीं यशाची शंभर टक्के खात्री पटविण्यांत येते. या सदरांत चित्रपटांनीं किती तरी जागा अडविलेली असते. चित्रपट कोणताहि असो. त्याचा विषय 'दिलखेचक' असावयाचा, त्यांतील दृश्यें नेत्रदीपक असावयाचीं, त्यांतील संगीत कर्णमधुर, नटी सौंदर्यसम्राज्ञी, आणि नट अभिनयसम्राट्, हें सगळें त्यांत असावयाचेंच! अतिशयोक्ति करण्यांत जणूं काय सारखी चढाओढ चालली आहे असें हा मजकूर वाचतांना वाटतें.

आपल्या मालाचें वृत्त गिऱ्हाइकास कळवावें एवढेंच जाहिरातीचें कार्य आहे. परंतु प्रत्यक्ष कृति मात्र निराळीच आढळते. गिऱ्हाइकांस आपल्या मालाचें महत्त्व पटवितांना त्याचे गुण प्रामुख्यानें सांगण्यांतहि कांहीं चूक नाहीं. परंतु या गुणवर्णनाच्या भरांत उघड उघड असत्य सांगणें, गिऱ्हा-

इकास पटविण्यापेक्षां बनविण्याचा प्रयत्न करणें, हें बहुतेक जाहिरातींचें धोरण दिसतें. अशा वेळीं जाहिरातीस जाहिरातबाजीचें स्वरूप येतें. 'अमुक एका औषधानें अमुक रोग बरा होतो' हें सांगणें निराळें आणि 'कोणताहि रोगी चोवीस तासांत बरा होतो' हें सांगणें निराळें. पहिली जाहिरात आहे, दुसरी जाहिरातबाजी आहे. चित्रपटगृह निम्में अधिक मोकळें असतां "हाउस फुल्ल" असल्याचें सांगणें, चार दोनशें लोक सभेस असतां प्रचंड लोकसमुदाय जमल्याचें सांगणें, ही जाहिरातबाजी आहे. अशा जाहिरातबाजींतील असत्य कांहीं दिवसांनीं तरी बाहेर येतेंच आणि मग अशा जाहिरातबाजाच्या कोणत्याहि विधानावर लोक विश्वास ठेवीत नाहींत. आपल्या कृतीकडे लोकांचें लक्ष वेधण्याचा जाहिरातीचा जो खरा हेतु तो जाहिरातबाजीनें मुळींच साधत नाहीं.

लोकांचें लक्ष वेधणें ही एक कला आहे. परंतु ती कला सर्वस्वीं थापेबाजीवर उभारलेली नाहीं. असत्य न सांगतां लोकांचीं मनें वेधतां येतात. आपल्या मालाच्या गुणाविषयीं खात्री असणारा व्यापारी जाहिरातबाजी करीत नाहीं. आपल्या प्रामाणिकपणानें त्यानें लोकमत संपादिलेलें दिसतें. त्यामुळें त्याच्या नांवानेंच लोक आकर्षिले जातात. त्यास गिऱ्हाइकास बनविण्याची यातायात करावी लागत नाहीं. जाहिरातबाजीनें कांहीं काळ लोकांचीं मनें वेधतां आलीं, कांहीं गिऱ्हाइकांना बनवून माल गळ्यांत बांधून थोडाफार फायदा झाला तरी तें वैभव फार काळ टिकत नाहीं. एकदां त्यांतील खोटेंपण कळलें कीं, मग पुन्हां त्या व्यापाऱ्यास कोणी विचारणार नाहीं. पैशापेक्षां पत हें व्यापारांत खरें भांडवल असतें. खरा व्यापारी पत हेंच आपलें शील समजतो. तो जाहिरातबाजीच्या मोहास कधीं बळी पडत नाहीं.

---

## ७२ : : शिधापद्धतीच्या गंमती

युद्धामुळें ज्या कांहीं नव्या नव्या घटना झाल्या त्यांपैकीं शिधापद्धति ही एक घटना आहे. युद्धकार्यांत सैनिकांसाठीं अन्नाचा पुरवठा पाहिजे

होता. सरकारनें अन्नाची जमवाजमव सुरू केली. दाहीदिशा अन्नाचा शोध केला. त्यांत परदेशांतील वाहतूक अशक्य झाल्यावर तर फारच गंभीर परिस्थिति निर्माण झाली असेल तेवढ्या शिधासामुग्रीवर सर्व कांहीं भागविणें अपरिहार्य होऊन बसलें. सरकारनें त्यांतल्या त्यांत असा विचार केला कीं, आधीं सैनिक जगविले पाहिजेत. तेव्हां इतरांनाच त्याग करावयास लाविलें पाहिजे. शांततेच्या वेळीं जरा सढळपणें खाणेंपिणें करण्याच्या संवयींचें नियंत्रण लोकांनीं केलें पाहिजे. लोकांना नुसता उपदेश करून काय होणार? स्वयंस्फूर्तीनें कोण आपला घांस काढून देतो! शेवटीं सरकारनें प्रत्येकाचा वांटा आपणच ठरविला आणि वांटणीवर नियंत्रण घातलें! धान्यनियंत्रणापासून आरंभ करून हळू हळू बऱ्याच जिनसांवर नियंत्रण बसलें! सगळें कांहीं मोजकें मिळूं लागलें! लोकांना अगदीं नवा अनुभव येऊं लागला. आतां तो अनुभव अंगवळणीं पडला आहे. त्यांतील दुःखाचा भाग क्षणभर बाजूस ठेवला तर या पद्धतीनें अनेक गंमती होत असल्याचें दिसतें.

पाहुण्यांच्या आदरातिथ्याचा बोजा आधीं कमी झाला. बेगुमानपणें दुसऱ्याच्या घरीं पाहुणचार घेणाऱ्यांना अगदीं सभ्यपणें वाटेस लावतां येऊं लागलें. फार तर सरकारला चार शिव्या हासडाव्यात म्हणजे झालें!! पायलींत आणि मणांत खरेदी करणारे पावशेराची आणि छटाकाची भाषा बोलूं लागले. कांहीं सणवार आले तरी गोडधड बेताबाताचेंच होऊं लागलें. दिवाळींतले ते करंज्या-कडबोळ्यांचे डबे रिकामे पडले!

थोडेंफार नाजुकसाजुक करावें आणि ताजेंताजें खावें अशी मोठी आरोग्यदायक सोय झाली. पण मोजकें धान्य मिळूनहि आरोग्य बिघडण्याचे प्रसंग उत्पन्न होऊं लागले. कारण धान्यांत पसापसा खडवण यावयाचें! कधीं न पाहिलेले तांदूळ नि गहूं खाण्याचा प्रसंग यावयाचा! मध्येंच सरकारनें आटा वांटावयास सुरुवात केली होती. त्या आट्यांत कांहीं ठिकाणीं चक्क माती निघाली! कोठें कोठें किडेहि आढळले! आणि त्या पिठाची केलेली 'भाकरी' खातांना दांतांना विलक्षण व्यायाम होऊं लागला!

पाहिजे तें धान्य मिळविण्यासाठीं नाना तऱ्हेच्या युक्त्या सुरू झाल्या

आणि त्यांतूनच काळ्या बाजाराचा सैतान अवतीर्ण झाला ! दोन पैशांची वस्तु दोनशें पैसे देऊन मिळविणें हीच मोठी शिताफी ठरली ! कारण एखादी वस्तु मिळविणें हाच मोठा पराक्रम होऊन बसला ! मेजवानीचा बेत राजरोस मांडवांत न होतां अंधाऱ्या माजघरांत होऊं लागला ! कारण प्रत्येकानें किती खावें याबरोबरच एकावेळीं एकदम किती लोकांनीं खाण्यास बसावें यावरहि सरकारी नियंत्रण आलें !

या दिवसांत दिसलेलें एक अद्‌भुत दृश्य म्हणजे रस्त्यांत दिसणाऱ्या रांगा ! क्यू ! ! गरीब आणि श्रीमंत हा भेद बाजूस ठेवून घासलेटच्या बाटल्या घेऊन लहानथोर स्त्रीपुरुष रस्त्यांत तासचे तास उभे राहूं लागले. घासलेटची ही गर्दी नंतर कापडाच्या दुकानीं दिसूं लागली ! साखरेचे कण कोठें पडले कीं, चोहों बाजूनें तेथें मुंग्या जमूं लागतात. कोण त्यांना बातमी सांगतो ? तसेंच या रांगांच्या बाबतींत होऊं लागलें. या बाबतींत झालेली अगदीं अलीकडची रांग म्हणजे काड्याच्या पेट्यांसाटीं झालेली !

गांवांत कुठून तरी बातमी येते ‘ गुळावर कंट्रोल आला ! आणि हरभऱ्याच्या डाळीवरचा कंट्रोल उठला !!’ लगेच धांवाधांव सुरू होते; आणि पाहतां पाहतां गुळाच्या ढेपी गडप होतात आणि डाळींच्या राशी दिसूं लागतात !

अडचणींचीसुद्धां संवय झाली कीं, त्यांतहि विनोद निर्माण होतो तसें या शिधापद्धतीचें झालें आहे.

---

## ७३ : : औद्योगिक शिक्षण

आधुनिक शिक्षणाबद्दल सर्वत्र एक ओरड ऐकूं येते ती ही कीं, हें शिक्षण केवळ पुस्तकी आहे. विद्यार्थी केवळ पुस्तकांतले किडे होतात. त्यांना पदवीइतकें शिक्षण घेऊनहि पोट भरतां येत नाहीं.

वरील टीका ही विशेषतः शिक्षणाच्या ज्या शाखेंत केवळ वाङ्मयाचा अभ्यास होत असतो त्या शाखेस जास्त लागू आहे. बी. ए., एम. ए. होऊन जेमतेम पोट भरतां येतें. तेंहि कारकून किंवा शिक्षक वगैरे नोकरी

करून आणि तीहि नोकरी न मिळाल्यानें बेकार राहण्याचा प्रसंग पुष्कळांवर येतो ! पोटाचा प्रश्न न सुटल्यानें साहजिकच असें वाटतें कीं, असें शिक्षण काय करावयाचें ?

शेती, वैद्यकी, स्थापत्य–शास्त्र ( एंजिनिअरिंग ) इत्यादि शाखांचें शिक्षण देणाऱ्या संस्था आणि तें शिक्षण घेणारे विद्यार्थी वाङ्मयशाखेच्या मानानें फारच थोडे आढळतात. परंतु जे आहेत त्या सर्वांनाच अगदीं चैनींत राहण्याइतका पैसा मिळतोच असें नाहीं. त्या शाखेचें शिक्षण घेणारा सहसा बेकार रहात नाहीं एवढेंच. परन्तु पोट भरण्याची खात्री असूनहि मग तिकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी कां ? तर त्या शाखेचें शिक्षण अतिशय खर्चाचें असतें ! कमींत कमी खर्चात घेण्यासारखें उच्च शिक्षण म्हणजे 'Arts' शाखेचें, म्हणूनच तिकडे इतकी गर्दी होते.

या परिस्थितींतून मार्ग म्हणजे कमी खर्चात सर्वांना घेतां येईल असें औद्योगिक शिक्षण देणें हा होय. प्रत्येकास स्वतंत्रपणें पोट भरण्यासारखा व्यवसाय करतां येईल असें शिक्षण देणें हा औद्योगिक शिक्षणाचा हेतु असतो.

गेल्या युद्धामध्यें सरकारला विविध प्रकारच्या व्यवसायासाठीं माणसें पाहिजे होतीं. युद्धोपयोगी वस्तूंचे प्रचंड कारखाने काढावयाचे होते त्यासाठीं माणसें पाहिजे होतीं. शास्त्रज्ञांची उणीव नव्हती तर त्यांच्या योजनेप्रमाणें काम करूं शकणारे कारागीर पाहिजे होते. त्यासाठीं सरकारनें अशा शिक्षणसंस्था काढल्या आणि हजारों करागीर निर्माण केले. त्यांतून हजारों लोकांना नवे नवे व्यवसाय करतां येऊं लागले. परन्तु युद्ध संपल्याबरोबर युद्धोपयोगी कारखानेहि बंद झाले. सरकारनें दिलेलें औद्योगिक शिक्षण जवळ जवळ निरुपयोगी ठरण्याची वेळ आली आहे !

आतां राष्ट्रीय सरकार शिक्षणाची पुनर्घटना करीत आहे. खरें औद्योगिक शिक्षण आतां सुरू होईल. कारण औद्योगिक शिक्षणाचा खरा अर्थ असा आहे कीं, प्रत्येकाला आपापल्या लोकवस्तींत, चाललेल्या व्यवसायाचें शिक्षण देऊन शिक्षण संपल्यावर त्यास चरितार्थाच्या बाबतींत स्वावलंबी

करणें. उद्योगाची किंवा व्यवसायाची विद्यार्थ्यांस लहानपणापासून गोडी लागली पाहिजे. हातानें काम करणें, कांहीं कृति निर्माण करण्याची गोडी लागून त्यासाठीं लागतील ते कष्ट करणें, या संवयी विद्यार्थ्यांस लागल्या पाहिजेत. शारीरिक कष्टांत कांहीं कमीपणा आहे अशी विकृत वृत्ति आधुनिक तरुणांत दिसते. त्यामुळें बुद्धिजीवी आणि श्रमजीवी असे भेद निर्माण झाले आहेत. ( खरे म्हणजे खरोखर बुद्धिजीवी असेहि थोडेच असतात !) ही विकृति नाहींशी झाली पाहिजे.

यासाठीं प्राथमिक शिक्षणापासून पुस्तकांच्या अभ्यासाबरोबर एखाद्या व्यवसायाचें शिक्षण द्यावयाचे असतें. ' व्यवसायद्वारा शिक्षण ' या नव्या शिक्षणपद्धतीसच वर्धाशिक्षण-योजना, ' बेसिक एज्युकेशन ' असें नांव मिळालें आहे.

विषय म्हणून व्यवसायाची निवड करतांना विद्यार्थ्यांची नैसर्गिक आवड आणि त्याच्या भोंवतालच्या वातावरणांत परिचित असलेला व्यवसाय या दोन्ही दृष्टींनीं विचार करावयास पाहिजे. त्यामुळें निरनिराळ्या प्रांतांतील औद्योगिक शाळांत निरनिराळे व्यवसाय शिकविले पाहिजेत. शेतकऱ्याच्या मुलाला शेतीचें, आणि सुताराच्या मुलाला सुतारकीचें शिक्षण देणें जास्त फायदेशीर आहे. त्यामुळें तो मुलगा लवकरच आपल्या बापाच्या व्यवसायांत मिळवता सहकारी होऊं शकतो. देशाच्या परिस्थितीप्रमाणें औद्योगिक शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविला पाहिजे.

औद्योगिक शिक्षणाचा आरंभ अप्रत्यक्षपणें शाळेंतच झाला पाहिजे. शालेय शिक्षण झाल्यावर एखाद्या विशिष्ट व्यवसायाचें शिक्षण देणाऱ्या संस्था पाहिजेत. ज्यांना विश्वविद्यालयाचें शिक्षण घेतां येत नाहीं त्यांना प्रत्यक्ष अनुभवानेंच व्यवसायाची माहिती व्हावी आणि पदवीवांचून स्वावलंबनानें पोट भरतां यावें हा औद्योगिक शिक्षणाचा हेतु असतो. त्यांत शास्त्रीय ज्ञानास मज्जाव असतो असें नाहीं. पण शास्त्रज्ञ होणें हें ध्येय नसतें. शास्त्रज्ञ, संशोधक यांचे मदतनीस निर्माण करण्याचें कार्य औद्योगिक शिक्षणानें होतें.

राष्ट्रीय सरकार नव्या शिक्षणयोजनेंत विविध व्यवसायांत अशा शिक्षणाची सोय करीत आहे. मच्छीमारीपासून तों मधमाशा पाळण्याच्या व्यवसायापर्यंत शिक्षणाची सोय होत आहे. उद्योगप्रधान जगांत इतर राष्ट्रांबरोबर मानानें जगण्यासाठीं आपल्या देशांत हजारों कारखाने काढले पाहिजेत. अशा कारखान्यांतून शास्त्रज्ञांच्या नेतृत्वाखालीं हजारों विद्यार्थी काम करून स्वाभिमानानें पोट भरूं लागल्याचें दृश्य लवकरच दिसूं लागेल.

---

## ७४ : : साक्षरता-प्रसार

आपल्या देशाच्या परिस्थितीचा विपरीतपणा अनेक बाबतींत दिसून येतो. एकीकडे सुशिक्षितांत बेकारी वाढत आहे तर दुसरीकडे शेंकडा ९० लोक निरक्षर आहेत ! म्हणजे शें. १० लोक सुशिक्षित झाले तेहि दीडशें वर्षांत ! पण त्यांच्याहि पोटापाण्याची तरतूद होऊं शकत नाहीं !

पण हे मूठभर सुशिक्षित आज ना उद्यां कांहीं तरी मार्ग काढूं शकतात. त्यांचें थोडेंफार ज्ञान अगदींच निरुपयोगी ठरत नाहीं. परंतु निरक्षरांचा जो प्रचंड वर्ग आहे त्यांचें आयुष्य जवळ जवळ वायांच गेल्यासारखें झालें आहे. धडधाकट माणसें परंतु निरक्षर राहिल्यामुळें त्यांची पदोपदीं कुचंबणा होते. कारण आज सर्व क्षेत्रांत ज्ञान वाढत आहे आणि प्रत्येक राष्ट्राचा जगांतील इतर राष्ट्रांशीं जास्त जास्त संबंध येत आहे. जगांतील एखाद्या देशांत झालेल्या घडामोडींचा दूरवर परिणाम होतो. नुकतेंच झालेलें युद्ध पहा. शेंकडों मैल दूर असलेल्या युद्धाचे आघात खेड्यापाड्यांपर्यंत, जगाच्या कानाकोंपऱ्यापर्यंत झाल्यावांचून राहिले नाहींत.

इतर वेळींसुद्धां सुधारलेल्या जगाशीं पदोपदीं संबंध येतो. पत्र, तार, आगगाडी, मोटार या गोष्टींचा आतां आपल्या खेडुतांच्याहि जीवनाशीं कोठें ना कोठें संबंध येतो. अशा जगांत वावरणाऱ्या निरक्षरांचे पदोपदीं हाल होतात. त्याला कोणीं पत्र पाठविलें तर तें वाचतां येत नाहीं आणि कोणाला पत्र लिहावयाचें असलें तर त्याला चार लोकांच्या हातापायां

पडावें लागतें. सावकार त्याचा आंगठा घेतो आणि जी प्रॉमिसरी नोट त्याला वाचतां येत नाहीं तिची फेड करण्यास तो बांधला जातो. सगळीकडे त्याची हरतऱ्हेनें फसवणूक होते. प्रौढ आणि इतर दृष्टीनें कर्तबगार अशीं माणसें केवळ निरक्षरतेमुळें वायां जाणें हें समाजाच्या दृष्टीनें मोठें नुकसान आहे.

हें नुकसान अंशतः तरी भरून यावें हा साक्षरता-प्रसाराचा हेतु असतो. ज्यांना शिकण्याच्या वयांत शिक्षण घेतां आलें नाहीं आणि प्रौढपणीं शिक्षणाच्या शालेय पद्धतीनें शिक्षण घेण्यास वेळ नाहीं त्यांना ज्ञान देणें हें साक्षरताप्रसाराचें ध्येय आहे. निदान सही करतां येणें आणि केलेली सही वाचतां येणें, एवढें तरी अक्षरज्ञान निरक्षर प्रौढांस मिळालें पाहिजे.

असें शिक्षण देण्यासाठीं प्रौढ निरक्षरांचे पोटाचे व्यवसाय संभाळून त्यांना शिकतां येईल अशा वेळीं आणि अशा पद्धतीनें शिकवावें लागतें. प्रौढांना शिकविणें सोपें आहे नि अवघडहि आहे. त्यांना अनुभव बराच असल्यानें बऱ्याच गोष्टी लवकर समजतात. परंतु ज्या गोष्टी लहान वयांत लवकर अंगवळणीं पडतात त्या प्रौढपणीं येणें जड जातें. या दोन्ही गोष्टी साक्षरताप्रसारांत लक्ष्यांत घ्यावयाच्या असतात. त्यांच्यासाठीं निराळीं पुस्तकें लिहिलेलीं असतात. देशांतील भयंकर अज्ञान नाहींसें करण्यासाठीं सरकार मुद्दाम हीं कामें करीत आहे. निरक्षर राहिलेल्यांना साक्षर करीत असतां निरक्षरांची संख्या वाढणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. त्यासाठीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें करावें लागतें. शाळेंत जाण्याच्या वयांत मुलांना शाळेंत न पाठविणाऱ्या पालकांस सरकारनें शिक्षा करण्याचें ठरविलें आहे.

देशांतील प्रत्येक ' साक्षर ' माणसानें आपल्या आसपासच्या निदान दहा तरी निरक्षरांस साक्षर करण्याचा निश्चय केला आणि तो एखाद्या व्रतासारखा पाळला तर आपल्या देशावरचा हा मोठा कलंक सहज धुऊन निघेल.

## ७५ : असाध्य तें साध्य करितां सायास।
## : कारण अभ्यास तुका म्हणे॥

मोटमोठ्या माणसांचीं चरित्रें वाचतांना आपल्या मनांतील त्यांच्या-विषयींचा आदर क्षणोक्षणीं दुणावत जातो. त्यांच्या आयुष्यांतील जवळ-जवळ प्रत्येक गोष्ट अद्भुत वाटूं लागते. आपण आणि चरित्रनायक यांची मनांतल्या मनांत तुलना चालू असते. 'कोठें आपण आणि कोठें हा चरित्रनायक' असे उद्गार अनेक प्रसंगीं तोंडांतून बाहेर पडतात.

सर्वसामान्य माणसास थोर पुरुषाविषयीं हें जें आश्चर्य वाटतें त्यामुळें त्यांना शेवटीं देवपण प्राप्त होतें. राम, कृष्ण, या पौराणिक काळांतील विभूती तुमच्याआमच्यासारख्याच 'माणूस' होत्या असें इतिहास सांगत असला तरी आज आपण त्यांना देवच मानतों. पुराणकालाचें एक असो, परंतु अगदीं अर्वाचीन इतिहासांतल्यासुद्धां व्यक्ती आपण देवपदावर स्थापन करूं लागलों आहोंत. गौतम बुद्ध, शंकराचार्य यांच्या जोडीला ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, शिवाजी या विभूती आपण स्थापन केल्या आणि लो. टिळक, महात्मा गांधी, यांचेंहि स्थान वरील देवमाणसांतच आपण योजिलें आहे.

थोर माणसांच्या कर्तृत्वानें थक्क होऊन त्यांना देव म्हणून वंदन करूनच आपण स्वस्थ बसलों तर त्यांचीं चरित्रें वाचण्याचा काय उपयोग ? त्यांच्या चरित्रांपासून आपणांस कांहीं स्फूर्ति मिळाली पाहिजे. आपल्यामध्यें तसें कांहीं करण्याचें कर्तृत्व आलें पाहिजे. त्यासाठीं आवश्यक असा आत्म-विश्वास निर्माण झाला पाहिजे. त्या विभूतींनीं इतरांना धैर्य यावें म्हणून तर स्वतः कृति करून आदर्श दाखविला. स्वतःस देवत्व मिळविण्यासाठीं त्यांनीं अनेक हालअपेष्टा सोसल्या नाहींत.

त्यांच्या चरित्रापासून त्यांनीं केलेल्या कृत्यांसारखीं कृत्यें करण्याचा मार्ग आपणांस कळला पाहिजे. त्यासाठीं आश्चर्य बाजूस ठेवून त्यांच्या चरित्राचा अभ्यास केला पाहिजे. असा अभ्यास करूं लागल्यानंतर आपणांस त्यांच्या

कर्तृत्वाचें रहस्य कळूं लागतें. तें रहस्य म्हणजे कोणत्याहि कार्यासाठीं त्यांनीं केलेली तपश्चर्या. इतरांना असाध्य वाटणारी गोष्ट त्यांनीं साधली, सिद्ध केली. इतकेंच नव्हे, ती कोणत्या मार्गानें साधतां येतें, साध्य होते तें प्रत्यक्ष आपल्या आचरणानें दाखविलें.

शिवाजीमहाराजांचेंच उदाहरण पहा. महाराष्ट्रास स्वतंत्रपणें जगतां येईल अशी कोणाला कल्पनासुद्धां नव्हती. मोठमोठे शूर आणि मुत्सद्दी यावनी सत्तेची सेवा करीत पराक्रम दाखवीत होते. तें परसत्तेचें जोखड झुगारून देणें अशक्य आहे, असाध्य आहे, असेंच सर्वांना वाटे. शिवाजी-महाराजांनीं तें सिद्ध केलें. कशाच्या जोरावर? मूठभर मावळ्यांतून त्यांनीं अजिंक्य सेना निर्माण केली. तानाजी, बाजीसारखे शूर वीर निर्माण केले. आणि अव्याहत झगडत राहून शेवटीं रायगडावर महाराष्ट्राच्या स्वराज्याचा झेंडा फडकविला ! शिवाजीमहाराजांच्या जीवनांतील फक्त विजयाकडेच पाहिलें तर तो एक चमत्कार वाटतो. परंतु त्या विजयाच्या मागील पराक्रम म्हणजे त्यांनीं अखंड केलेली तपश्चर्या पाहिली कीं, त्यांचा विजय हें त्या तपश्चर्येचें फल आहे हें आपणास कळतें. ती तपश्चर्या, तो अभ्यास हेंच असामान्य माणसाच्या असामान्यत्वाचें रहस्य आहे. एखादा संशोधक एखादें तत्त्व शोधण्यासाठीं, एखादा सिद्धांत सिद्ध करण्यासाठीं वर्षानुवर्षें अहोरात्र झटत असतो. इतरांना असाध्य वाटलेली गोष्ट त्याला साधावयाची असते. त्याचा तो प्रयत्न सामान्य लोकांस वेडयासारखा वाटतो. लोक त्याला तोंडावरसुद्धां वेडा म्हणतात. परंतु शेवटीं त्या संशोधकानें यश मिळविलें कीं, त्याच्या भोंवतीं तेच लोक जमूं लागतात. पंचमहाभूतांना माणसानें आपल्या सेवेस जुंपलें आहे तें अशा असामान्य वेड्यांच्या वेडाचेंच फळ नाहीं का ? शास्त्रीय संशोधकाप्रमाणेंच जगांतील तत्त्वज्ञानी, धर्मसंस्थापक यांनींहि असाध्याचा ध्यास धरून तें शेवटीं सिद्ध केलें !

हीं आणि अशीं अनेक उदाहरणें एकच गोष्ट सिद्ध करतात कीं, अभ्यासाच्या जोरावर, अविश्रांत तपश्चर्या केल्यास कोणतीहि असाध्य वाटणारी गोष्ट साध्य होते. मात्र त्यासाठीं लागणारे 'सायास' सोसण्याची तयारी पाहिजे. सायासानें वाल्याचा वाल्मीकि आणि नराचा नारायण होऊं शकतो.

## ७६ : : गुरु-सहवास

ज्ञानाचीं साधनें यंत्रयुगांत इतकीं वाढलीं आहेत कीं, ग्रंथ हेच आपले गुरु झाले आहेत. ग्रंथद्वारां कोणत्याहि विषयाचें ज्ञान अगदीं सहज होऊं शकतें. असा एकहि विषय आतां राहिला नाहीं कीं, ज्या विषयाचें संपूर्ण ज्ञान ग्रंथांनीं घेतां येत नाहीं. आपली लहर लागेल त्या वेळीं, इच्छा असेल त्या विषयाचा ग्रंथ काढावा. वाटेल तितका वाचावा. कंटाळा आला तर बाजूस टाकावा. पुन्हां पाहिजे त्या वेळीं तो ग्रंथ आपल्या सेवेस हजर आहे. अशा रीतीनें गुरुशिष्यांचे संबंध अगदीं बदललेले दिसतात. ग्रंथरूपी गुरुच आतां शिष्यांची 'सेवा' करण्यास तत्पर दिसतात. प्राचीन शिष्यांना बाराबारा वर्षें गुरुगृहीं रहावें लागे. गुरुजींची नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांचीहि ते सांगतील ती सेवा करावी लागे. अशी सेवा करीत असतां गुरुजी जेव्हां प्रसन्न होतील तेव्हां थोडेंफार ज्ञान मिळावयाचें ! या तपश्चर्येच्या पायीं ज्ञानपिपासू शिष्यांनीं किती खडतर तपश्चर्या केली त्याचीं उदाहरणें पुराणांतून वाचावयास मिळतात. तीं वाचतांना त्यांच्या गुरूपेक्षां त्या शिष्यांविषयींच कांहीं वेळां जास्त आदर वाटतो खरा ! पण प्रसंगीं प्राणहि अर्पण करावे इतकी त्या गुरूंची योग्यता त्यांच्या शिष्यांनींच मानिली आहे !

त्या गुरुसंस्थेचें महत्त्व आतां पूर्णपणें नाहींसें झालें आहे का ? ग्रंथांची उपयुक्तता पाहिली कीं, क्षणभर असें वाटतें खरें. परंतु प्रत्यक्ष अनुभव तसा नाहीं. आपापल्या विद्यार्थिदशेचीच आठवण करून पहा. आपणांस ज्ञान देणाऱ्या ग्रंथांबरोबर त्या त्या ग्रंथांच्या अभ्यासाच्या निमित्तानें ज्यांचा संबंध आला त्या गुरूजींची आठवण आपल्या मनांत राहिली नाहीं का ? त्यांच्या सहवासांत घालविलेले कांहीं क्षण तर जीवनांत अविस्मरणीय झाले नाहींत का ? ग्रंथ असूनहि त्या गुरुजीविषयीं आपणांस जो आदर वाटतो त्याचें कारण काय ?

ग्रंथ आणि गुरु यांची तुलना केली तर असें दिसेल कीं, ग्रंथ हे ज्ञानाचीं साधनें आहेत. गुरु हें ज्ञानाचीं स्फूर्तिस्थानें आहेत. गुरुजींच्या-

मुळें आपण ग्रंथांकडे वळतों. ग्रंथ स्वतः ‘ जड ’ आहेत. जो कोणी त्यांचा उपयोग करील त्यांना ते ज्ञान देतील. परन्तु शिष्याबद्दल अपत्याप्रमाणें वात्सल्य बाळगून त्याच्या ठिकाणीं जिज्ञासा निर्माण करण्याचें कार्य गुरू-शिवाय कोण करूं शकेल ? वाचकाच्या अज्ञानाबद्दल किंवा ज्ञानाबद्दल ग्रंथांना काय वाटणार !

ज्ञानप्राप्तीपेक्षांहि गुरुसहवासानें फार मोठा लाभ होतो. तो म्हणजे चारित्र्याचा. ज्ञानापेक्षा चारित्र्य श्रेष्ठ आहे. किंबहुना ज्यानें चारित्र्याची उभारणी होत नाहीं तें ज्ञान फुकट आहे. अशा निष्फळ ज्ञानाची गाढ-वाच्या पाठीवरील साखरेच्या गोण्यांबरोबर एका कवीनें तुलना केली आहे. आपल्याला ज्ञान देतां देतां तें ज्ञान प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचें अति-शय महत्त्वाचें कार्य गुरुसहवासानें होतें. चारित्र्याचा मूर्तिमंत आदर्श शिष्याच्या डोळ्यासमोर अहोरात्र असतो. त्याच्या दर्शनानें शिष्याच्या मनास चैतन्य प्राप्त होतें. त्याच्या सहवासानें त्याच्या जीवनाच्या मातीचें सोनें होतें. ‘फुलासंगें मातीस वास लागे’ याचा अनुभव गुरुसहवासांत येतो. अशा सहवासाची भरपाई जगांतील सर्व ज्ञानभांडारहि करूं शकणार नाहीं.

अशा चारित्र्यसंपन्न व्यक्तींच्या सहवासाचा भरपूर लाभ दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. त्यामुळें मानवजातीचें ज्ञान वाढूनहि संस्कृति-चारित्र्य मात्र हिणकस होत आहे. विविध कार्यक्षेत्रांत आदर्श चारित्र्याचीं मूर्तिमंत उदाहरणें डोळ्यासमोर असलीं तर त्याच्या सहवासानें भोंवतालचें वातावरण पवित्र होत असतें. तेथें अमंगलाचें मंगलांत रूपांतर होतें. आणि दुराचारी सदाचारसंपन्न होतो. साधुसंतांच्या सहवासाचें महत्त्व प्रत्यक्ष साधुसंतांनींच पदोपदीं गाइलें आहे. तें महत्त्व कोणत्याहि काळीं कमी होणार नाहीं. ‘सत्संगात् भवतिहि साधुता खलानाम्’ हें त्रिकालाबाधित सत्य आहे. तें नुसतें सुभाषित नाहीं.

---

## ७७ : अंधानुकरण

एका माणसाच्या घरांत एक अतिशय जुना आड होता. पिढ्यान्‌पिढ्या त्याच्या कुटुंबांतले लोक त्या आडाचें पाणी पीत होते. पुढें पुढें त्या आडाचें पाणी खराब झालें. तें बेचव लागूं लागलें. खराब लागूं लागलें. तरी त्या माणसानें त्याच आडाचें पाणी पिण्याचा आपला क्रम सोडला नाहीं. कोणी एक सूज्ञ त्यास सांगूं लागला, "पाणी खारट लागतें मग दुसरीकडचें पाणी कां घेत नाहीं?" तो गृहस्थ म्हणाला, "तातस्य कूपोऽयं! वाडवडिलांचा आड आहे ना हा! त्याचा अनादर कसा करावयाचा?" त्या माणसाची समजूत अशी कीं, वाडवडिलांनीं जें केलें तें कल्याणकारक असणारच! आपलें काम डोळे झांकून त्यांच्या पावलावर पाऊल टाकणें!

वरील माणसानें वाडवडिलांचें आंधळेपणानें अनुकरण चालविलें होतें. आदराविषयींच्या त्याच्या कल्पना विकृत होत्या. तशी विकृति अनेक माणसांच्या ठिकाणीं दिसते. आपल्याला हितावह वाटणाऱ्या गोष्टीविषयीं आपल्या मनांत आदर उत्पन्न होतो. कल्याणाच्या इच्छेनें आपण त्या गोष्टीचें अनुकरण करू लागतों. परंतु असें करतांना अनुकरणाच्या वेडापायीं स्वतःच्या कल्याणाचाच आपणांस विसर पडतो आणि केवळ अनुकरण करीत राहण्यांतच आपलें हित आहे अशी आपली समजूत होते. परंतु ज्या गोष्टीचें आपण अनुकरण करतों त्या गोष्टीची उपयुक्तता कालमाना-प्रमाणें बदलत असते हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. सर्वच गोष्टी सर्व काळीं सर्वांना कल्याणकारक नसतात. आपले ऋषिवर्य पूर्वज ज्या पद्धतीनें वागत होते ती पद्धति त्यांच्या काळीं अतिशय उपयुक्त ठरली. जीवनाच्या गरजा अतिशय थोड्या असल्यानें ध्यानधारणा, ईशचिंतन इत्यादि गोष्टींत त्यांचा काळ जात होता. तें जीवन कितीहि श्रेष्ठ असलें तरी आज त्याचें अनुकरण कितीसें शक्य आहे! आणि शक्य झालें तरी तें कितीसें कल्याण-कारक होईल? बदलत्या कालमानाचा विचार करतां पूर्वजांच्या दुर-भिमानानें त्यांचें आंधळेपणानें जे अनुकरण करतात ते आपल्या हातानें आपल्या जीवनाचा नाश करून घेतात.

पूर्वजांप्रमाणें वर्तमान कालांतील व्यक्तींचें अनुकरण करण्यांतहि हा आंधळेपणा अनेक व्यक्तींच्या ठिकाणीं दिसतो. ह्या आंधळेपणानें कांहीं व्यक्ति लहान तोंडीं मोठा घांस घेण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या व्यक्ती-विषयीं आदर वाटला कीं, आपणहि तसें व्हावें असें वाटूं लागतें. तसें होण्याच्या वेडानें अंधानुकरण सुरू होतें. प्रत्येकास दुसऱ्यानें केलेली प्रत्येक गोष्ट करतां येणें शक्य नाहीं याचा अंधानुकरणांत विसर पडतो. बगळ्या-सारखा रंग मिळविण्याच्या वेडानें कावळ्यानें आपलें अंग, दहा जन्म घासलें तरी त्याला कधीं बगळ्यासारखा शुभ्र रंग मिळवितां येईल का? अनेक गोष्टी कराव्याशा वाटल्या तरी ज्यानें त्यानें आपल्या कुवतीचा विचार केला पाहिजे. तेव्हां कशाचें अनुकरण करावें हा विचार आधीं केला पाहिजे.

अंधानुकरणानें अनुकरणीय व्यक्तीलाहि कमीपणा येण्याचा धोका निर्माण होतो. एखाद्या पुढाऱ्याभोंवतीं जमा झालेले अनुयायी त्या पुढा-ऱ्याच्या कांहीं सामान्य गोष्टींचें अनुकरण करून स्वतःस मोठेपण आण-ण्याची धरपड करतात. त्या पुढाऱ्यासारखा पोषाख करणें हा अंधानुकरणा-चाच एक प्रकार आहे. केवळ पोषाखाच्या अनुकरणानें मोठ्या माणसाचे गुण आपल्या अंगीं कसे येतील? गांधीजींचा पंचा, आणि पंडित जवाहरलालजींचें जाकीट, या वस्तूंत का त्या विभूतींचें श्रेष्ठपण आहे? त्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार न करतां त्यांचें अंधानुकरण करणारे स्वतःचें हंसें करून घेतात. इतकेंच नव्हे, तर त्या त्या विभूतींनाहि कमीपणा आणतात. अनुकरणाचा मोह झाला असतां आपल्या आदरणीय व्यक्तीच्या आदरासाठीं तरी आपण अंधानुकरणापासून परावृत्त झालें पाहिजे. अंध अनुयायी हे उघड शत्रूपेक्षांहि भयंकर ठरतात. कारण शत्रु फार तर प्राण घेतो, परंतु अंध अनुयायी आपल्या पुढाऱ्यांचें कार्यहि मातीस मिळवितात!

---

## ७८ : : महागाई !

नुकत्याच संपलेल्या युद्धाविषयीं बोलतांना एक गृहस्थ म्हणाले, 'जे मेले ते खरे भाग्यवान्! जिवंत राहिले त्यांचे मात्र हाल कुत्रादेखील खाणार नाहीं!'

मृत्यूसुद्धां बरा वाटावा असे युद्धाचे परिणाम वर्णन करणारा वरील गृहस्थ महागाईविषयीं सांगत होता. त्याच्या मनांत असलेले विचार आणि त्याला आलेले अनुभव आज प्रत्येकास येत आहेत.

कोणत्याहि कुटुंबात जा. 'पैसा पुरत नाहीं' ही ओरड तेथें ऐकूं आल्यावांचून राहणार नाहीं. नुसत्या प्राप्तीचा विचार केला तर सर्वसाधारणपणें प्राप्तींत वाढ झालेली दिसते. 'महागाईभत्ता' पट्टेवाल्यापासून तों त्याच्या साहेबापर्यंत सर्वांस मिळतो. गिरणीमजुरांना तर पगारापेक्षांहि महागाईभत्ता जास्त मिळत असल्याचीं उदाहरणें आढळतात. पूर्वीपेक्षां प्राप्ति वाढूनहि जो तो ओरडत आहे, 'पैसा पुरत नाहीं!'

याचें कारण प्राप्तीच्या वाढीच्या मानानें वस्तूंच्या किंमती कितीतरी पटीनें वाढल्या आहेत. ज्यांच्यावर चार-दोन माणसांचें पोषण करण्याची जबाबदारी आहे अशा कुटुंबवत्सल माणसास याची पदोपदीं जाणीव होते. त्याचें वात्सल्य जवळ जवळ नामशेष होण्याची वेळ आली आहे. वात्सल्यामुळें त्याच्या यातनांत भरच पडत असते. आपल्या घरच्या माणसांना पुरेसें अन्नवस्त्रहि देतां येऊं नये यापेक्षां जास्त दुःखदायक विचार कोणता असेल?

समाजांतील कोणताहि वर्ग या यातनांतून सुटलेला नाहीं. धनवंतांना सुद्धां महागाईच्या यातना भोगाव्या लागत आहेत. संपत्तीच्या जोरावर अतिशय चैनींत, निर्धास्तपणें जगण्याची संवय झालेल्यांनाहि पैसा असूनहि एखादी गोष्ट मिळेनाशी झाली तर त्यांना किती यातना होत असतील! कारण एखादी वस्तु महाग होतां होतां बाजारांतूनच अदृश्यच होणें हा महागाईचा अगदीं आधुनिक प्रकार आहे! बंगालमधील दुष्काळांत

अन्नाचा तुटवडा पडल्यावर पैसे जवळ असणाऱ्यांनाहि अन्नावांचून चरफडावें लागलें ! 'काळा बाजार' हा एक भयंकर शब्द महागाईच्या अगदीं नव्या प्रकारानें जन्मास आला आहे.

वस्तूंचे भाव नेहमीं अस्थिर असलेले आणि वाटेल त्या प्रमाणांत ते एकदम वाढतां वाढतां शेवटीं वस्तूच दडाव्यात असे प्रकार चमत्कारासारखे होत आहेत. बाजाराच्या या प्रचंड घडामोडींत मूठभर श्रीमंत कांहींसा टिकाव धरूं शकतात. मिळेल त्या भावांत त्यांना वस्तू सांठवितां येतात. परंतु गरीबांनीं काय काय सांठवावें ? अगदीं कमींत कमी लागणाऱ्या वस्तूसुद्धां त्यांना मिळवितां येत नाहींत. जवळ जवळ अर्धपोटींच राहणारे लोक कशाचा आणि कसा सांठा करणार ? महागाईच्या दिवसांत त्यांना आपल्या अगदीं आवश्यक गरजांनासुद्धां मुकावें लागतें. भात आहे तर भाजी नाहीं आणि सदरा आहे तर कोट नाहीं, अशी त्यांची कुतरओढ होत असते ! अगदीं कनिष्ठ दर्जाचेंहि अन्न मिळेनासें झाल्यामुळें कित्येक गरीबांनीं आतांपर्यंत कधींहि न खाल्लेला पाला खाण्यास आरंभ केला आहे. शांततेच्या वेळीं सुद्धां ज्यांना पोट भरण्यासाठीं अहोरात्र खपावें लागतें. त्यांचें अशा महागाईत काय होत असेल त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्यांचें जीवन 'राहणें' सुद्धां असह्य होतें मग ते स्वतः कसे जगत असतील ?

---

## ७९ : चातुर्यें शृंगारें अंतर, वस्त्रें शृंगारें शरीर

परमेश्वरानें आपणांस दिलेला देह सजवून नटवून नैसर्गिक स्वरूपांत कांहीं भर घालावी असें वाटणें हा माणसाचा स्वभावच दिसतो. अलंकारांची हौस ही मनुष्यजातीइतकी प्राचीन आहे. अगदीं रानटी अवस्थेंत असतांना सुद्धां माणसांमध्यें नटण्याची हौस होती. झाडाच्या सालीचीं वस्त्रें करीत असतां झाडाच्या पानांचा एखादा झुपका अंगावर कोठेंतरी खोवून माणूस आपलें शरीर अलंकृत करी. मारलेल्या पशूचें मांस खाऊन, त्याच्या हाडांचीं हत्यारें करावींत आणि हाडाचेच कांहीं तुकडे घासून माळेंत गोवून

गळ्यांत घालावेत हा प्रकार अद्यापहि कांहीं रानटी जातींत आढळतो. शरीर सजविण्यासाठीं नाना तऱ्हा करण्याचा प्रघात अनादि कालापासून चालत आहे. झाडांच्या फांद्या, पानें, फुलें घालणें, रंगीबेरंगी दगडांच्या माळा घालणें, पक्ष्यांचीं पिसें खोवणें, अंगाला रंग फासणें, नाकास-कानांस भोकें पाडून कांहीं पदार्थ अडकविणें हे प्रकार अलंकृत होण्यासाठीं माणूस करीत आला आहे. वस्त्र विणण्याची कला येऊं लागल्यावर माणसाच्या हौशींत आणखी भर पडली !

पण जीवनाचें सौंदर्य शरीर नटविण्यावर आहे कीं मन सजविण्यावर आहे ? मनाचा, अंतःकरणाचा विचार सोडला तर पशु आणि माणूस यांत काय फरक आहे ? पोळ्याच्या दिवशीं बैलाला नाहीं का आपण सजवीत ? दसऱ्याच्या दिवशीं घोड्याच्याहि गळ्यांत फुलांच्या माळा पडतात ! केवळ शरीर सजविणारा माणूस आणि माणसानें सजविलेला पशु यांत कांहीं अंतर नाहीं का ?

तें अंतर मनुष्याच्या अंतःकरणामुळें निर्माण होतें. सद्‌गुण हेंच जीवनाचें खरें सौंदर्य आहे. शरीराचा थाटमाट करण्याच्या भरांत माणसानें आपल्या अंतःकरणाची हेळसांड केली तर तो पशूपेक्षांहि हीन ठरेल. कारण अंतःकरणाच्या बाबतींत पशूकडून कांहींहि अपेक्षा नसते. पशूनें पशूसारखें वागावें यांत कांहींच गैर नाहीं. परंतु माणसानें आपलें मनुष्यत्व विसरणें पशुवृत्तीपेक्षांहि अधोगतीचें ठरतें.

हें मनुष्यत्व हाच जीवनाचा खरा अलंकार आहे. तें मनुष्यत्व मानवी शरीरावर अवलंबून नाहीं; त्या शरीरांतील अंतःकरणावर अवलंबून आहे. अंतःकरण चातुर्यानें अलंकृत करावें. चातुर्य हाच अंतःकरणाचा शृंगार होय. अंतःकरणास अलंकृत करणारें चातुर्य रामदासांनीं दासबोधांत विस्तारानें वर्णिलें आहे. 'चातुर्य' या शब्दांत समर्थांनीं जवळ जवळ सर्व गुणांचा समावेश केला आहे असें त्या चातुर्याच्या महतीवरून दिसून येतें.

'बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें' हें ज्याला साधेल तो चतुर ! यांत कोणत्या गुणाचा समावेश होत नाहीं ? जे सर्वांच्या अंतःकरणांत स्थान मिळवितात, जे ' मरणिं अमरता ' मिळवितात, ते सॉक्रेटिस-

सारखे लोक शरीरानें कुरूप होते. महात्माजींसारखे महात्मे शरीराच्या दृष्टीनें तर अगदींच किरकोळ आहेत–परंतु ते या देशाचेंच काय पण जगाचें, या युगाचें भूषण मानले जातात. त्याचें कारण त्यांचें अंतःकरणाचें सौंदर्य हेंच आहे.

'म्हणोनी दुसऱ्यासी सुखी करावें
तेणें आपण सुखी व्हावें'

हें चातुर्यरूपी सौंदर्याचें रहस्य त्यांच्या जीवनांत दिसत आहे.

चातुर्यानें जीवनास सौंदर्य आणण्याचें आणखी एक महत्त्व म्हणजे हें सौंदर्य मनुष्याधीन आहे. तें परमेश्वराच्या कृपेवर अवलंबून नाहीं.

' रूप लावण्य अभ्यासितां न ये
अवगुण सोडितां जाती । उत्तमगुण अभ्यासितां येती '

म्हणून चातुर्यरूपी साधनानें जे जन्मतः सुंदर असतील त्यांचें सौंदर्य जास्त खुलून दिसेल आणि ज्यांना देवानें कुरूप केलें आहे त्यांना जीवन सुंदर करितां येईल ! म्हणून,

अंतर्कळा शृंगारावी । नानापरी उमजवावी
चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ।
दोहींमध्यें कोण थोर । बरें पाहा.

---

## ८० : : थोर साहित्यिकाचा स्मृतिदिन

' काळ 'कर्ते हें नांव ज्यांच्या बाबतींत अनेक दृष्टींनीं सार्थ झालें आहे, त्या शिवरामपंत परांजपे यांचा गेल्या वर्षी झालेला स्मृतिदिन विशेष संस्मरणीय ठरला.

काळांतील निबंधांचे सर्व भाग इतक्या दिवस जप्त होते. ते कॉंग्रेस सरकारनें बंधमुक्त केल्यापासून काळाचें दर्शन घेण्याची अतिशय तीव्र इच्छा सर्वांच्या ठिकाणीं उत्पन्न व्हावी यांत कांहींच आश्चर्य नव्हतें. तो योग

श्री. य. गो. जोशी यांनीं बंधमुक्त काळ प्रकाशित करून जुळवून आणला. काळांतील निबंध प्रसिद्ध होणार हें जाहीर झाल्याबरोबर लोकांनीं भराभर आपलीं नांवें नोंदविलीं आणि ते ग्रंथांची वाट पहात बसले. वरील स्मृतिदिनाच्या प्रसंगीं काळास पुन्हां प्रकाश दिसला.

कै. शिवरामपंतांचें लौकिक जीवन जगरहाटीप्रमाणें समाप्त झालें तरी त्या दिवशीं काळाच्या रूपानें तें पुन्हां अवतीर्ण झालें असेंच सर्वांना वाटलें.

वरील स्मृतिदिनासाठीं प्रा. पोतदार, प्रा. श्री. म. माटे, प्रा. न. र. फाटक, श्री. शि. ल. करंदीकर यांची वक्ते म्हणून योजना होणें हाहि मोठा अपूर्व योग होता.

सभेच्या आरंभीं काळांतील निबंधांचे प्रकाशित भाग टेबलावर ठेवण्यांत आले त्या वेळीं क्षणभर श्रोत्यांचीं मनें आदरानें ओथंबलीं. ग्रंथरूपानें अण्णासाहेबांचें दर्शन घेत असतां त्यांची ती भव्य, तेजस्वी मूर्ति त्या सभागृहांत प्रत्येकाच्या मनश्चक्षूंसमोर दिसूं लागली. तेथें ठेविलेल्या प्रतिमेकडे प्रत्येकजण एकाग्रपणें पाहूं लागला.

नंतर एकेका वक्त्यानें आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेनें काळकर्त्यांचें अंतरंग श्रोत्यांसमोर उलगडून दाखविलें. प्रत्येकास शिवरामपंतांच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ झाला होता. त्या सहवासाच्या स्मृति त्यांच्या अंतःकरणांत उचंबळत होत्या आणि तों तों त्यांच्या वाणीस तेज चढत होतें. त्या प्रभावी वक्त्यांनीं स्वतःच्या अनुभवाचा निर्वाळा देऊन काळकर्त्यांच्या सामर्थ्याचें विवेचन केलें. तें ऐकतां ऐकतां कित्येक वेळां असें वाटे कीं, आपण प्रत्यक्ष शिवरामपंतांचेंच दर्शन घेत आहोंत. परंतु शिवरामपंतांच्या शरीराच्या दर्शनापेक्षां त्यांच्या अंतरंगाचें दर्शन होणें हें अपूर्व भाग्य आहे. तें भाग्य वरील स्मृतिदिनप्रसंगीं त्या वक्त्यांच्यामुळें सर्वांस लाभलें. एक प्रकारें असें वाटलें कीं, शिवरामपंतांचें प्रत्यक्ष दर्शन आणि सहवास ज्यांना लाभला त्यांच्यापेक्षांहि आपण भाग्यवान् ठरलों. कारण त्या दिवशीं शिवरामपंतांच्या अंतरंगाचें दर्शन घडविणारे ते वक्ते लाभले.

लेखणीच्या पराक्रमाच्या तात्त्विक गोष्टी आपण पुष्कळ ऐकतों. शिवरामपंतांच्या लेखणीच्या पराक्रमाची प्रत्यक्ष कथा त्या दिवशीं ऐकावयास

मिळाली. परतंत्र देशांत जीवनाचा सर्वस्वीं कोंडमारा होत असतो. अशा वेळीं सरकारी नियंत्रणाची टांगती तलवार डोक्यावर असतांना ज्यांनीं तलवारीलाहि लाजवितील असे पराक्रम लेखणीनें आणि वाणीनें करून दाखविले त्यांत शिवरामपंतांची गणना होते. सरकारी पहारा चुकवून लोकांच्या अंतःकरणांत पारतंत्र्याबद्दल चीड आणि स्वातंत्र्याबद्दल उत्कंठा निर्माण करण्यांत शिवरामपंतांच्या लेखणीचे जे गुणविशेष प्रकट झाले ते असंख्य उदाहरणांनीं त्या सभेंत ऐकावयास मिळाले.

सभेच्या शेवटीं प्रा. पोतदार यांनीं काळांतील एक उतारा, प्रत्यक्ष शिवरामपंत जसे बोलत तसा वाचून दाखविला. शिवरामपंतांचें लिहिणें हा वक्तृत्वाचाच एक अवतार असे, हें प्रा. पोतदार यांनीं जास्त स्पष्ट केलें.

काळांतील निबंध आतां वाचीत असतांना त्या ओळींतून शिवराम-पंतांचाच आवाज ऐकूं येऊं लागतो अशी विलक्षण तन्मयता त्या ग्रंथांच्या वाचनांत अनुभवास येते. ही तन्मयता त्या स्मृतिदिनाच्या सभेंत ऐकलेल्या व्याख्यानांनीं निर्माण केली.

काळासारखें वाङ्मय कसेंहि वाचलें तरी त्याच्या प्रभावाची जाणीव होतेच. परंतु योग्य पार्श्वभूमि निर्माण झाल्यानंतर त्या वाङ्मयाचा प्रभाव पूर्णपणें अनुभवास येतो. ती पार्श्वभूमि वरील स्मृतिदिनाच्या सभेंत निर्माण झाली. म्हणून तो स्मृतिदिन सर्वांना शिवरामपंतांइतकाच अविस्मरणीय वाटावा यांत आश्चर्य नाहीं.

---

## ८१ : हवाई हल्ला ( काल्पनिक वर्णन )

युद्ध सुरू झाल्यावर जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर त्याचा परिणाम दिसूं लागला. आभाळांत कोणत्यातरी कोपऱ्यांत काळे ढग दिसूं लागावेत आणि हळूं हळूं त्यांनीं सर्व आभाळ व्यापून टाकावें तसें युद्धाचें झालें होतें. गप्पांमध्यें युद्ध हाच मुख्य विषय होऊन बसला. 'जर्मनी आला

आणि जपान गेला' याखेरीज दुसरा विषयच उरला नव्हता. वर्तमानपत्रांना तर असें होऊन गेलें होतें कीं, युद्धाबद्दल किती लिहावें नि किती लिहूं नये !

दिवसा मिळतील तेवढीं वृत्तपत्रें वाचून मी संध्याकाळीं पुन्हां जादा अंकहि घेत असें. एक दिवस असाच एक जादा अंक मिळाला. एका भयंकर हवाईहल्ल्याची बातमी त्यांत छापली होती. त्या हल्ल्यांत सांपड-लेल्या आणि मोठ्या सुदैवानें वांचलेल्या बातमीदारानेंच स्वतः ती कळ-विली होती. त्यामुळें अस्सल 'सरकारी' बातमीपेक्षां मला ती जास्त जिव्हा-ळ्याची वाटली.

रात्रीं जेवण झाल्यावर मी तो खास अंक घेऊन वाचीत पडलों. मला तर कांहीं वेळानें वाचवेनासें झालें तें वर्णन. अंक खालीं ठेवला तरी डोक्यांत आवाज घुमूं लागले. त्यांतच मी झोंपीं गेलों. मनीं वसे तें स्वप्नीं दिसे, या म्हणीचा मला त्या दिवशीं भयंकर अनुभव आला.

मी कोठें तरी लांब फिरावयास गेलों. गांवाच्या किती दूर गेलों तें माझें मलाच कळेना. पण मला एवढें कळत होतें कीं, मी आपला सारखा चाल-तोंच आहें. चालतां चालतां एकदम कांहीं विचित्र आवाज ऐकूं येऊं लागला. प्रथम वाटलें सिंहाची गर्जना असावी. पण लवकरच मीं ओळ-खलें कीं, हा भयसूचक भोंगा वाजत आहे. मीं कान टवकारून ऐकलें. आवाज सारखा होत होता. अर्थात् अगदीं नक्कीच, हवाई हल्ल्याची इशारत होती ती.

आणि मग मी सारखा पळत सुटलों. पायांत कुठून बळ आलें इतकें कोणास ठाऊक ! जेमतेम गांव गांठलें. गांवांत एकसारखी धांवपळ चालू झाली. पोलादी टोप्या घातलेले लोक शिट्या वाजवीत हिंडत होते. लोकांना ते ताबडतोब लपण्यास सांगत होते. गांवांत हल्ल्यासाठीं निवाऱ्याच्या जागा केल्या होत्या. मी पटकन् त्यांतल्या एका भुयारांत घुसलों ! माणसांची प्रचंड गर्दी तेथें होती. कोणी मोठमोठ्यानें ओरडत होते; कोणी किंचाळत होते. आणि कांहींच्या तोंडून शब्दच निघेनासा झाला होता. सर्व भेदभाव

विसरून माणूस माणसाच्या सांत्वनासाठीं धांवत होता. गरीब-श्रीमंत, तरुण-वृद्ध, सर्व या एका संकटाच्या दडपणानें समान पातळीवर आले होते. कानांत कापसाचे बोळे घालून कांहीं बसले होते. कांहीं हातानें तोंड झांकून बसले होते. कांहीं तरुण मात्र याहि अनुभवांतील नावीन्य अनुभवीत होते. माझ्या खांद्यावर एका म्हाताऱ्यानें हात ठेवला. ओळख ना देख. मी त्याचें सांत्वन करूं लागलों !

इतक्यांत बाहेर धुमधडाका सुरू झाला. इमारती कोसळत होत्या. आंतील माणसें चेंगरत असावींत असें त्यांच्या किंकाळ्यांवरून स्पष्ट कळत होतें. त्या आवाजांनीं आमच्या मनासमोर जीं भयंकर दृश्यें उभीं राहिलीं त्यामुळें आमची वाणी बंद पडली. तळघरांत एकदम स्मशानशांतता झाली. कांहीं फक्त डोळे फाडून पाहतच राहिले. कांहींनीं आपलीं तोंडें गुडघ्यांत घट्ट धरून ठेविलीं ! प्रत्येकाच्या मनांत काय ब्रह्मांड उभें राहिलें असेल तें ज्याचें त्याला सुद्धां सांगतां येणार नाहीं. मला असें वाटलें कीं, मी त्या गांवीं एकटाच आहें. माझे नातलग गांवांत नाहींत. मी तळघरांत सुरक्षित आहें !

पण इतक्यांत त्या तळघराचें वरचें छप्पर—हो छप्परच—पाहतां पाहतां खालीं येऊं लागलें. आणि शक्य तितक्या कर्कशपणें मीं किंचाळी मारून हातांनीं तोंड झांकून घेतलें ! पुढें कांहीं आठवत नाहीं. कारण कांहीं झालेंच नाहीं. स्वप्न तेथेंच संपलें.

माझी आरोळी ऐकून बाबा धांवत आले;मला ते हलवून उठवीत होते. समोरच्या फळीवरचीं सर्व पुस्तकें खालीं कोसळलीं होतीं. मांजराचा पराक्रम असावा बहुतेक !

हवाई हल्ल्याचा 'फुकट' अनुभव मला मिळाला तो हा असा. पण स्वप्नास कारण झालेल्या क्षुद्र घटना सोडल्या तर स्वप्नांत कांहीं काळ अनुभवलेल्या यातना मात्र खऱ्याच होत्या. जेथें हें प्रत्यक्ष दररोज घडत असेल त्या ठिकाणचे लोक काय करीत असतील ?

---

## ८२ : प्रकाशनियंत्रणांतील गंमती

प्रत्यक्ष रणांगणांवर जे कांहीं प्रकार होत असतील त्यांचे कांहीं नमुने रणांगणापासून शेंकडों मैल दूर असणाऱ्या जनतेच्या सुद्धां अनुभवास येतात. त्यांत प्रकाशनियंत्रण हा एक नमुना आहे. रात्रीच्या वेळीं शत्रूला आपली छावणी दिसूं नये म्हणून तीं पूर्ण अंधारांत दडवून ठेवावी लागते. विशेषतः विमानें टेहळणी करूं लागल्यानें ही गोष्ट फारच आवश्यक झाली. पण युद्धाची व्याप्ति जों जों वाढूं लागली तों तों सगळीकडे छावणींचेंच वातावरण निर्माण होऊं लागलें. नागरिकांवर नाहीं नाहीं तीं नियंत्रणें बसूं लागलीं. प्रत्येक ठिकाण हें वाटेल त्या क्षणीं प्रत्यक्ष आघातांत सांपडेल असें गृहित धरून युद्धविषयक हालचालींची रंगीत तालीम गांवोगांवीं सुरू झाली. त्यांतच प्रकाशनियंत्रण आलें.

आम्हीं इतर गांवांतील हकीकती ऐकत होतों, आणि स्वतःला सुखी समजत होतों. विशेषतः रात्रीं दिवे लावून घरांत बसतांना आम्हांला वाटे, "कांहीं ठिकाणचे लोक बिचारे या वेळीं अंधारांत बसले असतील! काय भयंकर शिक्षा आहे ही! जागेपणीं अंधारांत बसावयाचें!"

पण एक दिवस आमच्या गांवावर हें नियंत्रण आलें! ज्या दिवशीं संध्याकाळपासून हें नियंत्रण सुरू होणार होतें त्या दिवशीं संध्याकाळीं कितीतरी लवकर मी घरीं आलों आणि आधीं माझ्या टेबलावरचा दिवा लावला. त्याच्यावर असलेलें सुरेख आच्छादन काढलें आणि बाहेर थोडा प्रकाश होता तरी मी माझ्या त्या आवडत्या दिव्याच्या तेजस्वी स्वरूपाकडे पाहतच राहिलों! ज्यानें विजेचा दिवा शोधून काढला त्या संशोधकाची मला आठवण झाली. त्यानें आम्हांला प्रकाश दिला आणि आम्हीं त्या प्रकाशावर नियंत्रण घालणारे करंटे!

मग मोठ्या कष्टानें बाजारांतून आणलेली 'काळी टोपी' त्या दिव्यावर चढविली! कांहीं वेळानें अंधार पडला. मी रस्त्यावरची गंमत पाहण्यासाठीं बाहेर पडलों. रस्त्यावरच्या प्रत्येक दिव्यावर ढांपणें होतीं. 'दिव्याखालीं अंधार,' असें म्हणण्याऐवजीं आतां दिव्यावर अंधार होण्याचे दिवस आले

होते ! मला मौज वाटली ती ही कीं, आधींच आमच्या म्युनिसिपालिटीची प्रकाशव्यवस्था ती काय ? तिच्यावर नियंत्रणाची जरूरच नाहीं मुळीं ! गांवांत कित्येक भाग असे आहेत कीं, तेथपर्यंत म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या प्रकाशाचा किरणहि कधीं पोहोंचला नाहीं !

मी बराच वेळ असा भटकत होतों. सगळीकडे एक प्रकार. उजेड दिसावयाचा पण दिवा दिसायचा नाहीं. त्यासाठीं लोकांनीं अनेक युक्त्या केल्या होत्या. दिव्याची ज्योत रस्त्यावरून दिसूं नये म्हणून एक गृहस्थ स्वतः रस्त्यांत येऊन घरांतला दिवा पाहत होता आणि तेथून घरांतल्या माणसांना सांगत होता, " थोडा खालीं ओढा. थोडा खालीं ! "

आमच्या दिव्यांची ही मुस्कटदाबी कांहीं दिवसांनीं आमच्या अंगवळणीं पडली. परन्तु त्यानंतर एक भयंकर हुकूम जारी झाला. रात्रीं कांहीं वेळानंतर प्रकाश मुळींच ठेवावयाचा नाहीं ! कोठें म्हणून प्रकाशाचा किरण दिसतां कामा नये !

त्या हुकुमानें मात्र जितका त्रास झाला त्यापेक्षां गंमतीच जास्त झाल्या. रात्रभर भटकणारे असे लोक असतात त्यांचे फार हाल झाले. मला या लोकांचें कित्येक वेळां मोठें नवल वाटे. रात्रीं केव्हांहि पहा. कांहीं लोक तरी अगदीं भर चौकांत जणूं काय फिरावयास चालल्यासारखे हिंडतांना दिसतात. त्यांतले कांहीं बिचारे असे असतील कीं, त्यांना डोकें टेकावयासमुद्धां कोठें जागा नसते. ते रस्त्यावरच्या दिव्याच्या सोबतीनें वेळ काढतात आणि मग त्या दिव्याखालींच कोठें तरी थोडा वेळ लवंडतात !

ते लोक आतां भुतासारखे हिंडत किंवा कोठें तरी दबा धरल्यासारखे बसून रहात. कांहीं लोकांच्या झोंपाच उडाल्यासारखें झालें. विचित्र अंधारांत एकमेकांचें तोंड न पाहतां हिंडण्याची मौज अनुभवास येऊं लागली. घरांत आणि विशेषतः चाळींत लोक जेवणखाण लवकरच उरकून, त्यांतल्या त्यांत उघाड्याच्या जागेवर जमत आणि युद्धाचीं रसभरित वर्णनें एकमेकांस ऐकवीत ! मला वाटतें, आभाळांतील ताऱ्यांकडे आणि नक्षत्रांकडे या दिवसांत आम्हीं जितक्या जिव्हाळ्यानें पाहूं लागलों तितकें पूर्वी

कधींहि पाहिलें नसेल. माणसाचे हात आभाळापर्यंत पोहोंचले नाहींत हें नशीबच म्हणावयाचें ! नाहींतर त्यानें परमेश्वरावर सुद्धां प्रकाशनियंत्रणाचा हुकूम बजावला असता !

आपल्या हातांनीं घरांतले दिवे मालवून माणसें अंधारांत बसत. चार-चौघांच्या जमावांत एखाद्याला धूम्रपानाची लहर यावयाची ! त्याचे हाल विचारूं नका. रस्त्यावरच्या पोलिसांची नजर चुकवून तेवढ्यांतहि तोंड लपवून एखादा झुरका तो घ्यावयाचाच आणि त्या वेळीं त्याचें थोडेंसें मुख-दर्शन इतरांना व्हावयाचें !

अंधारांत घालविलेल्या त्या जीवनांतील गमतींनीं युद्धाच्या दिवसांतहि कितीतरी आनंद निर्माण झाला !

---

## ८३ : खानेसुमारीचें राष्ट्रास महत्त्व

संसार सुरळीत चालविणाऱ्या माणसास आपल्यावरील जबाबदारीची जाणीव ठेवावी लागते. घरांत माणसें किती आहेत, त्यांच्या गरजा काय आहेत, हें कळून त्यांच्याविषयींचीं आपलीं कर्तव्यें पार पाडण्याच्या योजना तो आंखीत असतो.

राष्ट्राच्या संसाराचाहि असाच विचार करावा लागतो. देशांतील लोकांच्या सुखसोईस पुरेसें उत्पादन होत आहे कीं नाहीं हें कळण्यासाठीं देशांतील लोकसंख्येची कांहीं ठराविक काळानें गणती करण्याची पद्धति आहे. तिलाच खानेसुमारी म्हणतात.

दर दहा वर्षांनीं हिंदुस्थानांत अशी मोजणी होत असते. या मोजणींत लोकसंख्येंत स्त्री आणि पुरुष असे दोन भाग पाडतात. त्याचप्रमाणें धर्म, वंश, व्यवसाय याप्रमाणेंहि विभागणी करण्यांत येते.

अशा या मोजणीनें सरकारला आणि समाजाचा विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांस अतिशय महत्त्वाची माहिती कळते. आपल्या देशाच्या नुसत्या लोकसंख्येचे आंकडेच कितीतरी उद्‌बोधक आहेत. १९०१ सालीं या

देशाची लोकसंख्या जवळजवळ ३० कोटि होती. ती ३० वर्षांत ३५ कोटींपेक्षांहि थोडी जास्तच भरली आणि १९४१ सालीं ती संख्या ४० कोटींपर्यंत गेली आहे. ४० वर्षांत देशांत १० कोटि लोक वाढले. त्या मानानें देशांत अन्नपाण्याची तरतूद झाली का ? जर ती झाली नसेल, देशाचें उत्पादन वाढलें नसेल तर लोकसंख्येची वाढ म्हणजे दारिद्र्याची आणि बेकारीची वाढ असाच त्याचा अर्थ होणार आणि प्रत्यक्ष तसेंच झालें आहे ! या संख्येच्या वाढीचा अर्थ सरकारच्या लक्षांत आतां येऊं लागला आहे. देशांत अनेक प्रकारचे व्यवसाय सुरू करण्याची आवश्यकता या लोकसंख्येच्या आंकड्यांनीं स्पष्टपणें पटविली आहे.

या लोकसंख्येची व्यवसायाप्रमाणें होणारी वांटणी अतिशय उद्बोधक आहे. १९२९ सालीं असें आढळून आलें कीं, या देशांत विणकामाच्या कारखान्यांत ( कापड, ताग, लोंकर इत्यादि ) ७ लक्ष ६० हजार कामगार काम करतात. निरानिराळ्या वर्कशॉप्समध्यें २ लक्ष ६७ हजार कामगार आहेत. कापसाच्या व्यवसायांत २ लक्ष ३० हजार कामगार आहेत. असे आंकडे हे स्वतःच किती तरी गोष्टी सांगतात. हे बोलके आंकडे आहेत. देशांत कोणता व्यवसाय किती प्रमाणांत चालला आहे हें कळण्यास खानेसुमारीसारखें दुसरें साधन नाहीं. देशांतील ज्ञानाचा प्रसार कितपत झाला आहे हेंहि खानेसुमारीचे आंकडे सांगतात. १९३१ सालीं खालसा मुलखांत निरक्षर लोकांची संख्या २२ कोटि ६० लक्ष होती आणि साक्षर सारे १ कोटि ६ लक्ष होते. यावरून देशांत किती भयंकर अज्ञान आहे हें डोळ्यासमोर दिसूं लागतें ! पुरुष आणि स्त्रिया यांची संख्या पाहिल्यास १९३१ सालीं १९२१ सालपेक्षां पुरुषांची संख्या २ कोटींनीं वाढलेली दिसली आणि स्त्रियांची संख्या फक्त १ कोटीनें वाढलेली दिसली. असे अनेक प्रकारचे आंकडे खानेसुमारीच्या माहितीवरून कळतात आणि देशस्थितीचें स्पष्ट चित्र डोळ्यांसमोर दिसतें.

लोकसंख्येच्या दृष्टीनें हिंदुस्थानचा अनुक्रमांक पहिला ठरला. परंतु औद्योगिक व्यवसायांत तो कितवा लागेल ? अद्याप शेंकडा ९० लोक

खेड्यांत राहून पोट भरण्याची धडपड करीत आहेत. एका समाजाभ्यासकानें म्हटलें आहे कीं, या ग्रामवासीयांपैकीं शेंकडा ५० लोकांना वर्षांतून ६ महिने पोटभर खावयास मिळत नाहीं ! जगांत सुधारलेल्या सर्व देशांत मिळून बेकारांची संख्या जितकी भरते तितकी एकट्या हिंदुस्थानांत आहे ! हिंदी माणसाचें वार्षिक उत्पन्न ८२ रु. आहे. आणि हिंदुस्थानवर राज्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यांत हें प्रमाण १०१२ रु. आहे. म्हणजे एकाच साम्राज्यांत एका देशांत माणसाला महिन्याच्या काठीं जेमतेम ६।७ रु. मिळतात, तर इतरत्र ९० रुपये मिळतात !

आपल्या राष्ट्राच्या जीवनाचें यथार्थ चित्र कळण्यास खानेसुमारीसारखें दुसरें साधन नाहीं. आपण कसे आहोंत हें नीट कळल्याखेरीज आपणांस आपलें ध्येय गांठण्याचा मार्ग आणि साधनें कळणार नाहींत. यासाठीं खानेसुमारी ही राष्ट्रीय जीवनांत अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. औषध-योजनेसाठीं रोगनिदान जितकें महत्त्वाचें असतें तितकेंच राष्ट्राच्या जीवनास खानेसुमारीचें महत्त्व आहे.

---

## ८४ : : शारीरिक–शिक्षण–दिन

एखाद्या गोष्टीचें महत्त्व मुद्दाम लक्षांत येण्यासाठीं निरनिराळे दिन साजरे करण्याचा प्रघात पडला आहे. सत्पुरुषांचे जन्म-दिन आणि पुण्य-तिथि पाळण्यात हाच हेतु असतो. आपणांस कांहीं गोष्टींचें महत्त्व तत्त्वशः पटलेलें असलें तरी दैनंदिन व्यवहारांत तें आपल्या लक्षांत येत नाहीं. कल्याणकारक, मार्गदर्शक गोष्टींची सर्वांनीं मिळून आठवण करून चिंतन करावें यासाठीं सण, उत्सव, दिन साजरे करण्याचे प्रघात पडले आहेत.

आरोग्य हा वस्तुतः प्रत्येक समंजस माणसास माहित असलेली बाब आहे. परंतु तरी शरीराकडे नकळत कां होईना परंतु सर्वसाधारणपणें आपण दुर्लक्षच करतो. 'एवढ्यानें काय होणार' अशी मनाची समजूत करीत आपण आरोग्यरक्षणाचे साधे साधे पण महत्त्वाचे नियम उल्लंघीत असतों.

आपल्या आधुनिक शिक्षणपद्धतींत मनाबरोबर शरीराकडे मुद्दाम लक्ष देण्यास अलीकडे सुरुवात झाली आहे. वेळापत्रकांत खेळ, व्यायाम यांचे स्वतंत्र तास आतां ठेवलेले आढळतात. परंतु त्यांतहि एक प्रकारचा यांत्रिकपणा येत असतो. तो घालविण्यासाठीं आणि विशेष उत्साह निर्माण करण्यासाठीं शारीरिक शिक्षणाचा स्वतंत्र दिन साजरा करण्याचा प्रघात पडला आहे.

अशा दिनाच्या कार्यक्रमांत शरीरसामर्थ्याच्या वैभवाचीं विविध दर्शनें होतील असे कार्यक्रम असले पाहिजेत. अनेक प्रकारचे खेळांचे वैयक्तिक आणि सांघिक सामने या कार्यक्रमांत असावेत. त्यामुळें अनेक खेळाडूंच्या नैपुण्याचें चीज होतें आणि इतरांना स्फूर्ति मिळते. अर्थात् उघड्या मैदानांत हे कार्यक्रम मनसोक्त पाहण्यास अनुकूल अशा ऋतूंत हा दिन साजरा करावा. हिंवाळ्याचे दिवस हे अशा कार्यक्रमास सोईचे आहेत.

या दिनाच्या दिवशीं अध्यक्ष आणि वक्ते यांची योजना करतांना दिनाचा हेतु लक्षांत ठेविला पाहिजे. ज्यांच्या मुद्रेवर आरोग्याचें तेज झळकत आहे अशा व्यक्ति व्यासपीठावर दिसल्या पाहिजेत. ज्यांनीं शरीर आणि मन यांच्या पूर्ण विकासाचें वैभव संपादिलें आहे अशाच व्यक्तींनीं या समारंभांतील मुख्य स्थान विभूषित करावें. एखाद्या रोगग्रस्त, आळशी, चैनी धनिकापेक्षां स्वामी कुवलयानंद, प्रो. माणिकराव, महाबळ गुरुजी अशीं माणसें या प्रसंगीं प्रामुख्यानें दिसावींत. त्या त्या प्रांतांतील व गांवांतील शारीरशिक्षणाच्या कार्यक्षेत्रांतील विशेष कार्य करणाऱ्या संस्थांचे वृत्तांत थोडक्यांत फलकांवर सर्वत्र दिसावेत. शारीरसामर्थ्यांत विशेष नैपुण्य दाखवून देशाच्या कीर्तींत भर घालणाऱ्यांचीं छायाचित्रें हींच या समारंभाचीं खरीं भूषणें होत. तेथें प्रभु रामचंद्रापेक्षां मारुतिरायास थोडें जास्त मानाचें स्थान मिळालें पाहिजे ! इतर देशांतील आरोग्यसंपन्न नागरिकांचीं सांघिक हालचालींचीं चित्रें हीं या समारंभांत स्फूर्तिदायक ठरल्याखेरीज राहणार नाहींत.

आरोग्यरक्षण आणि संवर्धन यांविषयीं शास्त्रांतील अद्यावत् सिद्धांतांची आणि संशोधनाची माहिती व्याख्यानांतून आणि निरनिराळ्या पत्रकांच्या

द्वारां लोकांस कळविण्याची योजना असावी. या व्याख्यानांत आणि पत्रकांत मिळालेल्या ज्ञानावरून आरोग्यरक्षणाच्या पद्धतीची सुबोध आणि सुलभ माहिती कळली पाहिजे. ऊन, पाणी, हवा इत्यादि नैसर्गिक साधनांची या कामीं होणारी मदत अनेक उदाहरणांनीं प्रगट झाली पाहिजे. तसेंच आहाराच्या बाबतींत अगदीं मूलभूत ज्ञान नसल्यानें आपल्या हातून होणारे प्रमादहि कळले पाहिजेत. सर्वसाधारणपणें मिळणारे खाद्यपदार्थ आरोग्यदायक कसे होऊं शकतात हें शास्त्रीय माहितीच्या आधारें सर्वांना पटविणें हें या दिनाचें महत्त्वाचें कार्य आहे.

थोडक्यांत म्हणजे शरीरसंपत्तीचा हेतु आणि तो साधण्याचीं विविध साधनें आणि मार्ग यांचें ज्ञान सहज मनोरंजनाच्या द्वारें, तात्त्विक विवेचनानें आणि प्रात्यक्षिकांनीं जनतेच्या मनावर बिंबविणें ही हा दिन साजरा करण्याची योग्य पद्धति होय.

---

## ८५ : : दिल्लीचें आत्मवृत्त

आपल्या भारताच्या इतिहासाचें तुम्हांला अगदीं सहज दर्शन घ्यावयाचें आहे का ? मग मी दिल्ली—तुम्हांला आमंत्रण करतें. उंबऱ्यावर उभें राहिलें कीं, घराच्या अंतरंगाचें पुष्कळसें दर्शन होतें कीं नाहीं ! तसेंच माझें महत्त्व आहे. माझें नांवच मुळीं ‘ देहली ’ आहे ना ! देहली म्हणजे उंबरा–उंबरठा !

किती सार्थ नांव आहे नाहीं का ? भारतवर्ष हें एक भव्य मंदिर म्हटलें तर मी त्या मंदिराचा उंबरठाच आहें. त्या मंदिराइतकाच माझा जीवनवृत्तांत प्राचीन आहे.

आर्यांनीं सिंधु नद ओलांडल्यावर पहिला मुक्काम येथेंच केला. पांडवांचें हस्तिनापूर तें हेंच ! इंद्रप्रस्थ हेंच ! इंद्रप्रस्थापासून तों नव्या दिल्लीपर्यंत हीच भारतवर्षाच्या इतिहासाची स्थूल काल-मर्यादा नाहीं का ?

आज तुम्हीं दिल्ली म्हणतां पण मी म्हणजे एकच शहर नव्हे. माझ्या विस्तारांत आठ शहरें आहेत. प्रत्येक सम्राटानें आपापल्या हौशीप्रमाणें माझ्या स्वरूपांत फेरफार केले.

या आठ अवतारांची आठवण झाली कीं, असंख्य घडामोडींचा कोलाहल डोक्यांत उत्पन्न होतो. इंद्रप्रस्थ किंवा हस्तिनापूर म्हटलें कीं, त्या अजातशत्रु धर्मराजाची आठवण होते. पांडवांचा सखा भगवान् श्रीकृष्ण यांच्या चरणधुलीनें माझा देह पावन झाला आहे. परंतु आज त्या ठिकाणीं अक्षरशः धूळ सांचली आहे! आज माझें दर्शन घेणाऱ्यास सगळीकडे महाल आणि मशिदी दिसतात. पण त्या मशिदीच्या दगडांना विचाराल तर ते तुम्हांला सांगतील कीं, 'आम्ही मूळचे मंदिरांतले आहोंत! मंदिरांच्या जागीं मशिदी आल्या! आकार बदलला पण निदान दगडांना तरी आपल्या कुळाची खात्रीनें आठवण आहे!'

पृथ्वीराजानंतर माझ्या जीवनाला विलक्षण कलाटणी मिळाली. कुतुबुद्दिनानें आपल्या सुलतानशाहीचा जयघोष येथूनच केला आणि तेव्हांपासून १८५७ पर्यंत यवनांच्या सत्तेखालीं मला नांदावें लागलें! या काळांत मी एकापेक्षा एक भयंकर कृत्यें डोळ्यासमोर घडत असतांना पाहिलीं! लक्षावधि निरपराध्यांचें रक्त येथें सांडलें! रक्ताच्या नद्या, मांसाचे चिखल, मुंडक्यांचे ढीग हीं मीं पाहिलीं! आणि भाऊसाहेबांची रणगर्जनाहि पण मीं ऐकली!

पण ते तैमुरलंगहि गेले नि नादीरशहाहि गेले! आज सगळीकडे एकापेक्षां एक भव्य आणि कलावैभवसंपन्न राजमंदिरें माझ्या ठिकाणीं तुम्हांला दिसतील! कांहीं वेळां यमपुरी आणि कांहीं वेळां कुबेर-नगरी असें जीवन मीं अनुभविलें आहे. माझ्या पूर्व जीवनांत मीं असंख्य दरबार आणि समारंभहि पाहिले आहेत.

अगदीं ताजी आठवण म्हणजे १९११ सालीं मीं राज्यारोहण-दरबार पाहिला आणि त्याच डोळ्यांनीं मीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रभात-कालहि पाहिला. पंडित नेहरूंचें मुख्य प्रधान म्हणून स्वागत करतांना माझ्या जीव-

नाचें सार्थक झाल्यासारखें मला वाटलें ! आतां स्वराज्याचें निशाण मस्तका-वर केव्हां फडकेल त्या दिवसासाठीं माझें अंतःकरण तळमळत आहे !

तोंपर्यंत जुन्या वैभवाच्या आठवणी मी आठवीत बसतें. हा पाहिलांत चांदणी चौक ! येथें पूर्वी दोहोंबाजूंस पिंपळांचीं आणि निंबचीं झाडें होतीं आणि मधून पाणी वाहत होतें. अगदीं चांदण्यांत फिरल्यासारखें वाटे या रस्त्यावर ! पर्ण साहेबांनीं तें पार नाहींसें केलें ! आतां एक कारंजें येथें नाचत आहे !

ही जुम्मामशीद ! शहाजहान बादशहा मला शहाजानाबाद म्हणत असे. तो वीस वर्षें मला सजवीत आणि नटवीत होता. त्यानेंच ही मशीद बांधण्यास आरंभ केला आणि औरंगजेबानें ती पूर्ण केली. मोंगल बाद-शहांनीं येथें दर शुक्रवारीं प्रार्थना केली आहे !

आणि हा लाल किल्ला ! आझाद हिंद सैनिकांनीं ज्याचें नांव पुन्हां एकदां जगभर गाजविलें तोच हा लाल किल्ला ! तोहि शहाजहाननेंच बांधला. या किल्ल्यांत कित्येक राजपुरुषांचे शोचनीय अंत झाले आहेत. पण येथेंच दिवाण–इ–आम आणि दिवाण–इ–खासहि आहेत ! दिवाण–इ–खास म्हणजे पृथ्वीवरील नंदनवनच !

मराठ्यांचें स्वामित्व मला कांहीं दिवस लाभलें आहे पण त्यांच्या स्वामित्वाची कांहींहि आठवण त्यांनीं माझ्याजवळ ठेविली नाहीं !

१८०३ मध्यें शिंद्यापासून मला लॉर्ड लेकसाहेबानें हिरावून घेतलें. आणि माझा नवा अवतार म्हणजे नवी दिल्ली सुरू झाली ! या अवता-राची सजावट करतांना २९ हजार मजूर १८ वर्षें राबत होते. पण या नव्या रूपांत जुन्या आठवणी रस्त्याच्या नांवाच्या रूपानें आहेत. अशोक रस्ता, अकबर रस्ता हीं नांवें वाचलीं कीं, मला एकदम तो प्राचीन काळ आठवतो !

जुन्या दिल्लींत हिंदूंच्या सत्तेचे अवशेष नसले तरी नव्या दिल्लींत मात्र हिंदूंनीं मला अतिशय मोठें वैभव दिलें आहे. बिर्ला शेटजींचें हें राधा-कृष्ण-मंदिर, तें बुद्ध-मंदिर, तें कालीमंदिर, हीं माझ्या आठव्या अवताराचीं भव्य भूषणें आहेत.

आज देशाच्या राजकीय भवितव्याची चर्चा जेथें चालू आहे ती ही हिंदी पार्लमेंटची इमारत. अनेक प्रकारच्या कलाकौशल्यांनीं हीं आधुनिक राजगृहें नटविलेलीं आहेत.

तो पलीकडे दिसतो तो व्हाइसरॉयचा प्रासाद ! त्याचें वैभव मी तोंडानें काय सांगणार ! त्या प्रासादावर ज्या वेळीं स्वातंत्र्याचें निशाण फडकूं लागेल त्या वेळीं आपण सर्व एकमुखानें जयजयकार करूं या, " भारत माता की जय ! "

त्या वेळीं माझ्या जीवनांतले एकापेक्षां एक रोमांचकारक असे आणखी प्रसंग मी तुम्हांला ऐकवीन ! तोंपर्यंत " जय हिंद ! "

## ८६ : : शिवकालीन हेराचें आत्मवृत्त

शेतांत घाम गाळून पोट भरणारे लोक आम्ही ! माझ्या घराण्यांत कित्येक पिढ्या अशाच जगत आल्या होत्या. देशांत मोठमोठ्या घडामोडी होत होत्या. मुसलमानांचा सगळीकडे धुमाकूळ चालू होता. मावळ-खोऱ्यापर्यंत त्यांच्या बातम्या येत. आमचेच कांहीं जातभाई कोणत्या तरी बादशहाचे बडे नोकर म्हणून आमच्यावर अधिकार गाजवीत होते. आम्हांला तेच आमचे धनी वाटत. आमच्या गांवांतल्या पुष्कळ तरुणांनीं सैन्यांत नोकरी धरली होती. मी त्या बातम्या ऐकें, आणि माझ्याहि मनांत येई कीं, आपणहि एखादें घोडें घेऊन एखाद्या मराठे सरदाराच्या सैन्यांत दाखल व्हावें. परंतु पुन्हां मनांत येई, एखाद्या वेळीं आपल्याच गांवकऱ्यां-वर तलवार चालविण्याची वेळ यावयाची !

माझ्या मनांत असे विचार येत होते त्याच वेळीं मला शिवाजी-महाराजांच्या हालचालीची बातमी कळली. मुसलमानांची सत्ता झुगारून स्वतंत्र होण्याचें मोठें काम त्यांनीं अंगावर घेतलें होतें. गांवांतले कांहीं तरुण त्यांच्याकडे रूजूहि झाले होते. मींहि मनांत विचार केला ' ढेकळें फोडीत मरण्यापेक्षां कांहीं मानाचें तरी काम करीत मरावें ! गाई–ब्राह्मणां-

साठीं लोक जिवावर उदार होऊन लढत आहेत. आपणहि त्यांत सामील व्हावें !'

शेवटीं मीं महाराजांच्या एका अधिकाऱ्याची गांठ घेतली आणि मला हेरगिरीचें काम मिळालें. लहानपणीं मी सोंगाड्याचें काम हुबेहूब करीत होतों. गांवच्या जत्रेंत बहुरूपी म्हणून लोकांना मी थक्क करीत असें. त्या गुणांचा उपयोग झाला. मला हळूहळू मोठीं जबाबदारीचीं कामें सांगण्यांत आलीं. माझी हुशारी पाहून एक दिवस माझ्या मालकानें मला एक महत्त्वाची कामगिरी सांगितली. मावळखोऱ्यांतल्या एका किल्ल्याची पाहणी करून यावयाचें काम होतें तें. किल्लेदार मराठाच होता, पण तो विजापूरच्या सुलतानाचा नोकर होता. मीं गोंधळ्याचें सोंग घेतलें आणि किल्ल्याच्या जवळ देवीच्या देवळांत जत्रा होती, त्या जत्रेंत शिरलों !

जत्रेंत हिंडतां हिंडतां मी किल्ल्यावरून कोणी आलें आहे का त्याची चौकशी करीत होतों. शेवटीं कळलें कीं, किल्ल्यावरचा एक चौकीदार नवस फेडायला आला आहे. त्याचें नांव-गावहि कळलें. मी गोंधळाच्या गाण्यांत त्याचें नांव गोवून त्याच्यासमोर म्हणूं लागलों. तो ऐकतां ऐकतां इतका खूष झाला कीं, त्यानें मला किल्ल्यावर यावयाचें आमंत्रण दिलें. आणि अशा रीतीनें माझा किल्ल्यांत प्रवेश तर झाला. चौकीदाराकडे जातां जातां मी सभोंवतीं सारखी नजर ठेवीत होतों. मीं चौकीदारास विचारलें, " देवीचा वाघ कोणत्या बाजूनें येतो ? "

चौकीदार म्हणाला, " किल्ल्यावर तर वाघाला रहाण्याजोगें जंगल कुठेंहि नाहीं. तो मागल्या दरींतून येत असेल देवीच्या दर्शनाला ! "

मी म्हणालों, " वाघाच्या वाटेवर नारळ फोडा. तेथें पूजा करून भंडारा घ्या. देवीची कृपा होईल. पण वाघाच्या पावलाची खूण मात्र दिसली पाहिजे. मला दाखवा ती दराची बाजू. मी बरोबर खूण ओळखतों पावलाची ! "

माझा डाव बरोबर लागू पडला. वाघाचीं पावलें पाहण्याच्या निमित्तानें मीं किल्ल्याच्या तटाला फेरी मारली आणि मागल्या बाजूनें दरीच्या

अंगाला, तटाला खिंडार असल्याचें मीं पाहिलें ! मला पाहिजे होतें तें मीं हेरलें !

चौकीदाराला मी म्हणालों, "मी या बाजूच्या एका खडकावर देवीच्या नांवानें बेलभंडार ठेवतों. उद्यां त्या जागीं वाघाची स्वारी आलीच पाहिजे. देवीच्या वाघाचीं तटाला पावलें लागलीं तर तटाला कल्पांतीं मरण नाहीं ! वाघाच्या स्वारीच्या वाटेवर कोणाची मात्रा चालणार नाहीं."

चौकीदार सगळें मान्य करूं लागला. मीं त्या खिंडाराच्या जागीं बेलभंडार ठेवला आणि मनांत महाराजांचें स्मरण केलें !

त्याच खिंडारांतून कांहीं दिवसांनीं महाराजांच्या सैन्यांतले 'वाघाचे बच्चे' किल्ल्यांत घुसले ! किल्ल्याचा इतका बेमालूम वेध घेतल्याबद्दल मला शेलापागोटें मिळालें !

पण हेराचें जिणें मोठें विचित्र खरें ! मला तें शेला-पागोटें घालून मिरविण्याची वेळ क्वचितच येई ! कारण हेर म्हणून हिंडतांना जे पोषाख करावे लागत, जीं सोंगें घ्यावीं लागत, त्यांत शेला-पागोट्याची पाळी कितीशी येणार ?

म्हातारा होईपर्यंत मीं हेरगिरी केली. कशाचें सोंग घेतलें नाहीं असें नाहींच ! कधीं भिकारी तर कधीं गोंधळी, कधीं बैरागी तर कधीं गुराखी, असे शेंकडों 'अवतार' घेत मीं सगळें मावळखोरें पालथें घातलें. म्हातारपणीं शरीर थकलें आणि महाराजांच्या कृपेनें मी आतां सुखानें 'हरी' 'हरी' करीत बसलों आहें. तें मात्र सोंग नाहीं बरं कां ! मरायच्या आंत महाराजांच्या डोक्यावर राजाचा मुकुट चढलेला पाहीन ! लपत छपत हिंडण्यांत जन्म गेला पण आतां असें वाटतें,–महाराजांनीं दिलेलें शेला-पागोटें चढवून एकदां राजरोसपणें मावळभर हिंडावें! एवढीच आतां तळमळ आहे ! महाराजांचा हा भिवा हेर, त्यांच्या कीर्तीचे पोवाडे गात मावळ गर्जून सोडल्याखेरीज मरणार नाहीं हें खास !

## ८७ : : स्वयंसेवक सेनेचें महत्त्व

आज देशांत सगळीकडे दंग्याचें वातावरण माजलें आहे. कोठें 'आग' भडकली आहे, कित्येक ठिकाणीं धुमसत आहे. कोठें केव्हां ठिणगी उडेल याचा नेम नाहीं! कधीं जातीय कलहाचें निमित्त होतें, तर कधीं सरळ दरोडेखोरीचा तडाखा बसतो! जीवित अनेक दृष्टीनें असुरक्षित झालें आहे.

अशा वेळीं सैन्याच्या जोरावर, सरकारी सत्तेच्या पाठबळानें होणारें रक्षण ठिकठिकाणीं उणें पडूं लागलें आहे आणि गांवोगांवीं आत्मसंरक्षणाच्या योजनांचा विचार चालूं आहे. आपल्या गांवासाठीं, आपल्या देशबांधवांसाठीं सेवा करण्यास सिद्ध असलेले सेवक पाहिजे आहेत.

कांहीं ठिकाणीं तरुणांची स्वयंसेवक सेना तयारहि झाली आहे. मुंबईलाच पहा ना. दंग्याच्या भागांतून सुरक्षितपणें लोकांना इकडून तिकडे पोहोंचविण्याचें काम करणारे स्वयंसेवक सिद्ध आहेत.

त्यांना कोणी पगार देत नाहीं. ते कोणाचे नोकर नाहींत. तेच त्यांचे मालक! आणि त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें सेवेचें काम पत्करलें आहे. सरकारी शिपायापेक्षां या स्वयंसेवक सेनेंतील सैनिकाचें कार्य अगदीं निराळें असतें. ते कोणाचे नोकर नसतात. म्हणून सर्वांचे सेवक असतात. स्वयंसेवक या नात्यानें सर्वांचा दर्जा सारखाच असतो. तेथें अधिकाराची ऐट असूं शकत नाहीं. स्वयंसेवकांचीं पथकें असतात आणि पथकांचे नायक असतात. तरी प्रत्येक नायक हा स्वयंसेवकच असतो. स्वयंसेवक सेनेंत प्रत्येक सैनिक स्वेच्छेनें सेवा करण्याच्या कार्यासाठीं पुढें आलेला असतो. त्यामुळें तेथें अधिकार आणि दर्जा हे भेद निर्माण होत नाहींत. सेवा हेंच त्याचें वेतन. सेवा हेंच त्याचें समाधान!

या सेनेचें कार्यक्षेत्र पगारी सेनेच्या कार्यापेक्षां कितीतरी व्यापक असतें. सेवेच्या क्षेत्रांत सर्व कार्यांचा समावेश होतो. एकाद्या सार्वजनिक समारंभाच्या प्रवेशद्वारीं माननीयांचें स्वागत करण्यापासून तों एखाद्या परिषदेच्या पाहुण्यांच्या पंगतींत पाणी वाढण्यापर्यंत सर्व कामें स्वयंसेवकाच्या कक्षेंत येतात. कारण त्याचें महत्त्व कामाच्या दर्जावर अवलंबून नसतें, तर

ज्या निरपेक्षतेनें, सेवावृत्तीनें स्वयंसेवक सेवा करतो त्या वृत्तीवर त्याचें महत्त्व अवलंबून असतें.

युद्धकालांत प्रकाशबंदीचा हुकूम होता त्या वेळीं कित्येक गांवीं प्रत्येक पेठेंत रात्रीचा पहारा करण्याचें काम त्या त्या पेठेंतील स्वयंसेवकवृत्तीचे लोक करीत होते. त्यांना कोणीं हुकूम केला नव्हता, कोणीं पगारहि देऊं केला नव्हता. त्यांच्या कामाची कोणी तपासणीहि करीत नव्हता. तेथें ना बढती ना कपात !

एकमेकांस मदत करण्याची वृत्ति स्वभावतःच प्रत्येकांत असते. परंतु ही वृत्ति निश्चितपणें उपयोगी पडावी यासाठीं स्वयंसेवकांची संघटना करावी लागते. एखाद्या प्रसंगीं इतरांची सेवा करावी कीं नाहीं हें ज्याच्या त्याच्या इच्छेवर असतें; परंतु अशी इच्छा जाहीर करून 'स्वयंसेवक' म्हणून नांव नोंदविलें कीं, मग सेवा ही इच्छा राहत नाहीं; तें कर्तव्य ठरतें. स्वयंसेवकाचें विशिष्ट चिन्ह अंगावर मिरविणारा समाजसेवक सैनिक दिसला कीं, त्याची सेवा घेतांना मेहेरबानगीची भावना निर्माण होत नाहीं. सेवेचें व्रत घेतलेले असे व्रतधारी समाजाच्या सर्व विभागांत असणें हें समाजाच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहे. राखीव सैन्यासारखी स्वयंसेवक सेना होय !

स्वयंसेवक सेनेसारख्या संघटनेनें तरुण पिढीचा किती तरी फायदा होतो ! समाजसेवेचें अतिशय मोलाचें शिक्षण आहे तें. स्वयंसेवक सेनेंत दाखल होतांना अंगावर गणवेष चढविला कीं, स्वतःचें वैयक्तिक मोठेंपण विसरावें लागतें आणि कोणत्याहि मोबदल्याची अपेक्षा मनांत राहूं शकत नाहीं. आपल्या वैयक्तिक सुखदुःखाचा विचार बाजूस ठेवून कार्य करण्यांत मनाचें औदार्य वाढतें. वृत्तींत व्यापकता निर्माण होते. अहंकाराची तेथें बाधा होत नाहीं. तरुणपणींच मनास असें वळण लागूं शकतें. असें वळण लावण्यासाठीं इतर शिक्षणाप्रमाणेंच स्वयंसेवेचेंहि शिक्षण घेणें जरूर आहे.

कोणत्याहि राज्यपद्धतींत अशा सेनेची आवश्यकता असते. कारण सरकारचा नोकर-वर्ग हा देशांतील जनतेस एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच उपयोगी पडतो. लोककल्याणाचीं कितीतरी कामें करण्यासाठीं सरकारी नोकर

वर्गास स्वयंसेवक सेनेचें साहाय्य होतें. ही एक प्रकारें मुलकी फौजच आहे. देशांत युद्धासारखे किंवा इतर कांहीं आकस्मिक संकटासारखे प्रसंग निर्माण होतात, त्या वेळीं सरकारला प्रत्येक नागरिकाच्या साहाय्याची जरूरी लागते. गेल्या युद्धांत पाश्चात्य देशांत सरकारनें ज्या ज्या वेळीं माणसांची मागणी केली त्या त्या वेळीं देशाची कर्तव्याची हांक ऐकल्याबरोबर हजारों नागरिक पुढें आले. जे नागरिक तरुणपणीं स्वयंसेवक संघटनेंत तयार झालेले होते त्यांचा ताबडतोब कितीतरी उपयोग झाला. संघटितपणें एखादें काम अंगावर घेऊन निःस्वार्थीपणें पार पाडण्याचें शिक्षण त्यांना मिळालेलें असल्यानें त्यांना आपापले व्यवसाय सोडून नागरिक-दलांत ताबडतोब दाखल होतां आलें.

आपल्या देशांत प्रत्येक राजकीय पक्ष आपापल्या तत्त्वावर श्रद्धा ठेवणाऱ्या तरुणांची अशी संघटना तयार करीत आहे. राष्ट्र-सेवा-दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हीं अशा संघटनांचीं अतिशय मोठीं उदाहरणें आहेत. कोणत्याहि कार्यासाठीं सिद्ध असलेला तरुणांचा प्रचंड वर्ग पाठीशीं असणें हें त्या पक्षाचें आणि देशाचें मोठेंच पाठबळ आहे.

---

## ८८ : १००० रु. च्या नोटेचें आत्मवृत्त

दैव म्हणून कांहीं असतें हें मला कांहीं दिवसांपूर्वी कोणीं सांगितलें असतें तर मी त्याला हंसलेंच असतें. गरीबगुरीबांनीं फार तर दैवाचा डंका पिटावा. कारण त्यांच्यांत बेताबाताचेंच कर्तृत्व असतें. तेव्हां त्यांना जो काय थोडा लाभ होणार त्याबद्दल त्यांनीं दैवाचे वा देवाचे आभार मानावेत किंवा कांहीं संकट आलें तर देवाकडे धांव घ्यावी, नाहींतर दैव म्हणून कपाळावर हात मारून गप्प बसावें हें ठीक आहे. पण माझ्या जीवनांत अशा दैववादाला जागाच नाहीं असें मीं समजत होतें !

माझी प्राप्ति केवळ नशीब म्हणून कधीं होणें शक्य तरी आहे का ! एक हजार रुपयांची नोट मिळणें हें अगदीं केवळ उद्योगाचें, श्रमाचें,

कर्तबगारीचेंच फळ आहे, यांत शंकाच नाहीं. आम्ही ज्यांच्याजवळ असतों ते सर्व लोक आमची प्राप्ति होण्यापूर्वी अहोरात्र उद्योग करीत असतात. ते सर्व एका विशिष्ट दर्जाचेच लोक असतात. एकंदरींत असे लोक थोडेच असतात. एक रुपयाच्या नोटेला जसें हजारों ठिकाणीं भटकावें लागतें तसें माझें कधीं झालें नाहीं. सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमध्यें माझा जन्म झाला. जन्मापासून माझें वैभव दिसूं लागलें. माझ्या अभिजात सौंदर्यासाठीं किती कलावंत झटत होते आणि किती दक्षतेनें ते मला घडवीत होते! तेथून निघाल्यापासून मी मोठमोठ्या दिवाणखान्यांत सुंदर तिजोऱ्यांत वावरलें. कोठें बाहेर पडलेंच तर लक्षाधीशाच्या अगदीं 'हृदयाजवळ' मला जागा मिळावयाची! प्रवासाची दगदग अशी क्वचितच! नखाला माती अशी कधीं लागलीच नाहीं माझ्या!! आण्या-पैशाप्रमाणें मला कधीं वणवण भटकावें लागलें नाहीं.

पण युद्धांत जेथें जर्मनी नि जपानसारखीं राष्ट्रें हादरलीं नि कोसळलीं तेथें हजाराच्या नोटेची काय कथा! अनेक लक्षाधीश रसातळाला गेले आणि अनेक भिक्षाधीश लक्षाधीश झाले! अशी विलक्षण घडामोड सर्वत्र होत होती. आमच्या कांहीं 'बहिणी' बंगालमध्यें लक्ष्मीपुत्रांच्या सहवासांत विलास भोगीत होत्या. त्यांचे हाल तर विचारूंच नका! तो वृत्तांत केवळ ऐकूनच माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. सोनें-रूपें आणि हिरे-माणकें यांच्याशीं नेहमीं व्यवहार असावयाचा आमचा! पण बंगाली भगिनींना मूठभर धान्यासाठीं आपलें बलिदान करण्याचे प्रसंग आले. आणि कांहींचे मालक अन्नावांचून तरफडून मेले!

तितके वाईट दिवस मला आले नाहींत हें खरें आहे. पण युद्धकालांत एका धाडसी माणसाच्या हातीं मीं सांपडलें. त्या वेळीं मलाहि फार वाईट वाटलें. त्यानें जिवावर उदार होऊन कांहीं काळा बाजार केला म्हणे आणि तो काळा पैसा उजेडांत येऊं नये म्हणून, मिळविलेला 'खुर्दा' देऊन मला मिळविलें. मूळचा दरिद्रीच तो! माझ्यासारख्या खानदानींत वाढलेल्या व्यक्तीची तो कशी बडदास्त ठेवणार? त्यानें मला एका फडक्यांत बांधलें आणि तें फडकें एका डब्यांत घालून, तो डबा घरांतल्या अडगळींत दडवून

ठेवला. केव्हां तरी दारें खिडक्या लावून तो चोरून माझें दर्शन घेत असे. त्या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर भीतीचीहि छटा उमटे ! कारण काळा बाजार केला होता ना त्यानें !

आणि एक दिवस सरकारी हुकूम झाला कीं, एक हजाराची नोट बँकेंत हजर करावी ! एवढाच हुकूम नव्हता. हजारांच्या नोटांच्या मालकांनीं त्या कशा मिळाल्या तें सरकारला कळवावें ! हा हुकूम कळला त्या दिवशीं माझा मालक एकांतांत मला जवळ घेऊन अक्षरशः रडला अगदीं ! माझ्या दैवाची त्या क्षणीं मला जाणीव झाली ! माझ्या सहवासांत असतांना रडणारा असा तो पहिलाच प्राणी पाहिला मीं ! हजारांच्या नोटांनीं आपल्या मालकांच्या सहवासांत असतांना किती विलास पाहिले असतील तें एक त्यांना किंवा त्यांच्या मालकांनाच माहीत ! चोर-दरोडेखोरांच्या हातीं लागलेल्यांचें दुर्दैव सोडा. परंतु प्रकाशांत येण्याचीच 'चोरी' व्हावी हें मात्र खरें दुर्दैव नाहीं का ? माझ्या त्या दरिद्री आणि धाडशी मालकाच्या मनांत मोठा पेंच निर्माण झाला ! मला जवळ ठेवावें तर कांहीं दिवसांनीं मी मातीमोल ठरणार ! दूर करावें, बाहेर काढावें, सरकारी बँकेंत न्यावें तर आपण होऊन गळा अडकविण्याचा प्रसंग येणार ! कारण माझ्याविषयीं काय सांगणार तो ? माझ्या प्राप्तीसाठीं त्यानें केलेलीं काळीं कृत्यें कशीं सांगणार तो ? त्याचीं मनोराज्यें एका क्षणांत कोसळलीं !

मला कोणीं गुपचिप् स्वीकारावें म्हणून तो 'स्थळ' शोधूं लागला ! मोठ्यानें बोलण्याची चोरी ! उघड विचारायची चोरी ! ! शेवटीं त्यानें एक-दोघांना मोठा धीर करून विचारलेंच ! एक म्हणाला, "तीनशें देईन !" दुसरा म्हणाला, "फार तर पांचशें देईन !' मला तो माझा भाव ऐकून धक्काच बसला ! एक जण सांगत होता "कोणी म्हणे हा हुकूम ऐकल्याबरोबर माझ्या एका बहिणीचा होमच केला ! एका क्षणांत तिची चिमूटभर राख झाली आणि मग तो तिचा मालक वेडा झाला !" होणारच ! हजाराच्या नोटेचा आपल्या हातानें असा अंत करणें ही काय सामान्य आपत्ति आहे !

मला माझें तसें कांहीं होईल कीं काय अशी सारखी भीति वाटते! अद्याप माझ्या भवितव्याचा निर्णय लागला नाहीं! माझ्याजोगें स्थळ माझ्या मालकाला अद्याप सांपडलें नाहीं. तो आपल्या मित्रांत अगदीं संतापून म्हणतो, " आमच्यासारखे या संकटांपासून मुक्त आहेत हें सोडून द्या! (किती बेमालूम खोटें बोलणें हें!) पण सरकारची ही अरेरावी आहे! म्हणे नोट कशी मिळवली तें सांगा. काय अधिकार आहे सरकारला हें विचारण्याचा? संशय आला तर सरळ खटला भरावा. पण गुन्हा शाबीत झाला नाहीं तोंपर्यंत सरकारनें हजारला हजार टिकवलेच पाहिजेत. नोट म्हणजे प्रॉमिसरी नोटच आहे. पहा ना! प्रत्येक नोटेवर I promise to pay असें सरकारनें लिहून दिलें आहे! वचनभंगाबद्दल सरकारवर खटले भरले पाहिजेत! चोर सांपडत नाहींत म्हणून काय सावाला आणि संन्याशाला फांशीं देणार? "

माझ्या मालकाचा कायदेशीरपणाचा हा आवेश पाहून मला मनांतल्या मनांत हंसूं येतें. बिचारा मनांतून घाबरला आहे! मला स्थळ शोधतां शोधतां, अगदीं २।३ शें रुपये तो कमी घ्यावयास सुद्धां आतां तयार होऊं लागला आहे! पण अद्याप धीर होत नाहीं! लोभ सुटत नाहीं! तो बारंबार माझ्याकडे केविलवाण्या नजरेनें पाहतो! काळा बाजार म्हटला तरी हजाराची नोट मिळवायला काय कमी कष्ट पडतात! पण ते सांगायचे कोणाला?

शेवटीं माझी काय विल्हेवाट लागणार आहे कोणास ठाऊक! बाकी आतां चोराच्या हातीं लागण्याची फारशी भीति नाहीं! कारण मला आतां सरकारखेरीज कोण पत्करणार?

---

## ८९ : : स्वराज्याचें तोरण—तोरणा!

पुण्यांत कोणत्याहि उंच ठिकाणाहून नैर्ऋत्येकडे पाहिलें कीं, खुर्चीसारखा एक गड दिसतो. तो सिंहगड आणि त्याच्या पलीकडे उंच टोपीसारखा एक गड दिसतो. त्या गडावर स्वराज्याचें तोरण प्रथम फडकलें!

म्हणून त्याला तोरणा म्हणतात. तोरणा प्रत्यक्ष पाहिल्यानंतर त्याचें प्रचंड-गड हें नांवहि सार्थ वाटतें.

खडकवासल्यापासून २ मैलांवर एक पायरस्ता फुटतो. तो थेट तोरण्या-पर्यंत जातो. हल्लीं मोटारनें पायथ्यापर्यंत जातां येतें. जेम्स डग्लस नांवाचा युरोपियन १८८० मध्यें या पायवाटेनें ३७ मैल चाल करून तोरण्यास पोहोंचला होता !

शिवाजीमहाराजांनीं स्वातंत्र्याचा आरंभ या भूमींत केला. १८ जाने-वारी १६४६ रोजीं या भागांतील रांझें गांवच्या पूर्वीच्या पाटलाला दुर्वर्तनाबद्दल शिक्षा करून त्या गांवची पाटीलकी शिवाजीनें रद्द केली आणि गांव ताब्यांत घेतलें! वयाच्या सोळाव्या वर्षी शिवाजीनें स्वातंत्र्याचा असा आरंभ केला !

तोरण्याच्या वाटेनें जातांना अशा अनेक प्रसंगांच्या आठवणी होत असतां मन वर्तमान काल विसरतें. भूतकालांत मनानें भ्रमण करीत असतां प्रचंड-गडचा तट दिसूं लागतो. तेथील चढ पाहून आपण प्रचंडगडाकडे जात आहोंत हें सहज पटतें. डग्लससाहेबांस हा चढ चढण्यास ६५ वर्षांपूर्वी तीन तास लागले. आज रस्ता बराच चांगला असल्यानें तास दीड तासांत वर जातां येतें.

चढ संपल्यावर समोर एक प्रचंड खडकाची भिंत पसरलेली दिसते. समोर कोठें प्रवेशद्वार दिसतच नाहीं. पण थोडें उजवीकडे वळल्याबरोबर दरवाजा लागतो.

दरवाजांतून आंत गेल्यावर दिवाणखाना, राजवाडा, यांचे अवशेष दिसतात. तटाच्या आंत बालेकिल्ला आहे. तोरण्याचें मुख्य महत्त्व म्हणजे आसपासच्या प्रदेशावर पहारा करण्यास सोईचें ठिकाण हें होय. निजाम-शाही आणि आदिलशाही यांच्या प्रदेशाची तोरण्यावरून टेहळणी करतां येत असे. टेहेळणीची महत्त्वाची जागा म्हणून शिवाजीमहाराजांनीं तट-बंदी करून येथें बंदोबस्ताची जागा निर्माण केली. 'गडावरूनच राज्य निर्माण केलें' असें शिवाजीमहाराजांसंबंधीं म्हटलें आहे. त्याचा अर्थ प्रचंड-गडासारख्या गडाच्या बांधणींतील धोरणावरून दिसतो.

किल्ल्यांत एक माळेचा बुरुज आहे. त्याविषयीं असें सांगतातः औरंगजेबाच्या ताब्यांतून किल्ला परत मिळवितांना एकावर एक माणूस उभा करून अशी शिडी तयार करून मराठे सैनिकांनीं या बाजूनें प्रवेश केला. माणसांची शिडी किंवा माळ येथें उभी राहिली म्हणून त्याला माळेचा बुरुज नांव पडलें.

या बुरुजाखेरीज भेल बुरुज आणि हनुमान बुरुज हे दोन बुरुज आहेत. भेल म्हणजे ढेप. त्या बुरुजाचा आकार गुळाच्या ढेपीसारखा दिसतो. भेल बुरुजांतून आंतल्या बाजूनें खालीं उतरण्याचा रस्ता आहे. तो आतां बुजविलेला आहे.

झुंझारमल बुरुजांतून १५ फूट लांबीचें भुयार आहे. त्या भुयाराच्या पुढें मजबूत तटबंदी लागते. त्या ठिकाणीं चार रांजण आहेत. ते दारूगोळा ठेवण्याचे असावेत.

नैर्ऋत्येच्या कोंकण दरवाज्याजवळ पाताळगंगा नांवाचें तळें आहे. तळ्यावर खडकाचें छप्पर आलें आहे. तळ्यांत खडकांतून खालीं २५ खांब कोरलेले आहेत आणि त्या खांबांवर खडकाचें छप्पर तोललें गेलें आहे.

भिकुलीचा बुरुज हें एका शूर मराठा स्त्रीचें स्मारकच आहे. त्या बाजूनें शत्रू घोरपड लावून चढून येत असल्याची चाहूल भिकुले आडनांवाच्या बाईला लागली. तिनें मोठ्या शिताफीनें दोर तोडून शत्रूंच्या माणसांची वर चढूं लागलेली रांग खालीं पाडली !

या गडाच्या बुरुजांच्या बांधकामांत शिवाजीमहाराजांचें विशेष कौशल्य दिसून येतें. बुरुजाच्या पायथ्याशीं एक एक भिंत बांधलेली आहे. तिला चिलखत म्हणतात. त्या भिंतीवरून आणि भिंतींतल्या छिद्रांतून बंदुकातोफांचे गोळे आणि बाण यांचा वर्षाव करीत असत. अशीं 'चिलखतें' इतर किल्ल्यांवर आढळत नाहींत. चिलखतांनीं बुरुजांचें संरक्षण होत असल्यानें तीं खरोखरच किल्ल्याचीं चिलखतें ठरत असत.

डोंगराच्या बाहेरच्या बाजूस सोंडेसारखे भाग आहेत. त्या सोंडांच्यावरून जाण्यायेण्याचे मार्ग असत. त्या मार्गांवर जे पहारे असत त्यांना मेट म्हणत

असत. मेट म्हणजे गुडघा किंवा गुडघ्याचा बाक. मेटाची जागा तशीच दिसते. प्रचंडगडावर अशीं सात मेटें आहेत. मेट किंवा पहारे हे सगळे महारांच्याकडे असत. त्या मेटावर महारांचीं देवस्थानें असत. त्या देवस्थानांचे अवशेष आजहि प्रचंडगडावर दिसतात.

या किल्ल्यास पडलेलें तोरणा हें नांव स्वराज्याचा आरंभ अशा अर्थाचें आहे. तोरणाजाई नांवाची देवी मुख्य दरवाजाजवळच आहे. परंतु शिवाजीमहाराजांच्या पूर्वीच या किल्ल्याला तोरणा हें नांव होतें. महाराजांनीं तें नांव बदलून 'प्रचंडगड' हें नांव ठेविलें ! तरी जुन्या कागदपत्रांत तोरणा हेंच नांव जास्त रूढ आहे. प्रचंडगड आणि तोरणा हीं दोन्ही नांवें सार्थ आहेत असें किल्ला पाहतांना वाटतें.

---

## ९० : धान्यटंचाई व ती निवारण्याचे उपाय

नेपोलियन म्हणत असे 'सैन्यें पोटावर चालतात'. नेपोलियनच्या मनांतला अर्थ कांहींहि असो, त्याचे उद्गार या युद्धांत मात्र सरळ अर्थानें खरे ठरले आहेत. किंबहुना कोणत्याहि युद्धांत दारूगोळ्याइतकीच धान्याचा सांठा हीहि गोष्ट महत्त्वाची असते. बाहेर पडून शत्रूला तोंड देणें अशक्य झालें कीं, किल्ल्यांत राहून महिनेच्या महिने शत्रूपुढें टिकाव धरल्याचीं उदाहरणें इतिहासांत आढळतात. किल्ल्यांत राहून बचाव करतांना धान्याचा पुरवठा पुरेसा असला तरच निभाव लागावयाचा ! देवगिरीच्या रामदेवरावनें किल्ल्यांत धान्याच्याऐवजीं चुकून मिठाचींच पोतीं भरलीं म्हणून देवगिरीचा पाडाव झाला. नाहींतर शंकरदेव परत येईपर्यंत यादवसैन्यानें टिकाव धरला नसता का ?

या युद्धांत लष्कराची तरतूद करतांना सरकारनें दारूगोळ्याच्या कारखान्याबरोबर धान्याचीं कोठारें ठिकठिकाणीं उघडलीं आणि तीं कोठारें भरावयास सुरुवात केली. उत्तमांतलें उत्तम आणि तेंहि भरपूर असें अन्न सैनिकांना मिळूं लागलें.

परंतु हें अन्न आलें कोठून ? तें देशांतील नागरिकांच्या वांट्याचेंच अन्न नव्हतें का ? परंतु संकटाचा काळ लक्ष्यांत घेऊन नागरिकांनीं, हा त्याग केला खरा; यांत मुळींच शंका नाहीं. परंतु सरकारनें या त्यागासाठीं नागरिकांच्या स्वयंस्फूर्तीची वाट न पाहतां तो त्याग कायद्यानें त्यांच्यावर लादला.

आपल्याला पुरेसें धान्य देशांतून गोळा केल्यावर अर्थात् नागरिकांना धान्याची टचाई भासूं लागली. परदेशांतून पुरवठा करणें शक्य होईना. तेव्हां सरकारनें अनेक उपाय योजिले.

प्रथम ‘ अधिक धान्य पिकवा ’ ही मोहीम सुरू झाली. धान्याच्या लागवडीस उपयोगी पडणारा जमिनीचा तुकडा न् तुकडा शोधण्यांत आला. कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यास सारखें सांगण्यांत येई कीं, ‘ यंदा कापूस न काढतां धान्य काढ ! ’ सरकारी पद्धतीप्रमाणें अनेक साधनांनीं लोकांना ही गोष्ट पटविण्यांत आली. स्वतः उदाहरण घालून द्यावें म्हणून मोठमोठ्या सरकारी बंगल्यांच्या आवारांत बागबगीचे जाऊन तेथें भाजीपाला उगवूं लागला !

या उपायानंतर धान्याचो नासधूस थांबविण्याचे मार्ग सुरू झाले. माणसें जरूरीपक्षां जास्त धान्य खरेदी करतात आणि जरूरीपेक्षां जास्त खातात असें सरकारला वाटलें. म्हणून प्रत्येकाचा धान्याचा वांटा ठरविण्यांत आला आणि तेवढाच वांटा त्याला मिळावा अशी शिधापद्धति सुरू झाली. सरकारनें शेतकऱ्याकडून सक्तीनें धान्यखरेदी केली आणि स्वतः धान्याचीं कोठारें काढून त्यांतून शिधा-वांटप सुरू केलें.

प्रत्येकास लागणारें अन्नाचें प्रमाण ठरवितांना सरकारनें जगण्यास कमींत कमी किती धान्य लागतें तें ठरवून त्याप्रमाणें वांटणी केली. या पद्धतीनें धान्याची टंचाई बरीच कमी झाली. कारण जेवणावळी आणि फाजील आदरातिथ्य यांना आळा बसला. मोजकें धान्य मिळूं लागल्यानें लोक काळजीपूर्वक धान्य खर्चूं लागले. कित्येकांना विशिष्ट पदार्थांच्या आपल्या सवयी सोडाव्या लागल्या.

धान्याची पैदास ही पुष्कळ प्रमाणांत पाण्याचा पुरवठा होण्यावर अवलंबून असते. पाण्याचा तितका पुरवठा झाला नाहीं, तर कांहीं भाज्यांचा धान्याऐवजीं शरीररक्षणास उपयोग करावा, असा प्रचार सुरू झाला. अशा रीतीनें धान्याचा तुटवडा भाजीपाल्यानें भरून काढण्याचा प्रयोग सुरू झाला आणि अन्न देण्याचा गुण असणारे आणखी कांहीं पदार्थ आहेत कीं काय त्यांचें संशोधनहि सुरू झालें.

सरकारी मदतीची वाट पाहणें अशक्य झाल्यावर कांहीं लोकांनीं स्वतः नव्या अन्नाचा शोध लावला. इतक्या दिवस कधींहि न खाल्लेला असा पाला खाऊन जगण्याचा प्रसंग कित्येक गरीबांवर आला !

धान्यटंचाई निर्माण झाल्यावर ती दूर करण्याचे हे आणि असे अनेक उपाय सरकारनें योजिले. परन्तु त्यामुळें टंचाई पूर्णपणें नाहींशी झाली नाहीं. अगदींच उपासमार न होतां थोडेंफार पोटाला मिळूं लागलें एवढेंच. धान्यटंचाईची संधि साधून सांठेबाजीला ऊत आला. काळा बाजार सुरू झाला आणि टंचाई भरून काढण्याचे उपाय जास्तच अपुरे पडूं लागले.

बंगालमध्यें केवळ अन्न नसल्यामुळें लक्षावधि लोक भुकेनें तडफडून मरण पावले आणि इतरत्रहि अशीच उपासमार झाली ! सैनिकांसाठीं नागरिकांच्या तोंडचा घास काढून घेतला खरा ! परन्तु लष्करकडे इतका पुरवठा झाला कीं, देशांत लोक अर्धपोटीं रहात असतां छावणींतल्या लोकांना सुस्ती चढत होती !

धान्यटंचाईची ओरड अद्यापहि आहे. आपला 'बंगाल' होण्याची भीति प्रांतोप्रांतीं वाटत आहे. राष्ट्रीय सरकार उपायांची पराकाष्ठा करीत आहे. परन्तु तूर्त तरी शिधापद्धतीखेरीज दुसरा मार्ग आढळलेला नाहीं. युद्धानंतर वाहतूक पुष्कळशी सुरक्षित झाल्यामुळें परदेशांतून धान्य मिळविण्याचे प्रयत्न राष्ट्रीय सरकार करीत आहे आणि आपल्या अर्धपोटीं देशबांधवांना धीर देत आहे.

## ९१ : माझें आवडतें पुस्तक--श्यामची आई !

मराठी वाङ्मयांत इतकीं सुंदर सुंदर पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत कीं, सगळीं नुसतीं पाहणेंसुद्धां शक्य होत नाहीं. अशा स्थितींत माझें आवडतें पुस्तक म्हणून निवड करणें किती कठीण आहे! मीं वाचलेल्या पुस्तकांत किती तरी पुस्तकें मला अतिशय प्रिय झालीं आहेत. त्यांत निवड कशी करणार ?

पण तरी त्यांतल्या त्यांत मीं एका पुस्तकाचें नांव सांगूं शकेन. तें म्हणजे श्यामची आई ! अगदीं एकच पुस्तक निवडायचें झालें तर मी हेंच निवडीन.

सानेगुरुजी यांचें जें पहिलेंच पुस्तक मीं वाचलें तें श्यामची आई. आणि नंतर त्यांची ओळन् ओळ वाचण्याचा अट्टाहास मी करूं लागलों. श्यामची आई मीं वाचली, त्या वेळीं मी स्वतः घरापासून दूर आईच्या आठवणीनें तळमळत होतों हेंच पुस्तक मला विशेष प्रिय होण्याचें हेंहि एक कारण असेल; पण तें अगदीं ' खासगी ' कारण आहे.

आईबद्दल प्रत्येकाच्या मनांत ज्या अनंत भावना असतात त्या सगळ्यांना कांहीं अपूर्व जागृति देणारें असें हें पुस्तक आहे. आईचें जें अपत्याच्या जीवनांत कार्य असतें तेंच श्यामची आई या ग्रंथानें होतें. जीवनांत मला या ग्रंथानें नवी दृष्टि दिली. माझ्या लहानशा जीवनांत या ग्रंथानें क्रांति घडवून आणिली आहे. अनेक संकटांतहि आपली सात्त्विकता टिकविणारें तें कुटुंब डोळ्यांसमोर उभें राहतें. श्याम जणूं काय अगदीं आपल्यासमोर बसून घरच्या, आईच्या आठवणी सांगत आहे असें वाटतें. गुरुजींच्या लेखणीचें हें सामर्थ्य आहे. अंतःकरणापासून निघालेले त्यांचे उद्गार हां हां म्हणतां इतरांच्या अंतःकरणाचा ठाव घेतात. वाचतां वाचतां मी इतका तन्मय होऊन जातों कीं, मी ग्रंथ वाचीत नसून श्यामचे प्रत्यक्ष शब्दच ऐकत आहें असें वाटूं लागतें. घरांतील अगदीं साधे प्रसंग आहेत सगळे. भाषा तितकीच साधी. मांडणींतहि कसल्याहि खुब्या नाहींत कीं कांहीं नाहीं. पण रोजच्या व्यवहारांत माणसाच्या सहृदयतेनें किती अवीट गोडी

निर्माण होते हें या आठवणींत दिसतें. ती गोडी कोठें असते हें श्यामची आई वाचली कीं कळूं लागतें. साधेंसुधें जीवन किती सुंदर असूं शकतें तें या ग्रंथांत पानोपानीं दिसतें. महाराष्ट्रांत फार काय सर्व देशांत अशींच कुटुंबें पुष्कळ आहेत. वैभवाच्या आणि सुखाच्या खोट्या कल्पनांमुळें आपणांस तीं दिसत नाहींत. साध्या कुटुंबांत माणुसकीनें स्वर्ग निर्माण केला आहे. वरवर पाहणारास तेथें झोंपडीवजा घरें दिसतील. फाटकीं-तुटकीं वस्त्रें पाघरणारीं माणसें आढळतील. घरांत भांडणें आहेत; रुसणीं-फुगणीं आहेत. आशा निराशेचीं आंदोलनें आहेत. बायका काय, पुरुष काय, अगदीं चाकोरीसारखें जीवन जगत आहेत. वरवर पाहणारांस वाटेल किती रुक्ष, नीरस, मागासलेलें जीवन हें ! ना धांवपळ, ना धरपड ! कोठें पेंचप्रसंग नाहीं ! कोठें गांभीर्य नाहीं ! पण श्यामबरोबर याच वातावरणांत वावरूं लागलें कीं, आपणांस कांहीं निराळेंच जग दिसूं लागतें. हीं साधीसुधीं व घोपटमार्गी माणसें हृदयानें किती जिवंत आहेत ते त्यांच्या सहवासांत राहिल्याखेरीज कळणार नाहीं. ग्रंथाच्या सहवासांत असताना, एरव्हीं निरर्थक वाटणाऱ्या ओव्यांत आणि म्हणींत कांहीं निराळाच अर्थ कळूं लागतो. या जीवनचित्रांतील अंतरंग जसजसें उकलूं लागतें तसतसें भोंवतालच्या सामाजिक जीवनाचें चित्र तेथें दिसूं लागतें. मातृभक्तींतून मन हळूं हळूं देशभक्तीकडे वळूं लागतें. ईशसेवेंतून देशसेवा समजूं लागते. हाच या ग्रंथाचा हेतु आहे.

श्यामच्या आईचें जीवन हा अतिशय थोर सेवावृत्तीचा आदर्श आहे. तिनें मोलकरणीला स्वतः भात करून तिच्या घरीं पोहोंचविला. कुठल्या परक्या बालकानें रडूं ऐकल्याबरोबर पोटचें मूल जरा दूर सारून त्याला पोटाशीं घेतलें. गोठ्यांतली गाय मेली तर जणूं काय मायेचें माणूस मरण पावल्यासारखें दुःख होऊन तिनें उपास केला. या लहानसहान कृत्यांत सर्वश्रेष्ठ सेवाधर्म आणि सर्वव्यापक मानवतेचा आदर्श विशेष परिणामकारक होण्याचें कारण तो सामान्य मानवी जीवनांतून व्यक्त झाला आहे. अलौकिक अशीं माणसें येथें नाहींत. अगदीं आईच्या आपुलकीनें

'श्यामची आई' भारतमातेच्या सर्व बालकांना हातांशीं धरून उदात्त जीवनाच्या मार्गावरून नेत आहे. माझी खात्री आहे कीं, लहानमोठ्या असंख्य हिंदबांधवांना श्यामच्या आईचें हें थोरपण, ही डोळस माया अनुभवास आली असेल आणि माझ्याप्रमाणेंच कित्येक सांगतील कीं, हेंच माझें आवडतें पुस्तक—श्यामची आई !

---

## ९२ : : छत्रीची आत्मकथा

माझ्या जन्माच्या कथेचा विचार मनांत आला कीं, माझें मन थेट प्राचीन काळपर्यंत मागें जातें. मनुष्य रानावनांत, उन्हातान्हांत, भटकत असतां दमून गेला कीं, एखाद्या झाडाच्या सांवलीखालीं बसे. तेथें बसल्या बसल्या तो त्याच्यावर 'छत्र' धरणाऱ्या झाडांना कितीं धन्यवाद देई ! अनादि कालापासून परोपकारी वृक्ष दमल्या-भागल्या प्रवाशांचे आणि पशुपक्ष्यांचे धन्यवाद घेत आहेत. मानवेतर प्राण्यांनीं अद्यापहि झाडांचा आश्रय सोडला नाहीं. परंतु मनुष्यप्राण्याला मात्र सावलीसाठीं झाडाच्या कृपेवर अवलंबून राहणें आवडलें नाहीं. आणि त्यानें स्वतः 'छत्र' निर्माण करण्याचें ठरविलें. प्रगतिप्रिय मानवाच्या मनांत अशा रीतीनें आमचा जन्म झाला. आमचें पहिलें स्वरूप झाडांच्या शाखाविस्ताराकडे पाहून माणसानें निर्माण केलें. झाडांचींच पानें ओरबाडून माणसानें आपली 'पहिली छत्री' निर्माण केली. आजहि माझ्या शरीररचनेंत त्या आद्य स्वरूपाचेंच प्रतिबिंब दिसत नाहीं का? कोंकणांतल्या शेतकऱ्याच्या इरल्यामध्यें या आद्य स्वरूपाच्या खुणा आजहि स्पष्ट दिसतात !

पण माणसाच्या हातून जन्म झाल्यामुळें माणसाबरोबर आमचीहि प्रगति होत गेली. आणि गरज म्हणून आम्हांला जन्म देणाऱ्या माणसानें आम्हांला स्वतःचें शिरोभूषण केलें ! रानावनांतून भटकतां भटकतां आम्हांला राजदरबारीं प्रवेश मिळाला. राजाच्या डोक्यावर चामराबरोबर 'छत्र' म्हणून आम्हीं मिरवूं लागलों. 'छत्र' हें राजवैभवाचें प्रतीकच होऊन बसलें. 'छत्र' हें संरक्षणाचें चिन्ह झालें. प्राचीन काळीं राज-

सत्तेच्या ऐन अमदानींत आम्हांला श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादिकांच्या सह-वासाचा लाभ घडला आहे. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगीं आपला वंश धन्य झाल्यासारखें वाटलें! पण किती केलें तरी आम्ही सर्वस्वीं पराधीन! नरश्रेष्ठाप्रमाणें राक्षसांच्याहि सिंहासनाची आम्हांला सजावट करावी लागली आहे! 'छत्र' या स्वरूपांत आम्ही असंख्य वेळां चढ-उतार अनुभविला आहे!

पण सत्ताधीशांचा सहवास सोडल्यास इतर ठिकाणीं माझ्या जातीची कधीं अवहेलना झाली नाहीं. 'छत्री' म्हणून आम्हांला ज्यांनीं ज्यांनीं जवळ केलें त्यांनीं आमची उपयुक्तताच लक्ष्यांत घेतली आणि आमची सेवा गोड करून घेतली आहे. श्रीमंतापासून गरीबापर्यंत जे कोणी पादचारी असतात त्यांचें आम्ही ऊन-पावसापासून रक्षण करीत आहोंत. सेवा हेंच आमच्या घराण्याचें ब्रीद आहे; भूषण हें नव्हे.

मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारी
छाया करी तपन दीप्तिसहि निवारी

असें वामनानें आमचें वर्णन केलें आहे.

माझेंच उदाहरण घ्या ना! एका साध्या कारकुनाची छत्री मी! पण वेळेवर मी त्याच्या बड्या साहेबाचीहि सेवा करते आणि माझ्या गरीब धन्याला शाबासकी मिळवून देतें. या लढाईपूर्वींच मी माझ्या मालकाच्या घरीं आलें. मला पसंत करून घरीं आणल्यापासून माझा मालक मला जिवापलीकडे जपतो. ऊन, पाऊस असतांना तर मी त्याच्या उपयोगी पडतेंच, परंतु एरव्हीं सुद्धां मालक मला काठी म्हणून बरोबर घेतातच! स्वतःचें सुबक नांव त्यांनीं माझ्यावर कोरलें आहे! त्यामुळें एखाद्या ठिकाणीं घाई-गर्दी असली तरी त्यांची माझी चुकामूक होत नाहीं. पण एकदां मात्र एका गुंडानें मला पळविण्याचा प्रयत्न केलाच! त्या वेळीं केवळ नांवामुळें मी पुन्हां मालकाच्या हातीं लागलें! 'अहो! ती माझी छत्री आहे म्हटलं!' असें दरडावीत त्यांनीं त्या गुंडाच्या हातून मला सोडविलें! त्या वेळीं माझ्या भेटीचा आनंद त्यांनीं अक्षरशः मला हृदयाशीं धरून व्यक्त केला!

लढाईच्या दिवसांत छत्र्यांच्या किंमती वाढल्या आणि गुण लोपले ! आपल्या बेगडी रंगानें अनेकींनीं आपल्या मालकांचे कपडे भिजविले. पावसाचें पाणी रंगीबेरंगी होऊन त्या छत्र्यांच्या हृदयांतून खालीं ओघळे ! अशा वेळीं माझ्या गुणांचा पाढा वाचतांना मालकाचें हृदय अभिमानानें भरून येतें ! लढाईमुळें सर्व वस्तूंचे भाव वाढले. माझाहि 'भाव' वाढला आहे. पण तो म्हणजे माझ्याविषयीं मालकाच्या मनांत असलेला आपुलकीचा भाव ! सेवावृत्तीची ही कमाई आहे !

'छत्र' म्हणून मिरविणाऱ्या माझ्या जातभाईंचे दिवस आतां संपुष्टांत येत आहेत. जेथें सिंहासनेंच डळमळूं लागलीं आहेत तेथें छत्र-चामरांची कशी घडगत लागणार ? पण 'छत्री' म्हणून सेवा करीत भलेपणा मिळविण्याचें आमचें भाग्य कोण हिरावूं शकेल ? अगदीं रेनकोटांच्या अमदानींतहि 'छत्री'नें आपलें स्थान टिकविलें आहे. आणि 'सनहॅट्स' ऐटीनें मिरवत असल्या तरी 'छत्री'ला त्या पदच्युत करूं शकणार नाहींत. जोंपर्यंत सूर्य तळपळत आहे आणि पाऊस वर्षाव करीत आहे तोंपर्यंत मी आणि माझे जातभाई आपल्या सेवावृत्तीनें मिरवत राहणारच !

---

## ९२ : : : : संप

आजकाल सर्वत्र संपाची भाषा ऐकूं येत आहे. कामाच्या मोबदल्याबद्दल आणि इतर कांहीं तदनुषंगिक गोष्टींबद्दल मालकांकडून जें वर्तन होतें त्याबद्दल कामगार असंतुष्ट होतो. हा असंतोष अनेक प्रकारें व्यक्त होत असतो. कधीं मालकाची विनंति करून तर कधीं काम करतांनाच कामगार आपला असंतोष व्यक्त करतात. परंतु मालकाची करुणा भाकून किंवा थोडीशी हेळसांड करून कामगारांची मागणी पूर्ण होतेच असें नाहीं. कामगारांस आपल्यावांचून गत्यंतर नाहीं, त्यांचें आणि त्यांच्या मुलाबाळांचें पोट आपल्या हातीं आहे हें मालकांस माहीत असल्यानें ते कामगारांच्या असंतोषाची पर्वा करीत नाहींत. कामगार तेथें अगतिक होतात.

परंतु कामगारांनीं आपली संघटना केल्यामुळें त्यांचें बळ वाढलें आहे. एखाद-दुसऱ्या कामगाराच्या असंतोष व्यक्त करण्याच्या वैयक्तिक प्रयत्नापेक्षां सामुदायिक प्रयत्नांमुळें कामगारांना बळ प्राप्त झालें आहे. या सामुदायिक संघटित प्रयत्नांसच संप असें नांव पडलें आहे. एखाद्या कारखान्यांतील सर्व मजुरांनीं आपल्या तक्रारींचें निराकरण होईपर्यंत काम करण्याचें नाकारलें, मालकाशीं असहकार पुकारला कीं, संपरूपानें तेथें संघटित सामर्थ्य निर्माण होतें आणि त्या सामर्थ्यापुढें मालकांना नमावें लागतें !

संपाचीं कारणें पूर्वापार चालत आलेलीं आहेत. काम आणि मोबदला यांचें व्यस्त प्रमाण हेंच मुख्य कारण असतें. कमी मोबदल्यांत जास्ती काम मिळावें, असा मालकांचा प्रयत्न असतो. आपल्या संपत्तीच्या राशी अखंडपणें चढत रहाव्यात म्हणून मजुरांना गुरांपेक्षांहि जास्त क्रूरतेनें राबविणारे मालक या विसाव्या शतकांतहि आढळतात. आपल्या श्रीमंतीचा विनियोग करतांना हजारों रुपयांचा दानधर्म करणारे मालक, आपल्याच कारखान्यांतील कामगारांना मात्र अगदीं गुलामांसारखे वागवितात ! याचें कारण कामगारांना स्वतःची इच्छा आहे, त्यांच्याविषयींहि आपलें कांहीं कर्तव्य आहे याची मालकांना जाणीवच नाहीं. ती जाणीव करून देण्यासाठीं संप हा संघटित आणि निर्वाणीचा अखेरचा प्रयत्न ठरतो.

आत्मरक्षणासाठीं कामगारांनीं संघटना करावयास आरंभ केला आणि ट्रेड युनियन, कामगार संघटना यांसारख्या संस्था निघूं लागल्या. कामगारांनीं संघटनेच्या जोरावर रशियांत राज्यक्रांति घडवून आणिली. तेव्हांपासून जगांतील कामगारांना आत्मविश्वास वाटूं लागला. त्या आत्मविश्वासानेंच कामगार, संपाच्या जोरावर मालकशाहीस नमवूं शकतात हें दिसून आलें.

संपावर गेलेल्या कामगारांविषयीं जनतेस सहानुभूति वाटावी आणि मालकशाहीवर लोकमताचें नैतिक दडपण पडावें यासाठीं संपाचीं कारणें

न्याय्य असलीं पाहिजेत. आपण न्याय्य हक्कांची मागणी करीत आहोंत अशी लोकमताची खात्री पटली पाहिजे. संपाचें सगळें सामर्थ्य त्याच्या या नीतिमत्तेवर अवलंबून आहे. संप करणारे कामगार आधींच दारिद्र्यानें गांजलेले असतात. काम सोडल्यामुळें त्यांच्या दारिद्र्याच्या यातना वाढतच जातात. अशा स्थितींत त्यांना लोकांच्या सहानुभूतीवरच अवलंबून रहावें लागतें. त्यांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन संपाची संघटना उध्वस्त करण्यासाठीं मालकहि आपलें सर्व सामर्थ्य एकवटून अरेरावी करूं लागतात. फाटाफूट, लांचलुचपत, रानटी पद्धतीचा जुलूम इत्यादि शस्त्रास्त्रांचा भडिमार सुरू झाला कीं, कामगारांच्या सामर्थ्याची ती कसोटीची वेळ असते ! अशा प्रसंगीं कामगारांनीं संघटना टिकविली तरच त्यांना विजय मिळवितां येतो. दोन्ही पक्षांस मान्य होतील अशा पंचांच्या मध्यस्थीनें शेवटीं संप मिटतो. सध्यां आपल्या सरकारनेंच अशी मध्यस्थांची नेमणूक केली आहे. त्यामुळें कामगार आणि मालक यांचीं भांडणें विकोपास न जातां सामोपचारानें बरेचसे संप मिटतात. परंतु एवढ्या प्रयत्नानें कामगारांना पुरेसें संरक्षण मिळत नाहीं. कामगारांना शेवटीं लोकमताचें नैतिक पाठबळ मिळवावेंच लागतें. लोकमताच्या पाठबळावरच सरकार आणि मालक यांना आपलें म्हणणें मान्य करावयास भाग पाडतां येतें.

कामगाराप्रमाणेंच इतरत्रहि संपाचा अवलंब होत असतो. आपल्यावर सत्ता गाजविणारास आपले हक्क मान्य करावयास लावण्याचा संप हा एक निर्वाणीचा उपाय आहे. म्हणून शिक्षक, पोस्टमन, सैनिक आणि विद्यार्थीहि या मार्गाचा अवलंब करूं लागले आहेत. या सर्व संपांच्या बाबतींत एकच गोष्ट आढळून येते ती म्हणजे संप करणारांची संघटना अभेद्य असली व त्यांच्या मागण्या न्याय्य असल्या तरच संप यशस्वी होतात. न्याय्य हेतूसाठीं उभारलेली संघटना कधींहि विफल होत नाहीं.

## १४ : : विद्यार्थी आणि राजकारण

आधुनिक युगांत अनेक गोष्टींची उलथापालथ होत आहे. जुनी समाजव्यवस्था नव्या युगाच्या गरजांप्रमाणें निरुपयोगी ठरत आहे. त्यामुळें त्या व्यवस्थेंतील आचार आणि विचारहि बदलत आहेत. कर्तव्याच्या बाबतींतहि असाच बदल होत आहे.

विद्यार्थि-जीवनाचें जुनें स्वरूप आणि नवें स्वरूप यांत कितीतरी फरक पडला आहे प्राचीन काळीं गुरुगृहीं राहून एक एक तप गुरुसेवा करून ज्ञानार्जन करणारा विद्यार्थी आज दिसत नाहीं. अध्ययनाचे विषय बदलले आणि पद्धतीहि बदलल्या. स्थूलमानानें असें म्हणतां येईल कीं, आजच्या विद्यार्थ्यांस प्राचीन विद्यार्थ्यांपेक्षां जीवनाचा जास्त परिचय होतो. जीवन हाच आजच्या अध्ययनाचा केंद्रबिंदु आहे. ज्ञानासाठीं ज्ञान संपादण्याऐवजीं, जीवनासाठीं ज्ञान अशी अध्ययनांत आणि अध्यापनांत दृष्टि आढळते.

भोंवतालच्या प्रौढ जगांत ज्या हालचाली होतात त्यांचे आघात, प्रत्याघात विद्यार्थ्यांवरहि होतात. आपल्या देशांत राजकीय स्वातंत्र्याचें कार्य इतकें सर्वव्यापी झालें आहे कीं, त्याबद्दलच्या चळवळीपासून जीवनाचें एकहि क्षेत्र अलिप्त राहूं शकत नाहीं. आपल्या प्रत्येक हालचालीचा राजकीय वातावरणाशीं संबंध येतोच. अगदीं वैयक्तिक जीवनावरसुद्धां राजकीय वातावरणाचा परिणाम होतोच; राजकारण हा आपल्या जीवनांत स्वतंत्र असा भाग राहिलाच नाहीं. अशा स्थितींत विद्यार्थ्यांचें जीवन तरी अलिप्त कसें राहणार ?

परंतु प्रत्यक्ष राजकीय कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांच्यांतलें अंतर दृष्टीआड करतां येणार नाहीं. राजकीय वातावरणाचा विद्यार्थ्यांनीं अभ्यास करणें निराळें आणि त्या वातावरणांत प्रत्यक्ष भाग घेणें निराळें. राजकीय चळवळींत ज्या वेळीं देशांतील असंख्य लोक उडी घेतात आणि आपापले नेहमींचे व्यवसाय सोडून देतात त्या वेळीं विद्यार्थ्यांसहि असें वाटतें कीं, आपण त्यांत सामील व्हावें. एखाद्या राजकीय आंदोलनाच्या प्रसंगीं

इतरांबरोबर–प्रौढांबरोबर–विद्यार्थीहि त्यांत सामील होतात. परंतु त्यानंतर प्रत्यक्ष कार्य करतांना त्यांना असें आढळून येतें कीं, आपली स्थिति कांहींशी बाजारबुणग्यांसारखी झाली आहे. राजकारण कळण्याइतका आपण अभ्यास केलेला नाहीं. वाटेल त्या संकटास तोंड देण्याइतकी तत्त्वनिष्ठाहि आपल्या ठिकाणीं नाहीं. अनुयायी होणारासुद्धां कांहीं तपश्चर्या करावी लागते. तितकीहि आपण केलेली नाहीं. अशा परिस्थितीत ज्यांच्या जीविताची सर्वस्वीं धूळधाण होऊन जे प्रवाहपतित होऊन राहिले आणि नामशेष झाले असे कित्येक तरुण विद्यार्थी आढळतात ! असा प्रसंग न येण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं राजकारणांतील आपलें स्थान नीट विचार करून ठरविलें पाहिजे. आपल्या देशांतील राजकीय जीवन ही अद्यापहि एक खडतर तपश्चर्या आहे. एखाद्या चळवळीच्या वेळीं शौर्याचे कांहीं आकर्षक क्षण येतात. ते पाहून तरुण मनास त्यांत उडी घेण्याचा मोह होतो. परंतु प्रत्यक्ष त्यांत भाग घेतल्यावर, सरकारी यंत्राचे तडाखे बसूं लागतात व ते बसूं लागल्यावर पहिली आकर्षकता नाहींशी होते आणि पश्चात्तापाच्या बोचण्या सुरू होतात. ज्या तरुणांनीं राजकीय कार्यातील जीवनाचा पूर्ण विचार करून केवळ तत्त्वनिष्ठेनें त्याचा स्वीकार केला ते आज तरुणांचे पुढारी झाले आहेत. परंतु त्यांच्याइतकी प्रखर तत्त्वनिष्ठा असणारे फार थोडे !

याचा अर्थ विद्यार्थ्यांचा राजकीय चळवळीशीं कांहींच संबंध नाहीं, असा नाहीं. राजकीय कार्यांत प्रत्येकास भाग घेतां येईल इतकी व्यापकता असतेच. कॉंग्रेसनें विधायक कार्यक्रम म्हणून जो सांगितला आहे त्यांत प्रत्येक नागरिकास आपापला व्यवसाय संभाळून भाग घेतां येतो. भावी कार्यासाठीं प्रत्येकास आवश्यक अशा तत्त्वनिष्ठ जीवनाची शिस्त त्या विधायक कार्यक्रमानें लागते. साक्षरताप्रसार, ग्रामसेवा, स्वावलंबन, आपल्या संस्कृतीचा अभ्यास इत्यादि कार्यें विद्यार्थ्यास विद्यार्जन न सोडतांहि करतां येतात. अशा कार्यांचा कधीं गाजावाजा होत नाहीं. लाठीमार खाणें, कायदेभंग करणें, तुरुंगांत जाणें इत्यादि कार्यांइतकीं वरील कार्यें भडक नाहींत. परंतु त्या कार्यांत यशस्वी होण्यासाठीं वरील कार्यांच्या रूपानें एक प्रकारें

तपश्चर्याच करावयाची असते. विद्यार्थिदशेंत वरील विधायक कार्यांनीं ती तपश्चर्या करतां येते.

य'खेरीज राजकीय चळवळीचा सामुदायिक असा एक प्रासंगिक भाग असतो. एखादा दिन पाळणे, हा असा एक भाग होय. अशा प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं समाजापासून अलिप्त राहावें असें निदान आज तरी कोणी सांगत नाहीं. नैमित्तिक कर्तव्यासारखें तें एक कर्तव्य आहे. परंतु तें पार पाडतांना उत्साहाच्या भरांत आपल्या विद्यार्थि-वृत्तीचें उल्लंघन होतां कामा नये. अशा प्रसंगीं मतस्वातंत्र्याच्या अर्धवट कल्पनांनीं विद्यार्थ्यांनीं हुल्लडबाजी केली तर त्यांची ती वृत्ति कर्तव्यशून्यतेपेक्षांहि तिरस्करणीय आहे. आपल्या कृतींतील तत्त्वांची किंवा गांभीर्याची ज्यांना जाणिवहि नाहीं असे अनुयायी प्रत्यक्ष शत्रूपेक्षांहि विघातक ठरतात. देशव्यापी राजकीय कार्यांत आपल्याला नेमून दिलेला भाग पार पाडतांना आपले पुढारी आणि त्यांचें कार्य यांच्या इभ्रतीस चुकूनहि धक्का लागणार नाहीं याची काळजी विद्यार्थ्यांनीं घेतली पाहिजे. अशा विद्यार्थ्यांतून भावी राजकीय कार्यकर्ते निर्माण होतात. राजकारणाशीं आपला संबंध जोडतांना प्रौढांचें अंधानुकरण न करतां आपलें कर्तृत्व आणि कर्तव्य यांचा विचार विद्यार्थ्यांनीं केला पाहिजे.

युद्धासारखा असामान्य प्रसंग उद्‌भवला म्हणजे त्या वेळीं सर्वांबरोबर विद्यार्थ्यांनाहि 'सैनिक' म्हणून दाखल व्हावें लागतें. त्या प्रसंगीं नेहमींचीं सर्वच कामें बाजूस फेंकावीं लागतात. परंतु अशा प्रसंगाची हांक येईपर्यंत ज्यानें त्यानें आपापलें नियोजित कर्तव्य करीत राहिलें पाहिजे.

---

## ९५ : करमणुकीचीं आधुनिक साधनें

आपल्या करमणुकीसाठीं नवीं नवीं साधनें शोधून काढणें हा माणसाचा अनादिसिद्ध स्वभाव आहे. मनुष्येतर प्राण्यांत सुद्धां केवळ करमणुकीसाठीं कांहीं हालचाली होतांना दिसतात. मनुष्यानें इतर क्षेत्रांप्रमाणेंच करमणुकीच्या क्षेत्रांतहि आपली बुद्धिमत्ता व्यक्त केली आहे. स्थूलमानानें असें

म्हणतां येईल कीं, करमणुकीच्या पद्धतीवरून एखाद्या व्यक्तीचा वा समाजाचा दर्जा ठरवितां येतो. आधुनिक मानवी समाजाच्या प्रगतीचीं लक्षणें इतर क्षेत्रांत दिसतात तशीं करमणुकीच्या साधनांतहि दिसतात.

करमणुकीच्या आधुनिक साधनांनीं मनोरंजनाचें कार्य तर होतेंच. परंतु त्यांत माणसाची कल्पकता, कलाप्रियताहि जास्त प्रमाणांत दिसून येते. शास्त्रीय संशोधनाचा प्रभाव करमणुकीच्या क्षेत्रांतहि दिसतो.

करमणुकीच्या जुन्या साधनांत पत्ते खेळणें, नृत्य-गायन करणें इत्यादिकांचा समावेश होई. पण शास्त्रीय शोधांमुळें पुढारलेल्या जगांत आधुनिक साधनें अधिक मनोहर झालीं आहेत. फोनोच्या प्लेटींतून आपणांस उत्तम प्रकारचें गायन ऐकतां येतें. एकच चीज मनाची तृप्ति होईपर्यंत सुद्धां श्रवण करतां येते. रेडिओमधून दूरदूरच्या देशांतील गायन-वादन बसल्या बैठकीवर चांगल्या रीतीनें ऐकतां येतें. इंग्लंडांतील नाच, अमेरिकेंतील गायन हीं घरबसल्या ऐकावयास मिळतात. याच रेडिओमधून करमणुकीबरोबर ज्ञानार्जन सुद्धां करून घेतां येतें. निरनिराळ्या देशांतील व्यापारी बातम्या व देशस्थिति समजते. लहान मुलांच्या करमणुकीकरितां रेडिओमधून गोष्टी सांगितल्या जातात. करमणुकीच्या आधुनिक साधनांत रेडिओनें क्रांति करून सोडली आहे. 'टेलिव्हिजन' नांवाची रेडिओची सुधारून वाढलेली आवृत्ति निघाली आहे. त्यांत तर केवळ शब्द ऐकू येत नसून बोलणाराची मूर्ति प्रत्यक्ष दिसते.

पुणें—मुंबईसारख्या शहरांतून बोलपट हें करमणुकीचें एक मुख्य अंग होऊन बसलें आहे. दिवसभर काम करणाऱ्यांना दोन-तीन तासांची करमणूक झाल्यास मनास बरें वाटतें व त्यांच्यांत उत्पन्न झालेलें शैथिल्य नाहींसें होतें. पहांटे चार चार वाजेपर्यंत चालणारीं पूर्वींचीं नाटकें आतां लोकांना आवडत नाहींत. एक म्हणजे त्यांना तितका वेळ नसतो व दुसरें असें कीं, करमणुकीच्या पायीं जागरणाचा त्रासहि होतो. त्या मानानें दोन-तीन तासांची बोलपटाची करमणूक बरी असते. पुन्हां गरीबांनासुद्धां उच्च प्रतीच्याहि करमणुकीचा लाभ बोलपटाच्या द्वारां घेतां येतो, त्यामुळें बोलपटांचा

व्याप वाढूं लागला आहे. लक्षावधि कारागीर व मजूर या धंद्यांत काम करीत आहेत. नाट्यसृष्टींत आपणांस कृत्रिमपणा फार आढळून येतो; पण बोलपटांत तसें नाहीं. प्रत्यक्ष सृष्टिसौंदर्य आपणांस बोलपटांतून पहावयास मिळतें. दूरदूरचे देश, अनेक अज्ञात प्रदेश, अनोळखी समाज केवळ या चलत्-चित्रपटांतूनच आपणांस पहावयास मिळतात. नुसतें ऐकण्यापेक्षां प्रत्यक्ष पाहण्यानें मनुष्यावर फार परिणाम होतो. कारण करमणुकीबरोबर, चित्रपट हंसत-खेळत ज्ञानहि देतात. अनेक प्रकारच्या शास्त्रीय घडामोडी चित्रपटांच्या द्वारां साधारण माणसासहि कळूं शकतात. शिवाय ' सचित्र ' बातम्यांचे एक-दोन भाग दाखविले जातात. त्यामुळें जगांतील चालू परिस्थितीचें ज्ञान आपणांस करमणुकीबरोबर करून घेतां येतें. या चित्रपटांचा उपयोग शैक्षणिक सुधारणेकडे लावल्यास मुलांना शिक्षणाबद्दल तिटकारा न वाटतां त्यांचा हंसत-खेळत विकास करतां येतो.

यानंतर ग्रंथवाचन हें एक करमणुकीचें आधुनिक साधन आहे. काम करून दमून आलेल्या मनुष्याला कांहीं तरी चांगलें ऐकावें, वाचावें, पहावें व मनाची उदासीनता घालवावी असें वाटतें. ग्रंथवाचनांत अलीकडे लघुकथांचें वाचन खूप वाढलें आहे. आपटेप्रभृतींची ३००–४०० पानांची कादंबरी अगर चिपळूणकरांचे ६०–७० पानांचे निबंध वाचण्यास लोकांना फारशी सवड नाहीं. म्हणून छोट्या छोट्या गुजगोष्टी वाचून करमणूक करून घेण्याकडे लोकांची प्रवृत्ति वाढत आहे. वाङ्मयाची वाढ आधुनिक जगांत झपाट्यानें होत असल्यामुळें वाङ्मयाचे नवीन नवीन प्रकार रूढ होऊं लागले आहेत. थोड्या वेळांत, थोड्याशा जागेंत आपली कल्पना सुंदर रीतीनें वाचकांपुढें कशी मांडतां येईल इकडे लेखकांचें लक्ष लागलें आहे. लेखनांत ' मंत्रा ' इतकेंच ' तंत्रास ' महत्त्व आलें आहे.

करमणुकीच्या आधुनिक साधनांत क्रिकेट, टेनिससारखे मर्दानी खेळ व कॅरम, पत्त्यांसारख्या बैठ्या खेळांचाहि समावेश होतो. तसेंच काव्यगायन, पोवाडे, गायन यांचा करमणुकीच्या साधनांतच समावेश होईल. सारांश, करमणुकीच्या आधुनिक साधनांत नुसती करमणूकच नव्हे तर अप्रत्यक्षपणें ज्ञानार्जनहि होत असतें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

मनुष्याचें जीवन जास्तींत जास्त सुखी करण्यासाठीं विविध शास्त्रें झटत आहेत. त्यांत प्रत्यक्ष करमणुकीच्या कामांहि बरेंच शास्त्रीय संशोधन उपयोगी पडत आहे. प्राचीन साधनांपेक्षां आधुनिक साधनांची केवळ संख्याच वाढली नाहीं तर आधुनिक साधनांनीं एकाच वेळीं असंख्य लोकांची करमणूक होते. त्या साधनांच्या उपभोगांत माणसाचा आर्थिक वा बौद्धिक दर्जा फारसा आड येत नाहीं आणि तीं करमणुकीचीं साधनें जास्त काळ टिकणारीं अशीं झालीं आहेत.

---

## ९६ : : इतिहास हें एक प्रकारचें अंजन आहे

फ्रेंच राज्यक्रांति कां झाली, महाराष्ट्रांत स्वराज्याची स्थापना कशी झाली, अमेरिकेनें स्वातंत्र्य कसें मिळविलें, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें शोधूं लागलें कीं, इतिहासाचें सामर्थ्य लक्ष्यांत येतें. कारण या प्रश्नांचीं उत्तरें शोधतांना या घडामोडींचीं कारणें हातीं लागतात. वरील प्रसंग हे एका दृष्टीनें अरेरावीच्या शोचनीय मृत्यूचीहि आठवण करून देतात. कारण अरेरावीचा जुलूम असह्य झाला म्हणूनच तिचा नाश करणारें सामर्थ्य अवतीर्ण झालें. फ्रान्समध्यें, महाराष्ट्रांत किंवा अमेरिकेंत स्वातंत्र्याची जी अप्रतिहत स्फूर्ति निर्माण झाली ती तत्कालीन सत्ताधीशांच्या अरेरावीमुळेंच. स्वातंत्र्यसंपादनाचे ते यशस्वी प्रयत्न परतंत्र देशांतील हतबलांना स्फूर्ति देतात. हा इतिहासाचा एक भाग झाला. इतिहासाचा दुसरा भाग एक प्रकारचें अंजन आहे.

'सत्तामदें जे झिंगले' त्यांनाहि इतिहासापासून फायदा होईल. त्यांना प्रत्यक्ष विरोध करणारा कोणी भेटणार नाहीं कदाचित्! परंतु जर त्यांनीं चुकून कधीं इतिहासाचीं पानें चाळलीं तर त्यांना त्यांच्यासारख्या अरेरावांचा शोचनीय शेवट तेथें आढळेल आणि त्यांची विवेकबुद्धि खडबडून जागी होईल. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं किंवा रशियन राज्यक्रांतीच्या वेळीं ज्या वेळीं अढळ वाटणारीं सिंहासनें कोसळलीं त्या वेळीं त्या सिंहासनांच्या कृपेनें धुंद झालेल्यांना कोठें आधार मिळेना. एखाद्या अनाथ भिकाऱ्या-

पेक्षांहि त्यांची केविलवाणी स्थिति झाली. पूर्वी गोरगरिबांना पायदळीं तुडवीत हिंडणाऱ्या त्या सत्ताधीशांना चोराप्रमाणें तोंड लपवून परागंदा व्हावें लागलें आणि त्या धरपर्डींत जे शेवटीं क्रांतिकारकांच्या हातीं लागले त्यांना कुत्र्याच्या मोलानें मरण पत्करावें लागलें ! अन्यायी, बेबंद सत्ताधीशांचा असा शेवट झाल्याचे प्रसंग इतिहासांत पानोपानीं आहेत. ते पाहून आजचे अरेराव दचकल्याखेरीज राहणार नाहींत. त्यांना शुद्धीवर आणण्याचें सामर्थ्य इतिहासपुरुषाच्या ठिकाणीं खात्रीनें आहे ! सन्मित्रांच्या उपदेशाला लाथाडणारांचे डोळे इतिहासरूपी अंजनानें तरी खाडकन् उघडतील ! कारण इतिहासानें सत्कृत्याप्रमाणें दुष्कृत्यांचीहि नोंद केली आहे !

जग जिंकावयास उरलें नाहीं म्हणून हळहळणारा अलेक्झांडर, आपण लुटलेल्या संपत्तीच्या राशी 'स्वर्गात' बरोबर नेता येत नाहींत म्हणून त्या राशींच्याकडे पाहून ढसढसा रडणारा महंमूद, हे नेपोलियन आणि अकबर यांच्यासारख्यांइतकेच मार्गदर्शक आहेत. व्रतपालनासाठीं वनवास पत्करणाऱ्या प्रभु रामचंद्राचें चरित्र जितकें उद्बोधक तितकेंच चौदा चौकड्यांचें राज्य उपभोगून शेवटीं मातीमोल झालेल्या रावणाचेंहि चरित्र उद्बोधक आहे. एका दृष्टीनें असेंहि म्हणतां येईल कीं, सत्पुरुषापेक्षां दुराचारी व्यक्तींनाच इतिहासाचा खरा उपयोग आहे. कारण ध्येयनिष्ठ व्यक्तींच्या ठिकाणीं आपलें कार्य सिद्धीस नेण्याचें स्वयंसिद्ध सामर्थ्य असतें. त्यांना कोणाच्याहि मार्गदर्शनाची फारशी अपेक्षा नसते. त्यांचे तेच मार्गदर्शक असतात. ते स्वतः इतिहास निर्माण करतात. परंतु त्यांचे जे विरोधक असतात, त्यांच्यासारखे वर्तमानकाळांत जे कोणी असतील त्यांना आपला नाश टाळावयाचा असेल तर इतिहासरूपी अंजनच तेथें उपयोगी पडेल. कारण सामर्थ्याची सद्दी असते तोंपर्यंत त्या अरेरावांच्यापुढें कोणाची मात्रा चालत नाहीं. त्यांच्या भोंवतालचे सज्जनहि तेथें निष्प्रभ ठरतात. सत्तेपुढें शहाणपण 'ढ' ठरतें ! त्या अरेरावांच्या दुष्कृत्यांचा परिणाम डोळ्यांसमोर दिसत असतांहि सुज्ञ अगतिक होतात. 'अप्रियस्यापि पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः ।' असें एक सुभाषित आहे. त्याची प्रचीति तेथें येते. न्यायासाठीं,

सत्याचा पुरस्कार करण्यासाठीं सर्वस्वावर पाणी सोडणारे रामशास्त्री थोडेच असतात ! अशा वेळीं त्या अन्यायी सत्ताधीशांना सावध कोणीं करावें ! त्यांचे डोळे कसे उघडावेत ? इतिहासच हें करूं शकेल. कारण इतिहासावर कोणाची सत्ता चालत नाहीं. अशा अरेरावांच्या सुदैवानें त्यांना वेळेवर इतिहासरूपी अंजन मिळालें तर त्यांना आपला नाश टाळतां येईल.

सामाजिक जीवनांत कांहीं रूढींचें विलक्षण प्राबल्य असतें. रूढि हाच धर्म समजून कांहीं अरेरावी होत असते. उदाहरणार्थ अस्पृश्यताच घ्या. अस्पृश्यता पाळण्यांत आपण धार्मिकतेचें पुण्य संपादित आहोंत असें कांहीं धर्मवेड्यांना वाटत असेल; परंतु या विकृत धार्मिकतेनें आपण आपल्या सामाजिक शक्तीचा किती अपव्यय करीत आहोंत हें त्यांना इतिहासच सांगूं शकेल. धर्माच्या नांवाखालीं कनिष्ठ वर्णीयांवर लादलेलीं बंधनें, त्यांच्यावर केलेले जुलूम इत्यादींचे वृत्तांत इतिहासग्रंथांतून वाचले कीं, त्या धार्मिकतेंतील विकृति लक्ष्यांत येते. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे, याची जाणीव त्या ऐतिहासिक माहितीवरून तरी खास होते. हिंदु-समाजापुरता विचार केल्यास स्त्रियांवर लादलेलीं बंधनें, उच्च वर्णीयांनीं केवळ जन्मामुळें गाजविलेली मिरासदारी, परमार्थाविषयींची अतिरेकी उत्कंठा इत्यादि गोष्टींतील विघातकता इतिहासाच्या वाचनानें तत्काळ लक्ष्यांत येते आणि त्यांचा पुरस्कार करणाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन पडतें !

---

## १७ : माझे आवडतें नाटक : एकच प्याला

मीं पहिलें नाटक पाहिलें तें म्हणजे एकच प्याला. हा केवळ योगायोग म्हणा फार तर. परंतु त्यानंतर मीं अनेक नाटकें पाहिलीं तरी एकच प्याल्या-इतकें दुसऱ्या कोणत्याहि नाटकाचें मला आकर्षण वाटलें नाहीं. एकच प्याल्याचे अनेक प्रयोग मीं त्यानंतर पाहिले. नाटक तेंच, मला अतिशय प्रिय आणि त्यांत निरनिराळ्या नटवर्गाच्या वैशिष्ट्यामुळें माझ्या आनंदांत भरच पडत गेली. प्रथम प्रयोग पाहिला तो गंधर्व कंपनीचा. त्या कंपनीच्या

ऐन उत्कर्षाच्या काळीं मला हें नाटक पहावयास मिळालें हें मी माझें एक भाग्यच समजतों.

नाटकाच्या आकर्षणांत दोन प्रमुख घटक असतात: मूळ नाटक आणि तें करणारा नटवर्ग. मुळांत सामान्य असें नाटकहि केवळ नटवर्गाच्या कौशल्यानें आकर्षक होऊं शकतें. परंतु एकच प्याल्याच्या बाबतींत मूळ नाटकाचा प्रभाव कधींहि लोपत नाहीं. गडकऱ्यांच्या प्रतिभेचें वैभव नाटकांत पानोपानीं प्रगट झालें आहे. नाटकांतील नुसतें भाषावैभवहि कमालीचे मनोवेधक आहे. त्या वैभवाची नाट्यप्रयोगांत अडचण होते खरी. संवादाच्या दृष्टीनें तें वैभव दोषास्पदहि होत असतें. परंतु जें रंगभूमीवर पेलत नाहीं तें ग्रंथवाचनांत कांहीं निराळाच आनंद देतें. रंगभूमीस पुरून ग्रंथरूपानें उरण्याइतकें सामर्थ्य फार थोड्या नाटकांत आढळतें. कित्येक नाटकांचे उत्कर्षापकर्ष रंगभूमीवरच अवलंबून असतात. परंतु एकच प्याला हें नाटक असें आहे कीं, त्याचे प्रयोग थांबले तरी त्याचें स्वयंसिद्ध आकर्षकत्व ग्रंथरूपानेंहि अनुभवास येतें.

तसें पाहिलें तर दारूमुळें होणारे अनर्थ हा कांहीं नवा विषय नाहीं. सर्वांना माहित आहेत ते अनर्थ. परंतु तरी गडकऱ्यांच्या हातीं तो विषय आल्यावर त्यास कांहीं निराळेंच सामर्थ्य प्राप्त झालें. सुधाकराच्या संसाराचें नाटकाच्या आरंभीं दिसणारें चित्र जितकें आल्हादकारक तितकाच त्या संसाराचा नाश भयानक आहे. सुधाकर हळू हळू व्यसनाधीन कसा झाला हें दाखविण्यांत गडकऱ्यांनीं कथानकाचे धागेदोरे बेमालुम गुंफिले आहेत. नाटकांतील घटनांचा ओघ अपरिहार्य वाटावा, स्वाभाविक वाटावा, यावरच त्याची परिणामकारकता अवलंबून असते. ती अपरिहार्यता एकच प्याल्यांत आहे.

पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत वियोगाचें आणि विरहाचें उदास वातावरण निर्माण होऊं लागलें. एकमेकांना जीव कीं प्राण असलेल्या त्या कुटुंबियांना प्रासंगिक विरहसुद्धां वियोगासारखा वाटतो. सिंधूला रामलाल परदेशी जावयास निघाला म्हणून अकारण हुरहूर वाटते. आणि भावा-

सारखा मित्र दूर गेल्यामुळें सुधाकरास अनाथ झाल्यासारखें वाटूं लागतें. भावी संकटाची सावली तेथें चोरट्या पावलानें प्रवेश करते. दुसऱ्याच प्रवेशांत त्या संकटाचा सूत्रधार तळीराम भगीरथास दारूचें तत्त्वज्ञान ऐकवूं लागतो. तळीरामानें दारूपायीं आपल्या बायकोच्या—गीतेच्या—गळयांतील मंगलसूत्रासुद्धां हात घातला. पुढील घटनांची ही सूचनाच असते. तिसऱ्या प्रवेशांत सिंधूहि माहेरीं जाते आणि 'प्रिय पत्नीच्या प्रेमानें आपलें सर्व जीवनच व्यापून टाकलें आहे' असें मोठ्या आभिमानानें सांगणारा सुधाकर पांचव्या प्रवेशांत तळीरामाच्या हातून मद्यपानाची दीक्षा घेतो. अशा रीतीनें पहिल्या अंकांतच पुढील भयंकर कोलाहलाची पूर्वतयारी होऊन गेली आहे !

सिंधु परत आली त्या वेळीं सुधाकरानें दारू सोडण्याची वेळ निघून गेलेली असते ! (कारण त्याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे दारू सोडण्याची वेळ दारू पिण्यापूर्वी असते ! ) दुसऱ्या अंकाच्या शेवटीं भगीरथाची दारू सुटली, पण सुधाकर मात्र त्या पेल्यांत बुडतच गेला !

अशा स्थितींत केवळ परमेश्वराला आळवीत व्याकुळ मनःस्थितींत दिवस कंठणारी सिंधु तिसऱ्या अंकाच्या आरंभीं कारुण्यमूर्ति म्हणूनच प्रवेश करते ! तिला अज्ञात असलेलीं संकटें धडाधड कोसळूं लागतात. वादळांत सांपडलेल्या कर्दळीच्या झाडाप्रमाणें तिची स्थिति होते. परंतु त्याहि स्थितींत ती सुधाकराचा—आपल्या पतीचा—त्याग करीत नाहीं "असे पति देवचि ललनांना" यावर तिची अढळ श्रद्धा आहे. त्या श्रद्धेला कांहीं चांगलीं फळें येण्याची आशा वाटूं लागते. तिच्या प्रेमाच्या आणि सेवेच्या प्रभावानें सुधाकर एक दिवस धांवत येऊन सांगतो, "आजपासून दारू सोडली !" त्याक्षणीं सिंधूच्या अंतःकरणांत एकदम हेलावलेला आनंदसिंधु पाहून सर्व प्रेक्षक आनंदानें मुग्ध होतात. परंतु हें सर्व किती क्षणभंगुर ! ज्या मानभंगाच्या असह्य यातनांच्या पायीं सुधाकरानें दारूचा स्वीकार केला त्याच मानभंगाच्या आणखी तीव्र प्रहारांनीं त्याच्या निश्चयाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या ! आपली प्रियपत्नी, आपलें गोजिरवाणें मूल, प्राणापेक्षांहि प्रिय अशी अब्रू, स्वाभिमान हीं सर्व एकामागून एक

रसातळास जात असलेली डोळयांसमोर दिसत असतां ज़ास्तच आवेशानें सुधाकर मद्यपान करूं लागतो! शेवटीं दारूबरोबर रसकापुराचें साहाय्य घेऊन त्याच्याहि जीवनाचा नाश होतो आणि पडदा पडला तरी नाट्य-गृहांत 'दारू! दारू!' असे आवाज दुमदुमत असल्यासारखें वाटतें! बाल-गंधर्वादि नटश्रेष्ठांच्या अभिनयाच्या दर्शनाच्या आनंदासाठीं मोठ्या उत्साहानें नाट्यगृहांत आलेले प्रेक्षक, निःशब्दपणें हळूं हळूं पावलें टाकीत डोळ्याच्या कडा पुशीत नाट्यगृहाबाहेर पाऊल टाकतात!

सुधाकरानें सिंधूसह संसाराचा आणि स्वतःचाहि सर्वस्वीं नाश केला तरी शेवटीं त्याच्याबद्दल आपल्या हृदयांत सहानुभूतीच वाटत राहते. एका प्रेमळ भावनाप्रधान व्यक्तीचा तो भीषण अंत प्रत्यक्ष प्रयोगांत जास्तच भीषण वाटतो. सुधाकरापेक्षांहि सिंधूचा अंत जास्त हृदयद्रावक वाटतो. मीं पाहिलेल्या प्रयोगाच्या वेळीं बालगंधर्वांनीं सिंधूचें काम केलें होतें. त्यांच्या अभिनय-कौशल्याची तेथें पराकाष्ठा झाली असेंच मला वाटलें. सिंधूनें अनंत यातना निःशब्दपणें सहन केल्या. तिच्या त्या निःशब्द यातनांनीं प्रेक्षकांचीं हृदयें विदीर्ण होतात. नाटकांत शोकरसाचा चढता वेग असह्य होऊन कांहीं प्रेक्षक नाटकगृहांतून कांहीं वेळ बाहेर ' पळ ' काढतात!

नाटकांतील विषयाच्या प्रभावापेक्षां व्यक्तिचित्रणाचाच मनावर परि-णाम होतो, असा माझा तरी अनुभव आहे. या दृष्टीनें तळीराम हा खल-पुरुष असला तरी मानवी स्वभावाचा एक नमुना म्हणून त्याच्यांतहि आकर्षकता निर्माण झाली आहे. शिवाय गडकऱ्यांच्यासारख्या भाषावैभव-संपन्न कुबेराच्या राज्यांत सर्वांच्याच अंगावर उपमा-उत्प्रेक्षांचे ' हिरे-मोतियांचे ' अलंकार असावयाचे! मग तो सुधाकर असो नाहीं तर तळीराम असो. आर्यमदिरामंडळाच्या बैठकींतील विनोदाच्या वातावरणांत प्रेक्षक क्षणभर इतके रंगून जातात कीं, त्या बैठकींतच सुधाकराचा संसारासह होम होण्याची पूर्वतयारी चालू आहे याचा विसर पडतो. परंतु त्या बैठ-कीचा कथानकाशीं संबंध पाहिल्यावर तें हास्यहि भयानक वाटूं लागतें.

नाटकाच्या शेवटीं शेवटीं कारुण्याचा इतका उत्कर्ष होतो कीं, मद्यं-

तरींच्या विनोदाची आणि हास्याची पुसटहि खूण राहत नाहीं. एकाच रसानें प्रेक्षकांचें मन बेभान करण्याइतका प्रभाव मला तरी दुसऱ्या कोणत्याहि नाटकांत दिसला नाहीं.

नाटकामुळें आणि नटामुळें या नाटकांतील सर्व प्रसंग माझ्या मनावर पूर्णपणें बिंबले आहेत आणि एकच प्याला हें माझें आवडतें नाटक ठरलें आहे.

---

## ९८ : : प्रवासांतील मौजा

' केल्यानें देशाटन पंडित-मैत्री ' इत्यादि ओळी मी लहानपणींच पाठ केल्या आहेत. तेव्हांपासून प्रवास म्हणजे मोठी गंभीर गोष्ट आहे असें मला वाटे. परंतु पुढें पुढें असें आढळून आलें कीं, इतक्या गंभीर हेतूनें प्रवास करणारा प्रवासी हा दुर्दैवीच म्हटला पाहिजे. प्रवासानें 'पंडित-मैत्री' वगैरे फायदे होत असतील, नव्हे एखाद्या वेळीं होतातहि. परंतु तो कांहीं प्रवासाचा हेतु नव्हे. प्रवासाचा खरा आनंद स्वैरतेंत आहे. आभाळांत उडणारे पक्षी कांहीं भूगोलाचें निरीक्षण करण्यासाठीं भटकत नाहींत; ते गगनविहारासाठीं पंख उभारतात तसेंच प्रवासाचें आहे. तशा वृत्तीनें प्रवास केला तर प्रवासासारखा दुसरा आनंदच नाहीं. अनाहूतपणें येणाऱ्या अनुभवासाठीं मनानें तयार रहावें एवढेंच आपलें काम. म्हणजे मानवी जीवनाच्या विविधतेच्या दर्शनानें मनसोक्त आनंद लाभतो.

मीं मित्रांबरोबर केलेला विजापूरचा प्रवास अशा अनुभवांनींच अविस्मरणीय झाला आहे.

आम्हीं सर्वांनीं ' झोनचा प्रवास ' करावयाचें ठरविलें होतें. झोनच्या प्रवासांत जागा मिळावयाची किती मारामार ! ज्या डब्याशीं जावें तेथील लोक ' इधर जगा नही ' असें म्हणून पिटाळून लावीत. नवा डबा जोडला हें कळल्यावर आम्हीं सर्वजण ' एंजिन 'कडे धांवलों. त्या डब्याला कुलूप घातलें होतें. आम्हीं सैनिकाच्या आवेशानें खिडक्यांतून

चढाई केली आणि डबा ताब्यांत घेतला. कित्येक उतारू आमच्या डब्याकडे जेव्हां येऊं लागले तेव्हां आमच्यापैकीं प्रत्येकानें खिडकींतून बाहेर तोंड काढून 'हा डबा चिकार भरला आहे' असें दाखविलें. केव्हां एकदां गाडी सुटेल व आम्हीं निःशंकपणें डब्याचा ताबा घेऊं, असें आम्हांस होऊन गेलें. शेवटीं एकदांची गार्डानें शिटी दिली. हिरवें निशाण फडफडूं लागलें. एंजिननें एक आरोळी ठोकली व गाडी हळूंहळूं सुरू झाली. एखादा देश जिंकल्यासारखा आनंद आम्हीं उपभोगूं लागलों. पण तो आनंद फार वेळ लाभला नाहीं.

मध्यंतरीं दौंड स्टेशनवर नगरकडून कांहीं लोक येऊन आमच्या गाडीस मिळाले. पुढें कुर्डुवाडी स्टेशनवर तर आमची खूपच त्रेधा उडाली. गार्डानें आमच्या डब्याचें कुलूप काढून लोकांना आंत बसावयास सांगितलें. नाइलाजास्तव आम्हांलाहि आवरून बसावें लागलें. शेवटीं कसें तरी एकदांचें सोलापूर गांठलें.

प्रवासातले जागा मिळविण्याचे पराक्रम अतिशय अभिमानास्पद असतात. एखाद्या सेनापतीनें शत्रूच्या प्रदेशावर आक्रमण करून तेथें आपला झेंडा उभारावा तसें त्या प्रसंगीं वाटतें. अर्थात् या प्रयत्नांतल्या यशाइतकेंच अपयशहि मनोरंजक असतें. एखाद्या वेळीं धक्काबुक्कीच्या मामल्यांत आपणास यशस्वी माघार घ्यावी लागते. आपलें मोठेंपण, आपला दर्जा, आपली ऐपत या सगळ्यांचें गांठोडें बांधून बाजूस ठेवून एखाद्या निरक्षर रानवटाच्या खांद्याला खांदा लावून उभें राहण्याचीहि वेळ येते. त्या वेळीं आपण मनांतल्या मनांत जें आत्मनिरीक्षण करतों त्यांत कांहीं निराळाच आनंद असतो. कुर्डुवाडीपासून पुढील प्रवासांत आम्हांला हा 'आनंद' भरपूर मिळाला ! त्या गर्दींत सांपडल्याचें दुःख आम्हीं लवकरच विसरलों आणि इतर प्रवाशांच्या गप्पागोष्टींत चटकन् सामील झालों. गप्पांना असा कांहीं रंग आला कीं, कांहीं विचारूं नका ! त्याहि स्थितींत आम्हीं आपल्या ज्ञानाची छाप इतरांवर पाडण्याची धरपड करीतच होतों. निदान थापा मारण्यांत तरी आम्ही त्या निरक्षरांपेक्षां वरचढ ठरलों !

प्रवासांतील यातना अशा रीतीनें मोठ्या धीमेपणानें सहन करीत करीत आम्हीं मनांत मुक्ततेच्या क्षणाची वाट पाहत होतों आणि शेवटीं विजापूर आल्याची बातमी कोणीं तरी सांगितली. त्या गर्दीतून मान शक्य तितकी मागेंपुढें वळवीत आम्हीं बाहेर डोकावण्याची धरपड करूं लागलों !

काहीं वेळानें आम्हांला दूरवर काहींतरी ठिपक्यासारखें दिसूं लागलें. आम्हांला खूप आनंद झाला. कोलंबसाला जमीन दिसल्याबरोबर तो जसा अत्यानंदानें ‘ जमीन, जमीन ’ म्हणून ओरडूं लागला तसें मला विजापूर दिसूं लागल्याबरोबर वाटूं लागलें. पण इतक्यांत आमची गाडी थोडीशी उतारावर गेली व तो ठिपका आमच्या दृष्टीआड झाला. आम्हांला केव्हां एकदां विजापूर येईल असें होऊन गेलें. गाडीच्या खिडकींतून सृष्टि-सौंदर्याचें निरीक्षण करीत असतां, एकदम एक छोटीशी मशिदीची इमारत डोळ्यापुढून निघून गेली. त्या मशिदीनें जणूं काय, विजापूरच्या प्रांतांत तुम्हीं शिरत आहांत हेंच दर्शविलें ! हळूंहळूं आम्हांला खिडकींतून मशिदी, थडगीं दिसूं लागलीं व चबुतरे व मनोरे मोडक्या-तोडक्या स्थितींत दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. आम्हीं, विजापूर अद्यापि किती दूर आहे हें पाहूं लागलों तों आमच्या दृष्टीला गोलघुमटाची भव्य इमारत दिसली व विजापूर शहरहि दिसूं लागलें.

विजापूर दिसूं लागल्याबरोबर इतका वेळ असह्य झालेल्या यातनांचा क्षणार्धांत विसर पडला. आम्हांला जागा न देणाऱ्या प्रवाशांच्याबद्दल आम्हांला आलेला राग केव्हांच मावळला होता. खालीं उतरतांना आम्हीं त्यांनाहि मोठ्या प्रेमानें नमस्कार केला. जणूं काय त्यांचे आम्ही अगदीं जिवलग मित्रच होतों.

प्रवासांतील या आणि अशा अनुभवांचें क्षणभंगुरत्व हेंच सर्व मौजांचें रहस्य आहे. प्रवासांतील सोयी वा गैरसोयी, मैत्री वा कलह, पराक्रम वा पराभव सगळें कांहीं लवकरच संपणारें असतें. त्या त्या क्षणीं आपणांस त्याविषयीं कितीहि उत्कटता वाटत असली, तरी शेवटीं आपणच स्वतःशीं हसून म्हणतों, “ काय एवढ्याश्या गोष्टीसाठीं आपण जिवाचा आटापिटा करीत होतों ! ”

शेवटीं अगदीं नकळत मनांत कांहीं आठवणी राहतात तीच प्रवासांतील खरी कमाई ! बाकी सर्व क्षणभर गंमत असते !

---

## ९९ : : एक संशोधक ( जोहान केप्लर )

गणिती आणि खगोल-शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेला हा शास्त्रज्ञ लहानपणीं आपल्या बापाच्या दुकानांत पोऱ्याचें काम करीत होता. जोहानचे वडील लष्करी अधिकारी होते. परंतु एका मित्राची जामीनकी अंगावर आल्यामुळें ते एकदम दरिद्री झाले आणि त्यांना खाणावळवाल्याचा धंदा करावा लागला. बापाच्या गरिबीमुळें जोहानला शाळा सोडून खाणावळींत नोकराचें काम पत्करावें लागलें. वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत जोहान हें काम करीत असे. पुढें त्यानें शाळेंत प्रवेश केला. परतु तेवढ्यांत तो अतिशय आजारी पडला आणि त्यांच्या आईबापांस देवी आल्या! जोहानचें शिक्षण शाळेच्या दाराशींच कांहीं वेळ थबकलें !

परंतु एक वर्षानें त्याचें शिक्षण पुन्हा सुरू झालें. तो विश्वविद्यालयापर्यंत पोहोंचला. पण परिस्थिति त्याला सारखी मागें खेचीत होती. जोहान सारखा आजारी पडे. आई भयंकर कजाग बाई होती. तिच्या त्रासानें बापानें घर सोडलें आणि तो परदेशांत निघून गेला, तो तिकडेच मरण पावला. तरी याहि स्थितींत जोहाननें पदवी-परीक्षा पार पाडली.

वयाच्या २३ व्या वर्षी तो खगोलशास्त्राचा प्रोफेसर झाला. पण खगोलाचें निरीक्षण करण्याची त्याची तळमळ प्रकृतीमुळें शांत होईना. त्याचे डोळे अधू होते आणि प्रकृति अगदीं तोळामासा होती. त्यामुळें त्याला रात्रीं उघड्या जागीं बसणें सोसत नसे आणि आकाशाचें निरीक्षण करण्याची खरी वेळ म्हणजे रात्रच ! पण प्रत्यक्ष डोळ्याची उणीव जोहाननें आपल्या अपूर्व कल्पनाशक्तीनें भरून काढिली. तो मनानें कांहीं सिद्धांत बसवी आणि त्यावर वारंवार विचार करून अनेक प्रकारें इतर संशोधकांच्या मदतीनें त्याची तपासणी करी.

स्वतःची दृष्टि अधू असल्यानें जोहानला कोणाची तरी मदत घेणें जरूर होतें. त्या वेळीं प्रेग येथें एक खगोल-शास्त्रज्ञ होता. जोहाननें त्याचा मदतनीस म्हणून काम करण्याचें पत्करलें. पण प्रवासांतच तो इतका आजारी पडला कीं, त्याचें जाणें कित्येक महिने लांबणीवर पडलें. जवळची सगळी पुंजी संपली आणि ज्या शास्त्रज्ञाकडे जावयाचें होतें त्याच्याकडूनच पैसे उसने काढावे लागले.

जोहानला एका विद्वान् शास्त्रज्ञाचें सहकार्य लाभलें, पण त्याच्या दुर्दैवानें तें फार दिवस मिळूं दिलें नाहीं. तो शास्त्रज्ञ मित्र लवकरच मरण पावला ! जोहानची त्याच्या जागीं सरकारनें नेमणूक केली. पण त्याच वेळीं सरकारी तिजोरी युद्ध-खर्चानें इतकी रिकामी झाली होती कीं, सरकारकडून मिळावयाचा मोठा पगार नेहमीं बाकीच राही !

पोट भरण्यासाठीं मग जोहाननें ज्योतिषाचा व्यवसाय सुरू केला ! पण शास्त्रज्ञानाचा उपयोग लोकांना भविष्य सांगण्यांत करावा याचा जोहानला फार तिटकारा वाटे ! 'ज्योतिषाचा धंदा म्हणजे भीक मागण्याचाच एक प्रकार' असें तो म्हणे ! परंतु पोटासाठीं त्याला तेंहि करावें लागलें.

परंतु या आर्थिक अडचणींशीं झगडत असतांनाच जोहानचें खगोल-शास्त्राचें संशोधन चालूंच होतें ! त्याचें शरीर दारिद्र्याशीं झगडत असतां, मन मंगळाची भ्रमण–दिशा ठरविण्यांत गुंग होतें.

संकटांनीं त्याचा पाठलाग चालूंच ठेविला. त्याची बायको आजारी पडली आणि ती बरी होते न होते तोंच तिन्ही मुलांना देवी येऊन शेवटीं एक मुलगा मरण पावला !

सरकारकडून थकलेला पगार मिळण्याची आशा नाहींशी झाल्यावर जोहाननें प्रेग सोडलें आणि आपल्या गांवीं जाण्याचें ठरविलें. थकलेल्या पगाराची वाट पहात जोहानचें संशोधन चालूंच होतें. त्याचा मंगळाविषयींचा ग्रंथ याच काळांत प्रसिद्ध झाला. आणि त्याच सालीं म्हणजे १६०९ मध्यें गॅलिलिओनें दुर्बिणीचा शोध लावला. दारिद्र्यास कंटाळून

जोहान आपल्या गांवीं येतो न येतो तोंच बायको तापानें आजारी पडून त्या दुखण्यांतच तिचा अंत झाला !

मुलांच्या संगोपनासाठीं जोहाननें दुसरें लग्न केलें. त्याच सुमारास त्याला इटलींतून प्रोफेसरच्या जागेसाठीं बोलावणें आलें. जोहाननें ती जागा स्वीकारली नाहीं ! पैशाच्या अडचणीच्या यातना तो भोगीत होता तरी त्यानें ती प्रोफेसरची जागा नाकारली ! कारण इटलींत स्वतःचीं मतें मांडण्याइतकें स्वातंत्र्य नव्हतें ! पोटासाठीं आपली मुस्कटदाबी करण्यास जोहान तयार नव्हता.

विचारस्वातंत्र्यासाठीं त्यानें दारिद्र्य पत्करलें. त्याचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर इंग्लंडला येण्याचें आमंत्रण आलें. जोहाननें तो ग्रंथ पहिल्या जेम्सला अर्पण केला होता. परंतु जोहान इंग्लंडला गेला नाहीं. त्यानें नकाराचें एक मजेदार कारण सांगितलें. तो म्हणाला : "बेटांत राहणें म्हणजे स्वतःला कोंडून घेण्यासारखें आहे !"

पण इंग्लंडच्या राजाचें आमंत्रण नाकारलें तरी जोहानचें दैव आतां त्याच्यावर प्रसन्न झालें होतें. त्याला सायलेशियाच्या ड्यूक ऑफ फर्डिनांडनें बोलाविलें. त्याच्या विद्वत्तेबद्दल फर्डिनांडनें अतिशय आदर दाखवून त्याला मोठा नजराणा दिला, प्रोफेसरची जागा दिली आणि त्याच्या हाताखालीं एका मदतनिसाची नेमणूक करून त्याला एक छापखानाहि नजर केला ! वयाच्या ५८ व्या वर्षी त्याचें जीवन स्थिर झालें. परंतु आतांपर्यंतच्या अडचणीशीं लढतां लढतां त्याचें शरीर थकून गेलें होतें. त्याचें संशोधन चालूच होतें. त्या कामाचाहि ताण पडे. थोडे बरे दिवस आले. आतां आपल्या बायकामुलांची तरतूद करावी आणि आपण मनसोक्त संशोधन करावें असें त्याचे बेत चालू होते. पण मनानें हुरूप दाखविला तरी शरीर खंगलें होतें आणि शेवटीं सुखाचा जेमतेम वर्षभर उपभोग घेऊनच जोहान ५९ व्या वर्षी १६३० मध्यें मरण पावला !

५९ वर्षांच्या आयुष्यांत फक्त शेवटीं एक वर्ष जोहानला थोडेसें सुख लाभलें.

जन्मभर तो दारिद्र्याशीं सारखा झगडत होता. पण त्या परिस्थितींतच त्यानें ५५ ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं ३३ त्याच्या हयातींतच प्रसिद्ध झाले. मरणाच्या वेळीं २२ ग्रंथांचीं हस्तलिखितें तयार होतीं !

डोळ्यानें अधू, प्रकृतीनें अशक्त, परिस्थितीनें आणि दारिद्र्यानें गांजलेला अशा या खगोलशास्त्रज्ञानें ग्रहांच्या गतीविषयीं केवळ तर्कशक्तीच्या सामर्थ्यानें महत्त्वाचे सिद्धांत मांडले. ते आज जगन्मान्य झाले आहेत. त्याच्या कांहीं नियमांना 'केप्लरचे सिद्धांत' असें नांव मिळालें आहे.

जोहान केप्लरच्या संशोधनानें सूर्यमालेचें स्पष्ट स्वरूप आणि सूर्यमालेंतील ग्रहांचे परस्पर संबंध प्रगट झाले.

---

## १०० : : अॅटम बॉम्बचा संदेश

६ ऑगस्ट १९४५ रोजीं जगाला धक्का देणारी एक गोष्ट झाली. त्या दिवशीं अॅटम बाम्बचा अवतार झाला !

त्या अवतारानें 'हिरोशिमा' तर हादरलेंच, पण सगळें जगहि हादरलें. आणि पहिल्या धक्क्याचा हादरा थांबतो न थांबतो तोंच ८ ऑगस्टला 'नागासाकी' वर आणखी एक अॅटम बाँब पडला ! जगाच्या कानठळ्या बसल्या. डोळ्यापुढें काजवे चमकूं लागले. आणि १० ऑगस्टला तोफांचे गडगडाट 'सरकारी' रीत्या थांबले तरी जगाच्या अंतःकरणाची धडधड मात्र थांबली नाहीं !

अॅटम बॉम्बच्या धूमधडाक्याचा परिणाम इतका झाला कीं, विजयाची भावनाच हादरली. पहिल्या विजयानें बेहोष झालेलें मन एकदम बधिर झालें. आणि विजयानंतर करावयाचे सगळे बेत गारठून विजयाचीच चर्चा सुरू झाली.

'विजय झाला पण कोणाचा ?' असा एक नवा प्रश्न अॅटम बॉम्बनें जगांत सुरू केला. आतां आपल्यावरील पारतंत्र्याचें जोखड, गुलामगिरीच्या यातना, जीवनाचें भेसूर स्वरूप नाहींसें होईल इत्यादि परतंत्र राष्ट्रांतील विचा-

रहि क्षणभर थांबले. विजयी राष्ट्रांनाहि आपल्या विजयोत्सवाचा तितकासा उत्साह राहिला नाहीं. सुट्टी मिळाली, रजा मिळाली, दारू फुकट मिळाली आणि जिवंत राहतां आलें म्हणून थोडे नाचरंग झाले, नाहीं असें नाहीं. किती केलें तरी विजयदिन म्हणजे कांहीं जर्मनी—जपान— बद्दलच्या सुतकाचा दिवस नव्हे ! पण या नाचरंगाच्या दंगलींत एकदम डोळ्यासमोर ॲटम बॉम्ब दिसूं लागे. नाचाचा ताल चुकूं लागे आणि गाण्याची लकेर थंडावूं लागे.

कारण एकदम विचार येई, विजय झाला ! पण कोणाचा ?

ॲटम बॉम्ब विकट हास्य करून सांगत आहे. "माझा ! तुमचा नव्हे ! तुमचें शौर्य, तुमचे डावपेंच, तुमच्या चढाईच्या आघाड्या आणि यशस्वी माघारी हीं सगळीं आतां फोल आहेत. मागल्या युद्धांत घोड्यांना महत्त्व होतें तितकें आतां माणसांनासुद्धां राहिलें नाहीं आणि यापुढें आतां परमाणूला जें महत्त्व आहे तितकें परमेश्वराला सुद्धां नाहीं."

ॲटम बॉम्बच्या पराक्रमानें जगभर तत्त्वज्ञानाची एक लाट उसळल्यासारखी दिसते. आधींच विध्वंसक हत्यारांच्या प्रभावानें जीवित नश्वर वाटूं लागलें होतें. आतां तर 'ईश्वराला'हि नश्वरतेच्या विचारानें पछाडलें असेल. विध्वंसक हत्यारांचें सामर्थ्य एकीकडे वाढत होतें तेव्हांच लोक बॉम्ब टाकतां टाकतां एकमेकांना सांगत होते, "आतां एवढे बॉम्ब सम्पवले कीं, विध्वंस बंद ! फार वाईट खोड आहे ही ! शस्त्रसंन्यास घेतलाच पाहिजे."

आणि हें म्हणतां म्हणतां ॲटम बॉम्ब उडाला ! आतां जगणें आणि मरणें याला कांहीं अर्थच उरला नाहीं. जीविताला एवढा मोठा धक्का देणारा ॲटम बॉम्ब हाच खरा विजयाचा धनी । त्याचे संशोधक आणि त्याहिपेक्षां त्याचे नियोजक हे केवळ निमित्तमात्र !

अमेरिकेच्या हातांत ॲटम बॉम्ब आहे तोंपर्यंत अमेरिका विजयी. ज्याच्या हातांत तो बॉम्ब जाईल तो विजयी आणि त्या बॉम्बचें स्वामित्व हें कोणत्याहि नैतिक तत्त्वावर अवलंबून नाहीं. त्या बॉम्बच्या धास्तीनें इतर

राष्ट्रें अमेरिकेकडे आतां अतिशय दबकून पाहूं लागतील. हीच ती अमेरिका कीं, जेथें स्वातंत्र्यदेवीचा सर्वांत मोठा पुतळा आहे असें म्हणतात !

एवढें सामर्थ्य हातीं असतां आतां माणसांची नि माणुसकीची कशाला पर्वा करावी ? आतां तहाच्या वाटाघाटींसाठीं इकडून तिकडे विमानांतून आणि पाणबुड्या बोटींतून धांवपळ करण्याचें कारण काय ? आतां परिषदा कशाला आणि चर्चा कशाला ? खिशांत 'परमाणु' घालावा आणि फिरावयास निघाल्यासारखें जगावर बेधडक दाणदाण पावलें टाकीत भटकून यावें ! एवढें सामर्थ्य देणाऱ्या ॲटम बॉम्बचा जयजयकार असो !

ते गरीब बिचारे संशोधक ! त्यांनाहि त्या ॲटमच्या कामगिरीचें रहस्य पूर्णपणें कळलें नाहीं ! तें रहस्य त्यांना समजलें असतें तर त्यांनींच जगाच्या टाळक्यावर त्या बॉम्बची तरवार टांगती ठेवून सगळ्या जगाला नमविलें नसतें का ? परंतु आतां ती वेळ गेली ! आतां लोक त्यांनाच फांशीं देण्याची भाषा बोलत आहेत. संशोधकांचें हें असेंच होतें. त्यांच्या शोधांचा कोणीतरी अरेराव ताबा घेतो, जगांत उत्पात करतो आणि लोक म्हणतात 'याला जबाबदार ते संशोधक ! त्यांना आधीं फांशीं' द्या !

एका दृष्टीनें त्यांचीहि चूकच नाहीं का ? मूर्ख माणसांच्या हातांत जळतें कोलीत देण्यापूर्वी त्यांनीं दहादां विचार करावयास नको होता का ? खुनी माणसाप्रमाणेंच खुनास साहाय्य करणारेहि अपराधी ठरतात आणि शिक्षेस पात्र होतात ! तेव्हां विजयाचा वांटा घेण्यासाठीं जर संशोधक हात पुढें करणार असतील तर हिरोशिमा आणि नागासाकी येथील असंख्य मृतांच्या आत्म्यांचा तळतळाट घेण्यासाठींहि त्यांनीं आपलें शिर पुढें केलें पाहिजे. जपानमधील अरेरावी नष्ट करण्याचें पुण्य घेतांना ते जर पुढें येणार असतील तर इतर देशांतील असंख्य निरुपद्रवी लोकांच्या जीवितांतील शांततेचा भंग केल्याचें पापहि त्यांनीं पत्करलें पाहिजे !

पण त्याच संशोधकावर नि त्याच्या ॲटम बॉम्बवरच एवढा रोष कां, हाहि एक प्रश्न आहे. ॲटम बॉम्बची विध्वंसन-शक्ति बॉंब इत्यादि साधनांपेक्षां थोडी किंवा पुष्कळ जास्त आहे एवढेंच ना ! सर्व साधनांची जात एकच

नाहीं का ? देशप्रेम, स्वातंत्र्य-प्रीति, स्वाभिमान या वृत्तींच्या सामर्थ्यानें लढणारे प्राचीन रणशूर वीर ज्या वेळीं निकामी ठरले, माणसें जेव्हां भाडोत्री जनावरें ठरलीं—किंबहुना जनावरांपेक्षांहि क्षुद्र ठरलीं त्याच क्षणापासून या अधःपातास सुरुवात झाली आहे. तत्त्वापेक्षां शक्तीच्या जोरावर युद्धें जिंकण्याचा प्रघात आधुनिक शस्त्रसंभारानें सुरू केला त्याच वेळीं विजयाची जात नि स्वरूप बदललें ! यापूर्वी संहारक हत्यारांनीं केलेला संहार हा जणूं काय समर्थनीय आणि न्याय्य होता. अशा भावनेनें ॲटम बॉम्बबद्दल कांहीं लोक जात्र विचारूं लागले आहेत कीं, ॲटम बॉंब कां टाकला? शॉ विचारतोः 'दुसरा बॉंब कां टाकला?' जणूं काय पहिला टाकणें हें मोठें धर्मकृत्यच होतें ! जणूं काय युरोपांत केलेला संहार हा अगदीं आवश्यकच होता ? युद्धांत माणसांपेक्षां शस्त्रास्त्रें ज्या दिवसापासून प्रभावी ठरूं लागलीं त्याच दिवशीं त्या वेळच्या एखाद्या शॉनें असें कां विचारलें नाहीं ? ॲटम बॉम्बनें जपानमध्यें केलेला संहार युरोपांतील संहारापेक्षां काय जास्त भीषण नि भेसूर आहे ?

उलट असें म्हणतां येईल कीं, जर संहार-सामर्थ्यानेंच युद्धांचा निर्णय लागावयाचा तर वर्षानुवर्षें संहाराची शर्यत चालू ठेवण्यापेक्षां ही 'ॲटम-पद्धति' बरी ! दोन शहरें बेचिराख झालीं पण त्यामुळें इतर बांचलीं नाहींत का ? युरोपमधल्या युद्धांत हा 'परमाणु' अवतीर्ण झाला असता तर लक्षावधि अर्भकांचा, असंख्य निरुपद्रवी प्रौढांचा, अगणित तरुणांचा जीव बांचला असता. ६ तारखेस पहिला बॉंब, ८ ला दुसरा, १० ला युद्ध खलास ! युरोपांत असेंच झालें असतें ! माणसांनीं तेथें अनन्वित क्रूर कृत्यें केलीं आणि सुधारलेल्या युगाला कलंक फांसला. अशा काळांत जन्मल्याबद्दल जिवंत असणाऱ्यांना लाज वाटेल. असे त्यांनीं दिवे लावले त्यापेक्षां ॲटम बॉम्बचें विध्वंसन-कृत्य खात्रीनें कमी रानटी ठरेल !

तेव्हां नैतिकदृष्ट्या विचार केला तरी युरोपांतल्या पशुवृत्तीच्या सैनिकांपेक्षां आणि चीनमध्यें सैतानासारखे विलास करणाऱ्या जपानी बहादुरांपेक्षां ॲटम बॉम्बनें जास्त मोठा नैतिक विजय मिळविला आहे !

जिवंत राहून वर्षानुवर्षे कोणत्या तरी देशांतील माणसांची गुलामगिरी पत्करणें नशिबीं असेल तर त्यापेक्षां क्षणार्धांत मुक्त करणाऱ्या ॲटम बॉम्बची कृपाच बरी असें आतां कित्येकांना म्हणण्याची वेळ येणार आहे !

ज्यांच्यावर विजयश्रीची कृपा झाली नाहीं आणि ॲटम बॉम्बचीहि कृपा-दृष्टि वळली नाहीं त्या शरणागत, पराभूत लोकांचें जिणें उध्वस्त शहरा-पेक्षांहि भेसूर झालें आहे आणि यापुढें तें जास्त जास्त भेसूर होत जाणार ! आपण भारतीयांनीं अगदीं सर्वव्यापी पारतंत्र्यांत दीडशें वर्षे काढलीं. जगांत अपमानाचे जेवढे प्रकार असतील आणि दारिद्र्याचे जेवढे 'अवतार' असतील ते सर्व आपण अनुभवले; पण आपल्यालासुद्धां कधीं कधीं आश्चर्य वाटतें कीं, यापुढें जर्मन आणि जपानी लोक कसे दिवस काढतील ? त्यांचीं दुःखें आपल्या दुःखांपेक्षांहि भयंकर असतील का ? त्यांनीं हें जिणें कां पत्करलें ? त्यांचा पराभव कां झाला ?

जपानी लोक थकच झाले असतील ! त्यांना मनसोक्त लढायलासुद्धां मिळालें नाहीं. इतक्या दिवस थांबून आत्तांशीं कुठें 'मोठे मोठे' शत्रू त्यांना दिसूं लागले होते. पण थोडी कुठें गोळागोळी होते तोंच एकदम 'शरणागति,' आणि 'पराभव' असले शब्द त्यांना ऐकूं येऊं लागले ! आपल्या साहेबाचे सेनापति त्यांना दिसलेसुद्धां नसतील. आतां ते म्हणत असतील, 'विजय झाला खरा ! पण कोणाचा ? ॲटम बॉम्बचा ! लढाई झाली खरी, पण कोणाची ? ॲटम बॉम्ब आणि त्याचीं इतर भावंडें यांची ! त्यांत तो 'दादा' ठरला. पण या साधनांच्या भोवतालचीं माणसें मात्र तशींच आहेत. त्यांच्या भांडणाचा निवाडा झालाच नाहीं. बॉम्बच्या गड-गडाटानें सर्वांच्या कानठळ्या बसल्या आहेत. त्यामुळें कांहीं ऐकूं येत नाहीं. आणि म्हणून वाटतें 'शांतता झाली—वादळ थांबलें.'

लढाई थांबली आहे, पण कांहीं दिवसांनीं पुन्हां कान जागे होतील तेव्हां मग सर्वत्र आक्रोश, हलकल्लोळ ऐकूं येईल. माणसांच्या मनांतली राक्षसी वृत्ति तशीच आहे. दीनदुबळ्यांचा आक्रोश चालूच आहे. मग आपण एकमेकांस विचारूं लागूं कीं, "का हो, लढाई संपली, शांतता

झाली असें आपण ऐकलें होतें ना ? मग हें काय ! विजय झाला ना पण कोणाचा ? विजयाचा आनंद माणसांच्या जगांत तर कोठेंच दिसत नाहीं. मग विजय झाला तो कोणाचा ?"

ॲटम बॉम्बचा ! ॲटम बॉम्बनें आपल्या जातभाईवर विजय मिळवला. तुम्ही आम्ही, ते विजयी आणि ते पराभूत, सर्वच आक्रोश करीत आहेत ! म्हणजे युद्ध चालूच आहे कीं !

---

# थोडेंसें मार्गदर्शन

[ कांहीं निबंधांच्या लेखनाचे आराखडे खालीं दिलेले आहेत. ]

## ( १ ) मोठें कुटुंब.

**प्रस्तावनाः**—प्रकार. ( १ ) आई, बाप, बहिणी व भाऊ.
( २ ) वडील व धाकट्यांचीं लहान लहान कुटुंबें.

**फायदेः**—
१ सहवास.
२ आत्मोन्नति व स्वार्थत्यागाचें शिक्षण.
३ प्रयत्नास संधि.
४ दुर्बलांचें आश्रयस्थान.

**तोटेः**—
१ वडिलांवर धाकट्यांचें ओझें.
२ प्राप्ति व कुटुंबवाढ यांचें व्यस्त प्रमाण.
३ नव्या-जुन्यांचे मतभेद आणि तेढ.

**समारोपः**— फायदे किंवा तोटे कुटुंबांतील चालकांच्या वृत्तीवर अवलंबून.

## ( २ ) एक सुंदर घर.

प्रस्तावना:— श्रीमंती व सौंदर्य यांचा संबंध.

घराचें सौंदर्य:–( १ ) वसतिस्थान, नदीकांठ वगैरे.
बाग, मोकळी जागा इ.

रचना:— एक किंवा दोन मजली. मोठा व्हरांडा. मोठीं दारें व खिडक्या. रंग. वस्तुसंग्रह ( फर्निचर वगैरे ). व्यवसायासाठीं, पाहुण्यासाठीं स्वतंत्र विभाग.

समारोप:— विश्रांति व उत्साह देणारें स्थान.

## ( ३ ) आदर्श गांव

प्रस्तावना:— आजचीं खेडीं--अज्ञान व दारिद्य.

सुधारणा:— रस्ते, गटारें, पाणवठे, इ.
दिवे, झाडांची रस्त्यावर लागवड.
आरोग्यरक्षणार्थ औषधालयें वगैरे.
शाळा, स्थानिक व्यवसायाचें शास्त्रोक्त शिक्षण.
शहराशीं परिचय, सामान्यज्ञान-संवर्धन.

समारोप:— निसर्गाची कृपा व मानवी प्रयत्न यांचा संयोग.

## ( ४ ) संप.

प्रस्तावना:— सामान्य स्वरूप, असंतोष व्यक्त करण्याची सामुदायिक पद्धति.

साधारण स्वरूप:— कारणें: पगार व काम यांचें व्यस्त प्रमाण.
मालकांची बेफिकीरी, अरेरावी.

कार्य:— ट्रेड्यूनियन, मजूरसंघ इत्यादि.
मालकांची गरज ओळखून सनदशीर अडवणूक, न्याय्य मागणी.

शेवट:— पंचांची नेमणूक.
सामोपचारानें, जनतेच्या सहानुभूतीनें शेवट.

मजुरांचें मर्यादित सामर्थ्य.
फितुरीचा धोका.

समारोपः— मजुरांचा हक्क व तो मिळविण्याचें एकमेव साधन. संघशक्तीची आवश्यकता.

## ( ५ ) मी शाळेचा मुख्य झालों तर –

प्रस्तावनाः— शाळेचा हेतु, ज्ञान व चारित्र्य यांचें संवर्धन.

कार्येः— ( १ ) आदर्श शिक्षक--विद्यार्थिवृत्ति, चारित्र्य-संपन्नता, विद्यार्थ्यांचे थोर मित्र, व्यवसायाविषयीं प्रेम बाळगणारे.

( २ ) ऐसपैस वर्ग, विद्यार्थिसंख्येची मर्यादा, वाचनालय, ग्रंथालय, इतिहास, भूगोल, शास्त्र, इत्यादींचीं स्वतंत्र गृहें, बाग, व्यायामशाळा, क्रीडांगण, इ.
श्रमसौंदर्याची ओळख व आवड.

( ३ ) व्यवस्थेंत विद्यार्थ्यांच्या बहुमतास मान.
विद्यार्थि–प्रतिनिधी-सभा.

( ४ ) सहली, चढाओढीचे सामुदायिक खेळ इत्यादि प्रसंगांनीं शिक्षक व विद्यार्थी यांचे जिव्हाळ्याचे संबंध.

समारोपः— लोकसत्ताक व राजसत्ताक पद्धतीच्या संयुक्त प्रयोगानें चालणारें राज्य.

## ( ६ ) शिस्तीचें महत्त्व

प्रस्तावनाः— बेशिस्तपणा हेंच सुख समजण्याची प्रवृत्ति.
( उदाहरणें )

महत्त्वः— वेळ व शक्ति यांचा योग्य उपयोग.
वेळ व श्रम यांची बचत.
सामाजिक उपयुक्तता.

विशेष प्रसंगः— सामुदायिक स्वरूपाचीं कार्यें, वर्ग, संमेलनें, खेळ वगैरे
शिस्त हा सैनिकाचा पहिला गुण.
समारोपः— विद्यार्थि दशा. हाच योग्य काळ.

## ( ७ ) पूर्व आणि पश्चिम

प्रस्तावनाः— संन्यासी व शास्त्रज्ञ यांचीं शब्दचित्रें.
पौर्वात्यांचें कार्यः— तत्त्वज्ञान-नैतिक व आध्यात्मिक यावर भर. ( उदाहरणें.)
पाश्चिमात्यांचें कार्यः—जीविताची ऐहिक उन्नति, शास्त्राची वाढ, भूपृष्ठसंशोधन इ. ( उदाहरणें.)
जीविताचें पूर्णत्वः— ऐहिक आणि पारलौकिक कर्तव्यांची पूर्णता
समारोपः— पौर्वात्यांचें तत्त्वज्ञान व पाश्चिमात्यांचें भौतिक सामर्थ्य यांचें एकीकरण व्हावयास पाहिजे.

## ( ८ ) आपली दानधर्मपद्धति

प्रस्तावनाः— भिकाऱ्याचें करुणाजनक दृश्य.
दानाचे प्रकारः—( १ ) दुःखनिवारणाचे- ( १ ) तात्कालिक उपाय.
( २ ) चिरकालिक उपाय.
प्राचीन प्रकारः—(२) पैसा, अन्न, प्रत्यक्ष शारीरिक साहाय्य, विद्या.
आधुनिक प्रकारः—(३) धर्मशाळा, अन्नछत्रें, भोजनावळी इत्यादि.
त्यांचा परिणामः— आळसास उत्तेजन.
भिकाऱ्यांतील गुन्हेगारांची वाढ.
सुधारणेचे मार्गः— वैयक्तिक समाधानाची वृत्ति बदलली पाहिजे.
सामुदायिक स्वरूपानें साहाय्याची, दानाची पद्धति. संस्था वगैरे.
भिकाऱ्याविषयीं कायदे.

दानधर्मासाठीं दिलेल्या नेमणुका वगैरेंच्या विनियोगावर कायदेशीर बंधन.

## (९) मोफत वाचनालयें

प्रस्तावनाः— देशांतील निरक्षरतेचें प्रमाण.
निरक्षरतेचीं कारणें व परिणाम.
वाचनालयाचें सामान्य वर्णन, उपयोग.
मोफत वाचनालयाची आवश्यकता.
(१) ज्ञानप्रसाराचीं अपुरीं साधनें.
(२) जनतेचें दारिद्य.
(३) ज्ञानार्जनाच्या साधनांची व्याप्ति.

मोफत वाचनालयाचा हेतुः—सर्वसामान्य ज्ञानप्रसार.

कार्यपद्धतिः— ग्रंथापेक्षां वृत्तपत्रांचा संग्रह करावा.
विशिष्ट लोकवस्तीप्रमाणें वेळ.
वाचनालयांतील आकर्षकता.
साप्ताहिक व्याख्यानें वगैरे.

समारोपः— ज्ञानवर्धनाची आवड उत्पन्न करणें.

## (१०) थेंबें थेंबें तळें सांचे

प्रस्तावनाः— प्रत्यक्ष तळें तयार कसें होतें ?

म्हणींतील सूचित अर्थः—व्यक्तीचें सामर्थ्य.
अनेक व्यक्तींचें संकलित सामर्थ्य.

उदाहरणेंः— मधमाशी, मुंग्यांचें वारूळ, पक्ष्याचें घरटें, पाऊस, सामुदायिक चळवळी–पैसाफंड इ.

समारोपः— दिसावयास क्षुल्लक अशा वस्तूंचें व कार्यांचें सामुदायिक महत्त्व जाणावें. एकीचें बळ.

## (११) आजचा शेतकरी

प्रस्तावनाः— पूर्वीच्या पाटलाचें वैभव. त्याच घराण्यांची आजची स्थिति. त्याची झोपडी.

त्याचा पोषाख. त्याचा दिनक्रम. त्याचे नातेवाईक. आर्थिक परिस्थिति. सावकारांचा जाच. दुष्काळाची भीति. यांत्रिक युगांत त्याच्या श्रमाचें मोल. शहराकडे जाण्याची ओढ. तरुण गिरणीकडे धांवतात. वृद्ध शेतांत कष्टानें मरतात. निसर्गाचें वैभव डोळ्यासमोर असून कष्टमय जीवन.

**उन्नतीचे कांहीं मार्ग**—( १ ) साक्षरता-प्रसार. ( २ ) मोफत औषधालयें. ( ३ ) कायद्याचा सल्ला. ( ४ ) सहकारी पतपेढी.

## ( १२ ) आजची रंगभूमि

**प्रस्तावनाः—** लोकांच्या करमणुकीच्या आवडींतील फरक.
थोडा पैसा--थोडा वेळ.
चित्रपटास महत्त्व.

रंगभूमीच्या अवनतीचें कारणः—
( १ ) नाटकें प्रचलित जीवनापासून दूर.
( २ ) चित्रपटापेक्षां जास्त कृत्रिमता.
( ३ ) चित्रपटापेक्षां आकुंचित कार्यक्षेत्र.
( ४ ) चांगल्या नटांची चित्रपटाकडे ओढ.
उदा०—बालगंधर्व, मास्तर कृष्णराव.

रंगभूमीच्या उद्धाराचा संभव आहे काय ?
रंगभूमीचीं कांहीं वैशिष्ट्यें.
( १ ) नटाच्या व्यक्तिवैशिष्ट्यास भरपूर वाव.
( २ ) कमी खटाटोपांत कलेची सेवा.

**समारोपः—** 'रंगभूमीस चित्रपट-सृष्टींतील यांत्रिक सामर्थ्याची जोड.
आधुनिक जीवनावर प्रकाश पाडणारीं नाटकें

व नाटिका. उदा०—बालमोहन कंपनीचीं प्रि. अत्रेकृत नाटकें. श्री. वरेरकर यांचीं नाटकें. देवमाणूस, घरकुल, कुलवधू इत्यादि नाटकें.

## ( १३ ) आजची विजयादशमी

**प्रस्तावनाः—** पेशवाईतील दसऱ्याची स्वारी; आक्रमणाचा मुहूर्त साजरा करण्याचा दिवस.

आजची सीमोल्लंघनाची मिरवणूक.

( १ ) आपल्याच गांवची सीमा.

( २ ) उल्लंघन कशाचें ?

( ३ ) धान्याचे कोवळे तुरे,
शमीचीं पानें-तेंच सोनें.
घरीं परत आल्यावर ओवाळणें.
यांतील निर्जीवता.

( ४ ) पूर्वीचे इतर प्रकार : रेड्याचा बळी इ.

आज विजयादशमी-कशी साजरी करावी ?

पूर्वीच्या पराक्रमाची आठवण.
चालू जीवनाचें सिंहावलोकन.
केशवसुतांच्या 'सिंहावलोकन' या कवितेंतील मुख्य विचार.

## ( १४ ) साहसे श्रीः प्रतिवसति

**प्रस्तावनाः—** कोलंबसानें जलप्रवासाचें धाडस केलें नसतें तर— शिवाजीनें आग्र्याहून सुटण्याचें धाडस केलें नसतें तर—संशोधकानें शास्त्रीय शोधासाठीं आपला प्राण धोक्यांत घातला नसता तर—

( १ ) जगाची सुधारणा कांहीं साहसी लोकांच्या साहसामुळें झाली आहे.

( २ ) सामान्य माणूस व साहसी माणूस यांतील फरक.

साहसाचें स्वरूपः— परिणामाची, यशापयशाची पर्वा न करतां ईश्वरावर हवाला ठेवून कार्यांत उडी घेणें. सामान्य माणूस नफा-तोट्याचा हिशेब करीत बसतो.

सामान्य माणसासहि साहसाची जरूरी.

प्रत्येक वेळीं परिणामाचा अंदाज करतां येणार नाहीं. कांहीं प्रसंगीं साहस करावें लागतें.

साहसी माणसें स्वतः विजयी होतात किंवा त्यांच्या आत्मदानानें जग सुखी होतें.

समारोपः— साहसाची तयारी आपण स्वयंस्फूर्तीनें केली पाहिजे. साहसाचा हेतु शुद्ध असावा.

## ( १५ ) आतिथ्य

प्रस्तावनाः— अतिथिदेवो भव। या वचनांतील तत्त्व.

( १ ) अतिथींचे प्रकार. अनपेक्षितपणें सेवा करण्याचे प्रसंग साधणें.

( २ ) आतिथ्य आणि आदर.

आतिथ्याचें योग्य स्वरूप.

( १ ) अतिथीची योग्यता.

( २ ) आतिथ्याची पद्धति.

प्रचलित स्वरूपः—

( १ ) दुर्गुणी, आळशी लोकांस उत्तेजन.

( २ ) दानधर्माविषयीं पुण्याच्या वेडगळ कल्पना.

समारोपः— दानधर्म उपकारक असावा.

अस्थानीं दान हें पाप आहे.

भिकारी म्हणजे अतिथि नव्हे.

## ( १६ ) सहशिक्षण

प्रस्तावनाः— शिक्षणाचें ध्येय : व्यक्तीचीं सर्व कर्तव्यें करण्याची योग्यता.

स्त्रीपुरुषांस एकमेकांच्या स्वभावधर्मांची माहिती पाहिजे.

विभक्त राहण्याचे परिणामः—एकमेकांविषयींच्या अज्ञानाचे दुष्परिणामः—

स्त्रिया दुबळ्या, चंचल इत्यादि समज.

पुरुषच फक्त कर्तबगार हा भ्रम.

स्त्री-समाज एक निरुपयोगी ओझें ही चुकीची सामाजिक समजूत.

सहशिक्षणाचे हेतु

(१) स्त्री-पुरुषांतील सहकार्याची भूमिका तयार होणें.

(२) परस्परांविषयींच्या कुतूहलाचें आरोग्यमय नियमन.

आक्षेप :

(१) अनैतिक आचरण.

(२) स्त्रिया 'पुरुषी' होतात. पुरुष 'बायकी' होतात.

आक्षेपांचें निराकरण :

(१) प्राथमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण एवढेंच सहशिक्षणानें द्यावें.

(२) आदर्श गुरूंचें नेतृत्व.

(३) शिक्षणपद्धति आजच्यापेक्षां निराळी पाहिजे.

(४) खऱ्या अर्थानें—मानसिक देवघेवीचें साहाय्य पाहिजे.

(५) आजचें सहशिक्षण हें 'सह' शिक्षण नाहीं. विद्यार्थि-विद्यार्थिनींत शिस्तीच्या विचित्र कल्पनांनीं 'बांध' घातलेले आहेत.

समारोपः— सहशिक्षणाच्या सुपरिणामाचीं उदाहरणें. पाश्चिमात्य देशांतील स्त्रियांचें कर्तृत्व.

## ( १७ ) वसतिगृहांतील जीवन

प्रस्तावनाः— वसतिगृहांतील पहिला दिवस.
( १ ) अनोळखी जग.
( २ ) कांहीं गैरसोयी.
( ३ ) शिस्तीचें बंधन.

सुपरिणामः— वसतिगृह ही जगाची छोटी आवृत्ति.
मानवी स्वभावाचे विविध नमुने.
सामाजिक गुणांची वाढ.
वैयक्तिक गुणः सहनशीलता, शिस्त इ.
घराची खरी जाणीव.

संभवनीय दुष्परिणामः ( १ ) कुसंगति
( २ ) स्वैराचाराची वृत्ति
( ३ ) अनादराची वृत्ति

समारोपः— आवश्यक गोष्टी : व्यवस्थापकांचें आदर्श-जीवन.
गृहजीवनाचा मधून मधून अनुभव.

## ( १८ ) मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात

प्रस्तावनाः— बीं व झाड यांचे संबंध
'झाड म्हणजे पूर्ण वाढलेलें बीं.'
म्हणीचा अर्थ : 'पाय' भावी जीवनाचें बीज–पाया. मूलभूत प्रवृत्ति.
पाळणा–जीवनाचा आरंभ.

शिशुजीवनः— बाह्य जीवनांत दिसणारें कांहीं गुणांचें प्रतिबिंब.
उदाहरणेंः मुलाच्या कांहीं आवडी-निवडींचा अर्थ.

म्हणीचें विवेचनः— म्हणींतील सत्य मर्यादित आहे.
उदाहरणेंः कांहीं माणसांचें बाल्य व प्रौढत्व

यांत अंतर पडतें. आईबापांचे अंदाज चुकतात.
कारणें:—संगति, परिस्थिति इत्यादींमुळें नैसर्गिक प्रवृत्तींत फरक पडतो.
मनुष्यः निसर्ग-परिस्थिति.
बालमानसशास्त्राचें आधुनिक शिक्षणांतील महत्त्व.

समारोपः— पाळण्यांतील पाय—नैसर्गिक प्रवृत्ति—ओळखून त्यांच्या वाढीस साहाय्य करणें हें शिक्षणाचें कार्य. बालकें हीं राष्ट्राची संपत्ति.

समारोपः— मुलांना ‘ कळत नाहीं ’ हें म्हणणें खोटें आहे.

## ( १९ ) शाळेमध्यें धार्मिक शिक्षण असावें काय ?

प्रस्तावनाः— शिक्षणाचा हेतु—आदर्श नागरिक तयार करणें. ज्ञानापेक्षां चारित्र्यसंवर्धन जास्त महत्त्वाचें.
( १ ) वरील हेतूनें निरनिराळ्या विषयांचा उपयोग.
( २ ) धार्मिक शिक्षणानें आपली परंपरा व संस्कृति यांचें ज्ञान होतें.

आक्षेपः— ( १ ) नाना धर्मपंथांमुळें समाजांत होणारे कलह शालेय जगांत येतील. कलहाची वृत्ति फोफावेल.
( २ ) नाना धर्मपंथांच्या विद्यार्थ्यांना एकच शिक्षण-पद्धति असणें अशक्य.

आक्षेपांस उत्तरः— आचारधर्मापेक्षां विचारधर्माचें शिक्षण द्यावें, कारण सर्व धर्मांची विचारांची बैठक एकच आहे.

समारोपः— धर्मशिक्षण नैतिक शिक्षणास साहाय्यक होईल.

## ( २० ) फेरीवाला

प्रस्तावनाः— एका फेरीवाल्याची आरोळी. त्याचें वर्णन. पोषाख इ.
संग्रह...

नं. न. ९०३५

हातगाडीवरील वस्तुसंग्रह.
गिऱ्हाइकांशीं वागण्याची तऱ्हा.
लहान मुलाची विशेष ओढ.

दुकानदार व फेरीवाला यांची तुलना
(१) भांडवल.
(२) वस्तुसंग्रह.
(३) गिऱ्हाइकांची सोय.

फेरीवाल्याचे गुणः—१ आर्जवीपणा. २ कष्टाळूपणा.
३ गिऱ्हाइकांच्या आवडी ओळखण्याचें ज्ञान.
४ फेरी घालण्याचा प्रांत निवडण्यांतील शहाणपण.

कांहीं तक्रारीः—(१) लोकांचा शांतताभंग. (२) कमी दर्जाचा माल.
(३) कांहीं वेळां फसवणूक.

समारोपः— फेरीवाल्याचें दारिद्र्य, कष्ट व आपली सोय या दृष्टीनें त्याविषयीं सहानुभूति बाळगावी.

REFBK-0006847